


# महान वादविवाद

## पवित्र शास्त्राची अभ्यासिका

कायदेशीर अधिकृत हक्क (C) २००३
मर्लिन बियरमन आणि रेवेलेशन प्रकाशन
जागतिक स्तरावर अधिकृत हक्क.

### *वितरणाच्या परवानगीसाठीच्या अटी*

आम्हाला ह्या गोष्टीची जाणीव आहे कि जर तुम्ही हे साहित्य इतरांच्या पर्यंत पोहचवले नाही तर प्रभूसमोर तुम्ही जवाबदार ठरणार, म्हणूनच आम्ही तुम्हाला हे साहित्य इतरांना देण्याचे उत्तेजन देतो आणि ते देखील कोणत्याही प्रकारे ग्रंथाचे शुल्क अथवा मानधन न आकारता पण तसे वितरण तुम्ही पुढील सूचनांचे अवलंबन करून करू शकता. ही अभ्यास मार्गदर्शिका तुम्ही एका पीडीएफ स्वरुपात जतन करून त्याची झेरॉक्स काढून इतरांना ते देऊ शकता. ह्याची विक्री करता येणार नाही, किंवा त्यात कोणत्याही प्रकारे फेरबदल करता येणार नाही आणि ही कायद्याची अधिकृत सूचना प्रत्येक प्रतीमध्ये असणे आवश्यक आहे.

प्रश्न आणि संकलन मर्लिन बियरमन द्वारे
उदाहरणे- कायदेशीर अधिकृत हक्क (C) लार्स जस्तीनेन
शब्दकोश हा ई. जी. व्हाइट ह्यांच्या महान वादविवाद ह्यातील अध्यायांमधून संक्षिप्त स्वरुपात तयार करण्यात आला आहे.

*प्रश्नांची उत्तरे ही बायबल सोसायटीची आर.वी. आवृत्ती ® शास्त्रवचनातून घेण्यात आली आहेत. सर्व कायदेशीर हक्क अधिकृत आहेत.*

**ह्या अभ्यासिकेचा शब्दकोश हा महान वादविवाद ह्या महान पुस्तकातून संक्षिप्त स्वरुपात घेण्यात आले आहेत. अधिक चांगल्या अर्थाने ते समजून घेण्यासाठी तुम्ही पूर्ण पुस्तक मिळवावे ह्यासाठी आम्ही तुम्हाला उत्तेजन देतो.**

## अनुक्रमणिका

१.दुष्टाईचा उगम
२.मनुष्य आणि सैतान ह्यांच्यातील शत्रुत्व
३.दुष्ट आत्म्यांचे माध्यम
४.सैतानाचे जाळे
५.पहिली महान फसवणूक
६.मृत व्यक्ती आपल्याशी बोलू शकतात का?
७.जवळ येऊन ठेपलेला संघर्ष
८.शास्त्रवचने एक सुरक्षेचे स्थान
९.अंतिम इशारा
१०.त्रासाचा समय
११.देवाच्या लोकांची सुटका
१२.पृथ्वी ओसाड पडणे
१३.वादविवादाची समाप्ती

## परिशिष्ट
## जाणीवबुजून प्रस्तुत केलेल्या धाकाच्या प्रस्तावनेचे स्वातंत्र्य

हे पुस्तक पाप आणि त्यावरील विनाश अस्तित्त्वात आहे हे सांगण्यासाठी प्रकाशित केलेले नाही; ही वस्तुस्थिती खूप स्पष्ट आहे.

चांगले आणि वाईटाचे जीवन आणि मरण यांच्या दरम्यानच्या या अपरिवर्तनीय संग्रामात भाग घेण्यास भाग पाडणारा सहभागी म्हणून, आपण कधी हे विचारता का:

*ही महान लढाई कशी सुरू झाली?*
*कोणत्या तत्त्वांचा समावेश आहे?*
*ही किती काळ चालू राहील?*
*ती कधी संपेल?*
*माझी फसवणूक कशी होऊ शकत नाही?*
*माझ्या अंत: करणातील लढाई चांगल्यासाठी विजयात कशी मुळावली जाऊ शकते?*
*आपण मृतांशी संवाद साधू शकतो?*
*माझ्या अस्तित्वाचा हेतू काय आहे?*
*शेवट जवळ येत आहे हे मला कसे समजेल?*
*वेदना, दु: ख, अन्याय आणि मृत्यूपासून मुक्त भविष्य मिळण्याची खरोखर आशा आहे का?*

**धैर्य धरा! देव, ज्याने आपल्यामध्ये चांगल्या अस्तित्वाची आणि सत्याची इच्छा निर्माण करण्याची इच्छा निर्माण केली त्या देवाने तुमच्याकडून हे जीवन देणारे ज्ञान मागे ठेवले नाही.**

**महान वादविवादाची पवित्र शास्त्रीय अभ्यासिकेच्या अविश्वसनीय प्रवासात तुम्हाला आमंत्रण आहे. वरील प्रश्नांची तुम्ही उत्तरे शोधात असताना, तुम्हाला अंतिम दिवसांच्या त्या घटनांची समज येईल ज्यामुळे तुमचे सार्वकालिक भवितव्य निश्चित करण्यासाठी योग्य निर्णय घेण्यास सहाय्य मिळेल.**



# धडा १
# दुष्टाईचा उगम

## (१) पापासाठी देव का जवाबदार नाही?

***कोणाची परीक्षा होत असता, देवाने मला मोहात घातले, असे त्याने म्हणू नये; कारण देवाला वाईट गोष्टींचा मोह होत नाही आणि तो स्वतः कोणाला मोहात पाडत नाही. (याकोब १:१३)***

पापाच्या अस्तित्वाचे कारण देण्यासाठी त्याचा उगम स्पष्ट करून सांगणे अशक्य आहे. तरीही. तरीही पापाचा उगम आणि त्याचा प्रसार ह्याविषयी पुष्कळ माहिती समजून घेण्यात आली आहे व ह्यातून देव दुष्टाईला हाताळत असताना त्याचा न्याय आणि दयाळूपणा प्रदर्शित करतो. ह्यापेक्षा अधिक स्पष्ट शास्त्रवचनात शिकवले गेले नाही की देव पापाच्या प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारे जवाबदार नाही; कोणत्याही प्रकारे त्याची कृपा परावृत्त झाली नाही,दैवी शासनात काही कमतरता नव्हती, ज्याने बंडखोरी वर उभरून येण्यास एक प्रसंग उपलब्ध करून दिला.

## (२) पापाची पवित्र शास्त्रीय व्याख्या काय आहे?

*जो कोणी पाप करतो तो स्वैराचार करतो; कारण पाप स्वैराचार आहे. (१ योहान ३:४)*

पाप एक घुसखोर आहे, ज्याच्या संनिध्यासाठी काहीच कारण देता येत नाही. ते रहस्यमय आहे, बेहिशोबी आह; त्याला वगळणे म्हणजे त्याला उचलून धरण्यासारखे आहे. त्यासाठी सबब शोधता येते का, अथवा त्याच्या अस्तित्वासाठी कारण देता येते का, तसे झाल्यास पाप म्हणून ते संपुष्टात येईल. आपली पापाची एकमेव व्याख्या म्हणजे जी देवाच्या वचनात दिलेली आहे; ते म्हणजे "नियमशास्त्राचे उल्लंघन;" ते एका तत्वाच्या पलीकडचे कार्य आहे जे प्रीतीच्या महान नियमशास्त्रासोबत युद्धात आहे आणि हा दैवी शासनाचा आधारस्तंभ आहे.

## (३) देवाच्या शासनाचे वैशिष्ट्य म्हणून कोणती चार मुलभूत तत्वे आहेत?

*नीती व न्याय ही तुझ्या राजासनाचा पाया आहेत; दया व सत्य तुझे सेवक आहेत. (स्तोत्रसहिता ८९:१४)*

देवाच्या शासनाचा पाया किंवा आधारस्तंभ म्हणजे प्रेमाचे नियमशास्त्र, सर्व निर्मित सजीवांचा आनंद हा नितीमत्वाच्या महान तत्वांशी जुळवून घेण्यावर अवलंबून आहे. देव आपल्या प्रत्येक निर्मितीकडून प्रेमाची सेवा वृत्ती ठेवण्याची इच्छा बाळगतो आणि ही त्याच्या चारित्र्याच्या बौद्धिक कौतुकातून उदयास येते. जबरदस्तीच्या संबंधात त्याला स्वारस्य नाही, आणि प्रत्येकाला तो इच्छा स्वातंत्र्य देतो, की प्रत्येकाने स्वेच्छने सेवा करावी.

पण एक असा होता त्याने हे स्वातंत्र्य बदलण्याचा निर्णय घेतला.

**(४)देवाच्या नियमशास्त्राचे उल्लंघन कोणी केले आणि त्याद्वारे पापाचा उत्पादक बनला?**

*“हे देदिप्यमान तार्‍या, प्रभातपुत्रा, तू आकाशातून कसा पडलास !राष्ट्रांना लोळवणार्‍या तुला धुळीत कसे टाकले! (यशया १४:१२)*

पापाचा उगम त्यामध्ये आहे, ज्याला ख्रिस्ताच्या सोबत देवाने अत्यंत सन्मानित केले होते आणि जो स्वर्गातील रहिवास्यांमध्ये सामर्थ्य आणि गौरव ह्यात सर्वोच्च म्हणून ओळखला जात होता.

**(५) देवाने कोणत्या स्थितीत लुसिफरला निर्माण केले?**

*तुला निर्माण केले त्या दिवसापासून तुझ्या ठायी अधर्म दिसून येईपर्यंत तुझी चालचलणूक यथायोग्य होती. (यहज्केल २८:१५)*

त्याचे पतन होण्यापूर्वी, लुसिफर एक पहिला करूब होता, पवित्र आणि शुद्ध.

**(६) लुसिफरने वस्ती करत राहण्यासाठी कोणत्या गुणधर्माची निवड केली ज्याचा शेवट म्हणजे स्वतःला उंचावण्याच्या पापी इच्छा बाळगण्याकडे प्रवृत्त केले?**

*“तुझ्या सौंदर्याच्या अभिमानाने तुझे हृदय उन्मत्त झाले, तुझ्या वैभवाने तुझी बुद्धी भ्रष्ट झाली; मी तुला भूमीवर आदळले, राजांनी तुझा तमाशा पाहावा म्हणून त्यांच्यापुढे तुला टाकले... (यहज्केल २८:१७)*

लुसिफर अगदी योग्य रीतीने देवाच्य कृपेत व प्रसादात राहिला असता, सर्व देवदुतांचा प्रिय आणि सन्माननीय बनला असता, त्याच्या उदार सामर्थ्याचा वापर इतरांना आशीर्वाद देण्यासाठी आणि निर्माणकर्त्याचे गौरव करण्यासाठी केला असता ....... अंशतः टप्प्या टप्प्याने, लुसिफर स्वतःला गौरवण्याच्या आणि उंचावण्याच्या इच्छेत अडकत गेला.....देवाला त्याच्या सर्व निर्मितीत सर्वोच्च बनवण्याच्या ऐवजी, लुसिफरला हे सर्व स्वतःसाठी मिळवून घेण्याची इच्छा होती. अमर्याद पित्याने जो सन्मान त्याच्या पुत्रावर देऊ केला होता ह्याचा लोभ धरून, ह्या देवदूतांच्या राजकुमाराने तो सन्मान बाळगण्याची इच्छा धरली ज्याचा एकमेव हक्क आणि अधिकार हा ख्रिस्ताचा होता.

**(७) पापाचा परिणाम काय आहे- देवाच्या नियमशास्त्राच्या विरुद्ध बंडखोरी?**

***कारण पापाचे वेतन मरण आहे; पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे. (रोमकरास पत्र ६:२३)***

निर्माणकर्त्याचे गौरव आणि वैभव प्रदर्शित करण्यासाठी सर्व स्वर्ग उल्लासित होते. आणि देवाचा सन्मान होत असताना, सर्वत्र शांती आणि आनंद होता. पण आता ह्या स्वर्गीय दैवी शांतीत भंग पडला. सेवा आणि स्वतःला उंचावण्याची प्रवृत्ती जी निर्माणकर्त्याच्या विरोधात होते, ह्याद्वारे ज्या लोकांसाठी देवाचे गौरव हे अलौकिक होते त्यांच्या मनात त्याद्वारे दुष्टत्व उत्पन्न झाले.

स्वर्गीय दूतांच्या सैन्याने लुसिफरची याचना केली. देवाच्या पुत्राने त्याच्यासमोर ते

वैभव, थोरवी, चांगुलपण, उत्पन्नकर्त्याचा न्याय, आणि त्याच्या नियमशास्त्राचा पवित्र, न बदलणारा स्वभाव व्यक्त केला. देवाने स्वतः स्वर्गातील क्रम न सुसंगतीची स्थापना केली; आणि त्यापासून दूर जाण्याने , लुसिफर निर्माणकर्त्याचा अवमान करत होता, आणि त्याद्वारे स्वतःवर नाश व विध्वंस ओढवून घेत होता. पण अमर्याद प्रीती आणि दया ह्याद्वारे देण्यात आलेली सूचना ह्याने तर केवळ त्यामध्ये एक प्रतिकार देण्याची वृत्ती निर्माण झाली. लुसिफरने देवाच्या आवेशाला तसेच तेवत ठेवण्यास परवानगी दिली, आणि तो अधिक दृढनिश्चयी होत गेला.

**(८) लुसिफरच्या स्वतःवरच्या गर्वाने त्यामध्ये काय बाळगण्याची इच्छा उत्पन्न केली?**

***जो तू आपल्या मनात म्हणालास, 'मी आकाशात चढेन, देवाच्या तारांगणाहून माझे सिंहासन उच्च करीन, उत्तर भागातील देवसभेच्या पर्वतावर मी विराजमान होईन; मी मेघांवर आरोहण करीन, मी परात्परासमान होईन;' (यशया १४:१३-१४)***

स्वतःच्या गौरवात गर्व बाळगणे ह्यामुळे त्यात वरचढ होण्याची इच्छा अत्यंत पोषित होत गेली. लुसिफरला जे उच्च कोटीचे गौरव आणि सन्मान देण्यात आले होते त्याचे देवाचे वरदान म्हणून कौतुक झाले नाही आणि निर्माणकर्त्याच्या प्रती त्याची काहीच कृतज्ञता नव्हती. त्याने स्वतःच्या प्रज्वलित स्वभावावर गौरव करून स्वतःला उंचावले आणि देवाच्या समान होण्याची इच्छा बाळगली. स्वर्गीय दुतांचा तो प्रिय असून त्याला पवित्र लेखले जात असते. दूतांना त्याच्या आज्ञांचे अवलंबन करण्यात आनंद होता, आणि सर्वांपेक्षा त्याला

अधिक गौरव आणि सुज्ञान देऊन मंडित करण्यात आले होते. तरीही देवाचा पुत्र हा स्वर्गातील सन्माननीय सार्वभौम असा जाणला जाऊन, तो पित्याचा अधिकार आणि सामर्थ्य ह्यांच्यात एकसमान असा होता. देवाच्या सर्व प्रकारच्या सल्लामसलतीत, ख्रिस्त सहभागी होता, आणि लुसिफरला त्या दैवी कार्यात प्रवेश नव्हता. "का,"असा प्रश्न ह्या महान दूताने केला,"ख्रिस्ताला हे अलौकिकत्व आणि वर्चस्व का मिळावे? त्याला लुसिफरच्या वर का सन्मानित केले जावे?"

**(९) लुसिफरच्या फसवणुकीच्या कटरचनेत त्याने स्वतःसाठी काय ख्याती मिळवली?**

***तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता.तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही.तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे. (योहान ८:४४)***

देवाच्या सान्निध्यातील त्याचे स्थान सोडून, लुसिफर सर्वत्र दुतांमध्ये असमाधानाची वृत्ती पसरवू लागला. ह्या रहस्यमय गुपिताने काम करत असताना, आणि देवासाठी खरा सन्मान आणि आदर व्यक्त करण्यामागे त्याचा खरा उद्देश लपवून ठेऊन, स्वर्गीय सेनेवर अधिकार गाजवणाऱ्या नियमशास्त्रांबद्दल त्याने असंतुष्ट वृत्ती उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला, अशी भीती उत्पन्न केली की हे सर्व जबरदस्तीने एक अनावश्यक बंधन लादण्याचा प्रयत्न करतात. त्यांचे स्वभाव पवित्र असल्याने, त्याने आर्जव केला की दूतांनी स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागले पाहिजे.

त्याने स्वतःप्रती सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला असे म्हणत की देवाने ख्रिस्तावर सर्व श्रेष्ठत्व देऊन त्याच्यावर कसा अन्याय केला आहे. त्याची अशी धारणा होती की अधिक सामर्थ्य आणि सन्मान मिळवण्याची इच्छा बाळगून तो काही स्वतःला उंचावण्याचा प्रयत्न करत नव्हता, पण स्वर्गातील सर्व रहिवास्यांसाठी तो ते स्वातंत्र्य मिळवण्याची धडपड करत होता, जेणेकरून ह्याद्वारे त्यांच्या अस्तित्वाला एक अधिक वरचा स्तर प्राप्त होईल.

**(१०) देव आपल्याबद्दल करतो तसेच लुसिफर सोबत वागत असताना देवाच्या कोणत्या चारित्र्यगुणाचे प्रदर्शन येथे होते?**

***किंवा देवाची ममता तुला पश्चात्तापाकडे नेणारी आहे हे न समजून तू त्याची ममता, क्षमा व सहनशीलता ह्यांच्या विपुलतेचा अनादर करतोस काय?***
***(रोमकरास पत्र २:४)***

देव त्याच्या दयेच्यानुसार लुसिफरचे सहन करत गेला. त्याला लगेच प्रथम जेव्हा त्याने असमाधान व्यक्त केला तेव्हा किंवा जेव्हा दूतांच्या समोर त्याने आपले खोटे मत सादर केला तेव्हा देखील त्याच्या उच्च स्थानावरून खाली घेण्यात आले नाही. खूप दीर्घकाळ त्याला स्वर्गात ठेवण्यात आले. पश्चाताप आणि समर्पण ह्या अटींवर त्याला वारंवार क्षमा करण्यात आली. असे प्रामाणिक प्रयत्न जे केवळ अमर्याद प्रेम आणि सुज्ञान व्यक्त करू शकतात हेच केवळ त्याच्या चुकीची जाणीव करून देण्यासाठी करण्यात आले.

त्या पूर्वी असमाधानाचा आत्मा स्वर्गात कोणालाही ठाऊक नव्हता. लुसिफरने स्वतः तो

कुठे चालला आहे हे पहिले नाही; त्याच्या भावनांचा खरा स्वभाव त्याला समजला नाही. पण कोणतीही सबब न देता त्याची असमाधानी वृत्ती जशी सिद्ध झाली, लुसिफरला खात्री पटली की तो चुकीचा होता, दैवी जे प्रतीपादन होते हे रास्त व योग्य असून, आणि आहेत तसे संपूर्ण स्वर्गासमोर त्याला ते मान्य करणे गरजेचे होते. त्याने हे जर केले असते तर, त्याने स्वतःचा आणि अनेक देवदुतांचा बचाव केला असता. आतापर्यंत त्याने देवाच्याप्रती असलेले संबंध सोडले नव्हते.

जरी करूब असण्याचे स्थान त्याने सोडले, तरीही जर त्याला देवाकडे परत जायची जर इच्छा असती, आणि देवाचे निर्माणकर्त्याचे सुज्ञान त्याने स्वीकारले असते, आणि देवाच्या महान योजनेत जे स्थान त्याला देण्यात आले होते त्यात जर तो समाधानी असता तर, त्याच्या स्थानावर पुन्हा त्याला स्थानापन्न केले गेले असते. पण गर्व त्याच्या समर्पणाच्या आड आला. त्याने सातत्याने स्वतःचेच मत मांडले, पश्चातापाची गरज नाही असे ठामपणे व्यक्त केले, आणि निर्माणकर्त्याच्या विरोधात असलेल्या ह्या महान वादविवादात तो सहभागी झाला.

**(११) त्याच्या बंडखोरीच्या दरम्यान, सैतानाने किती देवदूतांना फसवण्यात यश मिळवले?**

*त्याच्या शेपटाने' आकाशातील तार्‍यांपैकी एक तृतीयांश तारे 'ओढून काढून ते' पृथ्वीवर पाडले'; ती स्त्री प्रसूत होईल तेव्हा तिचे मूल खाऊन टाकावे म्हणून तो अजगर त्या प्रसवणार्‍या स्त्रीपुढे उभा राहिला होता. (प्रगटीकरण १२:४)*

सैतानाच्या सर्व प्रकारच्या क्लुपत्या डोक्यात ठेऊन आता फसवणुकीच्या कार्यावर

त्याचे लक्ष केंद्रित होते, त्याच्या अधिकारात जे देवदूत होते त्यांची सहानुभूती मिळवण्याची त्याने धडपड केली. त्याच्या सर्व कटकारस्थानांना मुभा देण्यासाठी त्याने ख्रिस्ताची सूचना आणि सल्लामसलत ह्याकडे देखील दुर्लक्ष केले. ज्या लोकांच्या प्रेमपूर्वक विश्वासाने त्याला जवळ बांधून ठेवले, सैतानाने असे प्रस्तुत केले की चुकीच्या पद्धतीने त्याचा न्याय झाला आहे, त्याच्या स्थानाला कोणीही सन्मान देत नव्हते, आणि त्याचे स्वातंत्र्य धोक्यात होते.

ख्रिस्ताच्या शब्दांना चुकीच्या रीतीने मांडून, तो थेट लबाडीकडे गेला, आणि स्वर्गातील निवासी ह्यापुढे देवाच्या पुत्राला अवमानित करण्यासाठी त्यावर एक खोटा दोषारोप सिद्ध करत गेला. स्वतःमध्ये आणि प्रामाणिक देवदूतांच्या मध्ये देखील खोट्या बाबी उत्पन्न करण्याचा त्याने कट रचला. ज्या सर्वांना फसवून स्वतःच्या बाजूने तो करवून घेऊ शकला नाही त्यांच्यावर स्वर्गीय गोष्टींच्या बद्दल बेफिकीर असल्याचा त्याने दोष लावला. जे कार्य तो स्वतः करत होता त्याचा आरोप त्याने जे देवाशी एकनिष्ठ व खरे होते त्यांच्यावर लादण्याचा प्रयत्न केला. आणि देव त्याच्याप्रती कसा अन्यायी होता हे मत ठामपणे व्यक्त करत राहून, निर्माणकर्त्याचे शब्द आणि कृती ह्यांचे त्याने चुकीच्या अर्थाने प्रदर्शन केले. देवाच्या हेतूंच्या बद्दल देवदुतांमध्ये त्याने अगदी सूक्ष्म रीतीने वाद छेडून देऊन त्रस्त करण्याचे धाडस केले. जे काही सर्व सोपे साधे होते त्याला रहस्यमय बनवण्याचा प्रयत्न करून, आणि अगदी कलेने लोकांचे मत बदलवून यहोवाचा अगदी साध्या विधानांवर देखील शंका उपस्थित करण्याचे धाडस केले. त्याचे उच्च स्थान, जे दैवी व्यवस्थापनेच्या अगदी जवळचे

होते, त्यांनी त्याच्या प्रदर्शनाला अत्यंत जबरदस्त रीतीने प्रस्तुत केले, आणि त्यामुळे स्वर्गीय अधिकाराच्या विरोधात अनेकजण बंडखोरी करण्याच्या त्याच्या कटात सामील झाले.

**(१२) देवाने त्याच्या अमर्याद सुज्ञानात सैतानाला त्याचे खरे चारित्र्य का व्यक्त करण्याची परवानगी दिली?**

*सात्त्विकपणे चालणारा निर्भयपणे चालतो; कुटिल मार्गांनी चालणारा कळून येईल. (नितीसुत्रे १०:९)*

देवाने, त्याच्या ज्ञानात , सैतानाला हे कार्य करू दिले, जोपर्यंत प्रेम नसलेल्या आत्मा परिपक्व होऊन तीव्र स्वरूपाने बंड करू लागला. त्याच्या योजना पूर्णपणे विकसित होणे गरजेचे होते, जेणेकरून त्यांचा खरा स्वभाव आणि मनोवृत्ती सर्वच पाहू शकतील.

लुसिफर, अभिषिक्त करूब ह्या नात्याने, अति उंचावला गेला होता, स्वर्गीय दुतांचा तो लाडका होता, आणि त्याचा त्यांच्यावरील प्रभाव देखील जबरदस्त होता. देवाच्या शासनात केवळ स्वर्गीय रहिवासी नव्हते, पण जे सर्व विश्व त्याने निर्माण केले होते; आणि सैतानाला वाटले की सोबत त्याने इतर दूतांना जर ह्या बंडाईमध्ये घेतले तर, इतर विश्वांना देखील तो सहजपणे घेऊ शकतो.

त्याच्या दृष्टीने त्याने अत्यंत धूर्तपणे तो प्रश्न मांडला होता, त्याचे मत सिद्ध करण्यासाठी खोटे बेत आणि हेतू ह्यांचा वापर केला. फसवण्याचे त्याचे सामर्थ्य महान होते, आणि ह्या लबाडीच्या झग्यात स्वतःला नेसून त्याला फायदा मिळाला होता. प्रामणिक

देवदूतांना देखील त्याचा स्वभाव कळला नाही किंवा त्याचे कार्य कोणत्या दिशेला जात आहे हे देखील त्यांना समजले नाही.

## (१३) बंडखोरीची सुरुवात होताच देवाने सैतानाचा नाश का केला नाही?

*सर्वसमर्थ तर अगम्य आहे, त्याचे सामर्थ्य अप्रतिम आहे; तो न्याय व महान नीतिमत्ता विपरीत करीत नाही. (इयोब ३७:२३)*

जेव्हा तो स्वर्गात आता ह्यापुढे राहणार नाही हे जेव्हा ठरवले गेले, ह्या अमर्याद सुज्ञानाने सैतानाला नष्ट केले नाही. प्रेमपूर्वक सेवा केवळ देवाला मान्य होते म्हणून, त्याच्या सृष्टीप्रती असलेले त्याचे संबंध हे त्याचा न्याय आणि औदार्य ह्यावर विसंबून होते. स्वर्ग आणि इतर विश्वातील रहिवासी, ह्यांना पापाचा स्वभाव आणि परिणाम जाणून न  घेण्याची तयारी, त्यामुळे सैतानाचा नाश होण्यात त्यांना देवाची दया आणि न्याय पाहू शकले नाही. जर त्याला लगेच त्याच्या अस्तित्वापासून दूर नेले असते तर, देवाची सेवा त्यांनी प्रेमाने नाही तर भयाने केली असती. फसवणाऱ्या व्यक्तीचा प्रभाव पूर्णपणे नष्ट झाला नसता, आणि तसेच बंडखोरीचा आत्मा नष्ट झाला नसता.

दुष्टाईला देखील परिपक्व होऊ दिले पाहिजे. अनेक युगांपासून संपूर्ण विश्वाच्या चांगुलपणासाठी सैतानाने त्याचे तत्व अधिक पूर्णपणे विकसित करावे, जेणेकरून दैवी शासनाच्या विरुद्ध करण्यात आलेले त्याचे आरोप सर्व निर्मितीला दिसतील , देवाचा न्याय आणि दया आणि त्याचे न बदलणारे नियमशास्त्र सर्व प्रश्नांच्या पलीकडे टिकाव धरू शकतील.

संपूर्ण विश्वासाठी आणि युगांमध्ये सैतानाची ही बंडखोरी एक धडा होती, पापाच्या भयंकर परिणाम आणि स्वभाव ह्यांची ती एक साक्ष होती. सैतानाच्या अधिकाराचे कार्य, मनुष्य आणि देवदूत ह्यांवरील त्याचे परिणाम, ह्याद्वारे दैवी अधिकाराला बाजूला ठेवले तर काय निष्पन्न होईल हे दाखवण्यात आले. देवाचे शासन आणि त्याचे नियमशास्त्र अस्तित्वात असणे हे त्याच्या सर्व सृष्टीच्या हिताशी जोडले गेले आहे. म्हणूनच बंडखोरीच्या ह्या भयंकर प्रयोगाचा इतिहास हा सर्व बौद्धिक दृष्टीने राखवून ठेवण्यासाठी रास्त होता, अधम आणि पाप ह्यांच्या स्वभावाला बळी न पडण्यास, आणि ते न करण्यास व त्याच्या शिक्षेपासून दूर राहण्यास त्यांचा बचाव होता.

**(१४) सैतानाच्या बंडखोरीने कोणत्या विध्वंसक घटनेला जन्म दिला?**

*मग स्वर्गात युद्ध सुरू झाले; 'मीखाएल' व त्याचे दूत अजगराबरोबर 'युद्ध करण्यास' निघाले, आणि त्यांच्याबरोबर अजगर व त्याचे दूत लढले; तरी त्यांचे काही चालले नाही, आणि स्वर्गात त्यांचे ठिकाणही उरले नाही.मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला, म्हणजे सर्व जगाला ठकवणारा, जो दियाबल व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट' साप 'खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले. (प्रगटीकरण १२:७-९)*

स्वर्गात असणाऱ्या या वादविवादाच्या शेवटी थोर रीतीने व्याप्त करून घेणारा स्वतःला स्पष्ट करत राहिला. जेव्हा ह्याची घोषणा झाली की त्याच्याशी जे सर्व सहानुभूती दाखवतात त्यांना देखील आनंदाच्या सर्व ठिकाणहून काढले

जावे, मग ह्या बंड पुढाऱ्याने निर्माणकर्त्याच्या नियमशास्त्राच्या प्रती ठामपणे त्याचा तिरस्कार दर्शवला. त्याने त्याचे मत पुन्हा दर्शवले की दुतांवर नियंत्रण असणे गरजेचे नाही, पण त्यांना स्वतःची इच्छा पार पाडण्याचे स्वातंत्र्य मिळावे, आणि ते त्यांना योग्य मार्गदर्शन करत राहील. दैवी नियम त्यांचे स्वातंत्र्य भंग करते असे म्हणून त्याचा त्याने त्याग केला आणि घोषणा केली की त्याचे ध्येय हे नियमशास्त्राचे उल्लंघन व्हावे हे होते; जे ह्या मर्यादेपासून मुक्त होऊन, स्वर्गीय सेना ही अधिक उच्च, वैभवी अस्तित्वात प्रवेश करू शकेल.

**(१५) स्वर्गातून बाहेर टाकल्यावर, सैतानाने कोठे त्याचे साम्राज्य प्रस्थापित करण्याची इच्छा बाळगली?**

***मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला, म्हणजे सर्व जगाला ठकवणारा, जो दियाबल व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट‘ साप ’खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले. (प्रगटीकरण १२:९)***

ज्या आत्म्याने स्वर्गात बंडखोरी उत्पन्न केली तो पृथ्वीवर देखील बंडखोरी उत्तेजित करतो. जी योजना सैतानाने देवदूतांच्या सोबत अवलंबिली तिच तो मनुष्यांच्या सोबत देखील योजत आहे. जे लेकरे अवज्ञा करतात त्यांच्यात त्याचा आत्मा वस्ती करतो. त्याच्यासारखे ते देखील देवाच्या नियमशास्त्रांचे निर्बंध तोडून मनुष्यांना त्यांच्या स्वातंत्र्याच्या योजनेची कल्पना देतात. पापाची जाणीव अजूनही त्यांच्यात द्वेष आणि प्रतिकार ह्यांचा आत्मा उत्तेजित करतात. जेव्हा देवाचे इशारे देणारे संदेश जाणीवेने समजले जातात, सैतान

मनुष्यांना स्वतःचे स्पष्टीकरण देऊन पापात इतरांची सहानुभूती मिळवून घेण्यास प्रवृत्त करतो. त्यांच्या चुकी सुधारण्याच्या ऐवजी, जो दोष लावतो त्याच्या विरोधात ते क्रोध निर्माण करतात, जणूकाही सर्व त्रासाचे मूळ तोच होता. नीतिमान हाबेलाच्या काळापासूनआपल्या समयापर्यंत असाच आत्मा तेवत आहे अशा लोकांच्या प्रती जे पापाचा धिक्कार  करण्याचे धाडस करतात.

जसे स्वर्गात देखील देवाच्या चारित्र्याच्या बद्दल त्याने गैरसमजूत पसरवण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे तो कठोर व क्रूर आहे असे चित्र प्रस्तुत व्हावे, सैतानाने मनुष्याला पाप करण्यास प्रवृत्त केले. आतापर्यंत ह्या बाबत यशस्वी होऊन, त्याने घोषणा केली की देवाच्या अन्यायी मर्यादा ह्या मनुष्याच्या पतनाचे कारण बनले, आणि हेच त्याच्या स्वतःच्या बंडखोरीचे देखील प्रमाण होते.

**(१६) देवाच्या चारित्र्याचे खरे स्वरूप काय आहे?**

*परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली“ : परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, हजारो जणांवर दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा, (पण अपराधी जनांची (मुळीच गय न करणारा, असा तो वडिलांच्या दुष्टाईबद्दल पुत्रपौत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो......”   (निर्गम ३४:६-७)*

**(१७) देवाने त्याची महान प्रीती आणि दया कशा प्रकारे दर्शवली?**

*देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की,*

*जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. (योहान ३:१६)*

सैतानाला स्वर्गातून हद्दपार करण्यात, देवाने त्याचा न्याय घोषित केला आणि त्याच्या सिंहासनाचे वैभव राखले. पण जेव्हा मनुष्याने ह्या आत्म्याच्या फसवणाऱ्या आत्म्याला बळी पडला, देवाने त्याच्या प्रेमाचा पुरावा म्हणून पतन पावलेल्या जमातीसाठी आपल्या एकुलत्या एका पुत्राचे बलिदान दिले. ह्या खंडणीमध्ये देवाचे चारित्र्य प्रगट होते. वधस्तंभाचा महान वाद संपूर्ण विश्वासमोर दर्शवतो की जो पापाचा महाभयंकर मार्ग लुसिफरने अवलंबिला हा देवाच्या शासनावर दोष लावत नाही.

**(१८) येशूला त्याच्या पृथ्वीवरील सेवाकार्यात नष्ट करण्याच्या सैतानाच्या दुष्ट हेतूला दुष्ट लोकांनी शब्दात कसे प्रगट केले?**

*"त्याला वधस्तंभावर खिळून टाका," अशी त्यांनी पुन्हा आरोळी केली!"(मार्क १५:१३)*

ख्रिस्त आणि सैतान ह्यांच्या स्पर्धेत, तारणार्याच्या पृथ्वीवरील सेवाकार्यात, महान लबाडी करणारा ठकावणारा ह्याचे चारित्र्य उघडकीस आले. जगाच्या उद्धाराकाच्या विरोधात त्याने जी बंडाई छेडली त्यापेक्षा अधिक काहीही सैतानाला स्वर्गीय सेना ह्यांच्या प्रेमापासून आणि संपूर्ण विश्वातून उध्वस्त करू शकले नसते. ख्रिस्ताने त्याला नमन करावे अशी घोर निंदा करण्याचे जे त्याने धाडस केले, पर्वतावर आणि मंदिराच्या कळसावर जी त्याने परीक्षा घेतली, त्या उचांवरून खाली उतरण्याचा जो त्याने घातकी प्रस्ताव मांडला,

जागोजागी त्याचा शोध घेण्याचे त्याने जे ठरवले व अमलात आणले, याजकांच्या व लोकांच्या हृदयांना जे त्याच्या प्रेमाला नाकारण्यासाठी प्रेरित केले, आणि शेवटी, ‘‘त्याला क्रुसावर द्या! क्रुसावर चढवा! ही जी ओरड केली – ह्या सर्वांमुळे विश्वाचे आश्चर्य आणि क्रोध हे चिथवले गेले.

आता सैतानाचा दोष कोणतीही सबब न देता ताठ उभा राहिला. त्याने स्वतःचे खरे चारित्र्य एक लबाड व खुनी म्हणून व्यक्त केले. असे दिसले की ज्या आत्म्याने त्याने मनुष्यांवर सत्ता गाजवली, जे त्याच्या अधिकारात होते, तिच त्याने स्वर्गावर देखील गाजवली असती, जर तशी परवानगी त्याला देण्यात आली असती. त्याने असे सिद्ध केले होते की देवाच्या नियमशास्त्राचे उल्लंघन हे स्वातंत्र्य आणि स्वतःला उंचावणे हे निष्पन्न करतील; पण असे भासले की ह्याचा परिणाम म्हणजे बंधन आणि विनाश हे होते.

**(१९) देवाने आपल्या पुत्राचे अर्पण करून काय सिद्ध केले ज्यामुळे त्याचे चारित्र्य संपूर्ण विश्वासमोर प्रगट झाले?**

*ही सगळी देवाची करणी आहे; त्याने स्वतःबरोबर आपला समेट येशू ख्रिस्ताच्या द्वारे केला आणि समेटाची सेवा आम्हांला दिली, (२ करिंथकरास पत्र ५:१८)*

देवाने बंडखोरीच्या तत्वांच्या बद्दलचा विरोध दर्शवला. संपूर्ण स्वर्गाने त्याचा न्याय प्रगट झालेला पाहिले, सैतानाला धिक्कारून त्याला दोषी ठरवण्यात आणि मनुष्याच्या उद्धारात. लुसिफरने घोषित केले होते की जर देवाचे नियमशास्त्र बदलता येत नव्हते, आणि त्याची शिक्षा अटळ आहे, प्रत्येक पापी व अधम

इसम ह्याला देवाच्या कृपेपासून दूर नेणे हे रास्त होते. त्याने हे सिद्ध केले की पापी जमात ही उद्धाराच्या पलीकडे ठेवली गेली असून त्याचे योग्य भक्ष्यस्थान होते. पण मनुष्याच्या वतीने ख्रिस्ताचा मृत्यू एक वाद होता ज्याला दुर्लक्षित करता येत नव्हते. नियमशास्त्राची शिक्षा त्याच्यावर आली जो देवाच्या समान होता, आणि मनुष्याला  ख्रिस्ताचे नितीम्त्व स्वीकारण्याची मुभा होती,  आणि असे अपमानित व शिक्षा पावलेले विजय मिळेल असे स्वप्न पाहण्याचे आयुष्य घालवत, कारण सैतानाच्या अधिकारावर देवाचा पुत्र विजयी ठरला. तरीही देव हा न्यायी आहे आणि जे सर्व येशूवर विश्वास ठेवतो त्यांचे तो समर्थन करतो.

## (२०) ख्रिस्ताचे विशिष्ट कार्य काय होते?

***“नियमशास्त्र किंवा संदेष्ट्यांचे ग्रंथ रद्द करण्यास मी आलो आहे असे समजू नका; मी रद्द करण्यास नव्हे तर पूर्ण करण्यास आलो आहे.(मत्तय ५:१७)***

पण हे केवळ मनुष्याचा उद्धार सिद्ध करण्यासाठी नव्हते की ख्रिस्त पृथ्वीवर दुखसहन करून मरण पत्करन्यास आला. तो ‘‘नियमशास्त्राला दृढ’’ करण्यास आणि ‘‘त्याला सन्माननीय’’ बनवण्यास आला. केवळ ह्यासाठी नाही की सर्व निवस्यांनी त्या नियमशास्त्राला पवित्र आणि सन्माननीय असे लेखावे; पण संपूर्ण विश्वाला सिद्ध करण्यास की देवाचे नियमशास्त्र हे अटळ व न बदलता येणारे आहे.

त्यावरील आरोप बाजूला ठेवता, देवाच्या पुत्राने आपले जीवन एक अर्पण म्हणून दिले नसते, तशी गरज नसती. ख्रिस्ताचा मृत्यू ते नियमशास्त्र न बदलणारे आहे हे सिद्ध करते. आणि ते अर्पण ज्याद्वारे पिता आणि पुत्र ह्यांना

पाचारण झाले, जेणेकरून पापी लोकांचा उद्धार होईल, त्याद्वारे संपूर्ण विश्वाला हे सिद्ध केले जाते- जे त्याच्या खंडणीच्या योजेने एकमेव रीतीने दर्शवले नसते- की दया आणि न्याय हे देवाचे नियमशास्त्र आणि शासन ह्याचे हे आधारस्तंभ आहेत.

**(२१) ह्या महान वादविवादाच्या शेवटी प्रत्येक सृष्ट निर्मितीची कबुली काय असेल?**

***ह्यात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा, आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे. (फिलीप्पेकरास पत्र २:१०-११)***

न्यायचे अंतिम अवलंबन होण्यात असे दिसून येईल की पापाचे कारण अस्तित्वात उरणार नाही. जेव्हा संपूर्ण पृथ्वीचा न्यायाधीश सैतानाकडून अशी मागणी करेल, ‘‘तू माझ्याविरुद्ध का बंड केले, आणि माझ्या राज्यातील लोकांना का हिरावून घेतले?’’ दुष्टाईचा जनक त्यावेळी काहीच सबब देऊ शकणार नाही. प्रत्येक तोंड बंद होईल, आणि सर्व बंड करणारी सेना ही अबोल होईल .

**(२२) सैतानाच्या ह्या सदैव पसरलेल्या अंधकारात कोणती ओरड दिसून येते?**

***... येशूने आंब घेतल्यानंतर, “पूर्ण झाले आहे,” असे म्हटले; आणि मस्तक लववून आपला आत्मा समर्पण केला. (योहान १९:३०)***

कालवरीचा वधस्तंभ, जो नियमशास्त्राला न बदलणारे, असे ठरवतो, विश्वाला हे सिद्ध करते कि पापाचे वेतन हे मरण आहे. तारणार्याच्या ह्या

सततच्या आक्रोशात, "पूर्ण झाले आहे," सैतानाची मृत्यूची ओरड ही पसरत राहते. जो महान वादविवाद आतापर्यंत चालू होता, तो निश्चित होऊन, दुष्टाईचे अंतिम निर्मुलन निश्चित झाले. देवच पुत्र ह्या कबरेच्या सर्व स्तरातून पार गेला, की "हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे." इब्री २:१४

**(२३) सैतानाचे आणि जे सर्व गर्व व दुष्टाई ह्याला कवटाळतात त्यांचे अंतिम भवितव्य काय आहे?**

***"पाहा, भट्टीसारखा तप्त दिवस येत आहे; सर्व गर्विष्ठ व सर्व दुराचारी धसकट बनतील; तो येणारा दिवस त्यांना जाळून टाकील, त्यांचे मूळ, फांदी वगैरे काहीच राहू देणार नाही, असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो. (मलाखी ४:१)***

लुसिफरच्या स्वतःला उंचावण्याच्या ही इच्छा त्यामुळे तो म्हणाला : "'मी आकाशात चढेन, देवाच्या तारांगणाहून माझे सिंहासन उच्च करीन: . . . मी परात्परासमान होईन." देव घोषित करतो: "असे मी केले आहे आणि तुला पाहणाऱ्यांच्या डोळ्यांदेखत मी पृथ्वीवर तुझी राखरांगोळी केली आहे." यशया १४:१३,१४; यहज्केल २८:१८,१९.

**(२४) ह्या महान वादविवादाच्या समाप्तीला, उद्धार पावलेले लोक आणि पाहणारे सर्व विश्व कोणत्या अभिवचनाचा दुजोरा देईल?**

***परमेश्वराविषयी तुम्हांला काय वाटते? तो पुरापुरा अंत करील; विपत्ती दुसऱ्यांदा येणे नकोच. (नहूम १:९)***

संपूर्ण विश्व पापाचा स्वभाव आणि परिणाम ह्याचे साक्षीदार बनले. आणि त्याचे समूळ करण्यासाठी, ज्यामुळे सुरुवातीला देवदूत घाबरले आणि देवाचा अवमान केला, आता त्याच्या प्रेमाचे समर्थन करेल आणि त्याचे सन्मान संपूर्ण विश्वाच्या समोर व्यक्त करेल, जे त्याची इच्छा पूर्ण करण्यात संतुष्ट असतात, आणि ज्यांच्या हृदयात त्याचे नियमशास्त्र वसते. ह्यानंतर दुष्टाई कधीही व्यक्त होणार नाही. असे देवाचे वचन म्हणते:" विपत्ती दुसऱ्यांदा येणार नाही."

देवाचे नियमशास्त्र, ज्याला सैतानाने बंधनाचे जू म्हणून निंदात्मक रीतीने व्यक्त केले, त्याला स्वातंत्र्याचे नियमशास्त्र म्हणून सन्मानित केले जाईल. ज्या निर्मितीने परीक्षा दिली आणि स्वतःला सिद्ध केले ते परत त्याच्याशी मैत्री तोडण्यास वळणार नाहीत ज्याच्यासमोर त्याचे चारित्र्य व्यक्त होते जो अमर्याद प्रेम आणि अथक सुज्ञानाचा स्रोत आहे.

*मला हे समजते की, स्वतःच्या गर्वामुळे, लुसिफरच्या हृदयात पहिल्यांदा पाप जन्मास आले. मला ठाऊक आहे कि त्या क्षणी देव त्याचा नाश करू शकला असता, आणि भयामुळे सर्व निर्मित सजीव त्याचे आज्ञापालन करतील.*

*गोल करा :    होय      अनिश्चित*

*देवाच्या प्रीतीवर स्थित तत्वांचे उल्लंघन केल्यामुळे काय दयनीय अवस्था होते ह्याचा अनुभव मी घेतला आहे. मी  त्यांच्या आज्ञापालनातून जे प्रेम, रास्तपणा आणि दया दर्शवली जातात ते पाहतो.*

*गोल करा :    होय      अनिश्चित*

मला समजते कि सुज्ञानात देवाने पापाचा पसार होऊ देण्याची परवानगी दिली जेणेकरून संपूर्ण विश्वाला त्याच्या भयंकर परिणामांचे साक्षीदार होता येईल आणि त्यांना सैतानाचे खरे चारित्र्य पाहता येईल.

गोल करा : होय अनिश्चित

देवाने आपल्या पुत्राच्या महान अर्पणाने जी थोर दया दया व्यक्त केली ती सिद्ध करू इच्छितो. मला आनंद आहे की वरदानाच्या द्वारे नियमशास्त्राच्या सर्व गरजा भागवल्या जातात. त्याच्या सुज्ञानात तो न्यायी राहतो आणि जे सर्व विश्वास ठेवतात त्यांचा न्यायाधीश आणि समर्थन करणारा ठरतो.

गोल करा : होय अनिश्चित



# धडा २
# मनुष्य आणि सैतान ह्यांच्यातील शत्रुत्व

## (१) पतन पावलेल्या मनुष्यासाठी देवाने कोणती महान आशा दिली आहे?

*आणि तू व स्त्री, तुझी संतती व तिची संतती ह्यांच्यामध्ये मी परस्पर वैर स्थापीन; ती तुझे डोके फोडील, व तू तिची टाच फोडशील”. (उत्पत्ती ३:१५)*

मनुष्याचे पतन झाल्यानंतर सैतानाच्या विरुद्ध  जे दैवी विधान केले ते जणूकाही एक भविष्यवाणी होती, ज्यात सर्व युगांची समाप्ती झाली आणि त्याद्वारे पृथ्वीवर राहणाऱ्या सर्व जातींच्या लोकांसाठी तो महान वादविवाद प्रगट झाला. देवाने घोषणा केली: “मी शत्रुत्व निर्माण करणार.” ह्या शत्रुत्वाला सहजच

लेखता येत नाही. जेव्हा मनुष्याने त्या दैवी नियमशास्त्राचे उल्लंघन केले, त्याचा स्वभाव दुष्ट बनला, तो सैतानासोबत सलोख्यात राहत होता, त्याच्या विरुद्ध नाही. स्वाभाविकच नैसर्गिक मनुष्य जो पापी बनला आणि पापाचा जनक ह्यात काहीच शत्रुत्व उरले नाही. दोघेही ह्या पापाच्या घटनेने दुष्टच बनले.

अशा प्रकारे जो पाप करतो तो कधीच आराम करत नाही, फक्त केवळ जेव्हा त्याला सहानुभूती आणि आधार मिळतो जेणेकरून इतर लोक त्याचे अनुकरण करतात. ह्याच कारणासाठी पतन पावलेले देवदूत आणि दुष्ट लोक व्याकूळ अशा मैत्रीसाठी एकत्र येतात. जर देवाने हस्तक्षेप केला नसता तर, सैतान आणि मनुष्य स्वर्गाच्या विरुद्ध एकत्र झाले असते; आणि सैतानाच्या विरुद्ध शत्रुत्व बाळगण्याच्या ऐवजी, संपूर्ण मानवजात ही देवाच्या विरुद्ध जाण्यासाठी एकवटली असती.

**(२) आदाम आणि हवा ह्यांच्यासाठी देवाची कोणती विशिष्ट आज्ञा आणि इशारा होते?**

*पण बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील". (उत्पत्ती २:१७)*

**(३) नकाराच्या कोणत्या कृतीने पृथ्वीवर नाश ओढवून आणला आणि संपूर्ण मनुष्यजातीवर पतन पावण्याचा स्वभाव ओढवला?**

*त्या झाडाचे फळ खायला चांगले, दिसायला मनोहर आणि शहाणे करायला इष्ट आहे असे त्या स्त्रीला दिसून आले; तेव्हा तिने त्याचे फळ काढून खाल्ले, आणि आपल्याबरोबर*

*आपल्या पतीलाही ते दिले व त्याने ते खाल्ले. (उत्पत्ती ३:६)*

**(४) मोहपाश म्हणजे काय?**

*माझ्या बंधूंनो, नाना प्रकारच्या परीक्षांना तुम्हांला तोंड द्यावे लागते तेव्हा तुम्ही आनंदच माना. तुम्हांला ठाऊक आहे की, तुमच्या विश्वासाच्या परीक्षेने धीर उत्पन्न होतो; (याकोब १:२-३)*

**(५) सगळ्या मोहपाशाचा जनक कोण आहे?**

*मग सैतान सर्व परीक्षा संपवून संधी मिळेपर्यंत त्याला सोडून गेला. (लूक ४:१३)*

सैतानाने मनुष्याला पाप करण्यास भाग पाडले, ज्या प्रकारे त्याने देवदूतांना बंड करण्यास प्रवृत्त केले, जेणेकरून स्वर्गाच्या विरुद्ध युद्ध करण्यात त्याला सहकार्य मिळावे. त्याच्यात आणि पतन पावलेल्या दुतांमध्ये ख्रिस्ताच्या विरुद्ध द्वेष करण्यामध्ये काहीच फरक नव्हता; मात्र इतर सर्व बाबतीत त्यांच्यात ऐक्य नव्हते, विश्वाच्या अधिपतीच्या विरोधात जाण्यास त्याचा विरोध करण्यास ते एकजुटीने तयार होते. पण जेव्हा सैतानाने ही घोषणा ऐकली की त्याच्यात आणि स्त्रीमध्ये शत्रुत्व अस्तित्वात येईल, आणि त्याच्या व तिच्या संततीत ते दिसेल, त्याला ठाऊक होते की मानवी स्वभावाला दुराचारी बनवण्यात त्याचे प्रयत्न खंडीत होतील; की काही करून मनुष्य त्याचे सामर्थ्य रोखू शकत नाही त्याचा प्रतिकार करू शकत नाही.

**(६) मनुष्याची निर्मिती कोणाच्या प्रतीरुपाने झाली आणि तिच मनुष्यजातीला नष्ट करण्याच्या सैतानाच्या कल्पनेला प्रेरणादायी ठरली?**

*देवाने आपल्या प्रतिरूपाचा मनुष्य निर्माण केला; देवाचे प्रतिरूप असा तो निर्माण केला. नर व नारी अशी ती निर्माण केली. (उत्पत्ती १:२७)*

सैतानाचे मानवजातीच्या विरुद्ध असणारे शत्रुत्व उदयास आले, ते देखील ख्रिस्ताच्या द्वारे, देवाचे प्रेम आणि दया ह्यांचे ते साधन आहेत. मनुष्याच्या उद्धाराच्या दैवी योजनेचे खंडन करण्याची त्याची इच्छा आहे, देवाचा त्याद्वारे अवमान करणे, त्याच्या हस्तकृतींना तुच्छ लेखून त्याचा अपमान करणे; स्वर्गात दुख पसरवून संपूर्ण पृथ्वीवर तो धिकार आणि नाश पसरवू इच्छितो. आणि तो सर्वांना ह्या दुष्टाईकडे प्रवृउत करतो जो देवाच्या मनुष्याला घडण्याच्या कार्याचा परिणाम आहे.

**(७) ख्रिस्ताच्या सामर्थ्याने आपण कोणत्या अनमोल अभिवचनाला सिद्ध करून हस्तगत करू शकतो?**

*त्यांच्या योगे मोलवान व अति महान अशी वचने आपल्याला देण्यात आली आहेत, ह्यासाठी की, त्यांच्या द्वारे तुम्ही वासनेपासून उत्पन्न होणारी जगातील भ्रष्टता चुकवून ईश्वरी स्वभावाचे वाटेकरी व्हावे. (२ पेत्र १:४)*

ख्रिस्त ह्या आत्म्यात व जीवात ती कृपा उत्पन्न करतो जी मनुष्यात सैतानाच्या विरोधात ते शत्रुत्व निर्माण करते. ह्या बदलणाऱ्या कृपा आणि पुनरुज्जीवित सामर्थ्याच्या शिवाय, मनुष्य सैतानाच्या बंधनात राहू शकतो, एक सेवक जो सदैव ही बोली करण्यास तयार असतो. पण आत्म्यातील नवीन तत्व तो वादविवाद निर्माण करतात ज्यापुर्वी शांती प्रस्थापित करण्यात आली होती.

ख्रिस्त जे सामर्थ्य प्रदान करतो त्यामुळे मनुष्य त्या जुलूमकरणारा व सर्व काही हडप करणारा त्याच्या विरुद्ध प्रतिकार करू शकतात. जो कोणी पापाची आवड धरण्यापेक्षा त्याचा द्वेष करतो, जो कोणी त्या सर्व इच्छांवर विजय मिळवून त्याचा प्रतिकार करतो, ते वरून येणाऱ्या तत्वाचे स्पष्ट व खुले प्रदर्शन करतात.

**(८) ख्रिस्ताच्या जीवनाचा कोणता दैवी पैलू दिसला व त्यातून दुष्ट लोकांच्या मनात शत्रुत्व उत्पन्न झाले की त्यांनी त्याला वधस्तंभावर दिले?**

*तुम्हांला माहीत आहे की, आपली पापे हरण करण्यासाठी तो प्रकट झाला; त्याच्या ठायी पाप नाही. (१ योहान ३:५)*

ख्रिस्ताचा आत्मा आणि सैतानाचा आत्मा ह्यांच्यात जो विरोधाभास दिसतो तो अगदी ठळकपणे जगाने जो ख्रिस्ताचा स्वीकार केला त्यात दिसून येतात. ते काहीजगिक आरोग्य, शेखी, किंवा बढावा खूप नव्हते की यहुदी लोक त्यामुळे येशूला वधस्तंभावर द्यायला निघाले. त्यांनी बघितले की त्याच्यात सामर्थ्य आहे जे ह्या सर्व बाह्यात्कारी फायद्याच्या पेक्षा अधिक असून त्याची जागा भरून काढतील. पण ख्रिस्ताचे पावित्र्य आणि शुद्धता ह्यामुळे त्याच्यासमोर देवभिरू नसलेल्या लोकांच्या विरुद्ध तो द्वेष दिसून येतो. त्याचे स्वतःला नाकारून पापरहित समर्पण हे गर्विष्ठ व भावनिक लोकांच्या विरुद्ध सर्वकाळचा एक आरोप होऊन बसले. ह्यामुळे देवाच्या पुत्राच्या विरुद्ध शत्रुत्व उदयास आले. सैतान आणि दुष्ट देवदूत ह्या दुष्ट लोकांच्या सोबत एकत्र जमले. सत्याच्या महाविजेत्याच्या

विरुद्ध ह्या सर्व खोट्या पापी सैन्यांनी कट रचला उठाव केला.

**(९) ख्रिस्ताचे अनुयायी म्हणून जगाकडून आपण कोणत्या वागणुकीची अपेक्षा करू शकतो?**

*ख्रिस्त येशूमध्ये सुभक्तीने आयुष्यक्रमण करण्यास जे पाहतात त्या सर्वांचा छळ होईल. (२ तीमथी ३:१२)*

तेच शत्रुत्व ख्रिस्ताच्या अनुयायांमध्ये दिसते जे त्याच्या स्वामीच्या प्रती देखील प्रदर्शित झाले. जो कोणी पापाच्या ह्या घृणास्पद चारित्र्याला पाहतात, आणि वरून येणाऱ्या सामर्थ्याने त्या मोहाचा प्रतिकार करतात, ते निश्चितच सैतान व त्याच्या प्रजेच्या क्रोधास पात्र ठरतात. सत्याच्या खर्या तत्वांचा द्वेष, आणि जे कोणी त्याचे पालन करतात त्यांचा धिक्कर करून छळ करणे, हे पाप व पापी लोक जोपर्यंत अस्तित्वात आहेत तसेच चालू राहणार. ख्रिस्ताचे अनुयायी आणि सैतानाचे सेवक ह्यांच्यात सुसंगती कधीच होऊ शकत नाही. वधस्तंभाच्या विरोधातील पाप आणि गुन्हा हे काही संपलेले नाहीत.

**(१०) सैतानाच्या सर्व सैन्यावर विजय मिळवण्यासाठी आपण कोणत्या दोन मार्गांचे अवलंबन केले पाहिजे?**

*म्हणून देवाच्या अधीन व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुमच्यापासून पळून जाईल. (याकोब ४:७)*

सैतान त्याच्या सर्व सैन्याला बोलावतो आणि ह्या लढाईत त्याची सर्व शक्ती एकत्र

करतो. तो अधिक प्रतिकाराने तिकडे दर्शन देत नाही असे का ? ख्रिस्ताचे सैनिक इतक्या झोपेत राहून बेफिकीर कसे आहेत? कारण ख्रिस्ताच्या सोबत त्यांचा खूप कमी संबंध येतो; कारण त्यांना त्याच्या आत्म्यापासून खूप निराधार असल्यासारखे वाटते. पाप हे त्यांच्यासाठी त्याग करण्यासारखे किंवा प्रतीकात्मक असे भासत नाही, जसे त्यांच्या स्वामीला ते दिसते.

ख्रिस्ताने जसे निर्णयात्मक व निश्चयी वृत्तीने केले, तसे ते त्यांची भेट घेत नाही. भयंकर पाप आणि त्याचा होणारा पसार ह्यांची त्यांना जाणीव होत नाही, आणि अंधकाराच्या सत्ताधीशाच्या चारित्र्य व सामर्थ्य ह्याप्रती ते जणूकाही आंधळे होतात.

सैतान आणि त्याच्या कार्याच्या विरुद्ध थोडे शत्रुत्व असते, कारण त्याचे सामर्थ्य आणि दुष्टाई, ख्रिस्त व त्याची मंडळी ह्यांच्या विरुध्द चालू असणारी महाभयंकर लढाई ह्याच्या विरुद्ध इतके अज्ञान आहे. लोकसमुदाय इकडे भ्रमात पडतो. त्यांना ठाऊक नसते की त्यांचा शत्रू एक महान सैनिक आहे जो दुष्ट दूतांच्या मनावर ताबा ठेवतो आणि योग्य रचलेल्या योजना व कलेने केलेल्या हालचाली जो आत्म्यांचे तारण होऊ नये म्हणून ख्रिस्ताच्या विरुद्ध बंड पुकारतो.

जे स्वतःला ख्रिस्ती म्हणवून घेतात, आणि सुवार्तेच्या सेवकांच्यामध्ये देखील, क्वचितच सैतानाला संबोधले हे ऐकण्यात येते, कदाचित केवळ पूलपिटावर केवळ घटनात्मक उल्लेख केवळ असतो. त्याची सातत्यपूर्ण कृती आणि यश ह्यांच्या पुराव्यांकडे तो दुर्लक्ष करतो; तो किती धूर्त आहे अशा मिळणाऱ्या इशार्यांकडे कानाडोळा करतो; त्याच्या अस्तित्वाकडे ते जणूकाही दुर्लक्षच करतात.

## (११) सैतानाचे सातत्यपूर्ण उद्धिष्ट काय आहे?

*त्यांची म्हणजे विश्वास न ठेवणाऱ्या लोकांची मने ह्या युगाच्या दैवताने आंधळी केली आहेत, अशा हेतूने की, देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या गौरवी सुवार्तेचा प्रकाश त्यांच्यावर प्रकाशू नये. (२ करिंथकरास पत्र ४:४)*

मनुष्य त्याच्या सर्व योजना आणि हत्यार ह्यांच्याप्रती अज्ञानी असला तरीही, हा दक्षपूर्ण शत्रू कायम त्यांच्यावर पाळत ठेऊन असतो. घराण्याच्या प्रत्येक विभागात तो घुसखोरी करतो, आपल्या शहराच्या प्रत्येक रस्त्यावर, मंडळयांमध्ये, राष्ट्रीय परिषदांमध्ये, न्यायाच्या दरबारात, सर्वत्र त्रास देत, छळ करतो, ठकवत, स्त्री, पुरुष आणि लेकरांच्या मनाला व शरीरांना इजा पोहचवत, कुटुंब मोडकळीस आणून, हेवा, स्पर्धा, भांडण, खून ह्यांची पेरणी करत राहतो. आणि ख्रिस्ती विश्व ह्या गोष्टींचा विचार करत राहते जणूकाही देवाने त्यांची नेमणूक केली आणि ते अस्तित्वात राहिलेच पाहिजे.

सैतान सतत देवाच्या लोकांवर विजय मिळवण्याचा प्रयत्न करतो आणि ते देखील जे अडथळे त्यांना जगापासून वेगळे ठेवतात त्यांना मोडून हे साध्य करण्याचा प्रयत्न करतो. प्राचीन इस्राएल पाप करण्यात भुलवले गेले जेव्हा निषिद्ध अशा परजातीय लोकांशी त्यांनी संबंध जोडले. त्याच रीतीने आधुनिक इस्राएल देखील पतन पावतात...... जे सर्व निश्चय करून ख्रिस्ताचे अनुयायी बनत नाहीत ते सर्व सैतानाचे सेवक बनतात. पुन्हा स्थावर न होणाऱ्या हृदयात पापाचे प्रेम आहे आणि सबब देऊन ते कवटाळण्याची वृत्ती देखील आहे. पुनरुज्जीवित हृदयात पापाचा द्वेष आहे आणि सातत्याने त्याचा प्रतिकार करण्याची वृत्ती आहे.

जेव्हा ख्रिस्ती लोक देवभिरू नसलेले लोक आणि अविश्वास्णारे ह्यांची संगती साधतात, ते स्वतःला मोहास पात्र ठरवतात. त्यावेळी सैतान त्या ठिकाणाहून लपतो आणि अगदी सूक्ष्मपणे त्यांच्या डोळयांवर ती झापड किंवा पट्टी लावतो. त्यांना दिसत नाही की अशा संबंधाने त्यांना केवळ इजा पोहोचणार आहे; चारित्र्य, शब्द, आणि कृती हे घेऊन जेव्हा जगाशी ते समरूप होतात, त्यांच्या डोळयांवर पट्टी चढवली जाते.

**(१२) जगाशी आपण समरूप होऊ नये म्हणून कोणत्या मार्गाने केवळ आपला बचाव होऊ शकतो?**

***दुर्जनांच्या मार्गात शिरू नकोस; दुष्टांच्या मार्गाने चालू नकोस. (नितीसुत्रे ४:१४)***

जगिक पद्धतींशी समरूप होणे मंडळीला जगात बदलवून टाकतात; जगाला मंडळीत कधीही बदलत नाहीत. पापाशी जितके अधिक तुम्ही प्रचलित व्हाल तितकेच तुम्हाला अत्यंत अटळपणे त्याचा प्रतिकार कमी स्वरुपात करता येईल. जे कोणी सैतानाच्या सेवकांशी जोडण्याचा निर्धार करतात ते लवकरच त्यांच्या स्वामीची भीती बाळगण्याचे थांबवतात. जेव्हा कर्तव्याचे पालन करत असताना आपण परीक्षेत पडतो, ज्याप्रमाणे दानियेल राजाच्या दरबारात होता, आपण खात्री बाळगू शकतो की देव आपले सौरक्षण करणार; पण जर आपण त्या मोहाच्या अधीन गेलो तर कधी न कधी आपले पतन होणार.

**(१३) कोणाचे अनुसरण न करण्याचा आणि कोणाला त्या कौतुकाचे ध्येय न बनवण्याचा आपणास इशारा देण्यात आला आहे?**

*दुर्जनांचा हेवा करू नकोस, त्यांच्या संगतीची इच्छा धरू नकोस; (नितीसुत्रे २४:१ )*

मोहात टाकणारा अशा लोकांच्या मध्ये कार्य करतो जे त्याच्या नियंत्रणाच्या खाली येणार नाही अशी शक्यता खूप कमी असते. जे लोक कलागुण संपन्न आणि शिक्षित असतात त्यांचे कौतुक व सन्मान होते, जणूकाही ही गुणधर्म देवाचे भय व त्याचा अभाव ह्याची खंडणी भरून काढतील किंवा देवाच्या कृपेच्या पात्र मानवांना बनवतील. कलागुण आणि संस्कृती, जेव्हा त्यांचा विचार होतो, देवाची वरदाने आहेत; पण जेव्हा त्यांची जागा धार्मिकता घेते, जेव्हा आत्म्याला देवाच्या जवळ आणण्याच्या ऐवजी, ते त्याच्यापासून दूर जातात, तेव्हा ते एक शाप आणि जाळे बनते.

हे मत अनेकांच्या मनात असते की जे सर्व शिष्टाचार किंवा शुद्धीकरण म्हणून दिसते ते काही बाबतीत तरी ख्रिस्ताशी जोडलेले असणे आवश्यक आहे. ह्यापूर्वी एक महान चूक केली गेली नव्हती. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीमध्ये ही गुणधर्म असावीत, कारण खऱ्या धर्माच्या दृष्टीने ते जबरदस्त प्रभाव पाडतात; पण देवाच्या प्रती त्यांनी शुद्ध व्हावे, किंवा दुष्टाईसाठी देखील ते एक शक्ती बनतात.

अनेक दृष्टीने जो मनुष्य बौद्धिक व वागण्यास अत्यंत सुलभ असतो, जो कोणतीही अनैतिक कृती करण्यास झुकत नाही, तोच सैतानाच्या हातातील एक शस्त्र बनतो. जे अज्ञानी आणि असंस्कृत आहेत त्यांच्यापेक्षा त्याच्या फसवणाऱ्या आणि ठकवनार्या चारित्र्याचा प्रभाव आणि उदाहरण ख्रिस्ताच्या कार्यासाठी त्याला एक घातक शत्रू बनवतात.

## (१४) सुज्ञान आणि अध्यात्मिक बळाचा एकमेव स्रोत किंवा उगम कोण आहे?

*देव आमचा आश्रय व आमचे सामर्थ्य आहे; तो संकटसमयी साहाय्य करण्यास सदा सिद्ध असतो. (स्तोत्रसहिता ४६:१)*

कळकळीची प्रार्थना आणि देवावर विसंबून राहण्याने, शलमोनाला ते सुज्ञान मिळाले ज्याने जगाचे कौतुक आणि अद्‌भुत आकर्षित केले. पण जेव्हा तो त्याच्या शक्तीच्या स्रोताच्या पासून दूर गेला, आणि पुढे जाऊन स्वतःवर विसंबून राहत गेला, त्या मोहाला तेव्हा तो बळी पडला. मग ह्या अत्यंत सुज्ञ अशा राजावर ज्या अद्‌भुत शक्ती प्रदान केल्या गेल्या त्यामुळे आत्म्यांच्या शत्रूसाठी ते प्रभावी दूत बनले.

**(१५) हा महान वादविवाद जिंकण्यासाठी प्रयत्न म्हणून सैतानाने कोणता डावपेच अवलंबिला आहे?**

*सावध असा, जागे राहा; तुमचा शत्रू सैतान हा गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे हे शोधत फिरतो. (१ पेत्र५:८)*

आदामाच्या काळापासून आतापर्यंत, आपला महान शत्रू छळ करण्यास व नाश करण्याचे प्रयत्न करत आहे. मंडळीच्या विरुद्ध असलेल्या शेवटल्या युद्धाची तो तयारी करत आहे. जे सर्व लोक येशूचा शोध करतात त्यांना ह्या अथक शत्रूच्या विरोधातील लढाईत भाग घ्यावाच लागेल. जितक्या अधिक जवळून ख्रिस्ती व्यक्ती त्या दैवी पद्धतीचे अनुकरण करेल, तितक्या अधिक तो स्वतःला सैतानाच्या हल्ल्यांच्या विरुद्ध सज्ज करेल. जे सर्व देवाच्या कार्यात सजग आहेत, दुष्टाचे सर्व लबाड कृत्य व फसवणूक उघडकीस आणण्याचा जे प्रयत्न करतात आणि ख्रिस्ताला लोकांसमोर आणतात, ते पौलाच्या सोबत साक्ष देण्यात एकत्र येतील,

ज्यामध्ये संपूर्ण मनाच्या नम्रतेत, अनेक अश्रू आणि मोह घेऊन प्रभूची सेवा करण्यात तयार असतात.

**(१६) सैतानाच्या सर्व क्लुत्यांपासून आपले काय सौरक्षण करेल?**

*सैतानाच्या डावपेचांपुढे तुम्हांला टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री धारण करा. (इफिसकरास पत्र ६:११)*

सैतानाने ख्रिस्ताची परीस्खा अगदी कठोर व तीव्रपणे केली, पण प्रत्येक लढाईत त्याने प्रतिकार केला. ही युद्धे आपल्या वतीने लढली गेली; हे विजय आपल्याला विजयी होण्यास मदत करतील. जे सर्व लोक त्याचा शोध करतात ख्रिस्त त्यांना सामर्थ्य देईल. कोणताही मनुष्य स्वतःच्या परवानगीच्याशिवाय सैतानाला थारा देऊ शकत नाही. मोहात टाकणारा कोणावरही पाप करण्याची जबरदस्ती करू शकत नाही किंवा त्याच्या इच्छेवर नियंत्रण ठेऊ शकत नाही. तो त्याला व्याकूळ बनवू शकतो, पण अशुद्ध करू शकत नाही. तो वेदना देऊ शकतो, अपवित्र करू शकत नाही. ख्रिस्ताने विजय मिळवला ह्या वास्तविक्तेने त्याच्या अनुयायांना पाप आणि सैतान ह्यांच्या लढाईत धाडसाने लढण्याची प्रेरणा दिली पाहिजे.

**(१७) अपवित्र होण्यापासून आपली जीवने कशी राखली जाऊ शकतात?**

*तरुण आपला वर्तनक्रम कशाने शुद्ध राखील? तुझ्या वचनानुसार तो राखण्याने. (स्तोत्रसहिता ११९:९)*

**(१८) देवापासून येणाऱ्या कोणत्या अभिवचनाला आपण हस्तगत करू शकतो?**

*मनुष्याला सहन करता येत नाही अशी परीक्षा तुमच्यावर गुदरली नाही; आणि देव विश्वसनीय आहे, तो तुमची परीक्षा तुमच्या शक्तीपलीकडे होऊ देणार नाही, तर परीक्षेबरोबर तिच्यातून निभावण्याचा उपायही करील, ह्यासाठी की, तुम्ही ती सहन करण्यास समर्थ व्हावे. (१ करिंथकरास पत्र १०:१३)*

*मी आभारी आहे कारण देवाने त्याच्या लेकरांच्या मनात सैतानाच्या विरुद्ध शत्रुत्व घालण्याचे अभिवचन दिले.*

*गोल करा: होय अनिश्चित*

*देवाचे वचन मला अधिक मिळावे म्हणून अध्यात्मिक सुज्ञान आणि त्या महान इच्छेचेसाठी मी प्रार्थना करतो, आणि त्याच्या कृपेने, सैतानाच्या सर्व हल्ल्यांचा प्रतिकार करण्याचा मी निर्धार करतो.*

*गोल करा: होय अनिश्चित*

*माझ्या सहनशक्तीच्या पलीकडे माझी परीक्षा होऊ न देण्याचे देवाचे अभिवचन मी हसगत करतो आणि त्याप्सून सुटका होण्याच्या मार्गासाठी सुज्ञान मिळावे म्हणून प्रार्थना करतो.*

*गोल करा: होय अनिश्चित*

*मला जाणीव आहे की जे सर्व लोक ख्रिस्तासाठी जगतात त्यांचा छळ होणारच आणि*

*त्याच्यासाठी प्रेमपूर्वक सहन करण्याची माझी तयारी आहे.*

*गोल करा: होय अनिश्चित*



# धडा ३
# दुष्ट आत्म्यांचे माध्यम

**(१) ह्या महान वादविवादात दुष्टाची शक्ती शास्त्रवचने कशी ओळखतात?**

***कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्यांबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतींबरोबर, आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे. (इफिसकरास पत्र ६:१२)***

दृश्य आणि अदृश्य जगामधील संबंध, देवदूतांची सेवा, आणि दुष्ट शक्तींचे माध्यम, हे स्पष्टपणे शास्त्रवचनात व्यक्त होतात, आणि हे सर्व मानवी इतिहासाशी अतूट रीतीने गुंफले गेले आहेत. दुष्ट आत्म्याच्या अस्तित्वावर अविश्वेअस ठेवण्याच्या प्रवृत्तीत वाढ होत आहे, आणि पवित्र देवदूत म्हणतात, “ज्यांना वारशाने तारण मिळणार आहे” (इब्री १:१४) हे अनेक लोक मृतांचे आत्मे म्हणून लेखतात. पण शास्त्रवचने केवळ दुतांचे अस्तित्व शिकवते

एवढेच नाही,चांगले आणि वाईट दोन्ही, पण हे सर्व मृत लोकांचे देहापासून मुक्त असे आत्मे नाहीत ह्यावर कोणत्याही प्रकारे प्रश्न विचारता येणार नाहीत असे पुरावे सादर करतात.

**(२) महान वादविवाद सुरु होण्यापूर्वी सर्व दिव्यदूत कोठे राहत होते?**

*तेव्हा मी पाहिले तो राजासन, प्राणी व वडील ह्यांच्याभोवती अनेक देवदूतांची वाणी ऐकू आली; आणि त्यांची संख्या' अयुतांची अयुते व सहस्रांची सहस्रे होती, (प्रगटीकरण ५:११)*

**(३) पतन पावलेल्या देव्दुतांसाठी त्यांच्या संदर्भात शास्त्रवचनात कोणत्या नावाचा उपयोग होतो?**

*एकच देव आहे, असा विश्वास तू धरतोस काय? ते बरे करतोस; भुतेही तसाच विश्वास धरतात व थरथर कापतात! (याकोब २:१९)*

**(४) हे पतन पावलेले देवदूत आता कोठे वस्ती करतात?**

*मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला, म्हणजे सर्व जगाला ठकवणारा, जो दियाबल व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट 'साप' खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले. (प्रगटीकरण १२:९)*

**(५) देवदूतांच्या संदर्भात कोणत्या स्तरावर मनुष्याची निर्मिती केली गेली?**

*तू त्याला देवापेक्षा किंचित कमी असे केले आहेस; त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहेस. (स्तोत्रसहिता ८:५)*

मनुष्याची निर्मिती होण्यापूर्वी, देवदूत अस्तित्वात होते; कारण जेव्हा पृथ्वीचा पाया रचला गेला, " प्रभातीचे तारे एकत्र गीत गात होते, आणि देवाचे सर्व पुत्र आनंदाने गजर करू लागले." इयोब ३८:७. मनुष्याचे पतन झाल्यावर, बरेवाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे रक्षण करण्यासाठी देवदूतांना पाठवण्यात आले, आणि मनुष्याचा मृत्यू होण्यापूर्वी हे घडले होते. देवदूत स्वभावाने मानवापेक्षा उच्च आहेत, कारण स्तोत्रकर्ता म्हणतो की मनुष्याला "देवदुतांपेक्षा किंचित कमी असे केले आहे."

**(६) देवाने जितक्या देवदूतांना निर्माण केले त्यांच्या संख्येचे वर्णन शास्त्रवचन कसे करते?**

***तेव्हा मी पाहिले तो राजासन, प्राणी व वडील ह्यांच्याभोवती अनेक देवदूतांची वाणी ऐकू आली; आणि त्यांची संख्या ' अयुतांची अयुते व सहस्रांची सहस्रे होती. (प्रगटीकरण ५:११)***

स्वर्गीय दूतांची संख्या, सामर्थ्य आणि वैभव ह्यांच्याबद्दल शास्त्रवचनात आपल्याला माहिती देण्यात आली आहे, त्यांचे देवाशी कसे नाते होते, देवाच्या शासनाशी ते कसे संबंधित होते, आणि उद्धाराच्या कार्याशी त्यांचा काय संबंध आहे त्याची देखील माहिती दिली आहे. "प्रभुणे स्वर्गात आपले सिंहासन स्थापिले आहे; आणि त्याचे राज्य सर्वांवर आहे." आणि, संदेष्टा म्हणतो, "सिंहासनाच्या भोवती असलेल्या अनेक देवदूतांची वाणी मी ऐकली." राजांच्या राज्याच्या सान्निध्यात ते वाट पाहतात- "देवदूत, जे बल आणि पराक्रम ह्यात अत्युच्च आहेत, " "त्याचे सेवक, जे त्याची सेवा पूर्ण करतात," "जे त्याच्या वाणीकडे लक्ष देतात." स्तोत्रसहिता १०३:१९-२१; प्रगटीकरण ५:११. दहा हजार वेळा दहा हजार, आणि अनेक हजारोंनी, असे संदेष्टा दानियेल ह्याने पाहिले. प्रेषित पुलाने त्यांना " असंख्य

सेना.” असे घोषित केले. दानियेल ७:१०; इब्री १२:२२.

**(७) किती देवदूत दुष्टाईचा हा मार्ग निवडतात?**

***त्याच्या शेपटाने‘ आकाशातील तार्‍यांपैकी एक तृतीयांश तारे ’ओढून काढून ते‘ पृथ्वीवर पाडले’; ती स्त्री प्रसूत होईल तेव्हा तिचे मूल खाऊन टाकावे म्हणून तो अजगर त्या प्रसवणार्‍या स्त्रीपुढे उभा राहिला होता. (प्रगटीकरण १२:४)***

**(८) देवदूतांचे शारीरिक स्वरूप कसे आहे?**

***त्या प्राण्यांचे रूप म्हटले तर अग्नीच्या इंगळासारखे, मशालीसारखे दिसत होते. अग्नी त्या प्राण्यांमधून खेळत होता; तो धगधगीत असून त्यातून विद्युल्लता निघत होती. ते प्राणी विजेसारखे नागमोडीच्या गतीने इकडून तिकडे धावत. (यहज्केल १:१३-१४)***

देवाचे संदेशवाहक म्हणून ते पुढे जात राहतात, ‘‘क्षणभर वीज चमकते तसे, ‘‘.....इतक्या कडक रीतीने त्यांचे चकाकते वैभव दिसते, आणि त्यांची झेप देखील तितकीच जलद असते. ज्या देवदुताने तारणार्याच्या कबरेजवळ दर्शन दिले, त्याचा चेहरा ‘‘विजेसारखा चमकत होता, आणि त्याचे कपडे बर्फासारखे पांढरे शुभ्र होते,’’ ज्यामुळे त्याला घाबरून तेथील लोकांचा थरकाप झाला, आणि ‘‘मृत लोकांसारखे ते बनले.’’ मत्तय २८:३,४.

**(९) ह्या शास्त्रवचनातील कोणती घटना त्या सामर्थ्याला प्रगट करते जे देवाचा एकमेव दूत बाळगतो?**

***त्या प्राण्यांचे रूप म्हटले तर अग्नीच्या इंगळासारखे, मशालीसारखे दिसत होते. अग्नी त्या प्राण्यांमधून खेळत होता; तो धगधगीत***

*असून त्यातून विद्युल्लता निघत होती. ते प्राणी विजेसारखे नागमोडीच्या गतीने इकडून तिकडे धावत. (२ राजे १९:३५)*

जेव्हा सन्हेरीब, गर्विष्ठ अश्शूरी, ह्याने जेव्हा देवाचा धिक्कार केला आणि निंदा केली, आणि नाशाची धमकी इस्राएलाला दिली,'' त्या रात्री परमेश्वराचा दूत बाहेर पडला आणि त्याने अश्शूरांच्या छावणीतली एक लक्ष पंच्याऐशी हजार माणसे मारली.'' त्याने ''अश्शूरच्या राजाच्या छावणीतील सर्व शूर वीर, प्रमुख व नायक ह्यांची कत्तल केली''; तेव्हा तो फजीत होऊन आपल्या देशास परत गेला. २ राजे १९:३५; २ इतिहास ३२:३२.

**(१०) मनुष्याचे पतन झाल्यावर पतन न पावलेल्या देवदूतांना देवाने कोणती भूमिका सोपवली?**

*ज्यांना वारशाने तारण मिळणार आहे त्यांच्या सेवेसाठी पाठवलेले ते सर्व परिचारक आत्मे नाहीत काय? (इब्री १:१४)*

देवाच्या लेकरांच्या प्रती देवदूतांना दयेचा संदेश घेऊन पाठवण्यात येते. अब्राहाम ह्याप्रत, आशीर्वादाची अभिवचने घेऊन; सोदोमाच्या द्वारात, ज्वलंत नाशापासून नीतिमान लोटाची सुटका करण्यासाठी; एलीयासाठी, अरण्यात तो थकलेल्या आणि भुकेल्या अवस्थेपासून नाश पावत असताना; अलिशासाठी, अग्नीचे रथ आणि घोडे घेऊन त्या छोट्या शहरात तो आपल्या शत्रूंनी घेरला गेला तरीही; दानियेलासाठी, विदेशी राजाच्या दरबारात, किंवा सिंहाच्या तोंडी भक्ष्य व्हावे म्हणून जेव्हा त्याला सोडून दिले; पेत्रासाठी, जेव्हा तो हेरोदाच्या अंधारकोठडीत नाश पावणाऱ्या

अवस्थेत होता; फिलीप्पे येथील तुरुंगवासी ह्यांच्यासाठी; पौल आणि त्याच्या सहकाऱ्यांसाठी समुद्रात ते वादळ उठले तेव्हा; शुभवर्तमान ग्रहण करून कर्नेलीयचे डोळे उघडण्यासाठी; परजातीय विदेश्याच्या समोर तारणाचा संदेश घेऊन पेत्राला पाठवण्यासाठी- असेच, सर्व युगात, पवित्र दूतांनी, देवाच्या लोकांची भेट घेतली.

**(११) व्यक्तीशः देवदूत आपल्यासाठी काय करतात?**

*परमेश्वराचा दूत त्याचे भय धरणाऱ्यांसभोवती छावणी देतो आणि त्यांचे संरक्षण करतो.(स्तोत्रसहिता ३४:७ )*

ख्रिस्ताच्या प्रत्येक अनुयायासाठी एक रक्षण करणारा देवदूत नेमून देण्यात आला आहे. हे स्वर्गीय दूत दुष्टाच्या योजनेपासून नितीमानांचे सौरक्षण करतात. हे स्वतः सैतानाला कळले जेव्हा त्याने म्हंटले: " इयोब असाच देवाचे भय धरतो का? तू त्याच्या भोवती कुंपण केले नाही काय, आणि त्याच्या घराच्या भोवती, आणि त्याच्या चहूकडे?" इयोब १:९,१०. ज्या माध्यमातून देव आपल्या लोकांचे सौरक्षण करतो ते स्तोत्रकर्त्याच्या शब्दात व्यक्त होते: " परमेश्वराचा दूत त्याचे भय धरणाऱ्यांसभोवती छावणी देतो आणि त्यांचे संरक्षण करतो." स्तोत्रसहिता ३४:७. तारणारा म्हणाला, जे लोक त्याच्यावर विश्वास ठेवतात त्यांच्याबद्दल: " सांभाळा, ह्या लहानातील एकालाही तुच्छ मानू नका; कारण मी तुम्हांला सांगतो, स्वर्गात त्यांचे दिव्यदूत माझ्या स्वर्गातील पित्याचे मुख नित्य पाहतात." मत्तय १८:१०. देवाच्या लेकरांची

भेट घेण्यास ज्या दूतांना नेमले गेले त्यांना सदैव त्याच्या सान्निध्यात प्रवेश करण्याची मुभा आहे.

म्हणूनच देवाचे लोक, जे ह्या फसवणाऱ्या शक्तीपुढे आणि अंधकाराच्या सत्ताधीशाच्या द्वेशासमोर उघडकीस येतात, दुष्टाच्या सर्व शक्तीची युद्ध करतात, त्यांना ह्या स्वर्गीय दूतांचे न संपणारे  सौरक्षण देण्यात येते. गरज नसताना असे अभिवचन दिले गेलेले नाही. देवाने जर त्याच्या लेकरांना कृपा आणि सौरक्षण ह्यांचे अभिवचन दिले आहे, कारण त्यांना दुष्टाच्या महान सैन्याला सामोरे जायचे असते- माध्यमे अनेक, निश्चित आणि अथकपणे प्रयत्न करणारे, ज्यांच्या प्रसारात आणि सामर्थ्याच्या बद्दल कोणीही अज्ञानी आणि न ऐकणारे असे होऊ शकत नाही.

**(१२) पवित्र देवदूतांना भूतांमध्ये कशाने बदलले?**

***कारण ज्या देवदूतांनी पाप केले त्यांची देवाने गय केली नाही; तर त्यांना नरकात टाकले आणि न्यायनिवाड्याकरता अंधकारमय खाड्यात राखून ठेवले; (२ पेत्र २:४)***

दुष्ट आत्मे, सुरुवातीला, ज्यांना पापरहित असे घडवले, हे जे आता देवाचे संदेशवाहक आहेत त्यांच्या समान स्वभावाचे, सामर्थ्याने आणि वैभवाने घडवले गेले होते. पण पापात त्यांचे पतन होऊन, देवाचा अवमान आणि मनुष्यांचा नाश करण्यासाठी ते एकत्र येतात. सैतानाच्या सोबत बंडाई करण्यात एकत्र येऊन, आणि त्याला स्वर्गातून बाहेर लोटून देऊन, त्यांनी सर्व युगांच्या सोबत, ह्या दैवी अधिकाराच्या विरोधातील युद्धात त्याचे

सहकार्य केले आहे. आपल्याला शास्त्रवचनात त्यांच्या राष्ट्रमंडळ आणि शासन, त्यांच्यातील विभिन्न क्रम, त्यांची हुशारी आणि गूढता, आणि मनुष्याच्या शांती आणि आनंदाच्या विरोधातील कटकारस्थाने ह्याविषयी सांगितले आहे.

**(१३) मनुष्यजातीला फसवून त्याच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सैतान कोणत्या पद्धतींचे अवलंबन करतो?**

***ते चिन्हे दाखवणारे भुतांचे आत्मे आहेत; ते सर्वसमर्थ देवाच्या त्या मोठ्या दिवसाच्या लढाईसाठी संपूर्ण जगातील राजांना एकत्र करण्यास त्यांच्याकडे बाहेर जातात. (प्रगटीकरण १६:१४)***

जुन्या करारात अनेकदा प्रासंगिक स्वरूपाने त्यांचे अस्तित्व आणि माध्यम ह्याची मांडणी होते; पण जेव्हा ख्रिस्त पृथ्वीवर होता, दुष्ट आत्म्यांनी अत्यंत ठळकपणे त्यांचे सामर्थ्य व्यक्त केले. मनुष्याच्या उद्धाराच्या योजनेत प्रवेश करण्यासाठी ख्रिस्त आला, आणि तसेच सैतान देखील विश्वावर नियंत्रण ठेवण्याच्या त्याच्या हक्कावर कायम राहिला.

**(१४) जेव्हा पापी मनुष्य परवानगी देतो तेव्हा दुष्टाचे सर्व सैन्य आणि शक्तिओ कोठे वस्ती करतील?**

***मग संध्याकाळ झाल्यावर लोकांनी पुष्कळ भूतग्रस्तांना त्याच्याकडे आणले; तेव्हा त्याने भुते शब्दानेच घालवली व सर्व दुखणाइतांना बरे केले,(मत्तय ८:१६ )***

मनुष्यांना भुते ग्रस्त करायची , हे नवीन करारात स्पष्टपणे मांडले आहे. म्हणूनच ज्या लोकांना यातना व त्रास होते ते नैसर्गिक

कारणांमुळे आजारांनी ग्रासलेले नव्हते. ख्रिस्ताला काय हाताळत आहोत ह्याची पूर्ण कल्पना होती, आणि दुष्ट शक्तीचे सान्निध्य आणि मध्यम हे त्याने पटकन जाणून घेतले.

त्यांची संख्या, सामर्थ्य आणि ग्रासून टाकण्याची वृत्ती, आणि तसेच ख्रिस्ताचे सामर्थ्य आणि त्याची दया , ह्याचे ठळक उदाहरण गदार येथील भूतग्रस्तांना बरे करण्याच्या शास्त्रीय वृत्तांतात दिलेले आहे. हे दुष्ट वेडेपिसे झालेले, सर्व प्रकारची बंधने तोडून, फेसाळून, क्रोधाने आकार्मित होऊन, सर्वत्र त्यांचे आक्रंदन ऐकू येत होते, स्वतःला इजा पोहचवत होते, आणि जे सर्व लोक त्यांच्याकडे येत असत त्यांना धोकादायक ठरत होते. त्यांचे रक्तबंबाळ होणे आणि छिन्नविच्छिन्न शरीर आणि विचलित मने ह्या सर्वांनी अंधकाराच्या सत्ताधीशाच्या समोर एक छान चित्र प्रस्तुत केले.

**(१५) गरसेकर येथील मनुष्याच्या मध्ये किती भूतांची वस्ती होती?**

***त्याने त्याला विचारले, "तुझे नाव काय?" त्याने उत्तर दिले, "माझे नाव सैन्य; कारण आम्ही पुष्कळ आहोत." (मार्क ५:९)***

रोमी सैन्यात तीन ते पाच हजार लोक असायचे. सैतानाचे सैन्य देखील अशा समुदायात असते, आणि ज्या गटाचे ही भुते होती ती काही एका सैन्यापेक्षा कमी नव्हती.

**(१६) दुष्टाची सर्व शक्ती कोणत्या नावाच्या सामर्थ्याने पळ काढते?**

***नंतर ते बाहत्तर जण आनंदाने परत येऊन म्हणाले, "प्रभूजी, आपल्या नावाने भुतेदेखील आम्हांला वश होतात". (लुक १०:१७)***

येशूच्या आज्ञेने दुष्ट आत्मे त्या पिडीतांमधून निघून गेले, आणि त्यामुळे ते अत्यंत शांतपणे तारनार्याच्या चरनांजवळ बसले, शरण आलेले, सौम्य आणि बौद्धिक दृष्टीने समर्पित..... येशूचे सैतानाच्या बंधनाला तोडून सर्वांना बंधनमुक्त करण्याचे सामर्थ्य त्या प्रदेशातील लोकांनी पाहावे ही त्याची इच्छा होती. आणि जरी येशू स्वतः तिकडून निघून गेला, तरीही त्या लोकांची इतक्या अद्भुत रीतीने सुटका झाली, आणि ते लोक आपल्या उपकारकर्त्याचे वर्णन व घोषणा करण्यासाठी थांबले.

**(१७) अलीम जादुगार ह्याने काय सिद्ध केले ज्यातून भुते हे लोकांच्या निवडीनुसार त्यांना ग्रासून टाकतात हे प्रगट होते?**

*परंतु अलीम जादूगार) त्याच्या नावाचा अर्थ हाच आहे (ह्याने त्यांना अडवून सुभेदाराला विश्वासापासून फितवण्याचा प्रयत्न केला. (प्रेषित १३:८)*

जे लोक भूतग्रस्त असतात ते भयंकर अशा यातना सहन करतात; तरीही ह्याला अपवाद आहेत. अलौकिक सामर्थ्य प्राप्त करून घेण्यासाठी, काही लोकांनी त्या सैतानी प्रभावाला आमंत्रित केले. ह्याचा अर्थातच बहुतांशी काहीच वाद किंवा संघर्ष नव्हता. ह्या वर्गामध्ये असे होते ज्यांच्यात जादूटोणा करण्याचा आत्मा होता,- शिमोन मागुस, अलीम जादुगार, आणि जी मुलगी फिलीप्पे येथे पौल आणि सिलाच्या मागे धाऊन गेली.

**(१८) हे वचन लुसिफर- ज्याला आता सैतान म्हंटले जाते त्याचे शारीरिक स्वरूपाचे वर्णन कसे करते?**

*“तुझ्या सौंदर्याच्या अभिमानाने तुझे हृदय उन्मत्त झाले, तुझ्या वैभवाने तुझी बुद्धी भ्रष्ट झाली; मी तुला भूमीवर आदळले, राजांनी तुझा तमाशा पाहावा म्हणून त्यांच्यापुढे तुला टाकले. (यहज्केल २८:१७)*

महान लबाडी करणारा आणि ठकवणारा ह्याला आपल्याला त्याच्या सर्व पद्धती आणि मार्ग समजतील ह्यापेक्षा कशाचीही अधिक भीती वाटत नाही. त्याचे खरे चारित्र्य आणि उद्देश ह्यावर पांघरून घालून, त्याने स्वतःला असे प्रस्तुत केले आहे की त्याच्याप्रती धिक्कार क्रोध किंवा दोष ह्यापलीकडे कोणतीच भावना उत्पन्न होत नाही. त्याला एक हास्यास्पद किंवा किळसवाणे साधन, अशुभ, अर्धा पशु आणि अर्धा मनुष्य असे प्रस्तुत करायला आवडते. त्याला स्वतःचे नाव खेळात यायला आवडते आणि जे लोक स्वतःला हुशार आणि माहितगार असे समजतात त्यांची थट्टा करवून घ्यायला त्याला आवडते.

**(१९) फसवणूक टाळण्यासाठी सुज्ञान लाभावे म्हणून पवित्र शास्त्र कोणती कृती आपल्याला शिकवते?**

*सैतानाच्या डावपेचांपुढे तुम्हांला टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री धारण करा. (इफिसकरास पत्र ६:११)*

*तू सत्याच्या वचनाची योग्य विभागणी करून नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेही कारण नसलेला, देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी, असा स्वतःला सादर करण्यास होईल तितके कर. (२ तिमथी २:१५)*

हा प्रश्न इतक्या मोठ्या प्रमाणावर विचारला जातो कारण त्याच कौशल्याने त्याने स्वतःला झाकून टाकले आहे: “ असा कोणी

खरेच अस्तित्वात आहे का?" हा त्याचा यशाचा पुरावा आहे की जे सिद्धांत शास्त्रवचनाची सोपी साक्ष देतात त्या ह्या धार्मिक विश्वात इतक्या सामान्यतः स्वीकारण्यात येतात. आणि सैतान देखील इतक्या सहजपणे अशा लोकांचे मन ताब्यात ठेऊ शकतो कारण त्याचा तसा प्रभाव असतो, देवाचे वचन त्याच्या ह्या प्रसाराच्या कार्याची इतकी उदाहरणे देते, आपल्यासमोर त्या रहस्यमय शक्तींना उघड करून, आणि म्हणूनच त्याद्वारे त्याच्या हल्ल्यांच्या विरोधात आपल्याला सतर्क ठेवते.

**(२०) सौरक्षण होण्याचे कोणते महान अभिवचन आपण सिद्ध करू शकतो जेव्हा दुष्टाच्या शक्ती आपल्यावर हल्ला करतात?**

*अहो परमेश्वरावर प्रीती करणाऱ्यांनो, वाइटाचा द्वेष करा; तो आपल्या भक्तांच्या जिवाचे रक्षण करतो .तो त्यांना दुर्जनांच्या हातातून सोडवतो. (स्तोत्रसहिता ९७:१०)*

सैतानाचे सामर्थ्य आणि आकस आणि त्याचे सैन्य आपल्याला आश्चर्यचकित करू शकतात जर आपण आपल्या उद्धारकाच्या उच्च शक्तीच्या अधीन वस्ती करण्यास व त्याच्या सुटकेचा अनुभव घेण्यास तयार नसलो तर. आपण दुष्ट लोकांपासून घराचे सौरक्षण करण्यासाठी अत्यंत काळजीपूर्वक दारांना कड्या व कुलुपे लावतो; पण क्वचितच आपण दुष्ट शक्तींचा व दुतांचा विचार करतो जे सदैव आपल्यामागे येण्याची वाट पाहत असतात, आणि ज्यांच्याशी हल्ला करण्यास आपल्याकडे स्वतःचे बळ किंवा प्रतिकार करण्याची पद्धत उपलब्ध नाही. परवानगी दिली तर, ते आपले मन विचलित करू

शकतात, आपली मालमत्ता आणि जीवने नष्ट करू शकतात. त्यांना केवळ अशा रीतीने नाश व दुर्दशा पसरवण्यात आनंद आहे.

भयभीत अशी परिस्थिती लोकांची असते जे ह्या दैवी आशीर्वादांचा प्रतिकार करतात आणि सैतानाच्या मोहांना बळी पडतात, जोपर्यंत देव त्यांना दुष्ट आत्म्याच्या नियंत्रणात देत नाही. पण जे लोक ख्रिस्ताचे अनुकरण करतात ते सदैव त्याच्या काळजीच्या व लक्ष ठेवण्याच्या अधीन असतात. देवाने जे सौरक्षण त्याच्या लोकांच्या भोवती ठेवले आहे दुष्ट शक्ती ते तोडू शकत नाही.

*शास्त्रवचनातून मला दिसते की मी चांगले आणि वाईट ह्या विश्वाच्या संघर्षात अडकलो आहे. मला ह्याची जाणीव आहे की भूतग्रस्त शक्ती म्हणजे मृत लोकांचे आत्मे नाही तर पतन पावलेले देवदूत आहेत जे सतत माझ्या नाशाची वाट पाहतात कारण मी देवाच्या कृपादायी वरदानाला स्वीकारत असतो.*

*गोल करा : होय अनिश्चित*

*मी देवाचे आभारी आहे कारण तो त्याचे पतन न झालेले दूत माझी काळजी घेण्यास आणि सौरक्षण करण्यास ह्या महान वादविवादाच्या समयी पाठवत असतो.*

*गोल करा : होय अनिश्चित*

*मला जाणीव आहे की सैतान आणि त्याच्या दुष्ट माध्यमांच्या शक्ती, हुशारी, किंवा क्षमता ह्यांच्याशी जोडला जाऊ शकत नाही. मी देवाचे आभार मानतो कारण ख्रिस्ताच्या नावाने मी*

ह्या दुष्ट शक्तींपासून बचाव होण्यासाठी त्या अलौकिक शक्तीला हस्तगत करू शकतो.

गोल करा :  होय  अनिश्चित

मला माहित आहे की शेवटल्या दिवसात अंधकाराच्या शक्ती मला फसवण्यासाठी चमत्कारिक चिन्हे आणि अद्‌भुते ह्यांचा वापर करतील. देवाच्या वचनाचा अभ्यास करण्यात मार्गदर्शन होण्यात पवित्र आत्म्याने माझी फसवणूक होऊ नये म्हणून सहाय्य करावे.

गोल करा :  होय  अनिश्चित



## धडा ४
## सैतानाचे जाळे

### (१) ह्या महान वादविवादात सैतानाचा अंतिम हेतू काय आहे?

*आणि ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत त्याने राष्ट्रांना आणखी ठकवू नये म्हणून वरून बंद करून त्यावर शिक्का मारला .त्यानंतर त्याला थोडा वेळ सोडले पाहिजे. (प्रगटीकरण २०:३)*

ख्रिस्त आणि सैतान ह्यांच्यातील ह्या महान वादविवादात, जो सुमारे सहा हजार वर्षे चालू आहे, तो लवकरच संपुष्टात येणार आहे; आणि दुष्ट शक्ती ख्रिस्ताचे हे कार्य नष्ट करण्यास व आत्मे त्याच्या जाळयात अडकवून घेण्यास माणसाच्या वतीने दुप्पट प्रयत्नात व्यस्त आहेत. लोकांना अंधकारात आणि पश्चाताप न करण्याच्या वृत्तीत ठेऊन जोपर्यंत तारणार्याचे मनन संपत नाही, आणि पापासाठी काही अर्पण दिले जात नाही, हे ते साधन आहे जे सिद्ध करण्यास तो वाट पाहत असतो.

**(२) सैतानाच्या सर्व फसवणुकीपासून सौरक्षण होण्यास आपल्याला कोणत्या दोन- भागात सूचना देण्यात आल्या आहेत?**

*म्हणून देवाच्या अधीन व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुमच्यापासून पळून जाईल. (याकोब ४:७)*

जेव्हा त्याच्या शक्तीचा प्रतिकार करण्यास काही विशेष प्रयत्न केले जात नाहीत, जेव्हा मंडळी आणि जगात बेफिकीर वृत्ती टिकाव धरते, सैतानाचा संबंध येत नाही; कारण जे लोक त्याच्या इच्छेच्या अधीन बंदिवासात आहेत त्यांना गमावण्याची भीती त्याच्यात अजिबात नसते. पण जेव्हा सनातन गोष्टींकडे लक्ष वेधले जाते, आणि जीवात्मे चौकशी करतात, "माझे तारण व्हावे ह्यासाठी मी काय केले पाहिजे?" तो तर कार्य करण्यास तयार असतो, ख्रिस्ताच्या सामार्थ्याशी त्याचे सामर्थ्य जोडण्याचे प्रयत्न करत असतो आणि पवित्र आत्म्याच्या प्रभावाला करण्याची निष्फळ त्याची वृत्ती असते.

**(३) देहवासनेवर शक्ती संपादन करण्यासाठी कोणत्या पवित्र शास्त्रीय सल्ल्याची आपल्याला मदत होईल?**

*मी तर म्हणतो, आत्म्याच्या प्रेरणेने चाला, म्हणजे तुम्ही देहवासना पूर्ण करणारच नाही. (गलतीकरास पत्र ५:१६)*

परत, सैतान प्रभूच्या सेवकांना अशा रीतीने ओझ्याखाली दबलेले पाहतो कारण लोकांच्या भोवती हा अध्यात्मिक अंधकार पसरलेला असतो. तो त्यांची बेफिकिरी, निष्काळजी वृत्ती आणि आळस ह्यांना तोडण्याचे सामर्थ्य आणि कृपा मिळवण्याच्या त्यांच्या प्रामाणिक प्रार्थना

ऐकतो. मग नव्या जोमाने आणि आवेशाने तो त्याच्या कृतींना आकार देतो. तो मनुष्यांना भुकेच्या अधीन जाणे किंवा स्वतःच्या भोवती असणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्यांच्यात गुरफटून टाकतो, आणि त्याद्वारे त्यांच्या संवेदना बधीर कतो जेणेकरून ज्या गोष्टी शिकण्याची त्यांची अपेक्षा असते त्याच ऐकण्यात ते अपयशी होतात.

**(४) सनातन बाबींपासूनआपले विचार विचलित करण्यासाठी कोणते तीन दिशाभूल करण्याचे मार्ग सैतान वापरतो?**

***व नंतर प्रपंचाची चिंता, द्रव्याचा मोह व इतर गोष्टींचा लोभ ही त्यांच्यामध्ये शिरून वचनाची वाढ खुंटवतात आणि ते निष्फळ होते. (मार्क ४:१९)***

सैतानाला हे चांगलेच ठाऊक आहे ज्या सर्व लोकांना तो प्रार्थनेकडे दुर्लक्ष करण्यास आणि शास्त्रवचने वाचण्यापासून परावृत्त करू शकेल, त्यांच्यावर तो विजय सहज मिळवू शकतो. म्हणूनच मनाला इतर गोष्टींमध्ये व्यस्त ठेवण्यासाठी तो शक्य ते प्रत्येक हत्यार शोधून काढतो.

**(५) जे लोक स्वतःला ख्रिस्ती म्हणवून घेतात पण नाहीत त्यांचा उपयोग सैतान कसा करवून घेतो?**

***आता बंधुजनहो, मी तुम्हांला विनंती करतो की, तुम्हांला जे शिक्षण मिळाले आहे त्याविरुद्ध जे फुटी व अडथळे घडवून आणत आहेत त्यांच्यावर लक्ष ठेवा आणि त्यांच्यापासून दूर व्हा. (रोमकरास पत्र १६:१७)***

कायम असा एक वर्ग असतो जो देवभिरू असल्याचे भासवतो, सत्य काय आहे हे जाणून घेण्याच्या ऐवजी, ज्यांच्याशी त्यांचे पटत नाही त्यांच्या चारित्र्यात काहीतरी दोष काढण्यास आणि विश्वासात चूक काढणे हा त्यांचा धर्मच मानतात. असे सैतानाचे जवळचे मदतनीस आहेत. बंधूजणांना दोष लावणारे काही कमी नाहीत, आणि जेव्हा देव कार्यरत असतो आणि त्याचे सेवक त्याची मनोभावे सेवा करतात तेव्हा ते कायम कार्यशील असतात. ज्या लोकांचे सत्यावर प्रेम असते आणि त्या कृती त्यांना पसंत पडतात त्यांच्या शब्दांना ते फसवे करण्याचा प्रयत्न करतात. ख्रिस्ताचे सर्वात प्रामाणिक , आवेशी, आत्म-त्याग करणाऱ्या सेवकांना फसवणारे किंवा ठकवणारे असे प्रस्तुत करतात. प्रत्येक सत्य आणि उदार कृत्य ह्यांच्या हेतूला चुकीच्या रीतीने प्रस्तुत करणे, असे गैर मत ह्यांचा शिरकाव करतात, आणि कमी अनुभव असलेल्या लोकांमध्ये शंका निर्माण करतात. ज्या रीतीने ही बाब समजली जाते, जे सर्व शुद्ध आणि धार्मिक आहे त्याला ते गैर आणि फसवे असे लेखावे म्हणून शोध करत राहतात.

**(६) शास्त्रवचन ह्या लबाड लोकांना कसे ओळखते?**

***त्यांच्या फळांवरून तुम्ही त्यांना ओळखाल . काटेरी झाडांवरून द्राक्षे किंवा रिंगणीच्या झाडांवरून अंजीर काढतात काय? (मत्तय ७:१६)***

पण त्यांच्यासंबंधी कोणीही फसवले जाऊ नये. ते सहजपणे कळते की ते कोणाचे संतान आहेत, कोणाच्या उदाहरणाचे ते अनुसरण करतात, आणि कोणाचे काम ते करतात..... त्यांचे कार्य सैतानाशी जुळते, जो घातकी आणि

विषारी लबाड आहे, ''आपल्या बंधूजणांचा दोषी.'' प्रगटीकरण १२:१०.

जीवात्म्यांना त्या सापळयात टाकण्यासाठी ह्या महान लबाड बोलण्यार्याकडे त्या चुकी दर्शवण्यासाठी अनेक दूत किंवा माध्यमे आहेत- ज्या लोकांचे तो नुकसान करू शकतो त्यांच्या मतानुसार क्षमतेनुसार जुळवून घेण्यासाठी अनेक पाखंड आहेत. त्याची ही योजना आहे की मंडळीत अप्रामाणिक, निरुत्साही घटक आणने जे अशा प्रकारे शंका आणि अविश्वास उत्पन्न करतील, आणि ज्या सर्व लोकांचे देवाचे कार्य पुढे जाताना बघायचे आहे आणि तसेच स्वतःला पुढे न्यायचे आहे त्यांची ही इच्छा त्याला खुंटवायची आहे. अनेक लोक ज्यांचा देवावर किंवा त्याच्या वचनावर खरा विश्वास नाही ते सत्याच्या काही तत्वांशी पटवून घेतात आणि स्वतःला ख्रिस्ती म्हणवून घेण्यात यशस्वी होतात, आणि म्हणून त्यांच्या चुकांना शास्त्रवचनावर आधारित तत्वे किंवा सिद्धांत म्हणवून घेण्यात सक्षम असतात.

**(७) सत्याचा स्वीकार करण्याचा परिणाम काय असतो?**

*तुम्हांला सत्य समजेल व सत्य तुम्हांला बंधमुक्त करील". (योहान ८:३२)*

ज्यावर लोक विश्वास ठेवतात ते सैतानाचे सर्वात यशस्वी फसवणारे साधन आहे हे स्थान ह्याचा काही परिणाम नाही. त्याला सत्य ठाऊक आहे, त्याच्या प्रेमात ते स्वीकारून, ग्रहण करणाऱ्याच्या जीवात्म्याला शुद्ध करतो; म्हणूनच खोटे सिद्धांत, गोष्टी, दुसरे शुभवर्तमान ह्यांनी ती जागा बदलून टाकण्याच्या शोधात तो कायम आहे. अगदी सुरुवातीपासून देवाच्या सेवकांनी ह्या खोट्या शिक्षकांच्या विरुद्ध स्पर्धा

केली आहे, केवळ दुष्ट लोक म्हणून नाही, पण जीवात्म्यासाठी जे काही घातक आहे त्याला बिंबवणारे आहेत ह्या कारणाने तसे केले. एलिया, यिर्मया, पौल ह्यांनी जे लोकांना देवाच्या वचनापासून वळवत होते त्यांना भक्कमपणे आणि भयरहित रीतीने विरोध केला आहे. ती मनाची विशालता जी योग्य शार्मिक विश्वासाला महत्वाचे असे लेखत नाही त्यांनी सत्याच्या ह्या पवित्र दुजोरा देणार्यासमोर काहीच कृपामर्जी मिळवली नाही.

**(८) जे लोक स्वतःच्या विश्वासाशी शास्त्रवचनाला जुळवण्यासाठी त्यांना पिळवटून टाकतात त्यांना काय होईल?**

***आणि त्याने आपल्या सर्व पत्रांत ह्या गोष्टींचा उल्लेख केला आहे; त्यांत समजण्यास कठीण अशा काही गोष्टी आहेत .अज्ञानी व अस्थिर माणसे इतर शास्त्रलेखांचा जसा विपरीत अर्थ करतात तसा ह्यांचाही करतात; अशाने ते स्वतःच्या नाशाला कारणीभूत होतात. (२ पेत्र ३:१६)***

शास्त्रवचनाची विचित्र आणि काल्पनिक भाषांतरे, आणि धार्मिक विश्वासाच्या बद्दलचे अनेक विरोधी सिद्धांत, जे ख्रिस्ती विश्वात आढळतात हे तर आपल्या महान शत्रूचे कार्य आहेत ज्यामुळे मने गोंधळात पडतात आणि त्यांनी त्यामुळे सत्य ओळखून घेऊ नये. ख्रिस्तीत्वाच्या मंडळयांमध्ये जी फूट आणि वैमनस्य अस्तित्वात आहे ते शास्त्रवचनाला एका आवडत्या सिद्धांताशी जोडण्याच्या प्रचलित पद्धतीमुळे मोठ्या प्रमाणात दिसते. देवाच्या इच्छेचे ज्ञान जाणून घेण्यास ते विनम्र हृदय प्राप्त करून देवाचे वचन अगदी काळजीपूर्वक अभ्यासण्याच्या ऐवजी, अनेक लोक काहीतरी

विचित्र किंवा मूळ स्वभावाचे शोधण्यासाठी झटत असतात.

**(९) जे लोक देवाच्या वचनाचा अर्थ बदलण्याचा विचार करतात त्यांच्यासाठी काय इशारा किंवा सूचना दिलेली आहे?**

*ह्या पुस्तकातील 'संदेशवचने' ऐकणाऱ्या प्रत्येकाला मी निश्चयपूर्वक सांगतो की, जो कोणी 'ह्यांत भर घालील त्याच्यावर ह्या पुस्तकात लिहिलेल्या' पीडा देव आणील;*
*'आणि' जो कोणी ह्या संदेशाच्या पुस्तकातील वचनांतून काही 'काढून टाकील' त्याचा वाटा ह्या पुस्तकात वर्णन केलेल्या जीवनाच्या झाडातून व पवित्र नगरीतून देव काढून टाकील (प्रगटीकरण २२:१८-१९)*

चुकीचे सिद्धांत आणि विधर्मी सवयी राखण्यासाठी, काही लोक शास्त्रवचने जे संदर्भाच्या पासून अलिप्त आहेत त्यांना बळकावण्याच्या प्रयत्न करतील, त्यांचा मुद्दा सिद्ध करण्यासाठी कदाचित केवळ अर्धेच वचन बोलून दाखवतात, आणि उरलेले वचन तर त्याच्या विरुद्ध अर्थ प्रस्तुत करत असते. सर्पाच्या प्रमाणे धूर्त बनून त्यांच्या दैहिक इच्छा तृप्त करण्यासाठी आणि तसे शोभून दिसण्यासाठी अशा प्रकारे ते नको ते उच्चारतात. असेच अनेक लोक स्वेच्छेने देवाच्या वचनाला बदलतात. इतर लोक, ज्यांची काल्पनिक बुद्धी कार्यशील असते, पवित्र लेखणीचे विचार आणि चिन्हे ह्यांना बळकावतात, त्यांच्या भावनेला साजेसे होण्यासाठी त्याचे भाषांतर करतात, शास्त्रवचनाची साक्ष जी त्यांचे स्वतःचे भाषांतर करणारे बनते, आणि मग ते लोक पवित्र शास्त्राच्या शिकवणी म्हणून स्वतःचे विभिन्न विचार व्यक्त करतात.

जेव्हा केव्हा शास्त्रवचनाचा अभ्यास आपण प्रार्थनाहीन ,अविनम्र आणि न शिकण्याची वृत्ती, अशाने करण्याचा प्रयत्न करतो, सगळयात साधे आणि सोपे तसेच कठीण शास्त्रभाग त्यांच्या खर्या अर्थापासून दूर जातात.

**(१०) सोप्या आणि साध्या मनासाठी प्रभूची साक्ष काय करेल?**

*परमेश्वराचे नियमशास्त्र परिपूर्ण आहे, ते मनाचे पुनरुज्जीवन करते; परमेश्वराचा निर्बंध विश्वसनीय आहे .तो भोळयांना समंजस करतो; (स्तोत्रसहिता १९:७)*

आपल्या निर्माणकर्त्याच्या इच्छेशी जुळवून घेण्यात ज्या कोणाची इच्छा आहे त्यांच्याशी पवित्र शास्त्र एक मार्गदर्शिका बनू इच्छित आहे. देवाने मनुष्यांना भविष्यवाणीचे खात्रीशीर वचन दिले आहे; देवदूत आणि स्वतः ख्रिस्त देखील दानियेल आणि योहान ह्यांना ज्या गोष्टी येणार आहेत त्या दाखवण्यासाठी प्रगट झाले. ज्या महत्वाच्या बाबी आपल्या तारणाशी संबंधित आहेत त्यांना रहस्यमय म्हणून सोडून दिलेले नाही. सत्याच्या मागे धावणारे प्रामाणिक शोध करणारे त्यांना छळण्यासाठी आणि दिशाभूल करण्यासाठी अशा रीतीने प्रगट झाले नाहीत.

हबक्कुक द्वारे देव म्हणाला, ...... "हा दृष्टान्त लिहून काढ, पाट्यांवर ठळक लिही; म्हणजे कोणीही तो वाचून धावत सुटावे." ह्बक्कुक २:२. जे कोणी देवाचे वचन प्रार्थनापूर्वक हृदयाने अभ्यासतात त्यांच्यासाठी ते ठळक असे आहे. प्रत्येक

प्रामाणिक जीवात्मा हा ह्या सत्याच्या प्रकाशाकडे येईल. नीतिमानांसाठी प्रकाश व जे सरळ अंतःकरणाचे आहेत त्यांच्यासाठी हर्ष पेरला आहे." स्तोत्रसहिता ९७:११.

**(११) देव ह्या जगाच्या सुज्ञानाकडे कसे पाहतो?**

***कारण ह्या जगाचे ज्ञान देवाच्या दृष्टीने मूर्खपण आहे; कारण " तो ज्ञान्यांस त्यांच्याच धूर्तपणात धरतो," असा शास्त्रलेख आहे"; (१ करिंथकरास पत्र ३:१९)***

अनेकांसाठी, वैज्ञानिक संशोधन एक शाप बनले आहे. विज्ञान आणि कला शाखेतील संशोधनाने जगावर प्रकाश पसरण्यास देवाने परवानगी दिली आहे; पण अत्यंत हुशार आणि थोर मने देखील, जर देव त्यांच्या संशोधनात मार्गदर्शन करत नसेल, तर ते विज्ञान आणि प्रगटीकरण ह्यांच्यात नाते स्थापित करण्याच्या प्रयत्नात गोंधळात पडतात.

**(१२) शास्त्रवचन जगिक विज्ञानाला कसे लेखते?**

***हे तीमथ्या, तुझ्या स्वाधीन केलेली ठेव सांभाळ; अधर्माच्या रिकाम्या वटवटींपासून आणि जिला विद्या हे नाव चुकीने दिले गेले आहे तिच्या विरोधी मतांपासून दूर राहा: (१ तीमथी ६:२०)***

भौतिक आणि अध्यात्मिक गोष्टींच्या बद्दल असलेले मानवी सुज्ञान आहे अर्धवट असून परिपूर्ण नाही; म्हणूनच अनेक लोक शास्त्रवचनाच्या विधानांशी विज्ञानाच्या मतांना जुळवू शकत नाहीत. अनेक ,लोक केवळ सिद्धांत

आणि अंदाज ह्यांना वैज्ञानिक वास्तविकता म्हणून लेखतात, आणि त्यांना वाटते की देवाच्या वचनाला "विज्ञान म्हणवणाऱ्या कोणत्या पद्धतीने" शिकवणीने तपासण्याचे साधन आहे. . . . निर्माणकर्ता आणि त्याची हस्तकृती हे त्यांच्या समजबुद्धीच्या पलीकडे आहेत; आणि नैसर्गिक नियमांनी हे स्पष्ट करू शकत नाहीत म्हणून, पवित्र शास्त्राचा इतिहास हा विसंबून राहण्यासारखा नाही असे लेखतात. जे लोक जुना आणि नवीन करार ह्यांच्या नोंदीवर शंका घेतात ते एक पाऊल पुढे जाऊन देवाच्या अस्तित्वावर प्रश्न विचारतात आणि निसर्गाला अमर्यादित सामर्थ्य प्रदान करतात. त्यांचा जो भक्कम असा नांगर आहे त्याला सोडून, बेईमानीच्या खडकांवर ते आदळत राहतात.

**(१३) मनुष्य देवाला का पूर्णपणे समजून घेऊ शकणार नाही?**

***अहाहा, देवाच्या बुद्धीची व ज्ञानाची संपत्ती किती अगाध आहे !त्याचे निर्णय किती गहन आणि त्याचे मार्ग किती अगम्य आहेत! (रोमकरास पत्र ११:३३)***

म्हणूनच अनेक लोक विश्वासापासून चुकतात आणि सैतान त्यांना भुलवतो. आपल्या निर्माणकर्त्याच्या पेक्षा अधिक ज्ञानी होण्याचा धाडसी प्रयत्न लोकांनी केला आहे; मानवी तत्वज्ञानाने अशा प्रकारचे गुपित शोधण्याचा आणि स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे जे सर्व युगांमध्ये प्रगट होऊ शकत नाही. जर लोकांनी देवाने स्वतःबद्दल काय व्यक्त केले आणि त्याचे हेतू काय आहेत हे मात्र शोधून जाणून घेतले, त्यांना यहोवाचे गौरव, वैभव आणि सामर्थ्याचा इतका महान दृष्टीकोन समजून येईल, ते किती

कमी आणि क्षुद्र आहेत हे त्यांना समजेल आणि स्वतःसाठी व त्यांच्या लेकरांसाठी जे काही प्रगट झाले आहे ते पाहून आणि ऐकून समाधानी होतील.

जे काही देवाने दाखवले नाही त्याप्रत लोकांची मने शोधण्यास आणि तर्कवितर्क लावण्यात व्यस्त ठेवणे म्हणजे सैतानाच्या फसव्या स्वभावाचे एक सर्वोत्तम साधन आहे आणि ते आपल्याला समजू नये हा त्याचा हेतू आहे. ह्या कारणाने लुसिफरने आपले स्वर्गातील स्थान गमावले. तो स्वतः असमाधानी झाला कारण देवाच्या हेतूचे सर्व रहस्य त्याला गुप्तपणे सांगण्यात आले नव्हते, आणि त्याच्या स्वतःच्या कार्याच्या बाबतीत जे मोठे स्थान त्याला प्रदान करण्यात आले होते त्यात जे काही प्रगट झाले त्याचा त्याने पूर्णपणे अवमान केला. त्याच्या अधिकारात जी काही देवदूते होती, तोच असमाधान त्यांच्यात जन्मास घालून, त्याने त्यांचे पतन घडवून आणले. आता लोकांच्या मनात ह्याच आत्म्याला उत्स्फूर्त करण्याचा प्रयत्न तो करतो आणि देवाच्या आज्ञा अवमानण्यासाठी त्यांना दिशा दाखवतो.

## (१४) ह्या महान आणि थोर भ्रमांवर विश्वास ठेवण्याचा धोका कोणाचा आहे?

*ज्यांचा नाश होत चालला आहे त्यांनी आपले तारण साधावे म्हणून सत्याची आवड धरायची ती धरली नाही; त्यामुळे त्यांच्यासाठी सैतानाच्या कृतीप्रमाणे सर्व प्रकारची खोटी महत्कृत्ये, चिन्हे, अद्‌भुते आणि सर्व प्रकारचे अनीतिजनक कपट ह्यांनी युक्त असे त्या अनीतिमानाचे येणे होईल.*

*त्यांनी असत्यावर विश्वास ठेवावा म्हणून देव त्यांच्या ठायी भ्रांतीचे कार्य चालेल असे करतो;*

*ज्यांनी सत्यावर विश्वास ठेवला नाही, तर अनीतीत संतोष मानला त्या सर्वांना शासन व्हावे म्हणून असे होईल. (२ थेसलोनिकरास पत्र २:१०-१२)*

जे लोक पवित्र शास्त्राचे ठळक आणि स्पष्ट सत्य स्वीकारण्यास तयार नसतात, ते कायम त्यांचा विवेक संतोषकारक गोष्टींनी कसा शांत होईल ह्याच्या मागे असतात. कमी प्रतीचे अध्यात्मिक, आत्मत्याग वृत्तीचे, आणि जे काही सिद्धांत व्यक्त झाले त्यांचा अपमान करत, तितक्याच अधिक कृपामर्जीने त्यांचा स्वीकार करण्यात येतो. हे लोक त्यांच्या शारीरिक देहवासना तृप्त करण्यास त्यांच्या बौद्धिक क्षमतांना कमी लेखतात. शास्त्रवचने शोधून आत्मे शुद्ध करून दैवी मार्गदर्शन मिळावे म्हणून प्रार्थना करण्यास, त्यांच्या स्वतःच्या अहंकारात ते सुज्ञ असतात, आणि ह्यामुळे भ्रमापासून कोणत्याही प्रकारे त्यांचे सौरक्षण नसते. सैतान त्यांच्या मनाच्या इच्छा पूर्ण करण्यास तयार असतो, आणि सत्याच्या जागी त्याची सर्व लबाडी तो पुढे प्रस्तुत करतो.... जे कोणी देवाच्या वचनाकडे सोय आणि पद्धत ह्यांचा अभ्यास करण्यासाठी दुर्लक्ष करतात, ज्यामुळे जगाबरोबर वागत असताना त्यांच्यात फरक पडत नाही, त्यांच्याप्रत ह्या धार्मिक सत्यासाठी केवळ दोष लावणारे पाखंड पडते. प्रत्येक समजून घेता येणारी चूक ही जे लोक स्वेच्छेने सत्याला नाकारतात ते देखील स्वीकारतात. जो कोणी भयभीत होऊन फसवणुकीकडे पाहतो त्याचे सहजच दुसऱ्या फसवणुकीकडे लक्ष जाते.

ह्या महान फसवणाऱ्याचे यशस्वी माध्यम म्हणजे भ्रमात टाकणाऱ्या शिकवणी आणि अध्यात्मिक्तेच्या फसवे अद्‌भुते. प्रकाशाचा एक दूत म्हणून वेषांतर केल्याने, जिकडे कोणीही

अंदाज मांडला नसेल तिकडे आपले जाळे टाकतो. लोकांनी जर केवळ देवाच्या पुस्तकाचा कळकळीच्या प्रार्थनेने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला की जेणेकरून त्यांना ते समजावे, ते खोटे सिद्धांत मिळवण्यासाठी तितक्या अंधकारात ते राहणार नाहीत. पण जसे त्या सत्याचा ते नकार करतात तितक्याच पटीने फसवणूक होण्यास भक्ष्य पडतात.

**(१५) आपण काय टाळावे अशी सूचना आपल्याला देण्यात आली आहे?**

***अशा प्रकारे तुम्ही आपला संप्रदाय चालू ठेवून देवाचे वचन रद्द करता आणि ह्यासारख्या आणखी पुष्कळ गोष्टी करता".(मार्क ७:१३ )***

चुकीचे सिद्धांत आणि कल्पना इतक्या असंख्य आहेत ज्या ख्रिस्तीत्वामधील मंडळयांमध्ये ग्रहण केल्या जात आहेत. देवाच्या वचनाच्या द्वारे जे मार्गदर्शक सिद्ध झाले आहेत त्यातील एक जरी काढून टाकण्याचे वाईट परिणाम काय होतील ह्याचा अंदाज बांधणे देखील अशक्य आहे. अगदी कमी प्रमाणावर जे लोक असे करण्याचा प्रयत्न करतात ते एका सत्याला नाकारून तिकडेच थांबतात. त्यातील बहुसंख्याक लोक एका मागे एक सत्याची ही तत्वे बाजूला ठेऊन, ती मते किंवा सिद्धांत नाकारणारे व्यक्ती बनतात.

प्रसिद्ध धर्मशास्त्रातील चुका ह्यामुळे अनेक जीवात्मे ह्यावर शंका घेतात नाहीतर ते तर शास्त्रवचनावर विश्वास ठेवणारे बनले असते. न्याय, दया आणि परोपकार ह्यांच्या भावनांच्या विरोधात जे सिद्धांत असतात

त्यांचा स्वीकार करणे अशक्य असते; आणि ह्या सर्व पवित्र शास्त्राच्या शिकवणी म्हणून प्रस्तुत झाल्यामुळे, देवाचे वचन म्हणून ते ग्रहण करण्यास तो नकार देतो.

**(१६) मनुष्याच्या सर्व परंपरांना अत्युच्च आदर देऊन लेखण्याचा धोका काय आहे?**

***आणखी तो त्यांना म्हणाला, "तुम्ही आपला संप्रदाय पाळण्याकरता देवाची आज्ञा मोडण्याचा छान मार्ग शोधून काढला आहे! (मार्क ७:९)***

आणि सैतान हे उद्धिष्ट सिद्ध करण्याच्या मागे असतो. देव आणि त्याच्या वचनावरील विश्वास नष्ट करण्याच्या ऐवजी दुसरी कोणतीही मोठी इच्छा त्याची नसते. शंका घेणाऱ्या लोकांच्या सैन्याचा प्रमुख म्हणून सैतान उभा असतो, आणि सर्व प्रयत्नाने तो इतर जीवात्म्यांना त्याच्या दर्ज्यात घेण्याच्या प्रयत्नात असतो. शंका घेणे किंवा अविश्वास दर्शवणे ही एक प्रचलित बाब बनली आहे. ज्या रीतीने व कारणामुळे लेखकाच्या बाबतीत झाले तसेच एक मोठा वर्ग आहे जो देवाच्या वचनावर भरवसा ठेवत नाही- कारण म्हणजे ते पापाला सुधारून त्याचा धिक्कार करते. जे लोक त्याच्या सर्व अटींचे आज्ञापालन करण्यास तयार नसतात ते तो अधिकार सोडून देण्याचा धीट प्रयत्न करतात. ते पवित्र शास्त्र वाचतात, किंवा पवित्र ठिकाणाहून ती वचने शिकवण्यात येत आहेत असे त्याकडे पाहतात, केवळ शास्त्रवचने किंवा संदेश ह्यात चुका काढण्यात व्यस्त असतात.

क्वचितच काही लोक हे मत नाकारणारे बनतात कारण त्यांना कर्तव्याकडे दुर्लक्ष करून

स्वतःचे तसे समर्थन करून सबब मिळवायची असते. गर्व आणि आळस ह्यामधून शंका घेणारी तत्वे लोक अनुसरतात. खूप मोठ्या प्रमाणावर त्यांना गोष्टी सहज व्हाव्यात अशी आशा असते आणि सन्मानास पात्र अशा गोष्टी सिद्ध करतात, ज्यात प्रयत्न आणि आत्मत्याग ह्यांची आवश्यकता असते, पवित्र शास्त्रावर टीका करण्याच्या द्वारे ते उच्च सुज्ञान मिळवण्याची ख्याती व प्रसिद्धी त्यांना प्राप्त करून घ्यायची असते. मर्यादित मन, दैवी ज्ञानाने प्रकाशीत न होता, ग्रहण करण्यास सामर्थ्यहीन आहे; आणि म्हणूनच टीका करण्यासाठी त्यांना ते कारण अथवा प्रसंग मिळतो.

अनेक लोकांची मानसिकता अशी आहे की अविश्वास, शंका आणि बेईमानी ह्याच्या वाजुने उभे राहणे एक गुणधर्म आहे. पण अशा प्रकारे प्रामाणिकपणाच्या दृश्यात असे दिसते की हे लोक स्वतःवरील आत्मविश्वास आणि गर्व ह्यांनी फुगवून गेलेले असतात. इतर लोकांना गोंधळात टाकावे म्हणून शास्त्रवचनातून काहीतरी शोधून काढण्यात काही लोकांना आनंद वाटतो. काही लोक प्रथम इतरांवर टीका करतात आणि चुकीच्या दिशेने तर्क वितर्क लावतात, आणि हे सर्व विरोधाभास पाहिजे किंवा त्याबद्दल प्रेम आहे म्हणून होत असते. त्यांना ह्या गोष्टीची जाणीव होत नाही की अशा द्वारे ते पारध्याच्या सापळयात अधिक स्वतःला गुरफटून घेत आहेत. पण खुल्या रीतीने अविश्वास व्यक्त करून, त्यांना त्यांचे स्थान राखावे असे वाटत असते. म्हणूनच अविश्वासू लोकांबरोबर एक होऊन स्वर्गाचे द्वार स्वतःसाठी ते बंद करतात.

## (१७) पवित्र आत्म्याचे सहाय्य कोणाला देण्यात येईल?

*तुम्ही वाईट असताही तुम्हांला आपल्या मुलांना चांगल्या देणग्या देण्याचे कळते, तर मग स्वर्गीय पित्याजवळ जे मागतात त्यांना तो किती विशेषेकरून पवित्र आत्मा देईल!" (लुक ११:१३)*

देवाने त्याच्या वचनात दैवी चारित्र्याचे पुरेसे पुरावे दिलेले आहेत. आपला उद्धार होईल असे महान सत्य त्यासंबंधी स्पष्टपणे प्रस्तुत होतात. पवित्र आत्म्याच्या सहाय्याने, ज्याचे अभिवचन सर्वांना दिलेले आहे, जे कोणी प्रामाणिकपणे त्याचा शोध करतील त्यांना मिळेल, प्रत्येक मनुष्य स्वतःसाठी हे सत्य समजून घेऊ शकतो. देवाने मनुष्यांना आपला विश्वास राखण्यासाठी एक भक्कम पाया किंवा आधारस्तंभ दिलेला आहे.

**(१८) ह्या वचनातील कोणते महान अभिवचन आपण सिद्ध करून हस्तगत करू शकतो?**

*मनुष्यावर भरवसा ठेवण्यापेक्षा परमेश्वराला शरण जावे हे बरे. (स्तोत्रसहिता ११८:८)*

तरीही मनुष्यांचे मर्यादित मन हे अमर्यादित देवाच्या योजना आणि हेतू समजून घेण्यात अपुरे आहेत. देवाचा शोध घेण्याच्या द्वारे आपल्याला तो कधीही सापडणार नाही. ज्या पडद्याच्या आड तो आपले वैभव राखतो त्याला दृष्टीआड आणण्याचा प्रयत्न आपण करू नये. . . . आपल्याला आतापर्यंत तो कसा वागतो त्या गोष्टी ग्रहण होतात, आणि त्याचे हेतू कळतात, आणि त्यामुळे त्या अमर्यादित शक्तीशी अथांग प्रीती आणि दया कशा रीतीने जोडले गेले आहेत ते देखील समजते. आपला स्वर्गातील पिता सर्वकाही सुज्ञान आणि

धार्मिकता ह्यात सुसंगत करतो, आणि आपण असमाधानी किंवा अविश्वासू होऊ नये, पण त्याच्यापुढे आदरयुक्त समर्पण करावे. आपल्याला किती जाणून घेणे चांगले आहे तितके त्याचे हेतू तो आपल्याला व्यक्त करेल, आणि त्याच्या पलीकडे जो हस्त सर्व परीने कार्यक्षम आहे, आणि ज्या हृदयात प्रेम भरलेले आहे त्यावर विश्वास ठेवला पाहिजे.

**(१९) पाप आणि अविश्वास ह्यांचे घातकीय परिणाम काय आहेत ह्याचा इशारा आपल्याला शास्त्रवचन देते?**

***बंधुजनहो, जिवंत देवाला सोडून देण्याइतके अविश्वासाचे दुष्ट मन तुमच्यातील कोणाचेही असू नये म्हणून जपा.जोपर्यंत "आज" म्हटलेला वेळ आहे तोपर्यंत तुम्ही एकमेकांना प्रतिदिवशी बोध करा; हेतू हा की, पापाच्या फसवणुकीने तुमच्यातील कोणी 'कठीण होऊ' नये. (इब्री ३:१२-१३)***

देवाने विश्वासासाठी पुरेसे पुरावे दिलेले आहेत, तो अविश्वास ठेवल्याबद्दलची कोणतीही सबब काढून टाकणार नाही. जे सर्व त्यांच्या शंका टांगण्याच्या शोधात आहेत त्यांना ती आकडी कायम सापडेल. आणि जे लोक देवाचे वचन स्वीकारण्यास नकार देतात आणि त्याच्या वचनाचे जोपर्यंत प्रत्येक विरोध काढला जात नाही तोपर्यंत आज्ञापालन करत नाहीत, आणि शंका घेण्यास काहीच संधी मिळत नाही, ते प्रकाशात कधीही येणार नाही.

**(२०) दैहिक मनातून येणारा स्वाभाविक प्रतिसाद काय आहे?**

*येशूने तत्क्षणी हात पुढे करून त्याला धरले व म्हटले, “अरे अल्पविश्वासी, तू संशय का धरलास??” (मत्तय १४:३१)*

देवावरील अविश्वास हा पुनरुजीव्वीत न झालेल्या हृदयाचे नैसर्गिक प्रमाण आहे, जे त्याच्या विरोधात आहे. पण विश्वास हा पवित्र आत्म्याने प्रेरित आहे, आणि जसा तो जतन केला जातो तसा मुबलक होईल. निश्चित प्रयत्नांच्या शिवाय कोणीही विश्वासात अधिक बळवंत होऊ शकत नाही. अविश्वास बळावतो जसे त्याला उत्तेजन दिले जाते; आणि जर लोक, देवाने जे त्यांना विश्वास राखण्यासाठी पुरावे दिले आहेत त्यावर वस्ती करण्याच्या ऐवजी, स्वतःला प्रश्न आणि शंका ह्यांच्या अधीन करतात, आणि अधिकच त्या शंका बळावत आहेत असे त्यांना दिसते.

**(२१) जे लोक देवावर शंका घेऊन विश्वास ठेवत नाहीत त्यांच्यासाठी कोणते पवित्र शास्त्रीय तत्व लागू पडते?**

***फसू नका; देवाचा उपहास व्हायचा नाही; कारण माणूस जे काही पेरतो त्याचेच त्याला पीक मिळेल. (गलतीकरास पत्र ६:७)***

पण जे लोक देवाची अभिवचने ह्यांवर शंका घेतात आणि त्याच्या कृपेच्या खात्रीवर भरवसा ठेवत नाही; आणि त्यांचा प्रभाव, इतरांना ख्रिस्ताकडे घेऊन येण्याच्या ऐवजी, त्यांना त्याच्यापासून दूर घेऊन जातात. ही तर फळ न देणारी झाडे आहेत, जे आपल्या शाखा दूरवर पसरवतात, इतर झाडांपासून तो सूर्यप्रकाश हिरावून घेतात, आणि थंडगार सावलीत मृतावस्थेत त्यांना ठेवतात. ह्या लोकांचे जीवनाचे कार्य त्यांच्या विरुद्ध न

संपणारी साक्ष म्हणून प्रदर्शित होतात. ते तर शंका आणि अविश्वासाचे बीज पेरत आहेत ज्याचा हंगाम देखील फलरहित असणार.

**(२२) सिद्धांतावर शंका घेण्यापासून मुक्त होण्याचा पहिला मार्ग काय आहे?**

***जो कोणी त्याच्या इच्छेप्रमाणे करण्याची मनीषा बाळगील त्याला ही शिकवण देवापासून आहे किंवा मी आपल्या मनचे बोलतो हे समजेल. (योहान ७:१७)***

ज्यांना प्रामाणिकपणे त्या शंकांपासून मुक्त व्हायची इच्छा असते त्यांच्यासाठी एक मार्ग मात्र असतो. जे त्यांना समजत नाही त्यावर प्रश्न विचारण्याच्या ऐवजी, त्यांच्यावर जो प्रकाश आधीपासून चमकतो त्याकडे त्यांनी लक्ष दिले पाहिजे, आणि त्यांना महान किंवा तो मोठा प्रकाश प्राप्त होईल. त्यांना स्पष्टपणे समजेल असे कर्तव्य त्यांनी करत राहावे, आणि ज्याबद्दल त्यांना शंका वाटते ते समजण्यास आणि कार्य पूर्ण करण्याची क्षमता त्यांना प्राप्त होईल.

**(२३) अधिक बळवंत विश्वास प्राप्त करून घेण्यासाठी आपल्यासाठी कोणते दोन मार्ग उपलब्ध आहेत?**

***जो कोणी त्याच्या इच्छेप्रमाणे करण्याची मनीषा बाळगील त्याला ही शिकवण देवापासून आहे किंवा मी आपल्या मनचे बोलतो हे समजेल. (रोमकरास पत्र १०:१७)***

***लगेचच मुलाचा बाप डोळ्यांत आसवे आणून मोठ्याने म्हणाला, “प्रभूजी, माझा विश्वास आहे, माझा अविश्वास घालवून टाका!” (मार्क ९:२४)***

**(२४) जे लोक शोधतील त्यांना काय अभिवचन देण्यात आलेले आहे?**

*“मागा म्हणजे तुम्हांला दिले जाईल, शोधा म्हणजे तुम्हांला सापडेल, ठोका म्हणजे तुमच्यासाठी उघडले जाईल. (मत्तय ७:७)*

सैतान सत्याशी साजेसे असे प्रस्तुत करण्यात माहीर आहे की ते ज्या लोकांना फसवले जाण्याची इच्छा आहे त्यांना फसवते, जे लोक सत्य मागणी करते त्यानुसार आत्म-त्याग आणि अर्पण नाकारतात,पण त्याला एक जीवात्मा देखील जो प्रामाणिकपणे ते सत्य कोणतीही किमत मोजून देखील जाणून घेऊ इच्छितो त्याला नियंत्रणात ठेवणे अशक्य आहे. ख्रिस्त ते सत्य आणि जो प्रकाश , जगात येणाऱ्या प्रत्येकावर प्रकाशतो, तो प्रकाश आहे.” योहान १:९. लोकांना अंतिम सत्यात मार्गदर्शन करण्यासाठी सत्याच्या आत्म्याला पाठवण्यात आले आहे.

**(२५) देव आपल्याला मोहप्रसंगातून जाण्याची का परवानगी देतो?**

*परंतु माझा मार्ग त्याला कळला आहे; त्याने मला पारखून पाहिले म्हणजे मी सोन्यासारखा निघेन.(इयोब २३:१०)*

ख्रिस्ताच्या अनुयायांना सैतान आणि त्याचे सैन्य त्यांच्या विरोधात काय कटकारस्थान करत आहेत त्याची अल्पशी देखील कल्पना नसते. पण जो स्वर्गात आरूढ आहे तो हे सर्व सिद्ध करण्यासाठी ह्या सर्व साधनांवर विजय मिळवेल. प्रभू त्याच्या लोकांना मोहाच्या ज्वलंत भट्टीतून जाण्याची परवानगी देतो, कारण त्याला त्यांच्या त्रासात आणि यातनेत आनंद

होतो म्हणून नाही, पण ही प्रक्रिया त्यांच्या अंतिम विजयासाठी आवश्यक आहे म्हणून. तो , सतत त्याच्या स्वतःच्या गौरवाने त्यांना मोहांपासून राखून ठेऊ शकत नाही; कारण त्या परीक्षेचे अंतिम ध्येय म्हणजे त्यांची सर्व दुष्टाई पासून प्रतिकार करण्यात तयारी करणे आहे.

**(२६) मोहावर विजय मिळवण्याचे किंवा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य कोणाकडून येईल?**

***तेव्हा त्याने मला उत्तर केले, "जरूब्बाबेलास परमेश्वराचे हे वचन आहे : बलाने नव्हे, पराक्रमाने नव्हे, तर माझ्या आत्म्याने कार्यसिद्धी होईल असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो. (जखऱ्या ४:६)***

दुष्ट लोक किंवा सैतान कोणीही देवाचे कार्य थांबवू शकत नाही, किंवा त्याचे सान्निध्य लोकांपासून दूर ठेऊ शकत नाही, जर त्यांनी शरण गेलेले, भग्न हृदय घेऊन कबूली देऊन आपली पापे दूर केली, आणि विश्वासात अभिवचने सिद्ध केले. प्रत्येक मोह, विरोधी प्रभाव, खुला किंवा गुपित, त्याला यशस्वीपणे प्रतिकार करण्यात येऊ शकतो. .

**(२७) आपल्याला ह्या दुष्ट शक्तींना घाबरण्याची का गरज नाही?**

***पाहा, मी तुम्हांला साप आणि विंचू ह्यांना तुडवण्याचा व शत्रूच्या सर्व शक्तीवरचा अधिकार दिला आहे; तुम्हांला काहीएक बाधणार नाही. (लुक १०:१९)***

सैतानाला ह्या गोष्टीची चांगलीच जाणीव आहे की ख्रिस्तामध्ये जो सर्वात दुबळा जीवात्मा आहे तो अंधकाराच्या सेनेच्या विरुद्ध टिकण्यास

पुरेसा आहे, आणि त्याने जर स्वतःला खुल्या रीतीने प्रगट केले, त्याची भेट घेऊन त्याचा प्रतिकार करता येऊ शकतो. म्हणूनच वधस्तंभाचे रक्षण करणाऱ्या सर्व सैनिकांना त्या कार्यापासून त्याला दूर करायचे आहे, आणि त्याच वेळी तो त्याचे सैन्य घेऊन हल्ला करण्यास तयार असतो, जे कोणी त्याच्या क्षेत्रात हल्ला करतात त्यांना नष्ट करण्याच्या प्रयत्नात तो सदैव तयार असतो. देवावरील विनम्र विसंबून राहण्याने, आणि त्याच्या सर्व आज्ञांचे पालन करून, आपण सुरक्षित होऊ शकतो.

**(२८) आपण मोहात पडू नये म्हणून येशूने त्यापासून आपल्याला परावृत्त करण्यासाठी कोणत्या दोन तरतुदी दिल्या आहेत?**

***तुम्ही परीक्षेत पडू नये म्हणून जागृत राहा व प्रार्थना करा; आत्मा उत्सुक आहे खरा, पण देह अशक्त आहे." (मत्तय २६:४१)***

**संबंधित शास्त्रभाग: मार्क १२:३३**

प्रार्थनेच्या शिवाय कोणताही मनुष्य एक दिवस किंवा तास देखील सुरक्षित नाही. विशेषकरून त्याचे वचन समजून घेण्यासाठी आपण देवाची विनवणी केली पाहिजे. या ठिकाणी मोहात पाडणार्याचे सर्व दुष्ट हेतू प्रगट होतात ज्यामुळे यशस्वीपणे त्याचा प्रतिकार करता येऊ शकतो. शास्त्रवचन बोलून दाखवण्यात सैतान हा तज्ञ आहे, आणि शास्त्रवचनांचे भाषांतर तो स्वतः करतो, आणि त्याद्वारे आपण अडखळत जावे अशी त्याची आशा असते. पवित्र शास्त्राचा अभ्यास आपण विनम्र हृदयाने केला पाहिजे, आणि त्यामध्ये देवावर विसंबून राहणे कधीही विसरू नये.

सैतानाच्या सर्व हत्यारांच्या विरोधात आपण सदैव टिकाव धरून, सातत्याने प्रार्थना केली पाहिजे: " आम्ही परीक्षेत पडू नये म्हणून आमचे सहाय्य कर."

*मला जाणीव आहे की सैतानाचे ध्येय म्हणजे जगाला फसवणे आहे आणि तो माझा घात करण्यासाठी त्याच्या सामर्थ्याने प्रत्येक पद्धतीचा उपयोग करणार. मी त्या अभिवचनासाठी आभारी आहे की मी जर प्रामाणिकपणे ते सुज्ञान आणि सत्य शोधले तर मला ते सापडेल आणि मी त्याच्या फसवणुकीला बळी पडणार नाही.*

*गोल करा : होय अनिश्चित*

*मला समजते की सैतान विश्वासणारे आणि अविश्वासणारे ह्यांना दोघांना समान रीतीने त्याचे हत्यार म्हणून मी भरकटून जाण्यासाठी वापरतो. माझी प्रार्थना आहे: "प्रभू, ह्या सर्व सैतानी प्रभावांना ओळखण्याचे सुज्ञान मला तू कृपया दे."*

*गोल करा : होय अनिश्चित*

*सातत्याने ख्रिस्ताच्या सूचनेचे पालन करण्यासाठी त्या दृढनिश्चयासाठी मी प्रार्थना करतो आणि पैशांच्या मोहाला बळी पडू नये म्हणून जे मला त्याच्या सोबतच्या नात्यापासून दूर नेईल.*

*गोल करा : होय अनिश्चित*

*मी त्या अभिवचनांसाठी आभारी आहे की देव आपल्याला दुष्टाईवर शक्ती देईल आणि मी सहन करू शकणार नाही ह्याच्या पलीकडे तो*

माझी परीक्षा होऊ देणार नाही. मी प्रार्थना करतो की, विश्वास आणि त्याच्या कृपेने, मी विजयी होऊन त्याच्या नावाला गौरव देऊ शकतो.

गोल करा : होय अनिश्चित



# धडा ५
# पहिली महान फसवणूक

माणसाच्या सुरुवातीच्या इतिहसात, सैतानाने आपल्या प्रजातीला फसवण्याचे त्याचे प्रयत्न चालूच ठेवले. ज्याने स्वर्गात बंडाई छेडली होती त्याने पृथ्वीवरील रहिवाश्यांनी त्याच्याशी एकवटून देवाच्या शासनाच्या विरुद्ध लढाईत त्याला मदत करावी अशी इच्छा बाळगली. आदाम आणि हवा देवाच्या नियमशास्त्राचे आज्ञापालन करण्यात खूप खुश होते, आणि ही वास्तविकता म्हणजे त्या मताच्या विरुद्ध एक सातत्याची साक्ष होती जी सैतानाने स्वर्गात व्यक्त केली, की देवाचे नियमशास्त्र हे छळदायी होते आणि त्याच्या सृष्टीच्या हिताच्या विरोधात होते. आणि ह्यापुढे, सैतानाचा द्वेष उत्तेजित झाला कारण त्याने ह्या पापरहित जोडीसाठी तयार केलेले सुंदर घर पाहिले. त्याने त्यांचे पतन घडवून आणण्याचा निर्धार केला, की, देवापासून विभक्त होऊन त्याच्या अधिकाराच्या अधीन

आणून, त्याला पृथ्वीवर सत्ता गाजवता येईल आणि सर्वसमर्थ देवाच्या विरोधात त्याला त्याचे साम्राज्य प्रस्थापित करता येईल.

**(१) देवाच्या इच्छेच्या प्रती ताबडतोब, शरण जाणारे आज्ञापालन का आवश्यक आहे?**

***आज्ञापालनाकरता ज्याला तुम्ही स्वतःस गुलाम असे समर्पण करता, ज्याची आज्ञा तुम्ही मानता त्याचे तुम्ही गुलाम आहात .ज्याचा परिणाम मरण आहे अशा पापाचे गुलाम किंवा ज्याचा परिणाम नीतिमत्त्व आहे अशा आज्ञापालनाचे तुम्ही गुलाम आहात, हे तुम्हांला ठाऊक नाही काय? (रोमकरास पत्र ६:१६)***

सैतानाने जर स्वतःला त्याच्या खर्या चारित्र्यात प्रगट केले असते, त्याला लगेच दूर लोटता आले असते, कारण आदाम आणि हवा ह्यांना ह्या घातकी शत्रूच्या विरुद्ध इशारा देण्यात आला होता; पण तो अंधकारात कार्यरत होता, त्याचा हेतू लपवून, जेणेकरून अधिक प्रभावीपणे त्याचा हेतू सिद्ध करू शकेल. सर्प त्याचे माध्यम म्हणून उपयुक्त करून, त्याने स्वतःला हवेच्या समोर संबोधले:
"देवाने खरेच सांगितले का, तुम्ही ह्या बागेतील प्रत्येक झाडाचे फळ खाऊ नये?" उत्पत्ती ३:१.

मोहात पाडणाऱ्याशी वाद करू नये असे जर हवेने केले असते; ती सुरक्षित ठरली असती; पण तिने त्याच्याशी संगनमत केले आणि त्याच्या दुष्ट युक्तीला बळी पडली. म्हणूनच अनेक लोकांवर असाच तो विजय मिळवतो. देवाच्या आवश्यकतेच्या संबंधी ते शंका घेऊन वाद करतात; आणि त्या दैवी आज्ञांचे पालन करण्याच्या ऐवजी, ते लोक मानवी सिद्धांत स्वीकारतात, पण ते तर सैतानाच्या हत्यारांचे वेश्यांतर करतात.

**(२) आदाम आणि हवा ह्यांनी कोणत्या महान फसव्नुकीवर विश्वास ठेवण्याची निवड केली?**

*सर्प स्त्रीला म्हणाला, "तुम्ही खरोखर मरणार नाही. (उत्पत्ती ३:४)*

"स्त्री सर्पाला म्हणाली, त्या बागेतील सर्व झाडांची फळे आपण खाऊ शकतो: पण बागेमधील झाडाचे जे फळ आहे, देवाने म्हंटले आहे, तू त्यातून काहीच खाऊ नको, आणि त्याला स्पर्श देखील करू नको, नाहीतर तू मरशील. आणि सर्प स्त्रीला म्हणाला, तू निश्चित मरणार नाही: कारण देवाला ठाऊक आहे ज्या दिवशी त्या फळाचे तुम्ही सेवन कराल, तुमचे डोळे उघडतील, आणि तुम्ही देवासारखे व्हाल, बरे आणि वाईटाचे ज्ञान तुम्हाला प्राप्त होईल." वचने २-५. त्याने घोषित केले की ते लोक देवासारखे होतील, आधी पेक्षा अधिक सुज्ञान त्यांना मिळेल आणि उच्च प्रकारचे अस्तित्व त्यांना मिळेल. हवा त्या मोहाला बळी पडली; आणि तिच्या प्रभावाने, आदामाने देखील पाप केले. त्यांनी सर्पाचे शब्द स्वीकारले, की देव जे काही बोलला तसा त्याचा अर्थ नव्हता; त्यांनी निर्माणकर्त्यावर विश्वास ठेवला नाही; आणि अशी कल्पना केली की तो त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेत होता आणि त्याच्या नियमशास्त्राचे उल्लंघन केल्याने त्याला अधिक सुज्ञान आणि बढती मिळत होती.

**(३) त्यांच्या अधर्माचा लागलीच काय परिणाम झाला?**

*तर तुमचे अपराध तुम्ही व तुमचा देव ह्यांच्यामध्ये आडभिंतीप्रमाणे झाले आहेत; तुमच्या पातकांमुळे तो तुम्हांला दर्शन देत नाही, तुमचे ऐकत नाही. (यशया ५९:२)*

*मग परमेश्वर देव म्हणाला, “पाहा, मनुष्याला बरेवाईट कळू लागून तो आमच्यातल्या एकासमान झाला आहे; तर आता कदाचित तो आपला हात जीवनाच्या झाडाला लावून त्याचेही फळ काढून खाईल व सर्वकाळ जिवंत राहील;” ह्यास्तव ज्या जमिनीतून त्याला उत्पन्न केले होते, तिची मशागत करावी म्हणून परमेश्वर देवाने त्याला एदेन बागेतून बाहेर काढून लावले. (उत्पत्ती ३:२२-२३)*

**(४) पाप काय आहे?**

*जो कोणी पाप करतो तो स्वैराचार करतो; कारण पाप स्वैराचार आहे. (१ योहान ३:४)*

**(५) पापाचा अंतिम परिणाम काय आहे?**

*कारण पापाचे वेतन मरण आहे; पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे. (रोमकरास पत्र ६:२३)*

पण आदामाने, त्याच्या पापाच्या नंतर, आपल्या शब्दांचा काय अर्थ मिळवला, “ ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील तू निश्चित मरशील”? असा अर्थ होतो का की, जसे सैतानाने त्यांना विश्वास ठेवण्यास भाग पाडले, की त्याला अत्युच्च अस्तित्वाच्या स्तरापर्यंत जायचे होते? मग अधर्म केल्याने चांगले होणार होते का, आणि त्या संपूर्ण जातीचा हितकर्ता ह्या बाबतीत सैतान ठरला. पण ह्या दैवी विधानाचा हा अर्थ आदामाला समजला नाही. देवाने त्याच्या पापाची ही शिक्षा म्हणून घोषित केली, जिकडून मनुष्याला बाहेर काढण्यात आले तिकडे त्याने परत गेले पाहिजे: “तू माती आहेस, आणि

पुन्हा मातीस मिळशील." वचन १९. सैतानाचे शब्द, "तुझे डोळे उघडले जातील," हे ह्याच अर्थाने खरे सिद्ध झाले: आदाम आणि हवा ह्यांनी देवाची अवज्ञा केल्यानंतर, त्यांची चूक ओळखण्यासाठी त्यांचे डोळे उघडले गेले; त्यांना वाईट ते समजले, आणि अधर्माच्या कटू फळाचे त्यांनी चव घेतली.

एदेन बागेच्या मध्यभागी ह्या बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणारे झाड होते,ज्याच्या फळात आयुष्याची वाढ होऊ देण्याची क्षमता होती. आदाम जर देवाच्या प्रती आज्ञाधारक राहिला असता तर, त्याला सहज ह्या झाडाकडे जाता आले असते आणि तो सदैव जिवंत राहिला असता. पण जेव्हा त्याने पाप केले तो त्या झाडाचे फल खाण्यापासून परावृत्त झाला, आणि मृत्यूस तो एक कारण बनला. ते दैवी विधान, "तू माती आहेस, आणि पुन्हा मातीस मिळशील," हे जीवन पूर्णपणे संपुष्टात येणे दर्शवते.

**(६) अमरत्व पुन्हा मिळवण्याची मनुष्याची एकमेव आशा काय आहे?**

***ती आता आपला तारणारा ख्रिस्त येशू ह्याच्या प्रकट होण्याने दृश्यमान झाली आहे .त्याने मरण नाहीसे केले, आणि सुवार्तेच्या द्वारे जीवन व अविनाशिता ही प्रकाशित केली आहेत, (२ तीमथी १:१०)***

आज्ञापालन केल्यावर, मनुष्याला अमरत्व मिळेल, असे अभिवचन मिळाले होते, पण ह्याचे उल्लंघन पापाने आणि अधर्माने झाले. आदामाकडे जे काही नव्हते ते तो त्याच्या वंशजांना देऊ शकत नव्हता; आणि पतन पावलेल्या जातीसाठी काहीच आशा नव्हती, जर देवाने, आपल्या पुत्राच्या अर्पणाने, त्यांच्या

कह्यात अमरत्व आणले नसते..... आणि केवळ ख्रिस्ताच्या द्वारे अमरत्व मिळते. येशूने म्हंटले:: "जो पुत्रावर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; परंतु जो पुत्रावर विश्वास ठेवीत नाही त्याच्या दृष्टीस जीवन पडणार नाही; पण देवाचा क्रोध त्याच्यावर राहतो." योहान ३:३६.ह्या अनमोल आशीर्वादाचे वाटेकरी प्रत्येक मनुष्य होऊ शकतो जर त्याने ह्या अटींचे पालन केले. जे सर्व " चांगले करण्याने संयमाने ते गौरव आणि सन्मान व अमरत्व शोधतील," त्यांना " सनातन जीवन" मिळेल.  रोमकरास पत्र २:७.

**(७) पापी व्यक्तीच्या जीवात्म्याचे काय होते?**

***पण बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील". (उत्पत्ती २:१७)***

ज्या एकमेव व्यक्तीने अवज्ञेत जीवनाचे आश्वासन आदामाला दिले तो म्हणजे महान ठकवणारा. आणि सर्पाने जे ठामपणे एदेन बागेत हवेला ही घोषणा केली—"तू निश्चित मरणार नाही" – हा जीवाच्या अमरत्वावर दिला गेलेला पहिला उपदेश होता. तरीही ही घोषणा, जी सैतानाच्या एकमेव अधिकारावर आधारित होती, ती ख्रिस्तीत्वाच्या व्यासपीठावरून बोलली जाते आणि बहुसंख्यक मानवजातीने त्याचा स्वीकार केला आहे जसे आपल्या प्रथम पालकांनी त्याचा स्वीकार केला होता. ते दैवी विधान, , "जो जीवात्मा पाप करील तोच मरेल" (यहज्केल १८:२०), ह्या अर्थासाठी बनवला गेला आहे: जो जीवात्मा पाप करेल, तो मरणार नाही, तर सनातन जीवन जगेल. आपण केवळ आश्चर्य मात्र करू

शकतो कि सैतानाच्या शब्दांवर मनुष्य इतका काही भुलला जातो आणि आकर्षित होतो की देवाच्या वचनाच्या बाबतीत तो अविश्वासू ठरतो.

**(८) पाप आणि पापी लोकांचे अमरत्व होण्यापासून देवाने कसे टाळले?**
***देवाने मनुष्याला बाहेर घालवले आणि जीवनाच्या झाडाकडे जाणाऱ्या मार्गाची राखण करण्यासाठी एदेन बागेच्या पूर्वभागी करूबीम व गरगर फिरणारी ज्वालारूप तलवार ठेवली. (उत्पत्ती ३:२४)***

मनुष्याचे पतन झाल्यावर जर त्याला मुक्तपणे त्या बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाकडे जाता आले असते, तर तो सदैव जगला असता, आणि त्याद्वारे पाप अमर झाले असते. पण करूबीम आणि एक धगधगीत तलवार हे त्या "झाडाच्या प्रवेशाकडे ठेवण्यात आले" आणि आदामाच्या कुटुंबातील एकाला देखील तो अडथळा पार करून त्यांना त्या जीवनदायी झाडाचे फळ खाता आले नाही. म्हणूनच एक देखील पापी अमर नाही.

**(९) अंतिम न्यायाच्या नंतर दुष्टाच्या शरीर आणि जीवात्म्याचे काय होते?**

*जे शरीराचा घात करतात पण आत्म्याचा घात करण्यास समर्थ नाहीत त्यांना भिऊ नका, तर आत्मा व शरीर ह्या दोहोंचा नरकात नाश करण्यास जो समर्थ आहे त्याला भ्या. (मत्तय १०:२८)*

**(१०) जे लोक तारणाला नाकारतात त्यांचा नाश करताना प्रभूला कसे वाटते?**

*त्यांना सांग, प्रभू परमेश्वर म्हणतो, माझ्या जीविताची शपथ, कोणी दुर्जन मरावा ह्यात मला काही संतोष नाही तर त्याने आपल्या मार्गावरून मागे फिरून जगावे ह्यात मला संतोष आहे; फिरा, आपल्या मार्गावरून मागे फिरा; इस्राएल वंशजहो, तुम्ही का मरता?' (यहज्केल ३३:११)*

*कित्येक लोक ज्याला विलंब म्हणून म्हणतात तसा विलंब प्रभू आपल्या वचनाविषयी करत नाही, तर तो तुमचे धीराने सहन करतो; कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही, तर सर्वांनी पश्चात्ताप करावा अशी आहे. (२ पेत्र ३:९)*

पण पतन झाल्यावर, सैतानाने त्याच्या दूतांना मनुष्याच्या नैसर्गिक अमरत्वात हा विश्वास बिंबवण्यासाठी विशेष श्रम घेण्यास सांगितले; आणि ही चुकीची गोष्ट लोकांनी स्वीकारावी म्हणून, अशामुळे त्यांचा ग्रह झाला कि पापी मनुष्य सनातन दैन्येत वस्ती करेल. आता अंधकाराचा सत्ताधीश, त्याच्या दुतांचे माध्यम घेऊन काम करत असताना, देव एक सूड घेणारा जुलूमशाह असे प्रस्तुत करतात, अशी घोषणा करत कि जे कोणी त्याला संतोशवत नाहीत, त्यांना तो थेट नरकात ढकलतो, आणि त्याच्या क्रोधाचा तीव्र अनुभव देतो; आणि त्या धगधगीत आगीच्या भट्टीत ते लोक छळ आणि त्रास सहन करत असताना, त्यांचा निर्माणकर्ता त्यांच्याकडे समाधानाने पाहतो.

म्हणूनच स्वतःचे हे गुणधर्म घेऊन मनुष्याचा  निर्माणकर्ता आणि हितकर्ता असे त्याला संबोधतो. क्रूरता ही सैतानी आहे. देव प्रीती आहे; आणि जे काही सर्व त्याने निर्माण केले ते शुद्ध, पवित्र आणि प्रेमळ होते, जोपर्यंत पहिल्या मोठ्या बंडाई करणाऱ्याने जगात पाप

आणले नाही. सैतान हा स्वतः तो शत्रू आहे जो मनुष्याला पाप करण्यास मोहात पाडतो, आणि मग शक्य असेल तर त्यांचा नाश करतो; आपल्या भक्ष्याची खात्री झाल्यावर, मग त्याने तो विध्वंस घडवून आणला त्यात आनंद मानतो. जर त्याला परवानगी दिली तर, तो संपूर्ण मानवजातीला त्याच्या कह्यात खेचून घेईल. दैवी शक्तीचा जर हस्तक्षेप नसता तर, आदामाचा एक मुलगा किंवा मुलगी देखील ह्यातून सुटून जाऊ शकले नसते.

**(११) देवाचे खरे चारित्र्य आणि शासन कोणत्या चार गुणधर्मांनी स्पष्ट वर्णन म्हणून व्यक्त होतात?**

***"मी तुझ्या संततीची परंपरा सर्वकाळ चालवीन, तुझे राजासन सर्व पिढ्यांसाठी स्थिर स्थापीन;" (सेला( स्तोत्रसहिता ८९:४)***

आज सैतान मनुष्यांवर विजय मिळवण्याची वाट पाहत आहे, जसे त्याने आपल्या प्रथम पालकांच्या बरोबर केले, त्यांचा निर्माणकर्त्यावरील विश्वास हलवून देवाच्या शासनावर आणि त्याच्या नियमशास्त्रावर शंका घेण्यास प्रवृत्त करतो. सैतान आणि त्याचे दूत देवाचे चित्र स्वतःपेक्षा वाईट असे प्रस्तुत करतात, आणि हे त्यांचा घातकीपणा व बंडाई ह्यांचे समर्थन करण्यासाठी. महान फसवणारा स्वतःची भयंकर क्रूरता व ते चारित्र्य आपल्या स्वर्गीय पित्यावर घालण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून तो स्वतः स्वर्गातून बाहेर फेकण्यात आला म्हणून चुकीचा असा सिद्ध होतो कारण इतक्या अन्यायी अधिकाऱ्याच्या अधीन तो समर्पित होणे शक्य नसते. जगासमोर ते स्वातंत्र्य तो प्रस्तुत करतो जे त्याच्या ह्या कृतीत ते लाभ घेऊ शकतात, आणि हे सर्व यहोवाने जे

कडक नियम लावले आहेत त्या बंधनाच्या विरुद्ध असतात. असे करण्याने तो जीवात्म्यांना देवाशी घनिष्ट संबंध विकसित करण्यापासून दूर खेचत आहे.

**(१२) दुष्टांचे काय होणार जेव्हा न्यायी शिक्षा ही देण्यात येईल?**

***तुम्ही दुष्टांना तुडवाल; कारण मी हे करीन त्या दिवशी ते तुमच्या पायांच्या तळव्यांखाली राखेप्रमाणे होतील, असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो. (मलाखी ४:३)***

प्रेम आणि दया ह्यांच्या प्रत्येक भावनेचा तिरस्कार किती, आणि आपल्या न्यायाच्या भावनेला देखील, तो सिद्धांत आहे की दुष्ट मृत लोकांचा छळ हा अग्नी आणि गंधकाने सनातन ज्वलंत राहणाऱ्या नरकात होतो; ह्या पृथ्वीवरील अल्पशा आयुष्यात जी पापे घडतात जोपर्यंत देव आहे त्यांचा असाच छळ होणार. तरीही हा सिद्धांत जगभर शिकवला जातो आणि अनेक ख्रिस्तीत्वाच्या मतांगीकारांमध्ये तो समाविष्ट आहे.

**(१३) सैतान त्याच्या शेवटल्या टप्प्याकडे कसा येतो?**

***“खोटा व्यापार चालवून तू बहुत पातके केलीस, त्यांनी तू आपली पवित्रस्थाने विटाळलीस म्हणून तुझ्यातून अग्नी निघून तुला खाऊन टाकील, असे मी केले आहे आणि तुला पाहणाऱ्यांच्या डोळ्यांदेखत मी पृथ्वीवर तुझी राखरांगोळी केली आहे. (यहज्केल २८:१८)***

आपण जर हे कबूल केले कि देवाला अशा प्रकारे अथक छळ होताना बघणे आवडते तर

देवाला त्यातून काय मिळेल; त्रास आणि यातना सहन करणाऱ्या असंख्य लोकांची ओरड आणि दुखसहन पाहत ज्यांना तो त्या नरकात पाहतो? हे भयंकर आवाज अमर्यादित प्रेमाच्या स्रोताच्या कानात संगीत बनतात का? असा आर्जव आहे की न संपणारे दैन्य जे दुष्टांवर येते त्याने पाप म्हणजे देवाने द्वेष केलेले दुष्ट कृत्य जे विश्वाच्या शांती आणि सुस्थितीसाठी घातक ठरते. ओह! किती भयंकर ही ईश्वरनिंदा! जणूकाही देव पापाचा द्वेष इतका करतो म्हणूनच त्याचा प्रसार इतक्या मोठ्या प्रमाणावर होतो. कारण, ह्या धर्मशास्त्रज्ञांच्या शिकवणीनुसार, कोणत्याही प्रकारे दयेची आशा नसताना सातत्याने छळ होत राहणे त्याच्यामुळे भक्ष्य बनलेल्या दुष्ट लोकांना वेडेपिसे बनवते, आणि जसा त्यांचा क्रोध  शाप आणि ईश्वरनिंदा ह्यात बाहेर पडतो, सदैव ते त्यांच्या दोषावर टीका करत राहतात. अथक युगांच्या नंतर देखील पाप जेव्हा वाढत जाते तेव्हा देवाचे गौरव त्याद्वारे वाढत नाही.

त्या सनातन छळाच्या पाखंडाने जी दुष्टाई गुदरते. त्याची कल्पना करणे मानवी मनाच्या पलीकडे आहे. पवित्र शास्त्राचा धर्म, ज्यात प्रेम आणि चांगुलपण आहे, आणि अथक कळवळा आहे, त्यावर अंधश्रद्धा पसरलेली असून भय मांडलेले आहे. जेव्हा आपण विचार करतो कि कोणत्या खोट्या रंगांनी सैतानाने देवाचे चित्र रेखाटले आहे, मग आपल्याला आश्चर्य वाटेल कि आपल्या दयाघन निर्माणकर्त्याचे भय , धास्ती किंवा द्वेष हे केले जातात? देवाच्या बद्दलचे हे

भीतीदायक मत जे व्यासपीठावरून शिकवनीच्या द्वारे जगभर गाजवले जाते, त्यामुळे हजारो टीकक, आणि बेईमान जन्मास आले आहेत.

**(१४) ह्या वचनात कोणते वर्णन दिले गेले आहे जे खोट्या सिद्धांताचे वर्णन करते?**

***त्या देवदूतामागून दुसरा देवदूत येऊन म्हणाला, "पडली, मोठी बाबेल पडली, तिने आपल्या ' जारकर्माबद्दलचा क्रोधरूपी' द्राक्षारस सर्व राष्ट्रांना पाजला आहे." (प्रगटीकरण १४:८)***

सनातन छळाचा सिद्धांत हा एक खोटा सिद्धांत आहे ज्यात क्रोधरुपी बाबेलचा द्राक्षारस आहे, ज्यातून सर्व राष्ट्रे पितात. ख्रिस्ताचे ते सेवक ह्यांनी हा पाखंड स्वीकारून .......त्या पवित्र मेजावरून त्याची घोषणा करेन देखील एक रहस्य आहे. . . . देवाच्या वचनाच्या साक्षीपासून जर आपण दूर गेलो, आणि आपल्या वडिलांनी त्या शिकवल्या म्हणून जर खोटे सिद्धांत स्वीकारले, तर बाबेलवर जो दोष पुकारण्यात आला त्याच्या अधीन होतो; आपण तिच्या द्राक्षरसातून सेवन करतो.

**(१५) धार्मिक आणि पापी दोघांना प्रभू काय देणार?**

***"पाहा, मी 'लवकर 'येतो;' आणि प्रत्येकाला ज्याच्या-त्याच्या कृत्यांप्रमाणे देण्यास माझ्याजवळ वेतन आहे. (प्रगटीकरण २२:१२)***

एक मोठा वर्ग ज्याच्या प्रती सनातन छळाचा सिद्धांत प्रतिकार करतो तो त्या चुकीच्या विरोधात आहे. ते पाहतात की शास्त्रवचने देवाचे प्रतिनिधित्व करतात ते प्रेम

आणि कळवळा ह्याचे दर्शक आहेत, आणि ते विश्वास ठेऊ शकत नाहीत की तो आपल्या सृष्टीला सनातन धगधगीत जळणाऱ्या अग्नीत टाकेल. पण जीवात्मा नैसर्गिक रीतीने अमर आहे असा विचार करून, त्यांना कोणताही पर्याय दिसत नाही पण हेच तात्पर्य निघते की सर्व मानवजातीचे शेवटी तारण होणार. अनेक लोक पवित्र शास्त्राच्या धिटाईला लोकांनी आज्ञापालन भीतीमुळे करावे म्हणून, आणि शब्दशः त्याची पुरती होणार नाही. अशाने पापी लोक स्वार्थी आनंदात राहू शकतात, देवाच्या आवश्यकतेचा अवमान करून, आणि तरीही शेवटी त्याच्या कृपामर्जीत स्वीकारण्याची अपेक्षा असते. असा हा सिद्धांत, जो देवाच्या दयेला गृहीत धरतात, त्याच्या न्यायाकडे दुर्लक्ष करत, दैहिक हृदयाला संतोश्वीत आणि दुष्टांना त्यांच्या अधर्मात अधिक बळकट करत जातात.

देवाने त्याच्या वचनात निर्णयात्मक पुरावा दिला आहे की जे कोणी त्याच्या नियमांचे उल्लंघन करतील त्यांचे शासन होणार. जे लोक स्वतःची अशी समजूत घालतात की पापी लोकांचा न्याय करण्यास तो खूप दयाळू आहे, त्यांना केवळ काल्वरीच्या वधस्तंभाकडे पहायचे आहे. देवाच्या दोषरहित पुत्राचा मृत्यू साक्ष देतो की “पापाचे वेतन मरण आहे,” आणि देवाच्या नियमशास्त्राचे करण्यात आलेले प्रत्येक उल्लंघन ह्याला त्याची न्यायी शिक्षा ही मिळावी. त्याने अधर्माचा दोष स्वीकारला, आणि आपल्या पित्याने तोंड फिरवणे सहन केले, जोवर त्याचे हृद्य भग्न होऊन आयुष्य नष्ट झाले. हे सर्व अर्पण झाले कि पापी लोकांचा उद्धार व्हावा. दुसर्या कोणत्या पद्धतीने मनुष्य

ह्या पापाच्या शिक्षेपासून मुक्त होऊ शकत नाही. जी खंडणी मिळते ती ग्रहण करण्यास जो प्रत्येक जीवात्मा नकार देतो ह्या किमतीवर त्याने अधर्माचा दोष आणि शिक्षा सहन करावे.

**(१६) तारणाचे आश्वासन मिळण्यापूर्वी कोणत्या आवश्यक गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक आहे?**

***तो मला म्हणाला, "झाले! मी अल्फा व ओमेगा, म्हणजे प्रारंभ व शेवट आहे. मी 'तान्हेल्याला जीवनाच्या' झऱ्याचे 'पाणी फुकट' देईन.जो कोणी विजय मिळवतो त्याला ह्या गोष्टी वारशाने मिळतील; 'मी त्याचा देव होईन, आणि तो माझा पुत्र होईल.' (प्रगटीकरण २१:६-७)***

हे अभिवचन केवळ तहानलेल्या लोकांसाठी आहे. इतर दुसरे कोणीही नाही केवळ ज्यांना ह्या जीवनी जलाची तहान लागते, आणि इतर सर्व गोष्टींच्या पेक्षा ह्याचा धावा करतात, त्यांना ते पुरवले जाईल. ...सर्व गोष्टींचे वतन मिळण्यासाठी, आपण पापाचा प्रतिकार करून त्यावर विजय मिळवणे गरजेचे आहे.

प्रभू यशया संदेष्ट्याच्या द्वारे घोषित करतो: "नीतिमानांविषयी म्हणा की त्यांचे कल्याण होणार; कारण ते आपल्या कृत्यांचे फळ उपभोगणार. दुष्ट हायहाय करणार; त्याचे वाईट होणार; कारण त्याने आपल्या हातांनी जे केले त्याचे फळ त्याला मिळेल." यशया ३:१०,११. "पापी शंभरदा पाप करून पुष्कळ दिवस वाचला तरी माझी खातरी आहे की देवाचे भय बाळगणारे जे त्याला भिऊन वागतात त्यांचे कल्याणच होईल; पण दुष्टाचे

कल्याण होणार नाही, व त्याचे छायारूप आयुष्य दीर्घ असणार नाही; कारण तो देवाला भिऊन वागत नाही.” उपदेशक ८:१२,१३. आणि पौल साक्ष देतो कि पापी व्यक्ती स्वतःसाठी “देवाचा क्रोध व यथोचित न्याय ह्यांच्या प्रकटीकरणाच्या दिवसासाठी स्वतःकरता क्रोध साठवून ठेवतोस? तो प्रत्येकाला ज्याच्या फळ कृत्यांप्रमाणे त्याच्या- देईल;” “म्हणजे दुष्कृत्य करणारा मनुष्य, प्रथम यहूदी आणि मग हेल्लेणी अशा प्रत्येकाच्या जिवावर ती येतील.” रोमकरास पत्र २:५,६,९.

**(१७) देव बंडाई आणि पाप ह्यांना कसे हाताळणार?**

*परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली“: परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, हजारो जणांवर दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा, (पण अपराधी जनांची (मुळीच गय न करणारा, असा तो वडिलांच्या दुष्टाईबद्दल पुत्रपौत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो.” (निर्गम ३४:६-७)*

*परमेश्वर आपल्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांचे रक्षण करतो, पण सर्व दुर्जनांचा नाश करतो. (स्तोत्रसहिता १४५:२०)*

देवाने मनुष्याला त्याच्या चारित्र्याची घोषणा केली आहे आणि पापाला तो कसे हाताळणार हे देखील सांगितले आहे ... दैवी शासनाचा अधिकार आणि सत्ता हे बंडाई दूर

करण्यासाठी वापरण्यात येतात; तरीही ह्या प्रकारच्या न्यायाच्ये प्रदर्शन हे देवाच्या दयाळू, मंद्क्रोध आणि हितकर्ता ह्या चारित्र्याशी परिपूर्ण रीतीने जुळते.

**(१८) प्रत्येक पापी व्यक्तीसाठी देवाची विनवणी काय असते?**

***"परमेश्वर म्हणतो, चला, या, आपण बुद्धिवाद करू; तुमची पातके लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखी पांढरी होतील; ती किरमिजासारखी तांबडी असली तरी लोकरीसारखी निघतील. (यशया १:१८)***

देव कोणाच्या इच्छा किंवा न्यायावर जबरदस्ती करत नाही. तो कोणत्याही प्रकारे अशा गुलामगिरीच्या आज्ञापालन करण्यात आनंद मानत नाही. त्याची इच्छा अशी आहे की त्याच्या हस्तकृतीने त्याच्यावर प्रेम करावे कारण तो त्या प्रेमास पात्र आहे. तो त्यांच्याकडून आज्ञापालनाची अपेक्षा करतो कारण त्यांना त्याच्या सुज्ञानाचे, न्यायाचे, उपकाराचे खूप कौतुक आहे.आणि ज्या सर्वांना ह्या गुणधर्मांची जाणीव आहे ते त्याच्यावर प्रेम करतील कारण त्याच्या गुणधर्मांमुळे ते त्याच्याकडे आकर्षित होतात.

आपल्या तारणार्याने दया, चांगुलपण, प्रेम ह्यांची जी तत्वे दर्शवली आहेत, हे देवाची इच्छा आणि चारित्र्य ह्यांचा उतारा आहेत. ख्रिस्ताने घोषणा केली कि पित्यावाचून त्याने दुसरे काहीच शिकवले नाही. दैवी शासनाचे तत्व तारणार्याचे नियमशास्त्र ह्याच्याशी पूर्णपणे जुळतात, "आपल्या शत्रूंवर प्रेम कर."

देव दुष्ट लोकांचा न्याय करतो,विश्वाच्या

चांगुलपणासाठी, आणि ज्या लोकांचा न्याय झालेला आहे त्यांच्यासाठी देखील हे आहे. त्याच्या शासनाचे नियमशास्त्र आणि चारित्र्याचा न्याय ह्यांच्या अनुषंगाने शक्य झाले तर तो त्यांना खुश करू शकतो. त्याच्या प्रेमाचे दर्शक म्हणून तो त्यानं घेराव घालतो, त्याच्या नियमशास्त्राचे ज्ञान देतो, आणि त्याची दया देऊ करतो; पण ते लोक त्याच्या प्रेमाचा द्वेष करतात, त्याचे नियमशास्त्र रद्द करतात, आणि त्याची दया नाकारतात. त्याची वरदाने सतत ग्रहण करून, दात्याचा ते अपमान करतात; ते देवाचा द्वेष करतात कारण त्यांना ठाऊक आहे की देव त्यांच्या पापांचा द्वेष करतो. प्रभू त्यांचा हेखेखोरपणा सहन करतो; पण निर्णयाचा समय शेवटी येईल, जेव्हा त्यांचे भवितव्य ठरवले जाईल. मग ह्या बंडांना तो स्वतःच्या बाजूने बांधून टाकेल का? तो त्यांना त्याची इच्छा पूर्ण करण्यास जबरदस्ती करेल का?

**(१९) दुष्ट लोकांकडून कोटी ओरड होईल जेव्हा त्यांना प्रभूच्या सान्निध्याचा अनुभव येईल?**

***आणि ते डोंगरांना व खडकांना म्हणाले, "आमच्यावर पडून राजासनावर जो बसलेला आहे, त्याच्या दृष्टीपुढून व कोकऱ्याच्या क्रोधापासून आम्हांला 'लपवा'.! (प्रगटीकरण ६:१६)***

ज्या लोकांनी सैतानाला त्यांचा नेता म्हणून निवडले आणि त्याच्या सामर्थ्याच्या अधीन असतात ते देवाच्या सान्निध्यात प्रवेश करण्यास तयार नसतात. गर्व, फसवणूक, क्रूरता,

स्वैराचार हे त्यांच्या चारित्र्यात भिनले गेले आहेत. पृथ्वीवर ज्यांचा त्यांनी द्वेष केला तुच्छ लेखले त्यांच्यासोबत स्वर्गात राहण्यास ते जाऊ शकतात का? सत्य कधीही खोट्या व्यक्तीला पटणार नाही; विनम्र वृत्ती स्वतःवर विश्वास आणि गर्व ह्यांना तृप्त करणार नाही; शुद्धता ही भ्रष्ट लोकांसाठी मान्य नसते; स्वारस्य नसलेले प्रेम स्वार्थी लोकांना आकर्षित करत नाही. जे लोक पृथ्वीच्या आणि स्वार्थी हेतुंमध्ये गुंतले गेले आहेत त्यांच्यासाठी स्वर्ग काय आनंद देऊ शकेल?

ज्या लोकांची जीवने देवाच्या विरुध्द बंड करण्यात गेली ते अचानक स्वर्गात घेतले जाऊन त्यांना ते उच्च, पवित्र परिपूर्ण स्थान अनुभवता येईल का, जे तिकडे अस्तित्वात आहे- प्रत्येक जीवात्मा प्रेमाने भरलेला, प्रत्येक चेहरा आनंदाने खुललेला,  देव आणि कोकर्याचा सन्मान करत ते संगीतमय सूर, आणि जो सिंहासनारूढ आहे त्याच्या चेहऱ्यावरून जे प्रकाशझोत उद्धार झालेल्या लोकांच्या चेहऱ्यावर बाहेर पडतात,—ज्या लोकांच्या मनात देवाबद्दल द्वेष आहे, सत्य आणि पावित्र्याने , स्वर्गातील सेनेबरोबर एक होऊन त्यांच्या सुराने स्तुतीगीते गातील का? देवाचे आणि कोकऱ्याचे गौरव ते पाहू शकतात का? नाही, नाही; त्यांना अनेक वर्ष शिकण्यासाठी देण्यात आली, जेणेकरून स्वर्गासाठी ते चारित्र्य तयार करू शकतात; पण त्यांनी मनाला शुद्ध वृत्तीवर प्रेम करण्यास कधीही प्रशिक्षित केले नाही; ते कधीही स्वर्गाची भाषा शिकले नाही, आणि आता खूप उशीर झाला आहे.

देवाच्या विरुद्ध बंडाईचे जीवन जगणे त्यांना स्वर्गाच्या विरोधात तयार करून स्वर्गासाठी साजेसे बनवत नाही. त्याचे

पावित्र्य, शुद्धता आणि शांती त्यांना त्रास देते; देवाचे गौरव त्यांच्यासाठी एक भस्म करणारा अग्नी असते. त्या पवित्र स्थानातून पळ काढण्याचा त्यांचा विचार असतो. ते नाशाचा स्वागत करतात, जेणेकरून त्यांचा उद्धार करण्यासाठी जो मरण पावला त्याच्यापासून त्यांना लपता यावे. दुष्ट लोकांचे भवितव्य हे त्यांच्या स्वतःच्या निवडीने निश्चित करण्यात येते. स्वर्गातून त्यांना बाहेर काढण्यात येणे हे स्वतःच्या स्वेच्छेने होते, आणि देवाच्या दृष्टीने ते न्यायी आणि दयावान बनते.

**(२०) देवाकडून येणारी कोणती घोषणा सनातन काळासाठी सर्व मानवजातीचे भवितव्य शिक्कामोर्तब करेल?**

*दुराचारी माणूस दुराचार करत राहो .मलिनतेने वागणारा माणूस स्वतःला मलिन करत राहो; नीतिमान माणूस नैतिक आचरण करत राहो; पवित्राचरणी माणूस स्वतःला पवित्र करत राहो." (प्रगटीकरण २२:११)*

जलप्रलयाच्या पाण्याप्रमाणे त्या भयंकर दिवसाच्या ज्वाला देवाचा निर्णय घोषित करतात की दुष्ट लोक बरे होऊ शकत नाहीत.दैवी अधिकाराच्या अधीन जाण्यास त्यांना काहीच कारण नसते. बंड करून त्यांनी स्वतःची इच्छा प्रदर्शित केलेली असते; आणि जेव्हा आयुष्य संपुष्टात येते, त्यांची विचारसरणी विरुद्ध दिशेला जाणे किंवा वळवणे खूप कठीण असते, अधर्मापासून आज्ञापालन, द्वेषापासून प्रेम ह्याकडे वळण्यास खूप उशीर झालेला असतो.

**(२१) हाबेलाच्या खुनानंतर देवाने काईनाला तसेच सोडून दिले त्याचा परिणाम काय झाला?**

*पृथ्वीवर मानवांची दुष्टाई फार आहे, त्यांच्या मनात येणाऱ्या विचारांच्या सर्व कल्पना केवळ एकसारख्या वाईट असतात असे परमेश्वराने पाहिले. (उत्पत्ती ६:५)*

कांईन ज्याने खून केला त्याचे आयुष्य बचावून, देवाने संपूर्ण जगाला पापी व्यक्तीला अधर्मात पडून राहण्याची परवानगी देण्याचा काय परिणाम होतो हे उदाहरण दिले. काईनाचा शिकवण आणि उदाहरण ह्यांच्या प्रभावाने, त्याची असंख्य संतती पापात पडली, जोपर्यंत “पृथ्वीवर मनुष्याची दुष्टाई खूप वाढत गेली” आणि “त्याच्या मनातील सर्व विचार सतत वाईट किंवा दुष्टच होते.” “पृथ्वी देखील देवासमोर भ्रष्ट होती, आणि संपूर्ण पृथ्वी हिंसाचाराने भरलेली होती.” उत्पत्ती ६:५,११.

जगावर दया दाखवण्यासाठी, नोहाच्या समयी देवाने सर्व दुष्ट रहिवाशांना तिकडून काढून टाकले. त्याच्या दयेने त्याने सोदोमातील सर्व भ्रष्ट लोकांचा नाश केला. सैतानाच्या फसवणाऱ्या सामर्थ्याने अधर्माचे काम करणारे सहानुभूती आणि कौतुक प्राप्त करून घेतात, आणि त्याद्वारे सतत इतरांना बंड करण्यास प्रवृत्त करतात. काईन आणि नोहाच्या काळात असे घडले, अब्राहाम आणि लोटाच्या समयी देखील असे घडले; आपल्या समयी देखील असेच आहे. विश्वावरील दयेने देव शेवटी त्याची कृपा नाकारणाऱ्या लोकांना नष्ट करेल.

**(२२) ख्रिस्ताचे अर्पण सर्व पश्चाताप करणाऱ्या पापी लोकांचा उद्धार कसा करेल?**

*कारण जर त्या एकाच इसमाच्या द्वारे, त्या एकाच इसमाच्या अपराधाने मरणाचे राज्य चालू झाले, तर जे कृपेचे व नीतिमत्त्वाचे दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषेकरून*

*त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या द्वारे जीवनात राज्य करतील.तर मग जसे एकाच अपराधामुळे सर्व माणसांना दंडाज्ञा होते, तसे नीतिमत्त्वाच्या एकाच निर्णयाने सर्व माणसांना जीवनदायी नीतिमत्त्व प्राप्त होते.कारण जसे त्या एकाच मनुष्याच्या आज्ञाभंगाने पुष्कळ जण पापी ठरले होते, तसे ह्या एकाच मनुष्याच्या आज्ञापालनाने पुष्कळ जण नीतिमान ठरतील.शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली, (रोमकरास पत्र ५:१७-२०)*

आदामाच्या पापाचा परिणाम म्हणून, संपूर्ण मानवजातीवर मृत्यू ओढवला. सर्व समान रीतीने त्या कबरेत जातात. तारणाच्या योजनेच्या सर्व तरतूदीद्वारे, सर्वांना त्यांच्या कबरेतून बाहेर आणले जाते.

**(२३) दुष्ट लोकांना जी शिक्षा मिळणार आहे त्याचे प्रमाण काय निश्चित करेल?**

*मनुष्याचा पुत्र आपल्या पित्याच्या गौरवानिशी आपल्या दूतांसह येईल त्या वेळी‘ तो प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कृत्याप्रमाणे फळ देईल. (मत्तय १६:२७)*

“न्यायी आणि अन्यायी दोघांचे, मृत लोकांचे पुनरुत्थान होईल;” १ करिंथकरास पत्र १५:२२... पण हे पुढे येणारे दोन जे वर्ग आहेत त्यांच्यात फरक केला जाईल. “जे सर्व लोक कबरेत आहेत ते त्याची वाणी ऐकतील, आणि बाहेर येतील; ज्यांनी चांगले केले आहे, जीवनाच्या पुनरुत्थानासाठी; आणि ज्या लोकांनी वाईट केले, दोषारोपाच्या पुनरुत्थानासाठी.” योहान ५:२८,२९.

ज्या लोकांना जीवनाच्या पुनरुत्थानासाठी“पात्र असे लेखण्यात आले आहे” ते “आशीर्वादित आणि पवित्र आहेत.” “अशा लोकांवर दुसऱ्या मृत्यूचा काहीच अधिकार किंवा सामर्थ्य नाही” प्रगटीकरण २०:६. पण ज्या लोकांनी पश्चाताप आणि विश्वासाच्या द्वारे, क्षमा मिळवली नाही, त्यांनी अधर्माची शिक्षा प्राप्त करून घ्यावी —”पापाचे वेतन.” ते विभिन्न काळासाठी आणि तीव्रतेची शिक्षा भोगतात, “त्यांच्या कृत्यांच्या नुसार,” पण त्यांचा शेवट हा दुसऱ्या मृत्यूत होतो.

देवासाठी हे अशक्य आहे म्हणून, सातत्याने त्याचा न्याय आणि दया ह्यांनी, पापी व्यक्तीला त्याच्या पापात बचाव करून, त्याच्या अधर्मामुळे त्या अस्तित्वापासून तो परावृत्त होतो आणि ज्यासाठी त्याने स्वतःला अपात्र असे ठरवले आहे.

**(२४) जो जीवात्मा पाप करतो त्याची शेवटली परिस्थिती कशी असते?**

***कारण पापाचे वेतन मरण आहे; पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे. (रोमकरास पत्र ६:२३)***

***कारण तुम्ही जसे माझ्या पवित्र पर्वतावर प्यालात तशी सर्व राष्ट्रे सतत पीत राहतील; ती पिऊन बरळतील आणि होती की नव्हती अशी होतील. (ओबद्या १:१६)***

अशा रीतीने पापाचा शेवट होईल, त्याच्यासोबत जो धिक्कार आणि नाश आहे जे परिणामी जन्मास येतात. स्तोत्रकर्ता म्हणतो: “तू दुष्टांना नष्ट केले आहे, तू त्यांचे नाव सर्वकाळसाठी काढून टाकले आहे. हे शत्रू,

नाशाचा आता पूरेपर अंत झाला आहे.” स्तोत्रसहिता ९:५,६. प्रगटीकरणात, योहान त्या सनातन स्थितीकडे पाहतो, एक जागतिक संगीत किंवा स्तुतीचे राष्ट्रगीत ऐकतो ज्यात एक देखील अशांतीचा सूर नसतो. स्वर्ग आणि पृथ्वीवरील प्रत्येक सृष्टी देवाचे गौरव करत गीत गात होते. प्रगटीकरण ५:१ ३. देवाची ईश्वरनिंदा करण्यासाठी कोणतेही पतन झाले जीवात्मे नसतील ते त्या ठिकाणी कधीही न संपणाऱ्या छळात पडत राहतील; नरकातील कोणतेही दुष्ट लोक तारण झालेल्या लोकांच्या गीतांबरोबर त्यांचे रडगाणे गाणार नाही.

## (२५) ज्या सर्व लोकांचा मृत्यू होणार त्यांची परिस्थिती कशी असेल?

*आपल्याला मरायचे आहे हे जिवंतांना निदान कळत असते; पण मेलेल्यांना तर काहीच कळत नाही; त्यांना आणखी काही फलप्राप्ती होणार नसते; त्यांचे स्मरण कोणाला राहत नाही. (उपदेशक ९:५)*

नैसर्गिक अमरत्वाच्या मुलभूत चुकीवर आधारित विवेकबुद्धीचा सिद्धांत आहे- एक सिद्धांत, सनातन छळाप्रमाणे, शास्त्रवचनाच्या शिकवणींच्या विरोधात, तर्कबुद्धीच्या मतानुसार, आणि आपल्या मानवतेच्या भावनांनुसार दिसतात. त्या प्रसिद्ध विश्वासानुसार, स्वर्गात ज्यांचा उद्धार झालेला आहे ते पृथ्वीवर जे काही होते त्याच्याशी परिचित आहेत विशेषकरून ज्या मित्रांना त्यांनी मागे सोडले त्यांच्याबद्दल त्यांना सर्वकाही ठाऊक आहे. पाप मृत लोकांसाठी हे आनंदाचे एक कारण कसे होईल की त्यांनी जिवंत लोकांचे त्रास जाणून घ्यावे, त्यांच्या स्वतःच्या जवळच्या लोकांनी जी पापे केली ते

पाहणे, आणि आयुष्याचे सर्व दुख, निराशा आणि त्रास सहन करत  पाहणे? स्वर्गाचा किती आनंद ते लोक उपभोगतील जे पृथ्वीवरील त्यांच्या मित्रांच्या भोवती भ्रमण करत होते?

आणि हा विश्वास किती प्रतिकार करण्यासारखा आहे की जेव्हा देहातून श्वास निघून गेला की पश्चाताप न करणारा जीवात्मा नरकाच्या अग्नीसाठी सुपूर्त केला जातो! ते लोक किती दुख आणि वेदनेत असतील जे आपल्या मित्रांना तयारी नसताना देखील त्या कबरेकडे जाताना बघतात, धिक्कार आणि पापाने पूर्ण सनातन जीवनात प्रवेश करताना ते बघतात ! ह्या भयंकर अशा विचाराने अनेक लोक वेडेपिसे झालेले आहेत.

ह्या गोष्टींच्या संबंधी शास्त्रवचन काय सांगते? दावीद घोषित करतो की मनुष्य मृत्यूत असताना तेवढा सतर्क नसतो. “त्याचा श्वास पुढे जात राहतो, तो पृथ्वीवर परत येतो; त्याच दिवशी त्याचे विचार नष्ट होतात.” स्तोत्रसहिता १४६:४.

**(२६) जे मृत लोक करू शकत नाहीत त्यापैकी जिवंत लोक काय करू शकतात?**

***अधोलोक तुझा धन्यवाद करीत नाही, मृत्यू तुझी स्तुती गात नाही; शवगर्तेत उतरलेले तुझ्या सत्याची अपेक्षा करीत नाहीत.जिवंत, जिवंत माणूसच तुझा धन्यवाद करतो तसा मी आज करीत आहे. बाप तुझे सत्य मुलास प्रकट करतो.(यशया ३८:१८-१९)***

जेव्हा, प्रार्थनेचे उत्तर म्हणून , हिज्कीयाचे आयुष्य पंधरा वर्षांनी वाढवण्यात आले, ह्या राजाने देवाला स्तुतीचा यज्ञ त्याच्या महान दयेसाठी अर्पण केला. ह्या गीतामध्ये तो आनंद करण्याचे कारण सांगतो: “कबर तुझी स्तुती

करू शकत नाही, मृत्यू तुला साजरे करू शकत नाही: जे लोक खाली खोलवर खड्ड्यात जातात ते तुझ्या सत्याची आशा बाळगू शकत नाही. जिवंत, जिवंतच तुझी स्तुती करू शकतील, जसे आज मी करत आहे.” यशया ३८:१८,१९. प्रसिद्ध धर्मशास्त्र नीतिमान लोक ज्यांचा मृत्यू झालेला आहे ते स्वर्गात असल्याचे प्रस्तुत करतात आणि त्यांच्याकडे एक अमर अशी जिव्हा असते; पण हिज्कीयाला मृत्यूमध्ये असे काही गौरवी भवितव्य दिसले नाही. त्याच्या शब्दांनी स्तोत्रकर्त्याची साक्ष ऐकण्यात येते: “मृत्यूमध्ये तुझे स्मरण होत नाही: कबरेत कोण तुझी उपकारस्तुती करेल?” “मृत लोक प्रभूची स्तुती करत नाही, आणि जे कोणी शांततेत जातात ते देखील करू शकत नाही.” स्तोत्रसहिता ६:५; ११५:१७.

**(२७) आज दावीद राजा कोठे आहे?**

***“बंधुजनहो, कुलाधिपती दावीद ह्याच्याविषयी मी तुमच्याबरोबर प्रशस्तपणे बोलतो .तो मरण पावला, पुरला गेला व त्याची कबर आजपर्यंत आपल्यामध्ये आहे. (प्रेषित २:२९)***

दावीद त्यापुनरुत्थान होईपर्यंत त्या कबरेत राहतो ही वास्तविकता सिद्ध करते की नीतिमान मृत्युनंतर स्वर्गात जात नाहीत. केवळ पुनरुत्थान द्वारे, आणि ख्रिस्ताचे पुनरुत्थान झाले ह्या वास्तविक्तेने, दावीद शेवटी देवाच्या उजव्या हाताला बसू शकतो.

**(२८) पुनरुत्थानाच्या दिवशी मृत लोक कोठून येतील?**

***ह्याविषयी आश्चर्य करू नका; कारण कबरांतील सर्व माणसे त्याची वाणी ऐकतील आणि ज्यांनी सत्कर्मे केली ते जीवनाच्या***

*पुनरुत्थानासाठी व ज्यांनी दुष्कर्मे केली ते न्यायाच्या पुनरुत्थानासाठी बाहेर येतील, अशी वेळ येत आहे. (योहान ५:२८-२९)*

**(२९) ख्रिस्त येईल तेव्हा काय देईल ज्याचा अर्थ असा देखील आहे की त्याचे पुनरागमन होण्यापूर्वी ज्यांचा मृत्यू झाला आहे ते स्वर्गात किंवा नरकात जाणे हे काही वैचारिक म्हणून सिद्ध होत नाही?**

*"पाहा, मी 'लवकर 'येतो;' आणि प्रत्येकाला ज्याच्या-त्याच्या कृत्यांप्रमाणे देण्यास माझ्याजवळ वेतन आहे. (प्रगटीकरण २२:१२)*

आणि पौल म्हणाला: "मृत जर उठले नाहीत, मग ख्रिस्ताचे पुन्हा उठणे होत नाही: आणि जर ख्रिस्त पुन्हा उठला नाही, तर तुमचा विश्वास व्यर्थ आहे; तुम्ही अजूनही तुमच्या पापात आहात. मग ख्रिस्तामध्ये जे झोपी गेले आहेत त्यांचा देखील नाश झालेला आहे." १ करिंथकरास पत्र १५:१६-१८. जर चार हजार वर्षांसाठी नीतिमान मृत्यू झाल्यावर थेट स्वर्गात गेले, मग पौल कसा म्हणाला असता की जर पुनरुत्थान नसेल, "जे लोक ख्रिस्तामध्ये झोपी गेले आहेत त्यांचा नाश झाला आहे"? कोणतेही पुनरुत्थान मग आवश्यक ठरले नसते.

**(३०) ख्रिस्ताचे स्वर्गारोहण झाल्यावर, जे लोक त्याच्या पुनरागमनाची वात पाहतात त्यांच्यासाठी त्याने कोणते अनमोल अभिवचन देऊ केले आहे?**

*माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत; नसत्या तर मी तुम्हांला तसे सांगितले असते; मी तुमच्यासाठी जागा तयार करायला जातो.आणि मी जाऊन तुमच्यासाठी*

*जागा तयार केली म्हणजे पुन्हा येऊन तुम्हांला आपल्याजवळ घेईन; ह्यासाठी की, जेथे मी आहे तेथे तुम्हीही असावे. (योहान १४:२-३)*

पण जेव्हा त्याच्या शिष्यांना सोडण्याची वेळ आली, येशूने त्यांना सांगितले नाही की लवकर ते त्याच्याकडे येतील. . . . आणि पौल, आपल्याला पुढे सांगतो, की कारण आज्ञाध्वनी, आद्यदिव्यदूताची वाणी व देवाच्या तुतारीचा नाद होत असता प्रभू स्वतः स्वर्गातून उतरेल; आणि ख्रिस्तामध्ये जे मेलेले आहेत ते पहिल्याने उठतील. नंतर जिवंत उरलेले आपण त्यांच्याबरोबर प्रभूला सामोरे होण्यासाठी मेघांरूढ असे अंतराळात घेतले जाऊ, आणि तसेच सदासर्वदा प्रभूजवळ राहू. म्हणून ह्या वचनांनी एकमेकांचे सांत्वन करा.” १ थेसलोनिकरास पत्र ४:१६-१८. . . . पौल त्याच्या बंधूंना प्रभूच्या भविष्यातील येण्याकडे दर्शवतो, जेव्हा कबरेचे साखळदंड मोडण्यात येतील, आणि “ख्रिस्तामध्ये मृत्यू पावलेले” पुन्हा सनातन जीवनासाठी उठवले जातील.

**(३१) धार्मिक आणि दुष्ट लोकांना त्यांचे प्रतिफळ मिळण्यापूर्वी कोणती महान आणि पवित्र घटना घडली पाहिजे?**

*मी कोण आहे हे तुम्ही ओळखले असते तर माझ्या पित्यालाही ओळखले असते; आतापासून तुम्ही त्याला ओळखता व तुम्ही त्याला पाहिलेही आहे.” (प्रगटीकरण १४:७)*

कोणीही त्या आशीर्वादित लोकांच्या सुंदर महालात प्रवेश करण्यापूर्वी, त्यांच्या बाबींची चौकशी होणे आवश्यक आहे, देवासमोर त्यांचे चारित्र्य आणि कृती ह्यांचे परीक्षण होणे जरुरीचे आहे. ज्या गोष्टी पुस्तकात लिहून

ठेवण्यात आल्या आहेत त्यानुसार त्यांचा न्याय होणे आणि जसे त्यांचे कार्य आहे त्यानुसार त्यांना प्रतिफळ मिळणे आवश्यक आहे. मृत्युच्या समयी हा न्याय सुनवण्यात येत नाही. पौलाचे शब्द पहा: "त्याने एक दिवस नेमून ठेवला आहे, जेव्हा तो जगाचा न्याय नितीमत्वात करेल त्या मनुष्याच्या द्वारे ज्याला त्याने नियुक्त केले; ज्याद्वारे त्याने सर्व लोकांना ती खात्री दिली आहे, ज्यामध्ये त्याने त्याला मेलेल्यातून उठवले." प्रेषित १७:३१. या ठिकाणी प्रेषिताने अगदी स्पष्टपणे व्यक्त केले की एक विशिष्ट वेळ, मग भविष्य, ह्या जगाचा न्याय करण्यासाठी सिद्ध करण्यात आले.

यहूदा त्याच काळाचा संदर्भ देतो : "ज्या देवदूतांनी त्यांचे पहिले स्थान ठेवले नाही, पण स्वतःचे वसतीस्थान सोडले, त्या शेवटल्या दिवसासाठी न्याय होण्यास अंधकाराच्या अधीन त्याने साखळदंडात त्यांना ठेवले आहे." आणि पुन्हा, तो हनोखाचे शब्द येतेह बोलून दाखवतो: "पाह, प्रभू त्याच्या दहा हजार संतजणांच्या सोबत , सर्वांचा न्याय करण्यास परत येईल." यहूदा ६, १४, १५. . . . तडपत आहेत, मग भविष्यात न्यायाची का आवश्यकता असेल? पण मेलेले लोक जर आधीच स्वर्गाच्या आनंदाचा उपभोग घेत आहेत किंवा नरकाच्या ज्वालांमध्ये, ह्या महत्वाच्या मुद्द्यांवर देवाच्या वचनाच्या शिकवणी ह्या पुसट किंवा विरोधी नाहीत; सामान्य लोकांची मने त्यांना समजून घेऊ शकतात. पण वर्तमानाच्या सिद्धांतात मनाला सुज्ञान किंवा न्याय हे दिसतात का? नीतिमान जन, त्यांचा न्याय झाल्यावर, दोष प्राप्त करून घेतील का, "शाब्बास, भल्या आणि विश्वासू दासा: ... प्रभूच्या आनंदात तुझा स्वीकार आहे," जेव्हा खूप वर्ष आणि युगांसाठी ते कदाचित त्याच्या सान्निध्यात वस्ती

करतात?दुष्टांना त्या छळ होणाऱ्या जागेतून बोलवण्यात येते का आणि पृथ्वीच्या न्यायाधीशाकडून ते फर्मान त्याला मिळते का: “माझ्यापासून, तुम्ही शापित लोक, दूर व्हा, आणि सनातन अग्नीत जा”? मत्तय २५:२१,४१. ओह, काय ही थट्टा ! सुज्ञान आणि न्याय ह्यांचे लज्जास्पद उल्लंघन !

## (३२) पुनरुत्थान होईपर्यंत मृत लोक कोणत्या अवस्थेत राहतात?

***भूमीतील मातीत निजलेल्यांचा मोठा समुदाय उठेल; कित्येक सर्वकाळचे जीवन मिळवण्यास आणि कित्येक अप्रतिष्ठा व सर्वकाळचा धिक्कार मिळवण्यास उठतील. (दानियेल १२:२)***

कोठेही पवित्र शास्त्रवचनात हे विधान आढळत नाही की नीतिमान लोकांना त्यांचे प्रतिफळ मिळते किंवा मृत्युनंतर दुष्ट लोकांना त्यांची शिक्षा मिळते. कुलाधीपती आणि संदेष्टे ह्यांनी असे कोणतेही आश्वासन ठेवलेले नाही. ख्रिस्त आणि त्याच्या प्रेषितांनी त्याबद्दल काहीही इशारा दिलेला नाही. पवित्र शास्त्र स्पष्टपणे शिकवते की मृत लोक थेट कधीही स्वर्गात जात नाही. पुनरुत्थान होईपर्यंत ते झोपलेले आहेत असे प्रदर्शित होतात. १ थेसलोनिकरास पत्र ४:१४; इयोब १४:१०-१२. ज्या दिवशी तो चांदीचा दोर सैल होतो आणि सुवर्ण वाटी मोडण्यात येते (उपदेशक १२:६), मनुष्याचे विचार हे नाहीसे होतात. जे कबरेत जातात ते शांतीत असतात. सूर्याच्या प्रकाशात काय होत आहे त्याची त्यांना काहीच माहिती नसते. इयोब १४:२१. थकलेल्या धार्मिक लोकांसाठी तो एक आशीर्वादित विसावा असतो ! वेळ, मग थोडा किंवा जास्त असो, त्यांच्यासाठी एक क्षण बनतो. ते झोपी जातात; देवाने तो कर्णा वाजवल्यावर गौरवी अमरत्वासाठी ते पुन्हा उठवले जातात. “क्षणात, निमिषात, शेवटला कर्णा

वाजेल तेव्हा. कारण कर्णा वाजेल, मेलेले ते अविनाशी असे उठवले जातील, आणि आपण बदलून जाऊ.कारण हे जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान करावे, आणि हे जे मर्त्य त्याने अमरत्व परिधान करावे हे आवश्यक आहे.हे जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान केले, आणि हे जे मर्त्य त्याने अमरत्व परिधान केले, असे जेव्हा होईल तेव्हा "मरण विजयात गिळले गेले आहे" असा जो शास्त्रलेख आहे तो पूर्ण होईल.
१ करिंथकरास पत्र १५:५२-५४.

**(३३) पुनरुत्थित नीतिमान लोकांची विजयाची ओरड काय असेल?**

*"अरे मरणा, तुझा विजय कोठे?
अरे मरणा, तुझी नांगी कोठे?" (१ करिंथकरास पत्र १५:५५)*

त्यांच्या गाढ निद्रेतून जसे त्यांना बोलवण्यात येते ते कुठे थांबले ह्यावर विचार करू लागतात. शेवटली संवेदना म्हणजे मृत्यूचा पाश होता; शेवटला विचार, की ते लोक कबरेच्या अधीन त्या दास्याखाली पडत होते. जेव्हा कबरेतून ते बाहेर येतात, त्या विजयी घोषणेत त्यांचा पहिला आनंदी विचार हा प्रतिध्वनीच्या स्वरुपात ऐकण्यात येईल: "हे मरणा , तुझी नांगी कोठे? हे कबर, तुझा विजय कोठे आहे?"

*मला समजते की मानवजातीची पहिली फसवणूक म्हणजे , "तू निश्चित मरणार नाही." हे स्पष्ट आहे की पवित्र शास्त्र शिकवते की पश्चाताप न केलेल्या पापाचा अंतिम परिणाम म्हणजे शरीर आणि जीवात्मा ह्यांचा शेवटचा मृत्यू आहे.*

गोल करा :     होय     अनिश्चित

देवाच्या वचनात मी हे शोधले आहे की अमरत्वासाठी आपली एकमेव आशा म्हणजे ख्रिस्ताच्या खंडणी भरून देणाऱ्या अर्पणाचा स्वीकार करणे.

गोल करा :     होय     अनिश्चित

मी त्या महान वादविवादाचा पुरावा पाहतो आणि सैतानाचा प्रयत्न म्हणजे जगाला खात्री पटवून देणे की देवाचे शासन हे कडक आणि अरास्त आहे. पण, शास्त्रवचनात हे स्पष्ट आहे की देवाचे सर्व न्याय हे नीतिमान, न्यायी आणि दयाळू असतात.

गोल करा :     होय     अनिश्चित

मी देवाची दया ह्या वास्तविक्तेत बघतो की त्यांचे न्यायी प्रतिफळ मिळाल्यावर, दुष्ट लोकांचा नाश हा त्या नरकाच्या अग्नीत होईल. अनेक युगांसाठी छळ सहन करण्यास त्यांची शरीरे किंवा जीवत्मे उरणार नाहीत.

गोल करा :     होय     अनिश्चित

मी शास्त्रवचनात हे पाहिले आहे की मृत लोक स्वर्गात देवाची स्तुती करत दिसत नाहीत. त्यांना काहीच भावना, विचार नाही, किंवा कोणतीही जाणीव नाही पण ते तर त्यांच्या कबरेत झोपी गेले आहेत आणि पुनरुत्थानाची वाट पाहत आहेत.

गोल करा :     होय     अनिश्चित

मला हे जाणून शांती मिळते की ते लोक त्यांच्या प्रियजनांना ह्या जगाचे सर्व त्रास सहन करत असताना पाहत नाहीत. ते तर त्यांच्या कबरेत झोपी जातात पुनरुत्थानाची आणि ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्याची वाट पाहत.

गोल करा : होय अनिश्चित

ही माझी प्रार्थना आहे की मी त्या विश्वासू अनुयायांमध्ये असेल ज्यांची ओरड ऐकू येते, “हे मरणा, तुझी नांगी कोठे? हे कबर, तुझा विजय कोठे?”

गोल करा : होय अनिश्चित

___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___
___



# धडा ६
# मृत व्यक्ती आपल्याशी बोलू शकतात का?

शास्त्रवचनात जसे पवित्र देवदूतांची सेवा दिसून येते, हे सत्य सर्वात आरामदायी आहे आणि ख्रिस्ताच्या प्रत्येक अनुयायासाठी ते अनमोल आहे. पण ह्या मुद्द्यावर पवित्र शास्त्रीय शिकवणी ह्या पुसट आहेत आणि प्रसिद्ध धर्मशास्त्राच्या चुकांनी ते बदलले जाते. नैसर्गिक किंवा स्वाभाविक अमरत्व, जे प्रथम विदेशी तत्वज्ञानातून चोरले गेले आहे, आणि ख्रिस्ती विश्वासात जी महान प्रेषितीय तत्व सामावली गेली आहेत, त्यांनी सत्याला ठकवले आहे, आणि इतक्या सोप्या रीतीने शास्त्रवचनात ते शिकवण्यात आले आहेत, की "मृतांना काहीच ठाऊक नाही." असंख्य लोक ह्यावर विश्वास ठेवतात कि मृतांचे आत्मे आहेत जे ह्या रीतीने "सेवा करणारे आत्मे आहेत, जे त्यांच्यासाठी पाठवण्यात येतात जे तारणाचे वारस म्हणून सिद्ध होणार आहेत." आणि

शास्त्रवचनाची साक्ष जी स्वर्गीय दूतांच्या अस्तित्वावर दुजोरा देते ह्याकडे पाहता, आणि त्यांचा जो मनुष्याच्या इतिहासाशी संबंध आहे, आणि हे मानवाच्या मृत्युपूर्वी दिसते.

**(१) कबरेत प्रवेश केल्यावर मृत लोक काय करणार नाहीत?**

*मेघ ज्याप्रमाणे वितळून नाहीसा होतो, तसा अधोलोकात जाणारा परत वर येत नाही. (इयोब ७:९)*

मृत्यूमध्ये विवेकबुद्धीचा मनुष्याचा सिद्धांत, विशेषतः तो विश्वास मृतांचे आत्मे पुन्हा जिवंत लोकांशी बोलण्यास येतात, ह्याने आधुनिक अध्यात्माची वाट सिद्ध केली आहे. जर मृतांना देवाच्या सान्निध्यात आणि पवित्र दूतांच्या सहवासात प्रवेश मिळाला आणि त्या पलीकडचे जे त्यांच्याकडे आहे ते ज्ञान मिळून ते भाग्यशाली बनतात, मग पुन्हा पृथ्वीवर येऊन त्यांनी लोकांना प्रकाशित करून सूचना का देऊ नये? जर, प्रसिध्द धर्मशास्त्रज्ञ जसे शिकवतात, मृत लोकांचे आत्मे हे पृथ्वीवर त्यांच्या मित्रांच्या भोवती घुटमळत राहतात, मग त्यांना त्यांच्शी बोलण्याची परवानगी का मिळू नये, दुष्टाईच्या बद्दल त्यांना इशारा देऊन, किंवा दुखात अथवा वेदनेत त्यांचे सांत्वन का करू नये? ज्या लोकांना माणसाच्या मृत्युमधील विवेकावर विश्वास आहे ते गौरवी आत्मे जो दैवी प्रकाश त्यांच्यापर्यंत देऊ करतात त्याला कसे नाकारतात? या ठिकाणी एक माध्यम आहे, ज्याला पवित्र लेखले जाते, ज्याच्या द्वारे सैतान त्याचे हेतू सिद्ध करण्यासाठी कार्य करत असतो.

पतन पावलेले दूत जे त्याची बोलणी करतात ते तर ह्या आत्म्यांच्या जगातील दूत असे भासतात. जिवंत लोकांना मृतांच्या सोबत

संधान साधत असताना, दुष्टाईचा नायक त्यांच्या मनावर त्याचा दुष्ट प्रभाव पाडत राहतो.

**(२) दुष्ट शक्तींकडे कोणती क्षमता आहे आणि जगाला फसवण्याच्या ह्या प्रयत्नात त्याचा उपयोग ते करतात?**

***ते चिन्हे दाखवणारे भुतांचे आत्मे आहेत; ते सर्वसमर्थ देवाच्या त्या मोठ्या दिवसाच्या लढाईसाठी संपूर्ण जगातील राजांना एकत्र करण्यास त्यांच्याकडे बाहेर जातात. (प्रगटीकरण १६:१४)***

लोकांसमोर त्यांचे जे मित्र हरपले आहेत त्यांना घेऊन येण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे आहे. ही बनावट परिपूर्ण आहे; तेच प्रचलित रूप, तेच शब्द, वाणी, हे ठळक पण सुंदर अशा फरकाने स्पष्ट करण्यात येतात. अनेकांचे सांत्वन ही खात्री देऊन करण्यात येते की त्यांचे प्रियजन स्वर्गाचा आनंद उपभोगत आहेत, आणि कोणत्याही धोक्यावर शंका न घेता, ते "भुलवणारे आत्मे, आणि सैतानाचे सिद्धांत" ह्यांच्याकडे कान देतात. जेव्हा ते विश्वास ठेवतात की मरण पावलेले लोक तर त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलण्यास येतात, जे लोक कबरेत गेले आहेत त्यांची काहीच तयारी नव्हती असे चित्र सैतान प्रस्तुत करतो. ते स्वर्गात खुश आणि आनंदी राहण्याचे सिद्ध करतात आणि त्या ठिकाणी उच्च स्थाने मिळवून, आणि अशा प्रकारे ही चूक सर्वत्र पसरते की धार्मिक आणि दुष्ट ह्यांच्यात काहीच फरक केला जात नाही.

आत्म्याच्या जगातून जे लोक भेट देणारे आहेत असे भासवतात काही वेळा सतर्कराहण्याचा इशारा देतात जे योग्य असण्याचे सिद्ध करतात. मग, जसा

आत्मविश्वास वाढत राहतो, ते लोक सिद्धांत प्रस्तुत करतात ज्याचा विश्वास शास्त्रवचनात दिसून येतो. पृथ्वीवर त्यांच्या मित्रांचे चांगले होण्यास आणि तसे पाहण्यास ज्यांना खूप स्वारस्य असते, अशा द्वारे ते सर्वात धोकादायक चुका पसरवतात.

ही वास्तविकता की त्यात काही सत्य व्यक्त होतात, आणि काही वेळा भविष्यातील घटना सांगू शकतात, त्यामुळे त्यांच्या विधानांना विसंबून राहण्याचा आधार मिळतो; आणि त्यांच्या खोट्या शिकवणी अनेक लोक सहज रीतीने स्वीकारतात, आणि इतक्या जवळून त्यावर विश्वास ठेवण्यात येतो, जणूकाही पवित्र शास्त्रातील ते सत्य सर्वात पवित्र होते. देवाचे नियमशास्त्र बाजूला ठेवण्यात येते, कृपेच्या आत्म्याचा द्वेष केला जातो, कराराचे रक्त एक अपवित्र गोष्ट म्हणून लेखले जाते. आत्मे ख्रिस्ताच्या दैवत्वाला नाकारतात आणि निर्माणकर्त्याला देखील स्वतःच्या समान अशा स्तरावर ठेवतात. म्हणूनच अशा द्वारे नव्याने वेषांतर करून मोठा बंड करणारा अजूनही देवाच्या विरुद्ध ती लढाई छेडतो, ज्याची सुरुवात स्वर्गात झाली आणि पृथ्वीवर जवळ जवळ सहा हजार वर्ष चालू राहिली.

**(३) ह्या पवित्र शास्त्रीय उदाहरणात, कोण होते ज्याला दुष्टाच्या आत्म्यांनी व्यक्ती म्हणून दर्शवले?**

*त्याने तिला विचारले, “त्याचे स्वरूप कसे आहे?” ती म्हणाली, “एक वृद्ध पुरुष उठून येत आहे; त्याने झगा घातला आहे”.तेव्हा शौलाने ताडले की तो शमुवेल असावा; म्हणून त्याने भूमीपर्यंत लवून नमस्कार केला. (१ शमूवेल २८:१४)*

अनेक लोक अध्यात्मिक प्रदर्शने ह्यांना माध्यम म्हणून हातचलाखी आणि हुशारी असे दाखवतात. पण हे तितकेच खरे आहे की फसवणुकीचे परिणाम हे खरे प्रदर्शन किंवा मांडणी म्हणून दिसतात, आणि त्याच बरोबर अलौकिक सामर्थ्य व्यक्त होते.
ज्या रहस्यमय पद्धतीने आधुनिक अध्यात्माची सुरुवात झाली तो मानवी फसवणूक किंवा धूर्तपणा ह्याचा परिणाम नव्हता, हे तर दुष्ट दुतांचे थेट कार्य होते, ज्याने जीवात्म्याला नष्ट करण्याचा यशस्वी भ्रम दर्शवला. अनेक लोक ह्या विश्वासाने सापळयात अडकतात की अध्यात्म म्हणजे केवळ मानवी फसवणूक आहे; जेव्हा प्रत्यक्ष असे प्रदर्शन म्हणून दिसतात पण ते तर त्याला अलौकिक असे जाणतात, त्यांची फसवणूक होते, आणि मग ते देवाचे महान सामर्थ्य म्हणून स्वीकारतील.

**(४) सैतानी सत्तेच्या प्रदर्शनाचे वर्णन कोणत्या तीन वर्गात होते?**

***ज्यांचा नाश होत चालला आहे त्यांनी आपले तारण साधावे म्हणून सत्याची आवड धरायची ती धरली नाही; त्यामुळे त्यांच्यासाठी सैतानाच्या कृतीप्रमाणे सर्व प्रकारची खोटी महत्कृत्ये, चिन्हे, अद्‌भुते आणि सर्व प्रकारचे अनीतिजनक कपट ह्यांनी युक्त असे त्या अनीतिमानाचे येणे होईल. (२ थेसलोनिकरास पत्र २:९-१०)***

हे लोक शास्त्रवचनाच्या साक्षीकडे जी सैतान आणि त्याचे दूत देतात ह्याकडे दुर्लक्ष करतात. सैतानी सहाय्याने फारोच्या जादूगारांनी देवाच्या कार्याला खोटे ठरवले. पौल साक्ष देतो की ख्रिस्ताच्या दुसर्या येण्यापूर्वी अशाच रीतीने सैतानी सत्तेचे प्रदर्शन दिसत

होते. . . . आणि प्रेषित योहान, शेवटल्या काळात जे चमत्कार करणारे सामर्थ्य दिसेल ह्याचे वर्णन करत म्हणतो: “ते मोठी चिन्हे करते; माणसांसमक्ष आकाशातून पृथ्वीवर अग्नी पडावा असेदेखील करते. जी चिन्हे त्या श्वापदासमक्ष करण्याचे त्याच्याकडे सोपवले होते, त्यावरून ते पृथ्वीवर राहणाऱ्यांना ठकवते; म्हणजे तलवारीचा घाव लागला असताही, जिवंत राहिलेल्या श्वापदासाठी मूर्ती करण्यास पृथ्वीवर राहणाऱ्यांना ते सांगते.” प्रगटीकरण १३:१३,१४. अजून असे फसव्या लोकांची माहिती येथे देण्यात आलेली नाही. लोक सैतानाचे दूत जे चमत्कार करू शकतात ह्यांनी फसले जातात, ते करण्याचे भासवतात त्यांनी नाही.

**(५) सैतानाची फसवणूक करण्याची उत्कृष्ट कलाकृती काय आहे?**

***कारण अशी माणसे म्हणजे खोटे प्रेषित, कपटी कामदार, ख्रिस्ताच्या प्रेषितांचे सोंग घेणारी अशी आहेत. ह्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. कारण सैतानही स्वत: तेजस्वी देवदूताचे सोंग घेतो. (२ करिंथकरास पत्र ११:१३-१४)***

अंधकाराचा नायक, ज्याने इतका काळ त्या फसवणुकीच्या कार्यासाठी त्याचे कौशल्य मोडले, सर्व वर्गातील आणि परिस्थितीतील लोकांसाठी त्याचे मोह तो जुळवून घेतो. संस्कृती आणि शुद्धीकरण ह्यासाठी लोकांना तो अध्यात्म अधिक शुद्ध आणि बौद्धिक पैलूंनी प्रस्तुत करतो, आणि ह्याद्वारे अनेकांना त्याच्या जाळयात अडकवण्यात यशस्वी होतो.

अध्यात्म जे सुज्ञान प्रस्तुत करते ह्याचे वर्णन प्रेषित याकोबाने केले आहे, जे “हे ज्ञान

वरून उतरत नाही; तर ते ऐहिक, इंद्रियजन्य, सैतानाकडले आहे." याकोब ३:१५.हे, तरीही तो महान फसवणारा लपवतो जेव्हा अशा प्रकारे लपवणे त्याचा हेतू उत्तम प्रकारे सिद्ध करते. मोहाच्या अरण्यात ख्रिस्ताच्या समोर जो स्वर्गीय सेराफाच्या प्रकाशाने प्रगट झाला, तो मनुष्यांच्या समोर प्रकाशाचा देवदूत म्हणून आकर्षक स्वरूपाने प्रस्तुत होतो. ह्या तर्काच्या प्रती तो आर्जव करून ते उंचावणारे गमक प्रस्तुत करतो; जे काही चांगले आणि लुभावणारे आहे त्याच्या देखाव्यांनी तो आनंद मानतो; प्रेम आणि दानधर्म ह्याद्वारे तो आपला जिव्हाळा स्पष्टपणे मांडतो. त्या कल्पनेला तो बलाढ्य उंचीपर्यंत उत्साहित करतो, ज्याद्वारे लोक स्वतःच्या सुज्ञानावर अभिमान बाळगतात आणि आपल्या हृदयात सनातन देवाला तुच्छ लेखतात.

ही थोर व्यक्ती जिने जगाच्या उद्धारकाला उच्च पर्वतावर नेले आणि त्याच्यासमोर पृथ्वीचे सर्व राज्य आणि त्याचे गौरव आणले, तो त्याचे मोह मनुष्यांना असे प्रस्तुत करेल जेणेकरून ज्या लोकांना ह्या दैवी सामर्थ्याने झाकून टाकले नाही त्या सर्वांच्या संवेदना बदलून जातील.

**(६) दुष्ट लोक जे निषिद्धसुज्ञान आणि आत्म-उंचावणे आहे ज्याची इच्छा बाळगतात त्याचा उगम काय आहे?**

*हे ज्ञान वरून उतरत नाही; तर ते ऐहिक, इंद्रियजन्य, सैतानाकडले आहे. (याकोब ३:१५)*

आता सैतान देखील मनुष्यांना भुलवतो जसे त्याने एदेन बागेत हवेचे कौतुक करून तिला भुलवले, ते निषिद्ध सुज्ञान प्राप्त करण्याची इच्छा प्रज्वलित करून, आणि स्वतःला उंचावण्याचे ध्येय तिच्या मनात

उत्पन्न केले. ह्या दुष्टांना बाळगून त्याचे पतन झाले, आणि त्यांच्या द्वारे तो सर्व मनुष्यांना नष्ट करण्याचे ध्येय ठेवतो. “तुम्ही देवासारखे व्हाल,” त्याने घोषणा केली, “बरे आणि वाईट ह्याचे ज्ञान तुम्हाला मिळेल.” उत्पत्ती ३:५. अध्यात्म शिकवते “मनुष्य हा वाढत राहण्याचा बढतीचा सजीव आहे; त्याचा जन्म होण्यापासून जशी त्याची वाढ होत राहते, सनातन काळासाठी, तो त्या दैवत्वापर्यंत जात राहतो” . . .

म्हणूनच, नितीमत्वाच्या आणि अमर्यादित देवाच्या परिपूर्णतेच्या जागी, जे त्या आदरयुक्त प्रेमाचे खरे साधन आहे; त्याच्या नियमशास्त्राच्या परिपूर्ण नितीमत्वाच्या जागी, मानवी सिद्धतेचे खरे परिमाण, सैतानाने मनुष्याचा पापी, चुकणारा स्वभाव जिव्हाळा, प्रेम, न्यायाचा एकमेव नियम, किंवा चारित्र्याचा दर्जा ह्यांचे एकमेव साधन बनवले आहे. ही प्रगती, खालच्या दिशेने नव्हे तर वरच्या दिशेने आहे.

**(७) मनुष्यजातीला केवळ कसे उंचावले जाऊ शकते?**

***तो अधिक ‘कृपा करतो;’ म्हणून शास्त्र म्हणते, “देव गर्विष्ठांना विरोध करतो, आणि लीनांवर कृपा करतो”. (याकोब ४:६)***

अध्यात्मिक आणि बौद्धिक स्वभावाचे हे नियमशास्त्र आहे की पाहण्याने आपले रुपांतर होऊ शकते. मन देखील ज्यावर मनन करत राहते त्याच्यातील वस्तूंशी ते पटकन जुळवून घेते. ज्यावर त्याने प्रेम करून आदरयुक्त भावनेने पहायचे आहे त्याच्याशी ते एकरूप होते. मनुष्य कधीही त्याच्या शुद्धतेचा दर्जा किंवा चांगुलपण अथवा सत्य ह्यांच्यावर उठणार नाही. जर

स्वतः हा त्याचा अहंकारपूर्वक आदर्श बनतो, अत्युच्च केलेल्या कोत्याही गोष्टीपर्यंत तो पोहचू शकत नाही. त्या ऐवजी, तो सतत खाली आणि खाली खेचला जातो. देवाच्या कृपेमध्ये मनुष्याला उंचावण्याचे मात्र सामर्थ्य आहे. जर त्याला तसेच ठेवले तर, त्याचा मार्ग अटळपणे खालच्या स्तरावर पोहोचतो.

**(८) स्वतःमध्ये गुंतवून जाण्याच्या विरोधात मनुष्य देवाबरोबर सहकार्य करतो तेव्हा त्याची भूमिका काय असते?**

***इतर प्रेषित, प्रभूचे भाऊ व केफा ह्यांच्याप्रमाणे आम्हांलाही एखाद्या ख्रिस्ती बहिणीला लग्नाची पत्नी करून घेऊन तिला बरोबर नेण्याचा हक्क नाही काय? (१ करिंथकरास पत्र ९:५)***

स्वतःमध्ये व्यस्त होणार्यास, आनंद चाहणार्या, शारीरिक गोष्टींवर प्रेम करणाऱ्या लोकांसाठी, अध्यात्म स्वतःला वेषांतर करून प्रस्तुत करते अधिक शुद्ध आणि बौद्धिक लोकांसाठी नाही; मोठ्या स्वरुपात त्यांना त्यांच्या मताशी जे काही सुसंगत आहे ते दिसते. सैतान मानवी स्वभावाच्या दुर्बल्तेच्या प्रत्येक दर्शकाचा अभ्यास करतो, प्रत्येक व्यक्ती जे काही पाप करणार आहे त्याचा तो अभ्यास करतो, आणि मग तो काळजी घेतो की वाईट करण्याच्या प्रवृत्तीला संतुष्ट करणाऱ्या संधी कमी नाहीत. तो मनुष्यांना इतके जास्त मोहात पाडतो जे स्वतःमध्ये नियमबद्ध असते, आणि स्वतःवर नियंत्रण न ठेऊन त्यांचे शारीरिक, मानसिक आणि नैतिक सामर्थ्य किंवा शक्ती कमी करतो.

त्याने हजारोंचा नाश केला आणि आणि करत आहे जे लोक स्वतःच्या इच्छा पूर्ण करण्यात व्यस्त असतात, आणि ह्याद्वारे मनुष्याचा संपूर्ण स्वभाव

तो क्रूरतेने ग्रासून टाकतो. आणि त्याचे कार्य पूर्ण करण्यासाठी, तो घोषित करतो, आत्म्याच्या द्वारे की "खरे सुज्ञान मनुष्याला सर्व नियमशास्त्राच्या वर ठेवते;" की "जे काही आहे, ते योग्य आहे;" की "देव दोष लावत नाही;" आणि "जे पाप घडले ते निष्पाप स्वरूपाने घडले." जेव्हा लोक ह्याद्वारे विश्वास ठेवण्यास प्रेरित होतात की इच्छा हे सर्वोच्च नियमशास्त्र आहे, स्वातंत्र्य तो परवाना आहे, आणि मनुष्य केवळ स्वतःसाठी हिशोबी असतो, कोण ह्यावर विचार करेल की भ्रष्टाचार आणि वंचित राहणे प्रत्येक हातावर घुटमळत राहतात? जमाव उत्सुकतेने त्या शिकवणी ग्रहण करतो ज्या दैहिक हृदयाच्या प्रेरणेचे आज्ञापालन करण्यास स्वतंत्र असतात. आत्म-नियंत्रणाचे सर्व धागे आणि नसा ह्या वासनेच्या मानेवर ठेवण्यात येतात, मन आणि जीवात्मा ह्याच्या शक्ती तर पशूंच्या नैसर्गिक प्रवृत्तीच्या अधीन असतात, आणि सैतान अशा हजारो लोकांना जे ख्रिस्ताचे अनुयायी स्वतःला म्हणवतात त्यांना आपल्या कह्यात घेतो.

**(९) अध्यात्मामध्ये सहभागी होण्यासाठी शास्त्रवचन त्यासंबंधी काय इशारा देते?**

***'पंचाक्षऱ्यांच्या किंवा चेटक्यांच्या नादी लागू नका; त्यांच्यामागे लागून अशुद्ध होऊ नका; मी परमेश्वर तुमचा देव आहे. (लेवीय १९:३१)***

अध्यात्माच्या कोणत्याही सिद्धतेला घेऊन कोणीही फसवले जाऊ नये. देवाने जगाला तो सापळा किंवा ते जाळे ओळखण्यासाठी पुरेसा प्रकाश दिलेला आहे. जसे ह्यापूर्वी दाखवून देण्यात आले आहे, अध्यात्म बनवणारा तो सिद्धांत शास्त्रवचनातील सोप्या विधानांशी युद्धात आहे. पवित्र शास्त्र घोषित करते की मृतांना काहीच ठाऊक नाही, त्यांचे विचार

नाशवंत आहेत,; ह्या पृथ्वीवर जे काही घडले त्यांच्याशी त्यांचा काहीच संबंध नाही; पृथ्वीवर जे कोणी त्यांना अतिप्रिय आहेत त्यांचे सुख किंवा दुख ह्याबद्दल काहीच त्यांना माहित नसते. [उपदेशक ९:५].

**(१०) अध्यात्माची बाब किती गंभीर आहे हे प्रगट करण्यासाठी, जे लोक सहभागी झाले त्यांच्यासाठी देवाने कोणती शिक्षा सुनावली?**

***‘कोणी पंचाक्षरी अथवा चेटूक करणारा असला, मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो, त्यांना अवश्य जिवे मारावे, त्यांना दगडमार करावा; त्यांच्या रक्तपाताची जबाबदारी त्यांच्याच माथी राहील. “(लेवीय २०:२७)***

ह्यापुढे, निवर्तलेल्या आत्म्यांशी कोणत्याही प्रकारचे संभाषण जे लोक करण्याचा प्रयत्न करतात त्याला देवाने निषिद्ध केले आहे. इब्रींच्या दिवसात एक वर्ग होता जो सदैव असे सिद्ध करायचा, जसे आजचे अध्यात्म गाजवणारे लोक करतात, की त्यांनी मृत लोकांशी संभाषण छेडले आहे. पण हे “प्रचलित आत्मे,” दुसऱ्या जगातील ह्या भेट देणाऱ्या लोकांना तसे म्हणण्यात येते, पवित्र शास्त्र त्यांना “सैतानाचे आत्मे” म्हणून लेखतात. (गणना २५:१-३; स्तोत्रसहिता १०६:२८; १ करिंथकरास पत्र १०:२०; प्रगटीकरण १६:१४ ह्या वचनांची तुलना करा)

प्रचलित आत्म्यांना हाताळण्याचे कार्य प्रभूसाठी एक अमंगळ कृत्य म्हणून घोषित करण्यात आले, आणि मृत्युच्या शिक्षेच्या अधीन त्याला निषिद्ध करण्यात आले. जादूटोणा हे नाव घेणे आता दोषी म्हणून लेखले जाते. जे लोक असे मत सिद्ध करतात की दुष्ट शक्तींच्या सोबत संबंध ठेवता येतो त्याला आता

अंधकाराच्या युगाची एक दंतकथा म्हणून लेखण्यात येते. पण अध्यात्म, जे परिवर्तीत लोकांना शंभर अथवा हजार असे लेखते, होय लाखोंनी, ज्यांनी आपला मार्ग वैज्ञानिक वर्तुळात पसरवला आहे, ज्यांनी मंडळयांमध्ये घुसखोरी केली आहे, आणि कायद्याच्या संस्थेत त्यांना ती मर्जी मिळाली आहे, राजांच्या दरबारात देखील – ही बलाढ्य फसवणूक एक संजीवन मात्र बनते, नवीन स्वरूपाने वेषांतर करून, जो जादूटोणा दोषी आणि निषिद्ध अनेक काळापासून तसा लेखले जात होता.

अध्यात्माच्या खर्या चारित्र्याच्या जर दुसरा काही पुरावा मिळाला नाही तर, ख्रिस्ती व्यक्तीसाठी हे पुरेसे आहे की आत्मे हे धार्मिकता आणि पाप ह्यात काहीच फरक करत नाहीत, ख्रिस्ताच्या सर्वात उदार आणि शुद्ध प्रेशितांमध्ये आणि सैतानाच्या सर्वात भ्रष्ट सेवकांमध्ये देखील फरक करत नाही. जसे स्वर्गात आहे तसे ह्या लोकांना प्रस्तुत करून, आणि त्या ठिकाणी त्यांना सर्वात उच्च स्थान देऊन, सैतान जगाला म्हणतो : “तुम्ही कितीही दुष्ट असला तरीही; देव आणि पवित्र शास्त्र ह्यावर तुम्ही विश्वास ठेवला किंवा नाही. तुम्हाला पाहिजे तसे जगा; स्वर्ग हे तुमचे घर आहे.” अध्यात्म गाजवणारे शिक्षक अगदी प्रत्यक्ष हे घोषित करतात : “‘प्रत्येक दुष्कर्मी इसम परमेश्वराच्या दृष्टीने चांगला आहे व तो त्याच्यासंबंधाने संतुष्ट असतो, नाहीतर न्याय करणारा देव आहे कुठे?’ मलाखी २:१७. देवाचे वचन म्हणते: “जे वाइटाला बरे व बऱ्याला वाईट म्हणतात, जे प्रकाशाला अंधकार व अंधकाराला प्रकाश समजतात.” यशया ५:२०.

**(११) अध्यात्माच्या बाबतीत पवित्र शास्त्र अ एकमेव सल्ला मसलत करण्याचा विसंबून राहता येण्यासारखा स्रोत आहे?**

*तू त्यांना सत्यात समर्पित कर; तुझे वचन हेच सत्य आहे. (योहान १७:१७)*

त्या लबाड बोलणाऱ्या आत्म्यांनी भासवले तसे, हे प्रेषित म्हणून, पृथ्वीवर असताना जेव्हा पवित्र आत्म्याने त्यांना सूचना केल्या त्याच्या गडी विरुद्ध ते करतात. पवित्र शास्त्राच्या दैवी उगमाला ते नाकारतात, ख्रिस्ती व्यक्तीच्या आशेचा आधारस्तंभ ते फाडून टाकतात आणि स्वर्गाकडे जाण्याचा जो मार्ग आहे तो प्रकाश ते विझवून टाकतात. सैतान जगाला ह्यावर विश्वास ठेवण्यास भाग पाडत आहे की पवित्र शास्त्र म्हणजे एक काल्पनिक वस्तू आहे, किंवा एक पुस्तक जे लोकांच्या जातीसाठी एक सुरुवातीला वाचण्याचे साधन, पण आता त्याला सहज लेखून , कालबाह्य म्हणून वेगळे केले जाते.

देवाच्या वचनाची जागा घेण्यासाठी तो आपले अध्यात्मिक प्रदर्शने घेतो. ह्या ठिकाणी एक प्रवाह आहे जो पूर्णपणे त्याच्या नियंत्रणात आहे; ह्या माध्यमाने जो जगाला ह्या गोष्टींवर विश्वास ठेवण्यास भाग पाडेल. ज्या पुस्तकाने त्याचा आणि त्याच्या अनुयायांचा न्याय केला त्याने त्याला पुसट असे बनवले, केवळ जिकडे त्याला ते पाहिजे; जगाचा तारणारा केवळ एक सामान्य मनुष्य आहे असे चित्र त्यांना मांडले आहे. आणि ज्या रीतीने रोमी शिपायाने येशूच्या कबरेकडे पाहिले जो खोटा अहवाल पसरवत होते जो याजक आणि वडील ह्यांनी त्यांच्या मुखात त्याचे पुनरुत्थान सिद्ध न करण्यासाठी टाकले, त्याच प्रमाणे विश्वास्णारे देखील अध्यात्मिक प्रदर्शन करून असे भासवण्याचा प्रयत्न करतात की आपल्या तारणाऱ्याच्या जीवनातील परिस्थितीत काहीच असे चमत्कारिक नाही. ह्या रीतीने येशूला पार्श्वभूमीत ठेऊन, ते स्वतःच्या चमत्कारांकडे

लक्ष वेधून घेतात, आणि घोषणा देतात की हे चमत्कार तर ख्रिस्ताच्या कार्याच्या पुढे आहेत.

**(१२) अध्यात्म कोणत्या सामर्थ्याच्या स्रोताला सिद्ध करते?**

*त्या नगरात जादूगिरी करून शोमरोनी लोकांना थक्क करणारा असा शिमोन नावाचा एक माणूस होता, आणि आपण कोणीतरी मोठे आहोत असे तो दाखवत असे. लहानापासून थोरापर्यंत सर्व जण त्याचे लक्षपूर्वक ऐकत व म्हणत की, "जिला देवाची महाशक्ती म्हणतात ती हा आहे."(प्रेषित ८:९-१०)*

हे तितकेच खरे आहे की अध्यात्म आता त्याचे स्वरूप बदलत आहे, आणि त्याच्या विरोध घेऊ शकणाऱ्या घटकांवर पडदा टाकत, एक ख्रिस्ती वेषांतर गृहीत धरतात. पण त्यामधून जे काही बोलले जाते व्यासपीठ आणि प्रसारमाध्यमातून हे जनतेसमोर अनेक वर्ष उघड आहे, आणि ह्यामध्ये त्याचे खरे चारित्र्य प्रगट होते. ह्या शिकवणी नाकारता येत नाहीत अथवा लपवता येत नाहीत

त्याच्या वर्तमान स्वरुपात देखील, आधी होते त्यापेक्षा अधिक जास्त सहन करण्यास पात्र, ते अत्यंत धोकादायक आहे, कारण ही फसवणूक अत्यंत धूर्त अशी आहे. त्याने ख्रिस्त आणि पवित्र शास्त्र ह्याचा आधी त्याग केल्याने, आता दोन्हींचा स्वीकार करण्याचे ते भासवतात. पुनरुज्जीवन न झालेल्या हृदयासाठी संतोषकारक असे पवित्र शास्त्र प्रस्तुत करण्यात येते, त्यातील महत्वाचे आणि सार्वभौम सत्य हे कमी प्रभावाचे आणि परिणामाचे बनतात.

देवाचा मुख्य गुणविशेष म्हणजे प्रेम ह्याकडे पाहिले जाते, पण तसेच ती एक दुर्बल संवेदना

आहे असे देखील लेखले जाते, आणि ह्यामुळे चांगले आणि वाईट ह्यात खूप कमी फरक केला जातो.देवाचा न्याय, त्याने पापाचा नकार अथवा त्याग करणे, त्याच्या पवित्र शास्त्रीय नियमांच्या आवश्यकता, ह्या सर्व नजरेच्या आड ठेवल्या जातात. दहा आज्ञा एक मृतावस्थेत असलेले पत्र आहे असे लोकांना शिकवण्यात येते. आनंदी, त्रासदायक दंतकथा सर्व संवेदना बंद करून ठेवतात आणि लोकांना पवित्र शास्त्र त्यांच्या विश्वासाचा पाया आहे हे नाकारण्यास उद्युक्त करतात. आधी होते त्याप्रमाणे ख्रिस्ताला नाकारण्यात येते; पण सैतानाने लोकांच्या डोळ्यांवर ती पट्टी बांधली आहे की ती एक फसवणूक आहे हे लोक ओळखत नाहीत.

**(१३) फसवणुकीपासून आपले सौरक्षण व्हावे म्हणून शास्त्रवचन आपल्याला कोणता आदेश किंवा नियमावली देते?**

*तू सत्याच्या वचनाची योग्य विभागणी करून नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेही कारण नसलेला, देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी, असा स्वत:ला सादर करण्यास होईल तितके कर. (२ तीमथी २:१५)*

काही लोक असे आहेत की त्यांना अध्यात्माच्या फसवणाऱ्या सामर्थ्याची आणि त्याच्या प्रभावाखाली येण्याचा धोका ह्याविषयी काहीही समजूत आहे. अनेक लोक त्याच्याशी खेळतात केवळ त्यांचे कुतूहल असते म्हणून. त्यांचा त्यावर खरा विश्वास नसतो आणि त्या आत्म्याच्या ताब्यात येण्याच्या धोक्याबद्दल विचार करता त्यांचे मन भयभीत होते. पण ह्या निषिद्ध भूमीवर ते जातात, आणि त्यांच्या इच्छेच्या विरुद्ध महान नाश करणारा त्याचे सामर्थ्य अमलात आणतो. त्यांना एकदा

तरी त्याने सांगितलेल्या दिशेत आपली मने समर्पित करण्यास प्रेरणा मिळावी, आणि तो त्यांना बंदिवासात ठेवतो. त्यांच्या सामर्थ्याने, ते अशक्य आहे, ह्या हयंकर, भुरळ टाकणाऱ्या सापळयातून स्वतःला सोडवणे. प्रामाणिक प्रार्थनेचे उत्तर म्हणून, देव जे आपले सामर्थ्य देतो, त्यानेच हे अडकलेले जीवात्मे सोडवले जाऊ शकतात.

**(१४) कोणत्याही ज्ञात पापात सहभागी होण्याचा परिणाम काय आहे?**

***तर तुमचे अपराध तुम्ही व तुमचा देव ह्यांच्यामध्ये आडभिंतीप्रमाणे झाले आहेत; तुमच्या पातकांमुळे तो तुम्हांला दर्शन देत नाही, तुमचे ऐकत नाही. (यशया ५९:२)***

जे सर्व आपल्या चारित्र्यात हे पापी गुण समाविष्ट करतात, किंवा स्वेच्छेने एक ज्ञात पाप कवटाळत बसतात, ते सैतानाच्या मोहांना आमंत्रण देतात. ते स्वतःला देवापासून आणि त्याच्या रक्षण करणाऱ्या देवदुतांपासून विभक्त करतात; दुष्ट सैतान त्याच्या सर्व लबाडी समोर आणतो, त्याचा प्रतिकार करता येत नाही आणि सहजपणे ते त्यास भक्ष होतात. जे लोक अशा रीतीने स्वतःला त्याच्या सामर्थ्याच्या अधीन सोपवतात त्यांना क्वचितच ह्याची जाणीव होते की आपला शेवट कोठे होणार. त्यांचा नाश पाहता, मोहात टाकणारा आता ह्यांचा उपयोग इतरांवर भुरळ टाकण्यासाठी करतो.

**(१५) अनेक लोक “कडक किंवा शक्तिशाली भ्रमांवर” का विश्वास ठेवतील?**

***ज्यांचा नाश होत चालला आहे त्यांनी आपले तारण साधावे म्हणून सत्याची आवड धरायची***

*ती धरली नाही; त्यामुळे त्यांच्यासाठी सैतानाच्या कृतीप्रमाणे सर्व प्रकारची खोटी महत्कृत्ये, चिन्हे, अद्‌भुते आणि सर्व प्रकारचे अनीतिजनक कपट ह्यांनी युक्त असे त्या अनीतिमानाचे येणे होईल. त्यांनी असत्यावर विश्वास ठेवावा म्हणून देव त्यांच्या ठायी भ्रांतीचे कार्य चालेल असे करतो, (२ थेसलोनिकरास २:१०-११ )*

यशया संदेष्टा म्हणतो: “ते तुम्हांला म्हणतील, “भूतवैद्यांना व छांछू करणाऱ्या मांत्रिकांना विचारायला जा;” तेव्हा म्हणा, लोकांनी आपल्या देवाला विचारू नये काय? जिवंतांसाठी मेलेल्यांना विचारावे काय? नियमशास्त्र व साक्ष ह्यांकडे पाहा! ह्याप्रमाणे ते न बोलल्यास त्यांच्यासाठी निश्‍चये प्रभातसमय नाही.” यशया ८:१९,२०.

मनुष्याचा स्वभाव आणि मृतांची परिस्थिती ह्या संबंधी शास्त्रवचनात जे सत्य आहे त्यावर जर लोकांनी सहज विश्वास ठेवण्याचे निवडले असते तर, अध्यात्माच्या सिद्धतेत आणि प्रदर्शनात त्यांना चिन्हे चमत्कार आणि अद्‌भुते ह्यांनी सैतानाचे कार्य पाहिले असते.

पण त्यापेक्षा ते स्वातंत्र्य इतक्या सहज आणि सोप्या रीतीने दैहिक हृदयाकडे शरण देण्याच्या ऐवजी, आणि ज्या पापांवर त्यांचे प्रेम आहे त्याचा त्याग करत, जमाव जो आहे त्या प्रकाशाकडे कानाडोळा करतो आणि सरळ चालत जातो, इशारे कितीही आले तरीही, आणि तयच वेळी सैतान त्यांच्याभोवती ते जाळे विणत जातो, आणि ते लोक सहज त्याचे भक्ष्य बनतात. “कारण सत्याचे प्रेम त्यांनी स्वीकारले नाही म्हणून,

की जेणेकरून त्यांचे तारण व्हावे,” म्हणूनच “देव अधिक तीव्र भ्रम त्यांच्यात पाठवेल, की त्यांनी लबाडीवर विश्वास ठेवावा.”

**(१६) जेव्हा आपण देवाच्या वचनाच्या सत्यावर उभे असतो आपण कोणाचे विरोध करत असतो?**

***कारण माझी खातरी आहे की, मरण, जीवन, देवदूत, अधिपती, वर्तमानकाळच्या गोष्टी, भविष्यकाळच्या गोष्टी, बले, उंची, खोली, किंवा दुसरी कोणतीही सृष्ट वस्तू, ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची आपल्यावरील जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करायला समर्थ होणार नाही. (रोमकरास पत्र ८:३८-३९)***

जे लोक अध्यात्माच्या शिकवणींचा विरोध करतात ते तर केवळ लोक नाही, तर सैतान आणि त्याचे दूत ह्यांचा विरोध करत आहेत. ते सर्व एका स्पर्धेत प्रवेश करतात आणि ही उच्च स्थानी असलेल्या दुष्ट शक्ती आणि अंधकाराच्या सत्ता ह्यांच्या विरुद्ध आहे. सैतान तर एक इंच भूमी देखील त्यांना देणार नाही केवळ तेव्हा जेव्हा ते ह्या स्वर्गीय दूतांच्या सामर्थ्याने मागे खेचले जातात. देवाच्या लोकांनी, आपल्या तारणार्याने जसे केले, तसे त्याची ह्या शब्दांनी भेट घ्यावी: “असे लिहून ठेवलेले आहे.” आता ख्रिस्ताच्या दिवसात आहे तसे सैतान शास्त्रवचन बोलून दाखवू शकतो, आणि मग त्याचे भ्रम कसे खरे आहेत हे सिद्ध करण्यासाठी त्याच्या शिकवणी बदलू शकतो. जे लोक नाशाच्या काळात टिकाव धरून राहतील त्यांनी स्वतःसाठी शास्त्रवचनाच्या साक्षी ह्या जाणून घेतल्या पाहिजेत.

**(१७) जे दुष्ट आत्मे मृत व्यक्तींचे रूप घेऊन येतात आणि अशांशी आपला सामना झाला, तर त्या फसवणुकीपासून कोणते सत्य आपले सौरक्षण करेल?**

*आपल्याला मरायचे आहे हे जिवंतांना निदान कळत असते; पण मेलेल्यांना तर काहीच कळत नाही; त्यांना आणखी काही फलप्राप्ती होणार नसते; त्यांचे स्मरण कोणाला राहत नाही. (उपदेशक ९:५)*

अनेक लोक अशा रीतीने सैतानाच्या आत्म्यांशी सामना करतील जे प्रिय व्यक्ती किंवा मित्र ह्यांचे स्वरुप घेऊन येऊन सर्वात धोकादायक पाखंडाची घोषणा करतात. हे भेट देणारे लोक आपल्या सर्वात सौम्य सहानुभूतीशी आर्जव करतील आणि त्यांच्या मताला राखण्यासाठी चमत्कार घडवून आणतील. पवित्र शास्त्रातल सत्य घेऊन त्यांचा टिकाव आपल्याला करता आला पाहिजे की मृतांना काहीच ठाऊक नाही आणि म्हणूनच जे लोक असे दर्शन देतात ते तर सैतानाचे दुष्ट आत्मे आहेत.

**(१८) जर आपण देवाच्या वचनाचे अनुसरण केले, मग आपल्या “परीक्षेच्या काळात” आपण कोणते महान अभिवचन सिद्ध करू शकतो?**

*धीराविषयीचे माझे वचन तू राखले आहेस म्हणून पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांची परीक्षा होण्याचा जो परीक्षाप्रसंग सर्व जगावर येणार आहे, त्यापासूनही मी तुला राखीन. (प्रगटीकरण ३:१०)*

आपल्यासमोर हा “परीक्षेचा काळ आहे, जो सर्व जगावर येणार आहे, जे पृथ्वीवर

राहतात त्याद्वारे त्या सर्वांची परीक्षा होणार आहे.” ज्या सर्वांचा विश्वास दृढ रीतीने देवाच्या वचनावर स्थित नाही ते फसवले जातील आणि त्यांच्यावर विजय मिळवण्यात येईल. सैतान “अनीतिमान लोकांच्या सर्व फसवणाऱ्या भूमिकेने कार्य करतो ” मनुष्यांच्या संतानावर नियंत्रण ठेवण्यास, आणि त्याच्या लबाडी सतत वाढत राहतात. पण जसे लोक स्वेच्छेने त्याच्या मोहाला बळी पडतात तेव्हाच त्याला त्याचे साधन मिळते.

जे लोक सत्याचे ज्ञान मिळण्यासाठी व्याकूळ आहेत, आणि स्वतःचे जीवात्मे आज्ञापालन करून शुद्ध करण्यास झटत आहेत, आणि ह्याद्वारे त्या लढाईसाठी स्वतःची तयारी करत आहेत, त्यानं सत्यपूर्ण देवामध्ये, निश्चित तो आश्रय मिळेल. “तू माझा संयमाने शब्द राखला म्हणून, मी देखील तुला राखणार”, हे तारणार्याचे अभिवचन आहे. लवकरच तो स्वर्गातून प्रत्येक दुताला पाठवेल जेणेकरून त्याच्या लोकांचे सौरक्षण होईल आणि त्यामुळे असा एक जीवात्मा सोडेल जी त्यावर विश्वास ठेवणार आणि सैतान त्यावर विजय मिळवणार.

**(१९) कोणत्याही प्रकारे सत्य शोधल्याशिवाय आणि स्वतःसाठी त्याचा स्वीकार केल्याशिवाय सामान्य विश्वासाला आंधळयाप्रमाणे स्वीकारण्यात काय धोका आहे?**

*ज्ञानाच्या अभावी माझ्या लोकांचा नाश झाला आहे .तू ज्ञानाचा अव्हेर केलास म्हणून मीही तुझा अव्हेर करीन; म्हणजे अर्थात मी याजकाचे काम तुला करू देणार नाही; तू आपल्या देवाचे नियमशास्त्र विसरलास म्हणून मीही तुझ्या मुलांना विसरेन. (होशेय ४:६)*

दुष्ट लोकांवर जी भयास्पद फसवणूक गुदरणार आहे ती यशया संदेष्टा समोर आणतो, देवाच्या न्यायापासून स्वतःला तो सुरक्षित असे लेखतो: “तुम्ही म्हणता, “आम्ही मृत्यूबरोबर करार केला आहे, अधोलोकाबरोबर संकेत केला आहे; संकटाचा लोट येईल तेव्हा तो आमच्यावर येणार नाही, कारण आम्ही लबाडीचा आश्रय केला आहे व कपटाखाली दडून राहिलो आहोत.” यशया २८:१५. ह्या वर्गात अशा लोकांचे वर्णन आहे जे हटवादी होऊन पश्चाताप करत नाहीत आणि स्वतःला असे आश्वासन देऊन सांत्वन करतात की पापी व्यक्तीसाठी कोणतीही शिक्षा नाही; की सर्व मानवजात, मग ती किती भ्रष्ट असो, त्याचा काहीच फरक पडत नाही, त्यांना स्वर्गापर्यंत उंचावण्याची गरज आहे, आणि देवाचे देवदूत म्हणून त्यांनी बनले पाहिजे. पण तरीही हे लोक अत्यंत भर देऊन मृत्युसोबत तो करार करत आहेत आणि तसाच नरकाच्या सोबत, जे लोक त्या सत्यांचा त्याग करतात जे स्वर्गाने नीतिमान लोकांसाठी संकटाच्या दिवसासाठी आश्रय म्हणून दिली आहेत, त्या ऐवजी सैतान ज्या लबाडीचे कारण देतो त्याचा स्वीकार करतात- ही तर अध्यात्माचे भ्रमात टाकणारे खोटे दावे असतात.

**(२०) त्या बागेत असताना सैतानाने कोणती लबाडी केली जी सर्व अध्यात्मासाठी आधार आहे?**

*सर्प स्त्रीला म्हणाला, “तुम्ही खरोखर मरणार नाही. (उत्पत्ती ३:४)*

सैतान खूप काळापासून जगाला फसवण्याच्या प्रयत्नाची तयारी करत आहे. त्याच्या कामाचा पाया एदेन बागेत हवेला जे आश्वासन देण्यात आले त्यात दिसतो: “तू

निश्चित मरणार नाही.” “ज्या दिवशी तू त्याचे फळ खाशील, तुझे डोळे उघडतील, आणि तुम्ही, बरे वाईट जाणून घेणारे, देवासारखे व्हाल.” थोड्या प्रमाणावर त्याने अध्यात्माच्या विकासात स्वतःच्या फसवणुकीच्या उत्कृष्ट कलाकृतीसाठी मार्ग तयार केला आहे.

त्याने अजूनही त्याच्या सर्व कल्पना सिद्ध केलेल्या नाहीत; पण शेवटल्या उरलेल्या काळात ते सिद्ध होईल. संदेष्टा म्हणतो: “नंतर ‘बेडकासारखे’ असलेले तीन अशुद्ध आत्मे अजगराच्या तोंडातून, श्वापदाच्या तोंडातून व खोट्या संदेष्ट्याच्या तोंडातून निघताना मी पाहिले. ते चिन्हे दाखवणारे भुतांचे आत्मे आहेत; ते सर्वसमर्थ देवाच्या त्या मोठ्या दिवसाच्या लढाईसाठी संपूर्ण जगातील राजांना एकत्र करण्यास त्यांच्याकडे बाहेर जातात.” प्रगटीकरण १६:१३,१४. केवळ जे लोक देवाच्या सामर्थ्याने राखले जातात, त्याच्या वचनावर विश्वास ठेवल्याने, संपूर्ण जग ह्या भ्रमाच्या अधीन खेचले जाईल. लोक तर ह्या घातकी सुरक्षेत खेचले जात आहेत, आणि केवळ देवाच्या क्रोधानेच ते जागे होऊ शकतात.

**(२१) जेव्हा ह्या महान वादविवादाची समाप्ती होईल तेव्हा सैतानाच्या “लबाडीच्या अश्रायाचे” काय होईल?**

*न्याय ही दोरी व नीतिमत्ता हा ओळंबा असे मी करीन; लबाडीचा आश्रय गारांनी वाहून जाईल, व दडण्याची जागा जलाचे ओघ बुडवून टाकतील. (यशया २८:१७)*

***माझ्या अभ्यासाने मला जाणीव आहे की शेवटल्या काळात दुष्टाचा नायक आपल्या मनावर त्याचा जादूच्या प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करेल की जिवंत आणि मृत लोकांमध्ये अजूनही संभाषण होते.***

गोल करा :     होय     अनिश्चित

सैतानाच्या दोन मोठ्या लबाडी देवाने उघडकीस आणल्या म्हणून मी त्याचे आभारी आहे- जीवात्म्याचे अमरत्व, आणि मृत्यूमध्ये ती जाणीव, जेणेकरून त्याच्या वचनाने मी फसवला जाऊ नये.

गोल करा :     होय     अनिश्चित

देवाच्या वचनाचा अभ्यास किती महत्वाचा आहे हे मी पाहतो. मला सत्य प्रगट व्हावे म्हणून देवाच्या अभिवचनाला मी सिद्ध करतो मी त्याचा शोध करत राहतो त्यानुसार की सैतानाच्या फसवणुकीना मी भक्ष्य होऊ नये.

गोल करा :     होय     अनिश्चित

मला जाणीव आहे की पवित्र शास्त्र आपल्याला त्या शेवटल्या नाशवंत समयाची सूचना देईल ज्याचा अनुभव पृथ्वीच्या इतिहासात शेवटी आपल्याला येईल आणि त्या अभिवचना साठी मी इतकी आभारी आहे की जर मी त्याचे वचन पाळले तो माझे रक्षण करेल. त्याच्या सामर्थ्याने सनातन जीवनाचे अभिवचन मला प्राप्त होईल.

गोल करा :     होय     अनिश्चित

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________



# धडा ७
# जवळ येऊन ठेपलेला संघर्ष

**(१) देवाच्या एक देखील नियमशास्त्राचे उल्लंघन केले तर त्याचे परिणाम काय आहेत?**

***कारण जो कोणी संपूर्ण नियमशास्त्र पाळून एका नियमाविषयी चुकतो तो सर्वांविषयी दोषी होतो. (याकोब २:१०)***

स्वर्गातील महान वादविवादाच्या अगदी सुरुवातीपासून देवाचे नियमशास्त्र दूर लोटणे हा सैतानाचा हेतू होता. हे सिद्ध करण्यासाठी त्याने निर्माणकर्त्याच्या विरोधात बंड केला, आणि जरी स्वर्गातून त्याला हद्दपार केले तरीही पृथ्वीवर तो हे युद्ध चालूच ठेवतो. लोकांना फसवणे, आणि त्याद्वारे त्यांनी देवाच्या नियमशास्त्राचे उल्लंघन करावे, ते साधन आहे ज्याचा पाठलाग त्याने अढळपणे केला आहे. नियमशास्त्र पूर्णपणे बाजूला ठेवण्याने हे सिद्ध करणे किंवा, त्या पैकी नियमाचा नकार

करणे, परिणाम शेवटी सारखाच असणार. जो कोणी "एका बाबतीत," दुखावतो तो संपूर्ण नियमशास्त्राच्या प्रती तिरस्कार दाखवतो; त्याचा प्रभाव आणि उदाहरण हे अधर्माच्या बाजूंनी आहेत; तो "सर्वांचा दोषी बनतो."

**(२) देवाच्या नियमशास्त्रांना खाली खेचण्यात सैतानाचा हेतू काय आहे?**

***तर मग आपण काय म्हणावे? नियमशास्त्र पाप आहे? कधीच नाही !तरीही पापाची ओळख मला नियमशास्त्रावाचून कशानेच झाली नसती. "लोभ धरू नकोस," असे नियमशास्त्रात सांगितले नसते तर मला लोभाचे ज्ञान झाले नसते." (रोमकरास पत्र ७:७)***

दैवी नियमांचा तिरस्कार करण्याचे पाहता, सैतानाने पवित्र शास्त्राचे सिद्धांत बदलले आहेत, आणि जे हजारो लोक शास्त्रवचनावर विश्वास ठेवण्याचे सिद्ध करतात त्यांच्या विश्वासात ह्या गोष्टी चूक म्हणून सामावल्या गेल्या आहेत. सत्य आणि चूक ह्यामधील शेवटला महान वाद म्हणजे खूप काळापासून देवाच्या नियमशास्त्राच्या बद्दल चालत आलेला वाद ह्याविषयी अंतिम संघर्ष आहे. ह्या संघर्षात आपण आता प्रवेश करत आहोत- हे युद्ध मनुष्यांचे नियम आणि यहोवाचे नियमशास्त्र ह्यांच्यात आहेत, पवित्र शास्त्राचा धर्म आणि दंतकथा व परंपरा ह्यांचा धर्म.

**(३) देवाचे वचन आणि त्यातील नियमशास्त्र ह्यांचा हेतू किंवा उद्देश काय आहे?**

*तुझे वचन माझ्या पावलांसाठी दिव्यासारखे व माझ्या मार्गावर प्रकाशासारखे आहे.(स्तोत्रसहिता ११९:१०५)*

सत्य आणि नितीमत्व ह्यांच्या विरोधात जे मध्यम एकत्र येतील ह्या स्पर्धेत ते आधीच कार्यशील आहेत. देवाचे पवित्र वचन, जे आपल्याला यातना आणि रक्ताचे अर्पण इतके मोल देऊन देण्यात आले आहे, त्याचे मोल मात्र कमी करण्यात येते. पवित्र शास्त्र हे सर्वांसाठी आहे, पण खूप कमी लोक त्याला जीवनाची मार्गदर्शिका म्हणून स्वीकारतात आणि ग्रहण करतात.

**(४) बेईमानीचे मूळ कारण काय आहे?**

***शहाणे लज्जित होतात, त्यांची त्रेधा उडून ते पकडले जातात; पाहा, परमेश्वराचे वचन ते धिक्कारतात; त्यांच्यात शहाणपण कोठचे असणार! (यिर्मया ८:९)***

बेईमानी खूप मोठ्या प्रमाणावर दिसून येते, केवळ जगातच नाही, पण मंडळीमध्ये देखील. अनेकांनी हे सिद्धांत नाकारले जे ख्रिस्ती विश्वासाचे आधारस्तंभ आहेत. प्रेरित लेखकांनी जशा निर्मितीच्या महान वास्तविकता प्रस्तुत केल्या, मनुष्याचे पतन, भरपाई, देवाच्या नियमशास्त्राच्या शाश्वतेबद्दल, ते तर अंशतः किंवा पूर्णपणे, ख्रिस्ती म्हणवणाऱ्या जगाच्या मोठ्या प्रमाणावर लोकांनी प्रत्यक्ष नाकारण्यात येतात.

हजोर लोक जे स्वतःच्या सुज्ञान आणि स्वातंत्र्य ह्यावर गर्व करतात पवित्र शास्त्रावर पूर्णपणे भरवसा ठेवणे म्हणजे दुर्बलता आहे असे लेखतात; ते विचार करतात की उच्चकोटीचे कलागुण ह्याचा हा एक पुरावा आहे आणि

शास्त्रवचने शिकत असताना आणि अध्यात्माच्या द्वारे ते अनेक महत्वाच्या सत्यांचे स्पष्टीकरण देतात.

अनेक सेवक त्यांच्या लोकांना शिकवत आहेत, अनेक प्राध्यापक आणि शिक्षक त्याच्या विद्यार्थ्यांना सूचना देत आहेत, की देवाचे नियमशास्त्र हे बदलले किंवा रद्द झाले आहे; आणि जे लोक त्यातील अटींना रास्त म्हणून लेखतात, की प्रत्यक्ष रीतीने लोकांनी त्याचे आज्ञापालन करावे, त्यांच्या वाटेला केवळ धिक्कार अथवा तिरस्कार येणे योग्य आहे.

**(५) सत्याला नाकारण्यात काय धोका आहे?**

***... मी ह्यासाठी जन्मलो आहे व ह्यासाठी जगात आलो आहे की, मी सत्याविषयी साक्ष द्यावी .जो कोणी सत्याचा आहे तो माझी वाणी ऐकतो". (योहान १८:३७)***

सत्याला नाकारण्यात, लोक त्याच्या लेखकाला देखील नाकारतात. देवाच्या नियमशास्त्राचे उल्लंघन करताना, नियमशास्त्राच्या दात्याचा अधिकार ते नाकारतात. ज्या रीतीने लाकूड किंवा दगडाची मूर्ती बनते तसेच खोटे सिद्धांत आणि मतप्रणाली ह्यांची मूर्ती देखील बनवणे सोपे आहे. देवाच्या गुणांचे चुकीचे दर्शक म्हणून, सैतान त्यांच्याबद्दल खोटे चारित्र्य असल्याचे भासवतो.

अनेकांच्या बाबतीत, यहोवाच्या जागी एक तत्वज्ञानी मूर्ती असते; आणि जिवंत देव, जसे त्याच्या वचनात प्रगट होतो, ख्रिस्तामध्ये, आणि निर्मितीच्या कार्यात, खूप किमी लोक त्याची उपासना करतात. अनेक लोक निसर्गाला दैवत म्हणून लेखतात आणि त्याच वेळी निसर्गाच्या देवाला मात्र नाकारतात. जरी विभिन्न

स्वरूपाने, ख्रिस्ती जगात आज ही मूर्तीपूजा अस्तित्वात आहे ज्या रीतीने अगदी खचित एलीयाच्या दिवसांमध्ये प्राचीन इस्राएल मध्ये ती अस्तित्वात होती.

सुज्ञानी भासवणाऱ्या अनेक लोकांचा देव, तत्त्वज्ञानांचा, कवी, राजकीय पुढारी, पत्रकार- समजतील उच्चभ्रू लोकांच्या वर्तुळाचा देव, अनेक महाविद्यालय आणि विद्यापीठे, अगदी काही धर्मशास्त्रीय संस्थांचा- बाल पेक्षा थोडा अधिक चांगला आहे, फिनीशियाचा सूर्य-दैवत.

## (६) देवाचे नियमशास्त्र किती काळ प्रभावी राहणार?

*तुझे वचन संपूर्णपणे सत्य आहे; तुझे सर्व न्याय्य निर्णय सनातन आहेत. (स्तोत्रसहिता ११९:१६०)*

ख्रिस्ती जगणे स्वीकारलेली इतर कोणतीही चूक स्वर्गाच्या अधिकाराच्या विरुद्ध हल्ला करत नाही, कोणतीही तर्कबुद्धीच्या विरुद्ध नाही, इतर कोणतीही आधुनिक सिद्धांताच्या पेक्षा परिणामात हानिकारक नाही, इतक्या जलद रीतीने मूळ धरते, की देवाचे नियमशास्त्र आता मनुष्यांसाठी लादले जात नाही. प्रत्येक राष्ट्राचे नियम असतात, ज्यात सन्मान आणि आज्ञापालन ह्यांची अपेक्षा असते; कोणतेही सरकार त्यांच्याशिवाय अस्तित्वात नाही; आणि असे दिसते की स्वर्ग आणि पृथ्वीचा निर्माणकर्ता ह्याचा त्याने बनवलेल्या सृष्टीवर अधिकार चालवण्यासाठी कोणतेच नियमशास्त्र नाही?

असे गृहीत धरले की प्रख्यात सेवकांनी जाहीरपणे शिकवावे की जे नियमशास्त्र त्यांच्या भूमीवर सत्ता गाजवतात आणि त्यातील नागरिकांचे अधिकार सुरक्षित ठेवतात ते काही

बंधनकारक नव्हते—त्यांनी लोकांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणल्या, आणि म्हणून त्याचे आज्ञापालन होऊ नये; किती काळ अशा लोकांना व्यासपीठावर सहन करण्यात येईल? पणसर्व सत्तेचा पाया म्हणजे जे नियमशास्त्र आहे त्याला तुच्छ लेखण्यापेक्षा राष्ट्रे आणि शहरे ह्यांच्या नियमांना अवमानने हा गंभीर आरोप आहे.

**(७) नियमशास्त्रहीनता काय आहे?**

***जो कोणी पाप करतो तो स्वैराचार करतो; कारण पाप स्वैराचार आहे. (१ योहान ३:४)***

राष्ट्रांनी त्यांचे नियमशास्त्र रद्द करावे, आणि पाहिजे तसे लोकांना वागू द्यावे, विश्वाच्या अधिपतीने त्याचे नियमशास्त्र रद्द करण्यापेक्षा, जगाला कोणत्याही दर्जाच्या शिवाय दोषी लोकांवर आरोप अथवा त्यांचे समर्थन करण्यास तसेच ठेवणे. देवाच्या नियमशास्त्राला आपण फोल ठरवण्याचा परिणाम जाणतो का? हा प्रयोग करून पाहण्यात आला आहे. फ्रांस मध्ये जेव्हा नास्तिकत्व सत्तेत होते तेव्हा त्या ठिकाणचे दृश्य देखील असे भयंकर होते. मग जगाला हे दाखवण्यात आले की ज्या मर्यादा देवाने लावून दिल्या आहेत त्यांना दूर लोटणे म्हणजे सर्वात क्रूर जुलूमशाहीचा स्वीकार करणे. जेव्हा नितीमत्वाचा दर्जा बाजूला ठेवण्यात येतो, पृथ्वीवर दुष्टाच्या नायकाने त्याचा अधिकार स्थापित करण्यासाठी मार्ग खुला होतो.

जिथे कोठे हे दैवी नियम नाकारण्यात येतात, पाप तसे पापी दिसणे किंवा नितीम्त्व प्रिय आहे असे दिसत नाही. जे लोक देवाच्या शासनाच्या अधीन होण्यास नाकारतात ते स्वतःवर सत्ता गाजवण्यासाठी अपात्र असतात.

त्यांच्या हानिकारक शिकवणींच्या द्वारे लहान मुले आणि तरुण ह्यांच्या हृदयात गौण असण्याचा आत्मा बिंबवला जातो , ज्यांना स्वाभाविकपणे नियंत्रणात ठेवता येत नाही; आणि एक नियमरहित, स्वैराचारी समाज जन्मास येतो. देवाच्या नियमांचे जे आज्ञापालन करतात त्यांच्या क्षमतेचा उपहास करताना, अनेक लोक सैतानाचे भ्रम आग्रहाने स्वीकारतात. ते सत्ता वासनेला देऊन त्या पापात पडतात ज्यामुळे विदेशी लोकांवर तितके न्याय प्रसंग गुदरले आहेत.

**(८) जेव्हा देवाचे नियमशास्त्र बाजूला ठेवण्यात येतात तेव्हा परिणामी आपल्याला कोणते पवित्र शास्त्राचे तत्व दिसते?**

***फसू नका; देवाचा उपहास व्हायचा नाही; कारण माणूस जे काही पेरतो त्याचेच त्याला पीक मिळेल. (गलतीकरास पत्र ६:७)***

जे लोक इतरांना देवाच्या आज्ञांना सहज लेखण्यास शिकवतात ते अवज्ञेची कापणी करण्यासाठी तशीच पेरणी करतात. दैवी नियमशास्त्राने जे बंधन ठेवले आहे त्याला संपूर्णपणे बाजूला करण्यात यावे, आणि लवकरच मानवी नियमांना कमी लेखण्यात यावे. देव अप्रामाणिक सवयी, लोभ, लबाडी निषिद्ध लेखतो म्हणून, लोक जगिक समृद्धीच्या विरुद्ध देवाचे नियम हे अडखळण म्हणून लगेच ठेचण्याचा प्रयत्न करतात; पण ह्या नियामंना रद्द करण्याचा परिणाम असे असेल ज्याची ते अपेक्षा करत नाहीत.

नियमशास्त्र जर बंधनकारक नसते, मग त्याचे उल्लंघन होण्याचे भय का असावे? मालमत्ता मग ह्यापुढे सुरक्षित नसती. लोक हिंसेने आपल्या शेजार्याची मालमत्ता घेतील,

आणि सर्वात बलवान लोक धनवान होतील. आयुष्याचा सन्मान होणार नाही. विवाहाचे विधी आणि शपथा ह्या कुटुंबाचे सौरक्षण म्हणून पवित्र लेखले जाणार नाही. ज्याच्याकडे ते सामर्थ्य होते, तो हिंसेने इच्छा असेल तर शेजाऱ्याची पत्नी घेऊ शकेल.

चौथी आज्ञा आहे तिच्यासोबत पाचवी देखील बाजूला सारण्यात येते. मुले देखील आपल्या आई वडिलांचा जीव घेण्यास मागे पुढे पाहणार नाही जर तसे करणे ही त्यांच्या भ्रष्ट हृदयाची इच्छा असेल. सुसंस्कृत जग हे चोर आणि खुनी ह्यांचा अड्डा बनेल; आणि पृथ्वीवरून शांती, विश्राम आणि आनंद हे हरपून जातील.

**(९) देवाच्या आज्ञांचे आज्ञापालन न केले तर कोणता आशीर्वाद गमावला जातो?**

***माझ्या मुला, माझे नियमशास्त्र विसरू नकोस, तुझ्या चित्तात माझ्या आज्ञा वागोत; कारण त्यांपासून दीर्घ आयुष्य, वयोवृद्धी व कल्याण ही तुला प्राप्त होतील. (नितीसुत्रे ३:१-२)***

देवाच्या नियमांच्या प्रती मनुष्यांना सोडवण्यात आले आहे हा सिद्धांत असल्यामुळे लोक त्यांच्या नैतिक जवाबदारीतून मोकळे झाले आणि जगावर अधर्माचे द्वार खुले झाले. नियमशास्त्र विरहितपणा, दूर लोटणे, आणि भ्रष्टाचार हे आपल्यावर येणाऱ्या महान लाटेप्रमाणे येत आहेत. कुटुंबात, सैतान कार्यरत आहे. त्याचा झेंडा फडकतो, तो देखील ख्रिस्ती म्हणवणार्या घरांमध्ये. त्या ठिकाणी हेवा, ढोंग, वाढती दुष्टाई, दुरावा, स्पर्धा, भांडण, विश्वासघात, आणि वासनेत गुरफटून जाणे हे आहेत. धार्मिक तत्वे आणि सिद्धांत ह्यांची संपूर्ण पद्धत , जी सामाजिक जीवनाचा आधारस्तंभ

आणि रचना बनते, ते तर कोलमडून जाण्याच्या मार्गांवर आहेत...

**(१०) जे लोक दुसऱ्या लोकांवर सत्ता गाजवतात त्यांना जेव्हा नियमरहितपणा नियंत्रित करतो तेव्हा काय होते?**

***नीतिनियमांचे उल्लंघन, परमेश्वराचा अव्हेर, आमच्या देवास अनुसरण्यास माघार घेणे, छलसूचक व असत्य भाषण करणे, लबाडी मनात योजून ती बोलून दाखवणे, ही ती आहेत. (यशया ५९:१३)***

न्यायाचे दरबार भ्रष्ट आहेत. अधिकारी देखील शारीरिक प्राप्ती आणि देहाच्या वासनेत अडकलेले आहेत. असंयम इतक्या लोकांच्या मनात भिनला आहे की सैतानाने जवळ जवळ त्यांचा पूर्ण ताबा घेतला आहे. न्यायाधीशांना विकत घेतले जाते, लाच दिली जाते आणि फसवण्यात येते. पेताडपणा आणि मौज करणे, कामेच्छा, हेवा, प्रत्येक प्रकारचा अप्रामाणिकपणा, हे जे लोक नियमशास्त्र शिकवतात त्यांच्यात प्रतिकात्मक स्वरुपात दिसतात. "न्याय तर दूरवर उभा आहे: सत्य हे रस्त्यावर पडलेले आहे, आणि त्यात समानता प्रवेश करू शकत नाही."

**(११) देवाच्या वचनावरील विश्वास जेव्हा हरपून जातो तेव्हा त्याचा परिणाम काय होतो?**

***त्यांचे मन कठीण झाले आहे; मी तर तुझ्या नियमशास्त्रात रमून गेलो आहे. (स्तोत्रसहिता ११९:७०)***

रोमच्या अखत्यारीत जो अधर्म आणि अध्यात्मिक अंधकार प्रचलित होते ते

शास्त्रवचन त्यांनी दाबून ठेवले त्याचा परिणाम होते; पण जिकडे ते तर जगजाहीर रीतीने बेईमानी म्हणून दिसते, देवाच्या नियमशास्त्राचा नकार, आणि परिणामी भ्रष्टाचार, आणि हे सर्व धार्मिक स्वातंत्र्य मिळावे ह्या युगात प्रकाशित शुभवर्तमानाच्या तेजात व्यक्त होते?

आता सैतान शास्त्रवचने माघारी ठेऊन जगाला नियंत्रणात ठेऊ शकत नसल्याने, तोच हेतू सिद्ध करण्यासाठी ती इतर मार्गांचे अवलंबन करतो. पवित्र शास्त्रावरील विश्वास नष्ट करणे  आणि स्वतः पवित्र शास्त्राला नष्ट करणे हा त्याचा हेतू सफळ होतो. देवाचे नियमशास्त्र बंधनकारक नाही हा विश्वास सर्वांमध्ये टाकून, त्याने प्रभावीपणे मनुष्यांना अधर्म करण्यास प्रवृत्त केले जणूकाही त्यातील नियमांच्या बद्दल ते अज्ञानी होते.

आणि आता, जसे आधीच्या युगांमध्ये होते, त्याने त्याचे कट यशस्वी करण्यासाठी मंडळीच्या द्वारे कार्य केले आहे. त्या काळच्या धार्मिक संस्थांनी शास्त्रवचनात जे सत्य दिसतात त्यकडे सध्या रीतीने पाहणे किंवा ऐकण्यास नकार दिला, आणि त्याच्याशी जुळवून घेता घेता त्यांनी अशी काही भाषांतरे स्वीकारली आणि अशी काही स्थाने स्वीकारली ज्यामध्ये शंका घेण्याची बीजे पेरली जाऊन अखंड पसरत आहे...

**(१२) देवाच्या नियमशास्त्राच्या स्थिरतेसंबंधी कोणते दैवी अभिवचन देण्यात येते?**

***"नियमशास्त्र किंवा संदेष्ट्यांचे ग्रंथ रद्द करण्यास मी आलो आहे असे समजू नका; मी रद्द करण्यास नव्हे तर पूर्ण करण्यास आलो आहे. (मत्तय ५:१७)***

**(१३) जे लोक देवावर प्रेम करतात आणि शेवटल्या दिवशी त्या थोडक्या लोकांमध्ये जाणले जातात अशांचा सर्वात महत्वाचा गुणधर्म काय असेल?**

*देवाच्या आज्ञा पाळणारे व येशूवरील विश्वासाला धरून राहणारे पवित्र जन ह्यांचे धीर धरण्याचे अगत्य ह्यातच आहे. (प्रगटीकरण १४:१२)*

**(१४) जरी बहुसंख्यक लोकांनी नाकारले, देवाने त्याचा शब्बाथ म्हणून कोणता दिवस आपल्याला पाळण्यास सांगितले आहे?**

*"शब्बाथ दिवसाची आठवण ठेवून तो पवित्रपणे पाळ. सहा दिवस श्रम करून आपले सर्व कामकाज कर; पण सातवा दिवस तुझा देव परमेश्वर ह्याचा शब्बाथ आहे, म्हणून त्या दिवशी कोणतेही कामकाज करू नकोस; तू, तुझा मुलगा, तुझी मुलगी, तुझा दास, तुझी दासी, तुझी गुरेढोरे व तुझ्या वेशीच्या आत असलेला उपरा, ह्यांनीही करू नये; कारण सहा दिवसांत परमेश्वराने आकाश, पृथ्वी, समुद्र व त्यांतील सर्वकाही निर्माण केले आणि सातव्या दिवशी विसावा घेतला; म्हणून परमेश्वराने शब्बाथ दिवस आशीर्वाद देऊन पवित्र केला. (निर्गम २०:८-११)*

आणि जसे चौथ्या आज्ञेची सिद्धता लोकांसमोर व्यक्त होते, असे दिसते की सातवा दिवस हा शब्बाथ म्हणून पाळणे स्वीकारले जाते; आणि तो एकमेव मार्ग म्हणून ज्यामध्ये नको असलेल्या कामगिरीतून कर्तव्यापासून मुक्त होता येते, अनेक प्रसिद्ध शिक्षक घोषणा करतात की देवाचे नियमशास्त्र आता ग्राह्य नाही. ह्या नात्याने नियमशास्त्र आणि शब्बाथ दोघांना दूर लोटतात.

शब्बाथ दिवसाचे सुधारित कार्य जसे पुढे जाते, ह्या दैवी नियमाचा नकार करणे चौथ्या आज्ञेची सिद्धता टाळणे हे जागतिक सत्य बनते. धार्मिक पुढार्यांच्या शिकवणी ह्यांनी बेईमानी प्रत ते द्वार उघडले आहे, अध्यात्माच्या प्रती, देवाच्या प्रिय नियमशास्त्राच्या प्रती तो तिरस्कार; आणि ह्या पुढार्यांवर ख्रिस्ती जगात जे अधर्म अस्तित्वात दिसते त्यासाठी ती भयंकर जबाबदारी आहे.

**(१५) पशूचे सामर्थ्य काय बदलण्याचा प्रयत्न करणार असा अंदाज शास्त्रवचनात दिला आहे?**

*तो परात्पर देवाविरुद्ध गोष्टी बोलेल आणि परात्पर देवाच्या पवित्र जनांस जेर करील; तो नेमलेल्या सणांत व घालून दिलेल्या शिस्तीत बदल करण्यास पाहील; एक काळ, दोन काळ व अर्धा काळपर्यंत ते त्याच्या कबजात राहतील. (दानियेल ७:२५)*

**(१६) कोणती हुशार आणि तीक्ष्ण लबाडी जी सत्याची जागा घेते ह्याविषयी आपणास इशारा देण्यात आलेला आहे?**

*ख्रिस्ताप्रमाणे नसलेले, तर माणसांच्या संप्रदायाप्रमाणे, जगाच्या प्राथमिक शिक्षणाप्रमाणे असलेले तत्त्वज्ञान व पोकळ भुलथापा ह्यांच्या योगाने तुम्हांला कोणी ताब्यात घेऊन जाऊ नये म्हणून लक्ष द्या. (कलस्सेकरास पत्र २:८)*

तरीही ह्या वर्गाने असे मत मांडले की जलद रीतीने पसरणारा भ्रष्टाचार हा “ शब्बाथ दिवसाच्या अपवित्रीकरणाचे” प्रतिक आहे, आणि रविवार हा पवित्र पाळणे समाजाचे नैतिक स्तर वाढवतील.विशेषतः अमेरिकेत हे

मत मांडले जाते, जिकडे खर्या शब्बाथाचा सिद्धांत मोठ्या प्रमाणावर गाजवला जातो [आठवड्याचा सातवा दिवस = निर्गम २०:८-११] ह्या ठिकाणी ते संयमाचे कार्य, नैतिक सुधारणेचे प्रमुख आणि महत्वाचे स्वरूप, त्याला रविवारच्या हालचालीशी जोडता येते, आणि नंतरचे मत पसरवणारे लोक समाजाचा सर्वोत्तम हेतू मनात ठेऊन कष्ट करतात; आणि जे लोक त्यांच्याशी एक होण्यास नकार देतात त्यांना संयम आणि सुधारणा ह्यांचे शत्रू म्हणून घोषित केले जाते.

पण हे वास्तव की चूक स्थापित करण्यासाठी एक चळवळ एका कार्याशी जोडलेली आहे ती स्वत:मध्ये चांगली नाही, तो त्या चुकीच्या दिशेने काही चांगला वाद नाही. आपण जर विष चांगल्या आणि परिपूर्ण अन्नात मिसळले तर ते दिसत नाही, पण आपण त्याचा स्वभाव बदलू शकत नाही. त्या विरुद्ध, ते आणखी घातकी बनते, आकारण अजाणतेपणे त्याचे सेवन करण्याची शक्यता त्यामुळे वाढते.

सैतानाचे हे एक हत्यार आहे की लबाडीसोबत पुरेसे सत्य जोडायचे म्हणजे त्याला सत्याचा भास लाभतो. रविवारच्या चळवळीचे पुढारी काही नियमावली तयार करतात ज्याची गरज लोकांना असते, जे तत्व पवित्र शास्त्राशी सुसंगत असतात;  आणि ह्यासोबत एक अट असते जी देवाच्या नियमशास्त्राच्या अगदी विरुद्ध असते, त्याचे सेवक त्याच्याशी जोडले जाऊ शकत नाहीत. लोकांच्या नियमांसाठी देवाच्या आज्ञा बाजूला ठेवण्यात कोणीही त्यांचे समर्थन करू शकत नाही.

**(१७) अर्धवट आज्ञापालन करण्याचा अंतिम परिणाम काय आहे?**

*सुभक्तीचे केवळ बाह्य रूप दाखवून तिचे सामर्थ्य नाकारणारी अशी ती होतील; त्यांच्यापासूनही दूर राहा! (२ तीमथी ३:५)*

*“लावदिकीया येथील मंडळीच्या दूताला लिही:‘जो आमेन, जो ‘विश्वसनीय’ व खरा ‘साक्षी’, जो देवाच्या ‘सृष्टीचे आदिकारण’ तो असे म्हणतो : तुझी कृत्ये मला ठाऊक आहेत; तू शीत नाहीस व उष्ण नाहीस. तू शीत किंवा उष्ण असतास तर बरे होते;पण तू तसा नाहीस, कोमट आहेस; म्हणजे उष्ण नाहीस, शीत नाहीस, म्हणून मी तुला आपल्या तोंडातून ओकून टाकणार आहे.*
*(प्रगटीकरण ३:१४-१६)*

ख्रिस्ती म्हणवणाऱ्या लोकांमध्ये आणि अधार्मिक लोकांमधील फरक आता क्वचितच दिसून येतो. मंडळीच्या सभासदांना जगाला काय आवडते ते त्यांना आवडते आणि त्यात मिसळून जाण्याची त्यांची तयारी असते, आणि सैतान त्यांना एका शरीरात एकत्र करण्याचे निश्चित करतो आणि ह्यामुळे सर्वांना त्या अध्यात्माच्या दर्ज्यात खेचून आणण्याच्या प्रयत्नात मुळावत जातो.

पापिस्त लोक, जे चमत्कार म्हणजे खर्या मंडळीचे प्रतिक म्हणून शेखी मिरवतात, ह्या अद्‌भुत सामर्थ्याने पटकन फसवले जातात; आणि प्रोटेसतंत लोक, सत्याची ढाल बाजूला ठेऊन, ते देखील भ्रमात असतात. पापिस्त, प्रोटेसतंत, आणि जगिक लोक दैवी स्वभाव कोणत्याही सामर्थ्यनिशी सहज स्वीकारतील, आणि ह्या ऐक्यात त्यांना जगाचे परिवर्तन होण्याची महान चळवळ दिसेल आणि त्या द्वारे खूप काळ ज्या युगाचे आगमन होण्याची वाट पाहिली ते बघतील.

**(१८) देवाच्या नियमशास्त्राचा मनुष्याने केलेल्या नकाराचा अंतिम परिणाम काय होईल?**

***पृथ्वी शोकाकुल व कृश झाली आहे; जग झुरून कृश झाले आहे; पृथ्वीवरील प्रतिष्ठित जन जर्जर झाले आहेत. पृथ्वी आपल्या रहिवाशांकडून भ्रष्ट झाली आहे, कारण त्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे, विधींचे अतिक्रमण केले आहे आणि सनातन करार मोडला आहे.(यशया २४:४-५)***

सैतान तयारी नसलेल्या जीवात्म्यांच्या हंगामाला एकत्र करण्यासाठी त्याच्या घटकांच्या द्वारे कार्य करतो. त्याने निसर्गाच्या प्रयोगशाळांचा गुप्तपणे अभ्यास केला आहे, आणि देव परवानगी देतो तसे त्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यास तो सर्व सामर्थ्याचा उपयोग करतो. जेव्हा इयोबाला त्रास देण्याची वेळ होती, किती लवकर कळप आणि झुंडी, सेवक, घरे, मुले, हे हिरावण्यात आले, क्षणातच एका मागोमाग एक त्रास आणि संकट येत राहिले. देव त्याच्या निर्मितीचे रक्षण करतो आणि नाश करणाऱ्याच्या सामर्थ्यापासून बचावून त्याच्याभोवती कुंपण घालतो.

पण ख्रिस्ती जगाने यहोवाच्या नियमशास्त्राचा तिरस्कार केला आहे; आणि प्रभुने जशी घोषणा केली तसेच तो करणार- तो पृथ्वीवरून आपले आशीर्वाद परत खेचून घेईल आणि जे लोक त्याच्या नियमशास्त्राच्या विरोधात बंड करतात आणि इतरांना देखील तेच करण्यास शिकवतात त्यांच्यापासून तो आपल्या सौरक्षणाचा हस्त काढून घेईल . देव विशेषकरून ज्यांचे रक्षण करत नाही असे लोक सैतानाच्या नियंत्रणाच्या अधीन असतात. त्याच्या स्वतःच्या कल्पना सिद्धीस नेण्यासाठी

तो काहींवर कृपा दाखवेल आणि त्यांची समृद्धी करेल, आणि इतरांवर त्रास आणून लोकांना विश्वास ठेवण्यास भाग पाडेल की देव आहे जो त्यांना त्रास देत आहे.

मनुष्यांच्या समोर एक महान वैद्य जो त्यांच्या सर्व यातना, आजार, व्याधी बरे करू शकतो असे भासवतो, आणि त्याच वेळी , सर्व आजार आणि नाश ओढवतो, जोपर्यंत प्रसिद्ध शहरे नाशवंत आणि विनाशकारक बनतात. आता देखील तो कार्यरत आहे. समुद्रात आणि भूमीवर जे अपघात आणि दुर्घटना घडतात, मोठ्या प्रमाणावरील वणवा, भयंकर गारांचा पाऊस, वादळ, जलप्रलय, चक्रीवादळ, समुद्रातील लाटा, भरती आणि ओहोटी, प्रत्येक ठिकाणी भूमिकंप, हजारो स्वरूपाने
सैतान त्याचे सामर्थ्य वापरत आहे. तो पिक आलेले धान्य उध्वस्त करतो, आणि त्याच बरोबर दुष्काळ आणि बेचैनी येतात. हवेला तो एक भयंकर स्वरूप देतो, आणि त्या मरीमुळे हजारो लोकांचा नाश होतो. अशा प्रकारचे प्रसंग अधिक आणि अधिक भयंकर होत चालले आहेत. मानव आणि पशुंवर दोघांवर नाश हा ओढवणार. “पृथ्वी विलाप करून सरत चालली आहे,” “घमेंडखोर लोक . . . खिन्न होतात. पृथ्वी देखील तिच्या रहिवास्यांच्या खाली तुच्छ लेखली जाते; कारण त्यांनी नियमशास्त्राचे उल्लंघन केले, नियम बदलले आणि सर्वकाळचा करार मोडला” [यशया २४:५].

**(१९) जेव्हा फसवले गेलेले लोक सैतानाच्या योजनांच्या नुसार कृती करतात तेव्हा त्याचा भयंकर परिणाम काय होतो?**

*ते तुम्हांला सभाबहिष्कृत करतील, इतकेच काय पण तुमचा जीव घेणाऱ्या प्रत्येकाला*

*आपण देवाला सेवा सादर करत आहोत असे वाटेल, अशी वेळ येत आहे. (योहान १६:२)*

महान फसवणारा लोकांना ह्याची खात्री पटवून देईल की जे लोक देवाची सेवा करत आहेत त्यांच्यामुळे ही दुष्टाई होत आहे. ज्या वर्गाने स्वर्गात असंतोष माजवला ते सर्व त्रास त्या लोकांवर टाकतील ज्यांचे देवाच्या आज्ञांच्या प्रती असलेले आज्ञापालन हे अधर्म करणाऱ्यांसाठी सर्वकाळचा आरोप आहे. रविवारच्या शब्बाथाचे उल्लंघन करून लोक देवाला खिन्न करत आहेत ही घोषणा करण्यात येईल; पापाने त्या सर्व दुर्घटना आणल्या ज्या रविवारचे पालन कडकपणे होईपर्यंत थांबणार नाहीत; आणि जे लोक चौथ्या आज्ञेचे मत प्रस्तुत करतात, त्याद्वारे रविवारसाठी तो आदर कमी होतो, ते तर लोकांना त्रास देणारे आहेत, दैवी कृपामर्जी आणि तात्पुरती समृद्धी ह्यांच्याप्रात त्यांचे भरपाई होण्यापासून परावृत्त करत आहेत.

देवाच्या सेवकाच्या विरुद्ध जो दोष बर्याच काळापासून होता त्याची पुनरावृत्ती होईल आणि ती देखील स्थापित असलेल्या धर्तीवर: “एलीयाला पाहताच अहाब म्हणाला, “इस्राएलास छळणारा तो तूच ना?”तो म्हणाला, “मी इस्राएलास छळले नाही; तर तू व तुझ्या वडिलांच्या घराण्याने परमेश्वराच्या आज्ञा मानायचे सोडून बआलमूर्तींच्या नादी लागून इस्राएलास छळले आहे.” १ राजे १८:१७,१८. लोकांचा क्रोध अशा खोट्या आरोपांनी ज्वलंत होतो तसा, देवाच्या राजदूतांच्या प्रती ते असा मार्ग निवडतील जो धर्मत्यागी इस्राएलाने देखील एलियाप्रती अवलंबिला होता.

**(२०) शेवटल्या दिवसांमध्ये सैतान कोणत्या शक्तिशाली फसवणुकीचे स्रोत वापरेल आणि बहुसंख्यक लोकांना त्याच्या कार्याप्रती फसवण्याचा प्रयत्न करेल?**

***ते चिन्हे दाखवणारे भुतांचे आत्मे आहेत; ते सर्वसमर्थ देवाच्या त्या मोठ्या दिवसाच्या लढाईसाठी संपूर्ण जगातील राजांना एकत्र करण्यास त्यांच्याकडे बाहेर जातात. (प्रगटीकरण १६:१४)***

***कारण खोटे ख्रिस्त व‘ खोटे संदेष्टे ’उठतील व साधेल तर निवडलेल्यांनादेखील फसवावे म्हणून मोठी‘ चिन्हे व अद्‌भुते दाखवतील’. (मत्तय २४:२४)***

अध्यात्माच्या द्वारे जे चमत्कार घडवून आणणारे सामर्थ्य आहे हे जे लोक माणसांच्या ऐवजी देवाचे आज्ञापालन करतात त्यांच्यावर प्रभाव पाडतात. ह्या आत्म्यांकडून येणारे संभाषण घोषित करते की देवाने त्यांना जे लोक रविवारला नाकारतात त्यांच्या चुकीबद्दल खात्री पटवण्यासाठी असते, आणि जसे देवाचे नियमशास्त्र असते तसेच त्या पृथ्वीच्या नियमशास्त्राचे देखील पालन करणे गरजेचे असते. जगात जी महान दुष्टता आहे त्याविषयी ते शोक करतात आणि धार्मिक शिक्षकांच्या साक्षीला दुजोरा देतात की नैतिकता ढासळण्याचे मुख्य कारण हे रविवारचे अपवित्रीकरण आहे. जे लोक त्यांची साक्ष स्वीकारण्यास नकार देतात त्यांच्या विरुद्ध उदयास येणारा क्रोध हा महान असतो.

देवाच्या लोकांबरोबर असलेल्या ह्या अंतिम वादात सैतानाची भूमिका तिच आहे जी स्वर्गात महान वादविवाद सुरु झाला त्यावेळा होती. दैवी शासनाची स्थिरता स्वीकारण्याचे

तो भासवतो, आणि गुप्तपणे तो उधळून टाकण्याचा प्रत्येक प्रयत्न नष्ट करतो.

**(२१) भुरळ पाडणे आणि नियंत्रण ठेवण्याच्या त्याच्या पद्धतींचा उपयोग करून, ह्या उद्भवणाऱ्या वादासाठी सैतानाचे अंतिम ध्येय काय आहे?**

*सावध असा, जागे राहा; तुमचा शत्रू सैतान हा गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे हे शोधत फिरतो. (१ पेत्र ५:८)*

देव कधीही इच्छा किंवा विवेकबुद्धीवर जोर देत नाही; पण सैतानाचे सातत्याचे आश्रयस्थान- त्या लोकांवर नियंत्रण ठेवणे ज्यांना तो तसा भुरळ पाडू शकत नाही- ही क्रूरतेने केलेली जबरदस्ती आहे. भयाने किंवा जबरदस्तीने विवेकावर अधिकार गाजवण्याचा प्रयत्न तो करतो आणि स्वतःसाठी तो आदरयुक्त सन्मान मिळवतो. हे सिद्ध करून घेण्यासाठी, तो धार्मिक आणि जगिक अधिकाऱ्यांच्या द्वारे कार्य करतो, देवाच्या नियमशास्त्राच्या बद्दल मानवी नियम ह्यांची जबरदस्ती त्याद्वारे करतो.

**(२२) देवाच्या शेवटल्या काळातील उरलेल्या लोकांचे कोणते वैशिष्ट्य सैतान आणि त्याच्या अनुयायांसाठी तो द्वेष उत्पन्न करेल?**

*तेव्हा अजगर स्त्रीवर रागवला आणि देवाच्या आज्ञा पाळणारे व येशू ख्रिस्ताविषयी साक्ष देणारे तिच्या संतानापैकी बाकीचे जे लोक होते त्यांच्याबरोबर लढाई करण्यास तो निघून गेला. (प्रगटीकरण १२:१७)*

जे लोक पवित्र शास्त्रीय शब्बाथाचा सन्मान करतात त्यांना नियमशास्त्र आणि सुसंगती ह्यांचे शत्रू म्हणून पुकारले जाईल,

समाजातील नैतिक बंधने मोडून, सर्वत्र बेबंदशाही आणि भ्रष्टाचार उत्पन्न करतात, आणि पृथ्वीवर देवाचे न्याय आमंत्रित करतात. त्यांच्या कर्तव्यनिष्ठ कृती ह्यांना हटवादी म्हणून, हेखेखोर आणि अधिकाराचा त्याग म्हणून घोषित करण्यात येते. शासनाच्या प्रती जिव्हाळा नसलेले असा आरोप त्यांच्यावर लावण्यात येतो.

जे सेवक त्या दैवी नियमशास्त्राच्या जबरदस्तीला नकारतात ते व्यासपीठावरून देवाच्या प्रती जे नेमलेले अधिकारी आहेत त्याच्यासाठी कर्तव्य म्हणून आज्ञापालन करतात. कायद्याच्या गृहात आणि न्यायाच्या दरबारात, आज्ञापालन करणारे दोषी ठरवले जाऊन चुकीच्या पद्धतीने प्रस्तुत होतात. त्यांच्या शब्दांना चुकीचे रंग मिसळण्यात येतात; सर्वात वाईट रचना ही त्यांच्या हेतुंवर असते.

**(२३) नागरिक अधिकारी आणि बहुसंख्यक धार्मिक गट जे शिक्कामोर्तब झालेले आहे ते कोणती कृती करतील त्या लोकांवर ज्यांच्यावर देवाचे आज्ञापालन करण्याची जबरदस्ती आहे आणि तसे करण्याने ते आपल्या सदसदविवेकाचे उल्लंघन करतात?**

***आणि ज्यांच्यावर ती खूण म्हणजे त्या श्वापदाचे नाव किंवा नावाने दर्शवलेली संख्या आहे, त्यांच्याशिवाय कोणाला काहीही विकत घेता येऊ नये किंवा विकत देता येऊ नये, असे ते श्वापद करते. (प्रगटीकरण १३:१७)***

देवाच्या नियमशास्त्राचे सौरक्षण करण्यासाठी प्रोटेसतंत मंडळया स्पष्ट, शास्त्रवचनीय वाद नाकारतात, ते अशा लोकांना शांत करण्याचा प्रयत्न करतील ज्यांचा विश्वास पवित्र शास्त्राच्या द्वारे ते झुगारून देऊ शकत नाहीत. जरी ह्या वास्तवाकडे ते

स्वतःचे डोळे बंड करतात, ते आता असा मार्ग स्वीकारत आहेत ज्यामुळे जे कर्तव्यनिष्ठ आहेत त्यांचा छळ होईल कारण उर्वरित ख्रिस्ती जग जे करतात ते करण्यास त्यांचा नकार असतो, आणि पापल शब्बाथाचा ते स्वीकार करतात.

मंडळी आणि त्या शहराचे मुख्य प्रसिद्ध लोक एकत्र होऊन रविवारचा सन्मान करण्यासाठी लाच देतील, खात्री पटवतील, किंवा सर्व वर्गांवर जबरदस्ती करतील. दैवी अधिकाराची कमी छळवादाने केली जाते. राजकीय भ्रष्टाचार न्यायाच्या बद्दल प्रीती आणि सत्याला लेखणे हे नष्ट करतात; आणि अमेरिकेत देखील, अधिकारी आणि कायद्याचे निष्णात लोक, लोकांची मर्जी मिळवण्यासाठी, रविवारचे पालन करण्यासाठी लोकांची जाहीर मागणी स्वीकारतील.
विवेकात असणारे स्वातंत्र्य, ज्याने इतकी मोठी अर्पणाची किमत मोजली, त्याचा ह्यापुढे सन्मान करण्यात येणार नाही.

लवकरच येणाऱ्या वादात संदेष्ट्याचे मोठे करण्यात आलेले शब्द आपण पाहतो: "तेव्हा अजगर स्त्रीवर रागवला आणि देवाच्या आज्ञा पाळणारे व येशू ख्रिस्ताविषयी साक्ष देणारे तिच्या संतानापैकी बाकीचे जे लोक होते त्यांच्याबरोबर लढाई करण्यास तो निघून गेला." प्रगटीकरण १२:१७. [ पवित्र शास्त्रीय शब्बाथाचा इतिहास आणि त्याला बदलण्याचा मनुष्याचा प्रयत्न ह्याचे विस्तारित स्पष्टीकरण तुम्ही पुस्तकाचा शेवटला भाग अ, ब, क, ड ह्यात पाहा.]

*मला आता जाणीव होते की शास्त्रवचन स्पष्टपणे येऊ घातलेल्या वादाचे वर्णन "जसे कधीही नव्हते" असे करते ज्याची सुरुवात ही ह्या जगाच्या इतिहासाच्या शेवटी होताना पाहू.*

*गोल करा :     होय     अनिश्चित*

*मला जाणीव आहे की पाप जन्मास आले तेव्हापासून ह्या महान वादात सैतानाच्या*

हल्ल्याचे केंद्र हे देवाचे सनातन पवित्र नियमशास्त्र आहेत- जे त्याच्या शासनाचा आधारस्तंभ आहेत.

गोल करा : होय अनिश्चित

प्रगटीकरण १२:१७ प्रगट करते की सैतानाचे अंतिम ध्येय म्हणजे देवाच्या नियमशास्त्राची निंदा आहे जी ह्या पवित्र तत्वांच्या अंतिम नकाराच्या हेतूने देण्यात आले.

गोल करा : होय अनिश्चित

"तो परात्पर देवाविरुद्ध गोष्टी बोलेल आणि परात्पर देवाच्या पवित्र जनांस जेर करील; तो नेमलेल्या सणांत व घालून दिलेल्या शिस्तीत बदल करण्यास पाहील; एक काळ, दोन काळ व अर्धा काळपर्यंत ते त्याच्या कबजात राहतील." दानियेल ७:२५.

गोल करा : होय अनिश्चित

कारण जो कोणी संपूर्ण नियमशास्त्र पाळून एका नियमाविषयी चुकतो तो सर्वांविषयी दोषी होतो. याकोब २:१०.

गोल करा : होय अनिश्चित

देवाच्या आज्ञा पाळणारे व येशूवरील विश्वासाला धरून राहणारे पवित्र जन ह्यांचे धीर धरण्याचे अगत्य ह्यातच आहे. प्रगटीकरण १४:१२.

गोल करा : होय अनिश्चित



# धडा ८
# शास्त्रवचने एक सुरक्षेचे स्थान

**(१) सैतानाच्या भ्रमांपासून आपले सुरक्षा स्थान काय असेल?**

***येशूने त्याला उत्तर दिले : "'मनुष्य केवळ भाकरीने नाही, तर देवाच्या प्रत्येक वचनाने' जगेल असे लिहिले आहे."** (लूक ४:४)*

***नियमशास्त्र व साक्ष ह्यांकडे पाहा! ह्याप्रमाणे ते न बोलल्यास त्यांच्यासाठी निश्चये प्रभातसमय नाही.** (यशया ८:२०)*

देवाचे लोक शास्त्रवचनाकडे त्यांचे खोटे शिक्षक आणि अंधकाराच्या सत्ता ह्यांच्याविरुद्ध सुरक्षा स्थान म्हणून पाठवण्यात येतात. सैतान शक्य तितक्या प्रत्येक साधनाचा उपयोग लोकांनी पवित्र शास्त्राचे सुज्ञान मिळवण्यापासून त्यांना परावृत्त करतो; कारण त्यातील सोपे उदगार हे त्याच्या फसवणुकी

व्यक्त करतात. देवाचे कार्य जेव्हा प्रत्येक वेळा संजीवित होते दुष्टाईचा नायक अधिक तीव्र कार्य करण्यास प्रेरित होतात; ख्रिस्त आणि त्याचे अनुयायी ह्यांच्या विरुद्ध अंतिम संघर्ष करण्यास तो पुरेपूर प्रयत्न करत आहे.

शेवटला भ्रम आपल्यासमोर किती लवकर खुला होतो. ख्रिस्तविरोधक त्याचे अद्‌भुत कार्य आपल्या समोर करणार आहे. इतक्या जवळून दिसण्यात आलेला हा संघर्ष खरे जे आहे ज्याला व्यक्त करतो की पवित्र शास्त्रवचनाच्या शिवाय त्यांच्यात फरक करणे अशक्य असेल. त्यांच्या साक्षीने प्रत्येक विधान आणि चमत्कार हा तपासून बघितला पाहिजे.

**(२) मनुष्याच्या पेक्षा देवाचे आज्ञापालन करण्यासाठी आपल्याला सामर्थ्य मिळण्याचा स्त्रोत काय आहे?**

***आपल्या सार्वकालिक गौरवात यावे म्हणून ज्याने येशू ख्रिस्तामध्ये तुम्हांला पाचारण केले तो सर्व कृपेचा देव तुम्ही थोडा वेळ दुःख सोसल्यावर, स्वतः तुम्हांला पूर्ण, दृढ व सबळ करील. (१ पेत्र ५:१०)***

जे लोक देवाच्या सर्व आज्ञांचे पालन करण्याचा धीट प्रयत्न करतात त्यांचा विरोध होईल व उपहास होईल. ते केवळ देवामध्ये उभे राहू शकतात. त्यांच्यासमोर जी परीक्षा आहे ती सहन करत असताना, त्याच्या वचनात जशी देवाची इच्छा व्यक्त होते ती त्यांनी समजून घेतले पाहिजे;  त्याचे चारित्र्य, शासन, आणि हेतू  योग्य रीतीने समजून घेऊन मग ते त्याचा सन्मान करू शकतात, त्यांच्यासोबत कार्य करणे आवश्यक आहे. इतर दुसरे कोणीही नाही पण ज्यांनी मनाच्या तटबंदीत पवित्र शास्त्राचे सर्व

सत्य बिंबवले आहेत तेच ह्या अंतिम महान वादविवादात टिकाव धरून राहू शकतात.

प्रत्येक जीवात्म्यासाठी ही शोध घेणारी चाचणी समोर येईल: मनुष्यांच्या पेक्षा मी देवाचे आज्ञापालन करावे का? निर्णय घेण्याचा क्षण आता जवळ आहे. आपली पावले देवाच्या न बदलणाऱ्या वचनावर मुळावले आहेत का? देवाच्या आज्ञा आणि येशूचा विश्वास ह्याला दुजोरा देत आपण तितके दृढ उभे राहू शकतो का?

**(३) देवाने त्याच्या वचनात भविष्यवाणी का पुरवली आहे?**

*धीराच्या व शास्त्रापासून मिळणाऱ्या उत्तेजनाच्या योगे आपण आशा धरावी म्हणून जे काही शास्त्रात पूर्वी लिहिले ते सर्व आपल्या शिक्षणाकरता लिहिले. (रोमकरास पत्र १५:४)*

*"गुप्त गोष्टी आपला देव परमेश्वर ह्याच्या स्वाधीन आहेत, पण प्रकट केलेल्या गोष्टी आपल्या व आपल्या वंशजांच्या निरंतरच्या आहेत; ह्याचा हेतू हा की, ह्या नियमशास्त्राची सर्व वचने आपण पाळावीत. (अनुवाद २९:२९)*

त्याला वधस्तंभावर देण्यापूर्वी तारणार्याने त्याच्या शिष्यांना स्पष्ट करून सांगितले की त्याला मरण सहन करावे लागेल आणि पुन्हा त्या कबरेतून बाहेर यावे लागेल, आणि देवदूत त्याचे शब्द मनांवर आणि हृदयांवर बिंबवण्यास तयार होते. पण शिष्य तर रोमी दास्यातून तात्पुरती सुटका होण्याची वाट पाहत होते, आणि ते हा विचार सहन करू शकले नाही की ज्याच्यावर त्या सर्वांची आशा

केंद्रित होती त्याने अशा रीतीने भयंकर अंड द्रावक ,मृत्यू सहन करावा. जे शब्द त्यांना लक्षात ठेवायचे होते ते त्यांच्या मनातून हद्दपार झाले; आणि जेव्हा परीक्षेचा क्षण आला, त्यांची तयारी नाही असे त्यांना दिसले. येशूच्या मृत्यूने त्यांच्या पूर्ण आशा नष्ट केल्या जणूकाही त्याने त्यांना आधीपासून इशारा दिला नव्हता. म्हणून त्या भविष्यवाणीमध्ये भविष्य आपल्यासमोर उघडे आहे तितक्याच सोप्या रीतीने जसे ते शिष्यांसाठी ख्रिस्ताच्या शब्दांनी होते.

ज्या घटना ह्या तात्पुरत्या समाप्तीशी जोडल्या गेल्या होत्या आणि त्रासाच्या समयी ही तयारी होती, ते स्पष्टपणे मांडण्यात येते. पण जमावाला ह्या सत्याची इतकी माहिती नसते जर ते प्रगट झाले नसते. सैतान पाहतो आणि त्यांना तारणासाठी हुशार बनवणारे प्रत्येक मत पकडण्याचा प्रयत्न करतो, आणि त्रासाचा समय त्यांची तयारी नसेल तेव्हा त्यांना गाठतो.

**(४) कोणत्या तीन शेवटल्या काळातील इशारे म्हणजे आपल्या तारणाच्या मार्गासाठी झोपेतून जागे करण्यासाठी दिले जातात?**

*नंतर मी दुसरा एक देवदूत अंतराळाच्या मध्यभागी उडताना पाहिला; त्याच्याजवळ पृथ्वीवर राहणाऱ्यांना म्हणजे प्रत्येक राष्ट्र, वंश, निरनिराळ्या भाषा बोलणारे आणि लोक ह्यांना सांगण्यास सार्वकालिक सुवार्ता होती. तो मोठ्याने म्हणाला, "देवाची भीती बाळगा व त्याचा गौरव करा, कारण न्यायनिवाडा करायची त्याची घटिका आली आहे. 'ज्याने आकाश, पृथ्वी, समुद्र' व पाण्याचे झरे 'निर्माण केले,' त्याला नमन करा." त्या देवदूतामागून दुसरा देवदूत येऊन म्हणाला, "पडली, मोठी*

*बाबेल पडली, तिने आपल्या' जारकर्माबद्दलचा क्रोधरूपी 'द्राक्षारस सर्व राष्ट्रांना पाजला आहे." त्यांच्यामागून तिसरा देवदूत येऊन मोठ्याने म्हणाला, "जो कोणी श्वापदाला व त्याच्या मूर्तीला नमन करतो, आणि आपल्या कपाळावर किंवा आपल्या हातावर त्याची खूण करून घेतो, तोही 'देवाच्या क्रोधाच्या प्याल्यात निरा घातलेला' त्याचा क्रोधरूपी द्राक्षारस पिईल, आणि पवित्र देवदूतांसमक्ष व कोकऱ्यासमक्ष त्याला 'अग्नी व गंधक' ह्यांपासून पीडा होईल. (प्रगटीकरण १४:६-१०)*

जेव्हा देव लोकांना इतके महत्वाचे इशारे पाठवतो की त्यांना पवित्र स्वर्गदूत स्वर्गाच्या मध्ये उडत आहेत असे प्रस्तुत होतात, ज्या लोकांना ती तर्कबुद्धी प्राप्त आहे त्यांनी त्या संदेशाकडे लक्ष दिले पाहिजे जे भयभीत असे न्याय श्वापद आणि त्याच्या मूर्तीचे नमन करणार्यांच्या विरुद्ध पुकारले जातात (प्रगटीकरण १४:९-११), त्याद्वारे सर्वांनी भविष्यवाणींचा नितीपुर्वक अभ्यास करावा जेणेकरून श्वापदाची खून काय आहे हे समजेल, आणि त्याचा स्वीकार करण्यास त्यांनी कसे टाळले पाहिजे. पण असंख्य लोक हे सत्य ऐकण्यापासून आपले कान दूर लोटतात आणि त्यांची मने दंतकथांकडे वळवण्यात येतात.

**(५) मोहाने प्रेरित बहुसंख्य्क लोकांची प्रवृत्ती जी सिद्धांतीय सत्याकडे वळते त्याचे वर्णन पौलाने कसे केले?**

*कारण ते सुशिक्षण ऐकून घेणार नाहीत, तर आपल्या कानांची खाज जिरावी म्हणून ते स्वेच्छाचाराने आपणांसाठी शिक्षकांची गर्दी जमवतील, आणि ते सत्य ऐकण्यापासून*

*फिरतील, व कल्पित कहाण्यांकडे वळतील, अशी वेळ येईल. (२ तीम ४:३-४)*

ती वेळ आता पूर्णपणे आली आहे. लोकसमुदायाला ते पवित्र शास्त्रीय सत्य नको आहे, कारण पापी, जगावर प्रेम करणारे हृदय ह्यांच्या इच्छांशी हस्तक्षेप करते; आणि त्यांचे ज्यावर प्रेम आहे अशा लबाडी आणि फसवणूक सैतान पुरवतो.

**(६) ख्रिस्ताचे खरे अनुयायी सिद्धांतीय सत्य कसे निश्चित करतात?**

*नियमशास्त्र व साक्ष ह्यांकडे पाहा! ह्याप्रमाणे ते न बोलल्यास त्यांच्यासाठी निश्चये प्रभातसमय नाही. (यशया ८:२०)*

पण देव पृथ्वीवर लोकांना पवित्र शास्त्र राखण्यास ठेवेल, जे सर्व सिद्धांताचा उत्कृष्ट दर्जा आणि सर्व सुधारणांचा आधार आहे. शिक्षित लोकांची मते, विज्ञानाचे अनुमान, उपदेशकाच्या परिषदा किंवा मतांगीकर, इतके असंख्य आणि विसंगत जे त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंडळयांसारखे असतात, बहुसंख्यक लोकांची वाणी—ह्या पैकी एक किंवा सर्वांना धार्मिक विश्वासाच्या कोणत्या मुद्द्याच्या बाबतीत पुरावा म्हणून लेखण्यात येऊ नये. कोणताही सिद्धांत किंवा नियमस्वीकारण्याच्या पूर्वी, आपण त्याचा आधार म्हणून केवळ “असे परमेश्वर म्हणतो” असे मागावे.

**(७) लोकांच्या शिक्वर्निंच्या संबंधी आपली काय जवाबदारी आहे?**

*तेथील लोक थेस्सलनीकातल्या लोकांपेक्षा मोठ्या मनाचे होते; त्यांनी मोठ्या उत्सुकतेने वचनाचा स्वीकार केला, आणि ह्या गोष्टी अशाच आहेत की काय ह्याविषयी ते शास्त्रात दररोज शोध करत गेले. (प्रेषित १७:११)*

सैतान सतत लोकांचे लक्ष देवाच्या ऐवजी मनुष्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहे. तो लोकांना बिशप, पाळक, धर्मशास्त्राचे पालन करणारे, त्यांचे मार्गदर्शक म्हणून पाहावे असे करतो, शास्त्रवचनातून त्यांनी स्वतःसाठी आपली कर्तव्ये काय आहेत ते समजून घेऊ देत नाही. मग, ह्या पुढाऱ्यांचे मन ताब्यात ठेऊन, तो अनेक लोकांना त्याच्या इच्छेनुसार ताब्यात ठेऊ शकतो.

**(८) शास्त्रवचन समजून घेण्यासाठी यहुदी राष्ट्रांनी त्यांच्या पुढार्यांवर अवलंबून राहण्याचा परिणाम काय होता?**

*तुच्छ मानलेला, मनुष्यांनी टाकलेला, क्लेशांनी व्यापलेला व व्याधींशी परिचित असलेला असा तो पुरुष पाहून लोक तोंडे फिरवत व त्याला तुच्छ लेखत; आणि त्याला आम्ही मानले नाही. (यशया ५३:३)*

जेव्हा ख्रिस्ताने येऊन जीवनाचे शब्द पुकारले, सामान्य लोकांनी आनंदाने त्याकडे पाहिले; आणि अनेक, याजक आणि अधिकारी देखील त्याच्यावर विश्वास ठेवत होते. पण याजकत्वाचा प्रमुख आणि राष्ट्राला चालवणारे पुढारी हे दोष लावण्यास आणि त्या शिकवणी न स्वीकारण्यास तयार होते. त्याच्यावर दोष लावण्याच्या सर्व प्रयत्नात जरी ते गोंधळून गेले, तरीही त्यांना ह्या दैवी सामर्थ्याचा प्रभाव जाणवला आणि त्याच्या शब्दात सुज्ञान लाभले,

तरीही त्या पुर्वग्रहात त्यांनी स्वतःला पाहिले; त्याच्या मसिहात्वाच्या सर्वात स्पष्ट पुराव्याचा त्यांनी नकार केला, नाहीतर त्याचे शिष्य बनण्याची जबरदस्ती त्यांच्यावर झाली असती.

जेव्हा तो सभास्थान सोडतो, पृथ्वीवरील रहिवाश्यांच्या वर अंधकार पसरतो. त्या भयभीत अशा समयी नीतिमान लोकांनी एका पवित्र देवाच्या समक्ष कोणत्याही मध्यस्थाच्या शिवाय राहावे. जो निर्बंध दुष्टांवर होता तो काढून टाकण्यात आला आहे, आणि सैतानाचा शेवटी जे निगरगट्ट लोक आहेत त्यांच्यावर पूर्ण ताबा असतो. देवाचे खूप काळचे दुखसहन आता संपले आहे. जगाने त्याची दया नाकारली, त्याचे प्रेम तुच्छ लेखले, आणि त्याच्या नियमशास्त्राला तुडवले. दुष्ट लोकांनी त्यांच्या परीविक्षा काळाची सीमा ओलांडली; देवाचा आत्मा, ज्याला चिकाटीने प्रतिकार करण्यात आला होता, शेवटी आता तो काढून टाकण्यात आला आहे. दैवी कृपेने त्यांचे आच्छादन न होता, दुष्टापासून त्यांचे आता सौरक्षण होत नाही. सैतान मग पृथ्वीवरील सर्व रहिवाश्यांना त्या एका महान, अंतिम त्रासासाठी एकत्र एकवटून घेईल.

**(३) देवाच्या लोकांना शिक्कामोर्तब करून त्यांचे सौरक्षण होईपर्यंत कोणते दैवी मध्यम आता ह्या भयंकर संघर्षाच्या वाऱ्यांना रोखून ठेवत आहे?**

*ह्यानंतर मी चार देवदूत 'पृथ्वीच्या चार कोनांवर' उभे राहिलेले पाहिले, ते पृथ्वीवरून व समुद्रावरून वारा वाहू नये व कोणत्याही झाडाला लागू नये म्हणून पृथ्वीचे 'चार वारे' अडवून धरत होते. (प्रगटीकरण ७:१)*

देवाचे दूत जसे मानवी आवेशाच्या वाऱ्यांना रोखण्याचे थांबवतात, संघर्षाचे सर्व घटक हे सैल पडतील. संपूर्ण जग अशा भयंकर नाशात पडेल जे भयंकर यरुशलेम वर आले होते.

एकमेव देवदुताने सर्व मिसरी देशाच्या प्रथम जन्मलेल्या बालकांचा नाश केला आणि संपूर्ण भूमीवर आक्रोश आणि विलाप पसरला. जेव्हा दाविदाने देवाच्या विरोधात लोकांची गणती करून त्याला नाराज केले, एका देवदुताने तो भयंकर नाश घडवून आला ज्यामुळे त्याच्या पापाची शिक्षा देण्यात आली. तेच नाशवंत सामर्थ्य जेव्हा देवाची आज्ञा मिळते तेव्हा स्वर्गीय देवदूत अमलात आणतात, जेव्हा तो परवानगी देतो तेव्हा दुष्ट दूत ते अमलात आणतात. ह्या सर्व शक्ती आता तयार आहेत, आणि केवळ दैवी परवानगीची वाट पाहतात, जेणेकरून ते सर्वत्र तो हाहाकार माजवू शकतात.

**(४) दुष्ट लोकांच्या हृदयात अरास्त क्रोध आणि छळ हे कोणती दोन देवाच्या लोकांची गुणधर्मे प्रज्वलित करतील?**

*देवाच्या आज्ञा पाळणारे व येशूवरील विश्वासाला धरून राहणारे पवित्र जन ह्यांचे धीर धरण्याचे अगत्य ह्यातच आहे. (प्रगटीकरण १४:१२)*

जे लोक देवाच्या नियमशास्त्राचा सन्मान करतील त्यांच्यावर जगावर न्याय घेऊन येण्याचा दोष केला जातो, आणि त्यांना निसर्गात होणारे भयग्रस्त बदल ह्याचे कारण म्हणून लेखले जाते आणि ज्यामुळे संघर्ष आणि पृथ्वीवर धिक्कार करण्यास रक्त सांडले जाते. शेवटल्या इशाऱ्याकडे लक्ष देणारे सामर्थ्य तर दुष्ट लोकांना प्रवृत्त करते; ज्या सर्व लोकांनी संदेश ग्रहण केला त्यांच्या विरुद्ध तो क्रोध उत्तेजित होतो, आणि सैतान तर द्वेष आणि छळ ह्यांचा आत्मा वाढवून कार्य करण्यास उत्तेजित करत आहे.

**(५) ख्रिस्ताच्या दिवसासारखे, शेवटल्या काळात देखील तीच अध्यात्मिक परिस्थिती स्वयं-घोषित अध्यात्मिक बहुसंख्य्क लोक सिद्ध करतील?**

***"हे लोक [तोंड घेऊन माझ्याकडे येतात व] ओठांनी माझा सन्मान करतात,***
***परंतु त्यांचे अंतःकरण माझ्यापासून दूर आहे. ते व्यर्थ माझी उपासना करतात;***
***कारण ते शास्त्र म्हणून जे शिकवतात***
***ते असतात मनुष्याचे नियम."  (मत्तय १५:८-९)***

यहुदी राष्ट्रावरून, याजक आणि लोक देवाचे सान्निध्य शेवटी काढून टाकले गेले. जरी सैतानाच्या नियंत्रणाखाली असून, आणि सर्वात भयंकर आणि पसरणाऱ्या आवेशांनी ग्रासून जाऊन, त्यांनी स्वतःला अजूनही देवाचे निवडलेले म्हणून लेखले. मंदिरातील सेवाकार्य चालू होते; त्या भ्रष्ट वेद्यांवर अर्पणे करण्यात आली, आणि रोज तो दैवी आशीर्वाद अशा लोकांवर ओढ्वण्यात येतो ज्यांच्यावर देवाच्या प्रिय पुत्राच्या रक्ताचा दोष असतो आणि जे त्याचे सेवक आणि प्रेषित ह्यांना ठार मारण्याचा विचार करतात.

म्हणूनच जेव्हा सभास्थानाचा न बदलणारा निर्णय जेव्हा घोषित होतो आणि संपूर्ण विश्वाचे भवितव्य निश्चित केले जाते, पृथ्वीच्या रहिवाश्यांना ते समजत नाही. ज्या लोकांमधून देवाचा आत्मा काढून टाकण्यात आला आहे असे लोक धर्माचे स्वरूप आचरणात आणतात; आणि तो सैतानी आवेश ज्याने दुष्टाईचा नायक त्यांना प्रेरित करेल आणि त्याच्या दुष्ट पसरणाऱ्या कल्पना सिद्ध करेल, ते तर देवासाठी तो आवेश सिद्ध करतील.

**(६) दुष्ट लोक देवासाठी ही एक सेवा आहे, असा विचार करत काय करण्याचा प्रयत्न करतील?**

*ते तुम्हांला सभाबहिष्कृत करतील, इतकेच काय पण तुमचा जीव घेणाऱ्या प्रत्येकाला आपण देवाला सेवा सादर करत आहोत असे वाटेल, अशी वेळ येत आहे. (योहान १६:२)*

*त्या श्वापदाच्या मूर्तीत प्राण घालण्याची त्याला मुभा देण्यात आली; ह्यासाठी की, श्वापदाच्या मूर्तीने बोलावे आणि 'जे कोणी' त्या श्वापदाच्या 'मूर्तीला नमन करणार नाहीत' ते जिवे मारले जावेत असे तिने घडवून आणावे. (प्रगटीकरण १३:१५)*

संपूर्ण ख्रिस्तीत्वात विरोधाचा किंवा वादविवादाचा विशेष मुद्दा शब्बाथ बनला आहे म्हणून, आणि धार्मिक व जगिक अधिकारी एकत्र येऊन रविवारचे पालन करतात, छोट्या लोकांचा जमाव जो साततत्याने ह्या प्रसिद्ध विनवणीच्या प्रती नकार करतो, त्यामुळे हे तर जागतिक तिरस्काराचे साधन बनतात.

अशी विनवणी केली जाते की जे काही लोक मंडळीच्या संस्थेच्या विरुद्ध विरोधात उभे राहतील आणि राज्याचे नियमशास्त्र ह्याला सहन करता येत नाही; त्यांनी दुख सहन करणे चांगले आहे ज्यापेक्षा संपूर्ण राष्ट्रे हे गोंधळ आणि नियमशास्त्रहीनता ह्यात टाकले जातात. हाच वाद अठराशे वर्षांच्या पूर्वी ख्रिस्ताच्या विरोधात "लोकांच्या अधिकाऱ्यांनी मांडला." "हे आपल्यासाठी उद्दिष्टपूर्ण कार्य आहे," असे चपळ कैफाने म्हंटले, "प्रजेसाठी एका मनुष्याने मरावे आणि सबंध राष्ट्राचा नाश होऊ नये हे तुम्हांला हितावह आहे, हेही तुम्ही लक्षात आणत नाही." योहान ११:५०.

हा वाद तर तात्पर्याप्रत आहे असा दिसतो;आणि शेवटी एक आदेश अशा लोकांच्या विरुद्ध सुनावण्यात येईल जे चौथ्या आज्ञेच्या शब्बाथाला पवित्र लेखतात [निर्गम २०:८-११], उलट त्यांचा त्याग करत  असे म्हणत कि ते तर कडक शिक्षेस पात्र आहेत आणि लोकांना, ठराविक काळानंतर, ते स्वातंत्र्य देऊन, त्यांना ठार करतात. जुन्या विश्वातील रोमनिस्म आणि नवीन काळातील धर्मत्यागी प्रोटेसतंतीस्म त्याच समान मार्गाकडे जातात जिकडे सर्व लोक त्या दैवी नियमांचा सन्मान करतात.

**(७) कोणत्या घटनेच्या प्रती हा शेवटल्या दिवसाचा भयंकर विध्वंस जो देवाच्या लोकांच्या विरुद्ध दिसतो त्याची तुलना होते?**

***हायहाय! तो महादिन आहे; त्याच्यासमान दुसरा कोणता नाही; तो याकोबाचा क्लेशसमय आहे तरी त्यातून त्याचा निभाव होईल. (यिर्मया ३०:७)***

याकोबाच्या त्रासाच्या समयाच्या प्रमाणे जसे वर्णन संदेष्टा करतो तसे देवाचे लोक त्याच त्रासाच्या आणि यातनेच्या समयात खेचले जातात. ““परमेश्वर असे म्हणतो, तुम्ही म्हणता आम्ही थरकाप झालेल्यांचा शब्द ऐकला आहे, दहशत आहे, शांती नाही. कोणा पुरुषास प्रसववेदना होत आहेत की काय, हे विचारा; पाहा, प्रत्येक पुरुष प्रसवणाऱ्या स्त्रीप्रमाणे कंबरेला हात देऊन उभा आहे व प्रत्येकाचे तोंड फिक्के पडले आहे असे माझ्या दृष्टीस का पडत आहे? हायहाय! तो महादिन आहे; त्याच्यासमान दुसरा कोणता नाही; तो याकोबाचा क्लेशसमय आहे तरी त्यातून त्याचा निभाव होईल. यिर्मया ३०:५-७. . . याकोबाची संघर्षाची रात्र, जेव्हा एसावाच्या पासून बचाव

होण्यासाठी त्याने प्रार्थनेत झोंबी केली (उत्पत्ती ३२:२४-३०), त्रासाच्या समयी देवाच्या लोकांचा अनुभव ह्याचे प्रतिनिधित्व करतात...

**(८) हा सर्प कोण आहे?**

***मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला, म्हणजे सर्व जगाला ठकवणारा, जो दियाबल व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट 'साप' खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले. (प्रगटीकरण १२:९)***

**(९) जे लोक देवाच्या आज्ञांच्याप्रती प्रामाणिक असतात त्यांच्याप्रती सर्पाची प्रतिक्रिया काय आहे?**

***तेव्हा अजगर स्त्रीवर रागवला आणि देवाच्या आज्ञा पाळणारे व येशू ख्रिस्ताविषयी साक्ष देणारे तिच्या संतानापैकी बाकीचे जे लोक होते त्यांच्याबरोबर लढाई करण्यास तो निघून गेला. (प्रगटीकरण १२:१७)***

सैतानाने एसावाला याकोबाच्या विरुद्ध जाण्यास जसे प्रभावित केले, तसेच त्रासाच्या समयी देवाच्या लोकांचा नाश करण्यासाठी तो दुष्ट लोकांना प्रवृत्त करतो. आणि जसा त्याने याकोबावर दोष लावला, देवाच्या लोकांच्या विरुध्द तो आपले दोष दाखवणार. तो जगाला त्याची प्रजा म्हणून गणित करतो; पण जितकी थोडी लोकांची संख्या आहे ती तर त्याचे वर्चस्व नाकारत असून प्रतिकार करत आहे. पृथ्वीवरून जर तो ह्या लोकांना पुसून टाकू शकेल, तर त्याचा विजय परिपूर्ण होईल. तो पाहतो की पवित्र देवदूत त्यांचे रक्षण करत आहेत, आणि तो तात्पर्य काढतो की त्यांच्या पापांची क्षमा

झाली आहे;पण त्याला माहित नाही की वरील सभास्थानात त्यांच्या बाबींवर निर्णय आधीच झाला आहे. त्या लोकांना जी पापे करण्यास त्याने भाग पाडले ह्याचे त्याला अचूक ज्ञान आहे, आणि सर्वोच्च प्रकाशात देवाच्या समोर ते तो प्रस्तुत करतो, जसे त्याच्या बाबतीत तसेच ह्या लोकांना देखील देवाच्या मर्जीपासून वंचित राहण्यास ते पात्र आहे असे तो व्यक्त करतो. तो घोषणा करतो की प्रभू त्याच्या न्यायात ह्या लोकांच्या पापांची क्षमा करू शकत नाही आणि तरीही त्याला व त्या ह्या दूतांना नष्ट करू शकतो. ते त्याचे भक्ष्य आहेत असे ते सिद्ध करतात आणि नाश करण्यासाठी त्यांच्या हातात सोपवण्याची ते मागणी करतात.

**(१०) ह्या नाशवंत समयी ख्रिस्ती व्यक्तीच्या चारित्र्याच्या कोणत्या महत्वाच्या पैलूची तपासणी होईल?**

***ह्यासाठी की, नाशवंत सोन्याची परीक्षा अग्नीने करतात त्या सोन्यापेक्षा मूल्यवान अशी जी तुमच्या विश्वासाची परीक्षा ती येशू ख्रिस्ताच्या प्रकट होण्याच्या वेळेस प्रशंसा, गौरव व मान ह्यांस कारणीभूत व्हावी, (१ पेत्र १:७)***

*तुम्हांला ठाऊक आहे की, तुमच्या विश्वासाच्या परीक्षेने धीर उत्पन्न होतो. (याकोब १:३)*

देवाच्या लोकांन्ना त्यांच्या पापांचा दोष सैतान लावतो म्हणून, प्रभू त्याला टोकापर्यंत त्यांची परिक्षा घेण्याची परवानगी देतो. त्यांचा देवावरील आत्मविश्वास, त्यांचा विश्वास आणि कडकपणा, ह्याची कठोर रीतीने चाचणी होईल. ते लोक भूतकाळाचा आढावा घेतात तसे, त्यांची आशा बुडतात; कारण त्यांना आयुष्यात खूप कमी चांगले असे दिसते. त्यांना त्यांची दुर्बलता

आणि अपात्रपणा ह्यांची पूर्णपणे जाणीव आहे. सैतान त्यांना ते आशाहीन आहेत हा विचार घालून भयभीत करतो, त्यांच्या अशुद्धतेच डाग हा कधीही धुतला जाणार नाही हे पटवून देतो. त्यांचा विश्वास नष्ट करण्याची त्याची आशा आहे जेणेकरून ते त्याच्या मोहांना शरण जातील आणि देवापासून त्यांचा जो जिव्हाळा आहे त्यापासून वळतात.

**(११) देवाने त्याच्या लेकरांना कोणते अभिवचन दिले आहे, जे लोक विश्वासाने, चिकाटी धरून उभे आहेत?**

*धीराविषयीचे माझे वचन तू राखले आहेस म्हणून पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांची परीक्षा होण्याचा जो परीक्षाप्रसंग सर्व जगावर येणार आहे, त्यापासूनही मी तुला राखीन. (प्रगटीकरण ३:१०)*

*आणि माझ्या नावामुळे सर्व लोक तुमचा द्वेष करतील; तथापि जो शेवटपर्यंत टिकेल तोच तरेल. (मत्तय १०:२२)*

जरी देवाचे लोक शत्रूंनी घेरले गेले आहेत जे त्यांच्या नाशावर टपले आहेत, तरीही ज्या यातना ते सहन करतात तो सत्यासाठी त्यांचा छळ होण्याचा काही धाक नाही; त्यांना भीती आहे की प्रत्येक पापाचा पश्चाताप अजूनही झालेला नाही; आणि त्यांच्या स्वतःमध्ये काहीतरी चुकीकडे पाहता त्यांना तारणार्याचे अभिवचन पूर्ण होताना दिसणार नाही: I “पृथ्वीवर राहणार्या लोकांची परीक्षा होण्याचा जो परीक्षाप्रसंग सर्व जगावर येणार आहे, त्यापासूनही मी तुला राखीन.” **प्रगटीकरण** ३:१०. जर त्यांच्याकडे क्षमा मिळेल हि खात्री असते ते छळ किंवा मृत्यू ह्यापासून मागे हटणार

नाही; पण जर ते अपात्र आहेत असे सिद्ध झाले, आणि चारित्र्याच्या स्वतःच्या कमतरतेमुळे जर आपले प्राण गमावले तर, देवाच्या पवित्र नावाची निर्भत्सना होईल.

देवासमोर स्वतःच्या जीवात्म्यांना ते कष्ट देतात, अनेक पापांचा त्यांचा भूतकाळातील पश्चाताप, आणि अशा रीतीने तारणार्याच्या अभिवचनाचा आर्जव करतात: “पण त्याने माझा आश्रय धरावा; त्याने माझ्याबरोबर दोस्ती करावी, माझ्याबरोबर दोस्ती करावी.” यशया २७:५. त्यांच्या प्रार्थनेची उत्तरे लगेच मिळत नाही म्हणून त्यांचा विश्वास काही अपयशी होत नाही. जरी सर्वात तीक्ष्ण त्रास, भय आणि अस्वस्थता ह्यातून ते जातात, त्यांची मध्यस्थी करण्याचे ते थांबवत नाहीत. ते जसे याकोबाने देवदूताचा धावा केला तसे देवाच्या सामर्थ्याचा धावा करतात; आणि त्यांच्या जीवात्म्याची भाषा असते : “तू मला जोपर्यंत आशीर्वाद देणार नाही, मी तुला सोडणार नाही, जाऊ देणार नाही.”

**(१२) जे लोक देवाच्या नियमशास्त्राकडे दुर्लक्ष करतात आणि पापांची कबुली न देता जीवन जगतात अशा लोकांच्या प्रार्थनेकडे देव कसे पाहतो?**

*नियमशास्त्र कानी पडू नये म्हणून जो आपला कान बंद करतो त्याची प्रार्थनादेखील वीट आणणारी आहे. (नितीसुत्रे २८:९)*

*म्हणून जो कोणी अव्हेर करतो तो माणसाचा नव्हे, तर तुम्हांला आपला पवित्र आत्मा देणारा देव ह्याचा अव्हेर करतो. (१ थेसलोनिकरास ४:८)*

याकोबाने जे पाप केले आणि ज्येष्ठत्वाचा हक्क मिळवला त्यातून जर त्याने पश्चाताप केला

नसता तर, देवाने त्याची प्रार्थना ऐकली नसती आणि दयेने त्याचे जीवन जतन केले नसते. म्हणूनच, त्रासाच्या समयी, देवाच्या लोकांकडे जर कबूल न केलेले पाप असते जेव्हा ते भय आणि त्रास ह्यांनी लोकांसमोर आले असते, त्यांच्यावर ते दडपण आले असते; निराशेने त्यांचे भय हिरावून घेतले असते आणि देवापुढे सुटकेची याचना करण्यासाठी त्यांच्याकडे तो आत्मविश्वास नसता. पण त्यांच्याकडे ती अपात्र असण्याची भावना आहे म्हणून, त्यांना प्रगट करण्यासाठी काहीही लपलेल्या चुकी नाहीत. त्यांची पापे आधीच न्यायासाठी मांडण्यात आली आहेत आणि ती पुसून टाकली गेली आहेत, आणि त्यांना त्याचे स्मरण होत नाही.

**(१३) जे लोक छोट्या गोष्टीत विश्वासू असतात त्यांना कसे प्रतिफळ देव देतो?**

*त्याला त्याच्या धन्याने म्हटले, 'शाबास, भल्या व विश्वासू दासा, तू थोडक्या गोष्टीत विश्वासू राहिलास, मी तुझी पुष्कळावर नेमणूक करीन; तू आपल्या धन्याच्या आनंदात सहभागी हो.' (मत्तय २५:२१)*

सैतान अनेकांना विश्वास ठेवण्यास भाग पाडतो की जीवनाच्या छोट्या बाबींमध्ये देव त्यांच्या अविश्वासूपणाकडे दुर्लक्ष करेल; पण प्रभू ज्या रीतीने याकोबाशी वागतो त्यात तो दाखवतो की तो कोणत्याही रीतीने दुष्टाईला सहन करणार नाही. जे सर्व त्यांची पापे लपवण्याचा किंवा त्याला सबब म्हणून देण्याचा प्रयत्न करतात, आणि त्यांना स्वर्गाच्या पुस्तकात राहण्याची परवानगी देतात, कबूल न करता आणि क्षमा न मिळवता, सैतान त्यांच्यावर विजय मिळवेल. जितका त्यांचा व्यवसाय उच्च करण्यात येतो आणि जे स्थान ते पत्करतात ते

सन्माननीय आहे म्हणून, देवाच्या दृष्टीने त्यांचे ते कार्य तितकेच गंभीर असते आणि त्यांच्या महान शत्रूचा विजय होण्याची खात्री तितकीच असते. देवाच्या दिवसासाठी जे तयारी करण्यास विलंब लावलतात त्यांना त्रासाच्या दिवसात किंवा कोणत्याही अशा समयी ते मिळत नाही. अशा सर्व लोकांची बाब ही आशाहीन असते.

**(१४) खऱ्या पश्चातापाचे फळ काय आहे?**

***मी आपला दोष पदरी घेतो; माझ्या पापामुळे मी खिन्न आहे. (स्तोत्रसहिता ३८:१८)***

***तुम्हांला आपल्या दुष्कर्माचे व अनाचाराचे स्मरण होईल; तुमचे अधर्म व अमंगळ कृत्ये ह्यांमुळे तुमचा तुम्हांलाच वीट वाटेल. (यहज्केल ३६:३१)***

जे स्वतःला ख्रिस्ती म्हणवतात ते तयारी न करता स्वेच्छेने त्या शेवटल्या भयग्रस्त वादात येतात, त्यांच्या निराशेत, जळत्या त्रासाच्या आणि यातनेच्या शब्दात पापाची कबुली देतात, आणि तसेच दुष्ट लोक त्यांच्या नैराश्येत जोर करतात. एसाव किंवा यहुदाच्या बाबतीत जसे होते तशाच ह्या कबुली देखील त्याच चारित्र्याच्या आहेत. जे त्यांना करतात, अधर्माच्या परिणामावर शोक करतात, त्याच्या दोषावर नाही. त्यांना खरी दिलगिरी वाटत नाही, दुष्टाईचा तिरस्कार ते करतात. ते त्यांचे पाप कबूल करतात, शिक्षेच्या भीतीमुळे; पण जसे फारो प्रमाणे , जर न्याय प्रसंग काढून टाकण्यात आला तर ते स्वर्गाची उघड अवज्ञा करतील.

**(१५) जर खरा पश्चाताप करण्याने आपण प्रभूकडे परत गेलो, अग्निमय यातना सहन करण्याचा परिणाम काय होईल?**

*ह्यासाठी की, नाशवंत सोन्याची परीक्षा अग्नीने करतात त्या सोन्यापेक्षा मूल्यवान अशी जी तुमच्या विश्वासाची परीक्षा ती येशू ख्रिस्ताच्या प्रकट होण्याच्या वेळेस प्रशंसा, गौरव व मान ह्यांस कारणीभूत व्हावी, (१ पेत्र १:७)*

याकोबाचा इतिहास ही देखील खात्री आहे की देव ज्यांची फसवणूक झाली आहे ज्यांची परीक्षा झाली आहे आणि पापात त्यांचा विश्वासघात झाला आहे त्यांना सोडणार नाही, पण जे लोक खरा पश्चाताप करून त्याच्याकडे परतले आहेत. सैतान ह्या वर्गाला नष्ट करण्याचे पाहतो म्हणून, देव त्याच्या देवदूतांना नाशाच्या वेळी त्यांचे सांत्वन करून सौरक्षण करण्यास पाठवेल. सैतानाचे हल्ले हे गंभीर आणि निश्चित आहेत, त्याचे भ्रम हे भयंकर आहेत; पण प्रभूची नजर ही त्याच्या लोकांवर आहे, आणि तो त्यांच्या रडण्याकडे कान देतो. त्यांची यातना महान आहे, भट्टीच्या ज्वाला त्यांना भस्म करण्यास तयार आहेत; पण शुद्ध करणारा त्यांना जसे सोने भट्टीतून बाहेर पडते तसे त्यांना देखील बाहेर काढेल. देवाचे त्याच्या लेकरांवर त्यांच्या कठोर अशा परीक्षेच्या वेळी असलेले प्रेम तसेच बळकट आणि मृदू असे दाखवतो जसे ते त्यांच्या चमकत्या समृद्धीच्या दिवसात असते; पण त्यांना त्या अग्नीच्या भट्टीत टाकणे आवश्यक होते; त्यांचे पृथ्वीवर असणे भस्म झाले पाहिजे,जेणेकरून ख्रिस्ताची प्रतिमा हि परावर्तीत होईल.

**(१६) कोणत्या प्रकारच्या प्रार्थना खूप फायदेशीर ठरतात?**

*तेव्हा तुम्ही निरोगी व्हावे म्हणून आपली पातके एकमेकांजवळ कबूल करून एकमेकांसाठी*

*प्रार्थना करा. नीतिमानाची प्रार्थना कार्य करण्यात फार प्रबळ असते. (याकोब ५:१६)*

त्रास आणि यातना ह्यांचा जो ऋतू आपल्यापुढे आहे त्यातून अशा विश्वासाची अपेक्षा होते जो सर्व थकवा, विलंब आणि भूक हे सहन करतील- एक विश्वास ज्याची परीक्षा झाली तरीही कमी पडणार नाही. हा तयारीचा समय सगळयांना देण्यात येतो. याकोब टिकून राहू शकला कारण त्याने चिकाटी ठेऊन दृढनिश्चय दाखवला. त्याचा विजय म्हणजे अत्याग्रही प्रार्थनेच्या सामर्थ्याचा पुरावा आहे. जे सर्व देवाच्या अभीवचनांवर विश्वास ठेवतील, जसे त्याने केले, आणि तितकाच उत्साही आणि चिकाटीपूर्ण असून, तो विजयी होईल जसा तो विजयी झाला. जे लोक स्वतःचा त्याग करण्यास तयार नसतात, देवासमोर ती यातना प्रस्तुत करतात, लांबलचक प्रार्थना करत त्याचे आशीर्वाद उत्साहाने मिळवत, ते त्यांना मिळणार नाही. देवासोबत झोंबी करत- किती कमी लोकांना काय आहे ते समजते! किती कमी लोकांनी आपले जीवात्मे देवाच्या मागे त्या इच्छेला मनात ठेऊन बाळगतात जोपर्यंत प्रत्येक शक्ती ही ताणली जात नाही. जेव्हा निराशेच्या ह्या लाटा याचना सहन करणाऱ्या लोकांवर येतात ज्याचे वर्णन कोणतीही भाषा करू शकत नाही, कशा रीतीने काही लोक शरण न जाणाऱ्या विश्वासाने देवाच्या अभिवचनांना चिकटून राहतात.

**(१७) खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीची जीवनी दोर काय आहे, आता आणि येणाऱ्या नाशाच्या समयासाठी देखील?**

*कारण तिच्यात देवाचे नीतिमत्त्व विश्वासाने विश्वासासाठी प्रकट झालेले आहे; "नीतिमान विश्वासाने जगेल" ह्या शास्त्रलेखाप्रमाणे हे आहे." (रोमकरास पत्र १:१७)*

*नियमशास्त्राच्या योगे देवापुढे कोणी नीतिमान ठरवण्यात येत नाही हे उघड आहे; कारण "नीतिमान विश्वासाने जगेल." (गलतीकरास पत्र ३:११)*

जे लोक आता कमी विश्वास आचरणात आणतात, ते सैतानाच्या भ्रमांच्या त्या शक्तीच्या अधीन जाण्याच्या धोक्यात अधिक असतात आणि विवेकाला पाचारण करण्याचा नियम त्यांच्यावर लागू पडतो. आणि जरी ती परीक्षा त्यांनी सहन केली, त्रासाच्या समयी अधिक खोलवर त्रास आणि यातना ह्यांच्यात ते खेचले जातात, कारण देवावर विश्वास ठेवण्याची त्यांनी सवय केली नाही. विश्वासाच्या ज्या धड्यांकडे त्यांनी दुर्लक्ष केले , निराशेचे भयंकर तणावाखाली शिकण्याची जबरदस्ती त्यांच्यावर करण्यात येईल.

**(१८) आपली विश्वासाची जीवनी दोर राखण्याची गुरुकिल्ली काय आहे?**

*निरंतर प्रार्थना करा, (१ थेसलोनिकरास ५:१७)*

आता देवाची अभिवचने सिद्ध करत आपण त्याच्याशी अधिक परिचित होणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रार्थना जी उत्कंठेने आणि प्रामाणिकपणे केली गेली आहे त्याची नोंद देवदूत ठेवतात. देवाशी संधान साधण्याकडे दुर्लक्ष करण्याच्या ऐवजी आपण प्रत्येक स्वार्थी मतप्रणाली नाकारून त्याग केल्या पाहिजेत.

सगळयात खोल स्थित दारिद्र्य, सर्वात थोर आत्म-त्याग, त्याच्या परवानगीने जो करण्यात येतो, हे तर धन, संपत्ती, सन्मान, सहजता आणि मैत्री ह्यापेक्षा चांगले आहे. प्रार्थना करण्यास आपण वेळ घालवला पाहिजे. आपल्या मनात जर जगिक गोष्टींना आपण घर करू दिले तर, प्रभू आपल्यामधून सोन्याच्या मूर्ती, सुपीक जमीन किंवा घरे हे काढून घेऊन आपल्याला समय देईल.

**(१९) आपली अध्यात्मिक जीवनी दोर राखण्यासाठी आपण कुटुंब, मित्रपरिवार, किंवा धार्मिक पुढारी ह्यांच्यावर का विसंबून राहू शकत नाही?**

***म्हणून माझ्या प्रिय जनहो, जे तुम्ही सर्वदा आज्ञापालन करत आला आहात, ते तुम्ही, मी जवळ असता केवळ नव्हे तर विशेषेकरून आता, म्हणजे मी जवळ नसताही, भीत व कापत आपले तारण साधून घ्या; (फिलीप्पेकरास पत्र २:१२)***

"त्रासाचा समय, जसा कधीही नव्हता," तो लवकरच आपल्यावर येणार आहे; आणि आपल्याला असा एक अनुभव पाहिजे जो आता आपल्याकडे नाही आणि जे अनेक मिळवून घेण्यासाठी खूप सुस्त आहेत. बरेचदा अशी बाब दिसते कि प्रत्यक्षात आहे त्यापेक्षा त्रासाची आपण जास्त अपेक्षा करू शकतो; पण आपल्यासमोर जी समस्या आहे त्याविषयी हे काही खरे नाही. सर्वात ठळक अशी मांडणी त्या दिव्य कसोटीपर्यंत पोहचू शकत नाही. त्या परीक्षेच्या काळात, प्रत्येक जीवात्म्याने स्वतःसाठी देवासमोर उभे राहिले पाहिजे. "तर प्रभू परमेश्वर म्हणतो, माझ्या जीविताची शपथ, नोहा, दानीएल व ईयोब हे त्यात असले तरी

त्यांना पुत्राचा किंवा कन्येचा बचाव करता येणार नाही; ते आपल्या नीतिमत्तेमुळे फार तर आपला जीव वाचवतील.” यहज्केल १४:२०.

**(२०) देवाच्या सामर्थ्यासोबत जर आपण आपली ताकत एकवटली तर, कोणत्या प्रकारचा स्वभाव मिळवणे आपल्यासाठी शक्य आहे?**

***त्यांच्या योगे मोलवान व अति महान अशी वचने आपल्याला देण्यात आली आहेत, ह्यासाठी की, त्यांच्या द्वारे तुम्ही वासनेपासून उत्पन्न होणारी जगातील भ्रष्टता चुकवून ईश्वरी स्वभावाचे वाटेकरी व्हावे. (२ पेत्र १:४)***

ह्याच जीवनात आपण पापाला वेगळे करायचे आहे, विश्वासाच्या द्वारे येशू ख्रिस्ताच्या शुद्ध करणाऱ्या रक्ताच्या द्वारे. आपला अनमोल तारणारा आपल्याला त्याच्याशी एकजूट होण्याचे आमंत्रण देतो, आपली दुर्बलता त्याच्या सामार्थ्याशी जोडण्यास सांगतो, आपली अज्ञानता त्याच्या सुज्ञानाशी, आपली अपात्रता त्याच्या पात्रतेशी एकत्र जोडण्यास सांगतो. देवाचा पुरवठा म्हणजे ती शाळा आहे ज्यामध्ये येशूची नम्रता आणि दिनता हे आपल्याला शिकायचे आहेत. प्रभू तर आपल्यासमोर तयार आहे, आपण निवडतो त्या पद्धतीने नाही, जी आपल्याला सोपी आणि चांगली वाटते, पण त्यात जीवनाचे खरे ध्येय असतात. आपल्यावर आता जवाबदारी आहे की आपण स्वर्ग जे माध्यम प्रस्तुत करते त्यासोबत सहकार्य करावे आणि आपली चारीत्र्ये त्या दैवी नमुन्याशी जोडून घ्यावी. कोणीही ह्या कार्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही किंवा त्याकडे कानाडोळा करू शकत नाही नाहीतर त्यांच्या जीवात्म्याचा नाश हा अटळ आहे.

**(२१) जमावाला फसवण्यासाठी सैतान आणि त्याचे दुष्ट दूत कोणत्या तीन योजना अवलंबेल?**

***त्यामुळे त्यांच्यासाठी सैतानाच्या कृतीप्रमाणे सर्व प्रकारची खोटी महत्कृत्ये, चिन्हे, अद्‌भुते आणि सर्व प्रकारचे अनीतिजनक कपट ह्यांनी युक्त असे त्या अनीतिमानाचे येणे होईल, (२ थेसलोनिकरास पत्र २:९ )***

अलौकिक चारित्र्याचे दृश्य लवकरच स्वर्गात प्रगट होतील, चमत्कार- करणाऱ्या भुतांच्या सामर्थ्याचे प्रात्यक्षिक म्हणून ते दिसते. भूतांचे आत्मे पृथ्वीवरील राजांमध्ये आणि संपूर्ण जगात जातील, त्यांना फसवणुकीत अडकवण्यास, आणि सैतानाचा जो अंतिम संघर्ष आहे स्वर्गाच्या शासनाच्या विरुद्ध त्याच्यात एकवटून जाण्याची विनवणी करतात. ह्या दूतांच्या द्वारे, अधिकारी आणि प्रजा हे समान रीतीने फसवले जातील. लोक स्वतः ख्रिस्त होण्याचे भासाव्तील, आणि जगाच्या उद्धारकाचे जे शीर्षक आणि आराधना आहेत ते स्वतःसाठी सिद्ध करतील. ते आरोग्याचे अद्‌भुत चमत्कार करतील आणि शास्त्रवचनाच्या विरुद्ध साक्ष त्यांची आहे तसे त्यांना स्वर्गातून प्रगटीकरण मिळाले असे सिद्ध करतील.

**(२२) फसवणुकीची मुकुटमंडित कृती काय आहे?**

***कारण खोटे ख्रिस्त व ‘खोटे संदेष्टे’ उठतील व साधेल तर  वडलेल्यांनादेखील फसवावे म्हणून मोठी ‘चिन्हे व अद्‌भुते दाखवतील. (मत्तय २४:२४)***

फसवणुकीच्या महान नाटकात एक मुकुटमंडित कृती म्हणून, सैतान स्वतःला ख्रिस्त आहे असे भासवेल. मंडळीने खूप काळापासून

तिच्या आशेची पूर्तता म्हणून तारणार्याचे पुनरागमन ह्याकडे पाहिले आहे. आता महान फसवणारा असे दाखवेल की ख्रिस्त हा आला आहे. पृथ्वीच्या विभिन्न भागात, सैतान लोकांमध्ये स्वतःला प्रज्वलित प्रकाशाने युक्त, योहान प्रगटीकरण ह्यात देवाच्या पुत्राचे कसे वर्णन करतो तसे स्वतःला प्रस्तुत करेल **प्रगटीकरण** १:१३-१५. जे वैभव त्याच्याभोवती आहे जे कोणत्याही मर्त्य डोळयांनी आज पर्यंत बघितले नाही. विजयाचा जयघोष संपूर्णपणे ऐकू येत आहे: “ख्रिस्त आला आहे! ख्रिस्त आला आहे!” लोक त्याच्यासमोर आदरभावाने नतमस्तक होतात, तो आपले हात उंच करून त्यांच्यावर आशीर्वादाची घोषणा करतो, ख्रिस्त पृथ्वीवर असताना ज्या रीतीने त्याने आपल्या शिष्यांना आशीर्वादित केले होते तसे. त्याची वाणी मंद आणि मृदू आहे, तरीही त्यात गोडवा आहे.

सौम्य, दयाळू अशा आवाज पट्टीत तो काही कृपाळू, स्वर्गीय सत्य प्रस्तुत करतो जे तारणार्याने उद्गृत केले; तो लोकांचे आजार बरे करतो, आणि मग, ख्रिस्ताचे चारित्र्य जे त्याने गृहीत धरले, त्याने शब्बाथ रविवारी बदलला असे सिद्ध करतात, आणि जो दिवस त्याने आशीर्वादित केला तो सर्वांनी पवित्र पाळावा अशी आज्ञा करतो. तो घोषणा करतो की जे लोक सातवा दिवस पवित्र पाळण्यात टिकाव धरून राहतात ते त्याच्या नावाची निंदा करतात कारण जे त्याचे देवदूत त्यांच्याकडे प्रकाश आणि सत्य घेऊन पाठवले होते त्यांचे देखील ते ऐकत नाहीत. हा तर बलवान, जवळ जवळ वरचढ असा भ्रम आहे. शिमोन मेगस ह्यांनी जसे शोम्रोनी लोकांना फसवले,

लहानापासून थोरापर्यंत, ते ह्या जादूटोण्याकडे कान देऊन ऐकतात:ती आहे “जिला देवाची महाशक्ती म्हणतात ती हा आहे.” प्रेषित ८:१०.

**(२३) देवाचे लोक फसवले जाण्यापासून त्यांना काय परावृत्त करेल?**

***नियमशास्त्र व साक्ष ह्यांकडे पाहा! ह्याप्रमाणे ते न बोलल्यास त्यांच्यासाठी निश्चये प्रभातसमय नाही. (यशया ८:२०)***

पण देवाच्या लोकांची दिशाभूल होणार नाही. ह्या खोट्या ख्रिस्ताच्या शिकवणी शास्त्रवचनाच्या अनुसार नाहीत. त्याचे आशीर्वाद श्वापद आणि त्याची प्रतिमा ह्याच्या आराधकांवर उदृत होतात, तोच वर्ग ज्यांच्यासाठी पवित्र शास्त्र घोषित करते की देवाचा अमिश्रीत क्रोध ओतला जाईल.

**(२४) खऱ्या ख्रिस्ताचे आगमन कोणत्या रीतीने होईल?**

***तेव्हा मनुष्याच्या पुत्राचे चिन्ह आकाशात प्रकट होईल; मग ‘पृथ्वीवरील सर्व जातींचे लोक शोक करतील’ आणि ते ‘मनुष्याच्या पुत्राला आकाशातल्या मेघांवर आरूढ होऊन’ पराक्रमाने व मोठ्या वैभवाने ‘येताना’ पाहतील; ‘कर्ण्याच्या महानादाबरोबर’ तो आपल्या दूतांना पाठवील, आणि ‘ते आकाशाच्या एका सीमेपासून दुसऱ्या सीमेपर्यंत’ त्याच्या निवडलेल्यांना ‘चाऱ्ही दिशांकडून जमा करतील.’ (मत्तय २४:३०-३१)***

सैतानाला ख्रिस्ताच्या पुनरागमनाची नकळ करण्याची परवानगी नाही. ह्या स्तराच्या फसवणुकीसाठी तारणार्याने त्याच्या लोकांना इशारा दिला आहे, आणि स्पष्टपणे त्याचे दुसरे येणे कसे होईल ह्याविषयी सांगितले आहे. “कारण खोटे ख्रिस्त व ‘खोटे संदेष्टे’ उठतील व साधेल तर निवडलेल्यांनादेखील फसवावे म्हणून मोठी ‘चिन्हे व अद्‌भुते दाखवतील.’... ह्यास्तव कोणी तुम्हांला म्हणतील, ‘पाहा, तो अरण्यात आहे,’ तर जाऊ नका; तुम्हांला म्हणतील, ‘पाहा, तो आतल्या खोल्यांत आहे,’ तर ते खरे मानू नका. कारण जशी वीज पूर्वेकडून निघून पश्चिमेपर्यंत चकाकत जाते तसे मनुष्याच्या पुत्राचे येणे होईल.” मत्तय २४:२४-२७, ३१; २५:३१; प्रगटीकरण १:७; १ थेसलोनिकरास पत्र ४:१६, १७. ह्या येण्यासाठी कोणत्याही प्रकारची नकळ होणे शक्य नाही. ते जागतिक स्तरावर जाणले जाईल- आणि संपूर्ण जग त्याचे साक्षीदार बनतील.

## (२५) बहुसंख्यक लोक का फसवले जातील?

***ज्यांचा नाश होत चालला आहे त्यांनी आपले तारण साधावे म्हणून सत्याची आवड धरायची ती धरली नाही. (२ थेसलोनिकरास पत्र २:१०)***

केवळ जे लोक शास्त्रवचनाचे मेहनती विद्यार्थी झाले आहेत आणि ज्यांना सत्याचे प्रेम प्राप्त झाले तेच केवळ ह्या महान भ्रमापासून सुरक्षित राहतील ज्याने संपूर्ण जगाला बंदिवान करून ठेवले आहे. पवित्र शास्त्राच्या साक्षीने हे वेष्यांतर केलेल्या फसवणाऱ्याला देखील पटकन ओळखतील.

## (२६) कोणत्या तीन जाळयांना आपण टाळावे असा इशारा आपल्याला देण्यात आला आहे?

*कारण जगात जे सर्व आहे ते, म्हणजे देहाची वासना, डोळ्यांची वासना व संसाराविषयीची फुशारकी, ही पित्यापासून नाहीत, तर जगापासून आहेत; (१ योहान २:१६)*

सर्वांसाठी हा परीक्षेचा समय येणारच. ह्या मोहाला जणूकाही चाळण लावून खरा ख्रिस्ती प्रगट होईल. देवाचे लोक आता इतक्या भक्कमपणे त्याच्या वचनावर स्थित आहेत का ते त्यांच्या संवेदनांच्या पुराव्याला शरण जाणार नाहीत? अशा परिस्थितीत, ते पवित्र शास्त्र आणि केवळ पवित्र शास्त्र ह्यालाच चिकटून राहतील का? शक्य असल्यास, सैतान त्यांना त्या दिवसासाठी अढळ उभे राहण्यास तयारी करू देणार नाही. तो सर्व परिस्थिती अशी बदलून टाकेल कि त्यांच्या मार्गात अडचणी येतील, पृथ्वीवरील धन आणि खजिन्यात त्यांना असे गुरफटून टाकेल, जड थकणारे ओझे त्यांना वहावयास लावेल, की त्यांच्या हृदये ह्या जीवनाच्या चिंता आणि काळज्या ह्यांनी ग्रस्त होतील आणि त्रासाचा दिवस त्यांच्यावर एका चोराप्रमाणे येऊन गुदरेल.

**(२७) ह्या त्रासाच्या महाभयंकर समयी देवाचे विश्वासू लोक कोठे आश्रय शोधतील?**

*तो उच्च स्थानी वास करील, दुर्गम पहाड त्याचा दुर्ग होईल, त्याला अन्नाचा मुबलक पुरवठा होईल, त्याचे जल आटणार नाही. (यशया ३३:१६)*

जशा ख्रिस्तीत्वाच्या अनेक अधिकाऱ्यांनी आज्ञापालन करणाऱ्यांवर नियम लावले ते सरकारचे सौरक्षण मागे घेतील आणि जे लोक त्यांचा नाश होण्याची इच्छा धरतात त्यांना सोडून टाकतील, देवाचे लोक शहरे आणि

गावातून पळ काढून एकत्र जमावात येतील, सर्वात एकाकी आणि शांत ठिकाणी वस्ती करतील. अनेक लोक पर्वतांवर आपला आश्रय शोधतील. पिडमोंट खोऱ्यातील ख्रिस्ती लोकांसारखे, पृथ्वीवरील उंच भागांना ते सभास्थाने बनवतील आणि देवाचे आभार मानतील "खडकांच्या युद्धसामग्रीसाठी."

**(२८) विश्वासासाठी अनेक जण तुरुंगवास सहन करतात, ते कोणते अभिवचन सिद्ध करू शकतात?**

*"स्त्रीला आपल्या पोटच्या मुलाची करुणा येणार नाही एवढा तिला आपल्या तान्ह्या बाळाचा विसर पडेल काय? कदाचित स्त्रियांना विसर पडेल, पण मी तुला विसरणार नाही. पाहा, मी तुला आपल्या तळहातांवर कोरून ठेवले आहे; तुझे कोट नित्य माझ्या दृष्टीसमोर आहेत. (यशया ४९:१५-१६)*

*ह्यास्तव इस्राएलाचा देव परमेश्वर म्हणतो, तुझे घराणे व तुझ्या बापाचे घराणे माझ्यासमोर निरंतर चालू राहील असे मी म्हटले होते खरे, पण आता परमेश्वर म्हणतो, असे माझ्या हातून न घडो; कारण जे माझा आदर करतात त्यांचा मी आदर करीन आणि जे मला तुच्छ मानतात त्यांचा अवमान होईल. (१ शमुवेल २:३०)*

पण सर्व राष्ट्रे आणि सर्व वर्ग, उच्च आणि नीच, श्रीमंत आणि गरीब, काळे आणि गोरे, ह्यांना सर्वात अन्यायी आणि कृत अशा बंधनात टाकण्यात येईल. देवाचे प्रिय लोक ह्या थकलेल्या दिवसांतून जातात, साखळ्यांनी बंदिस्त होऊन, तुरुंगाच्या आड होतात, त्यांचा वध होण्याची सुनावणी केली जाते, अंधाऱ्या

आणि कठोर कोठडीत उपासमार होण्यासाठी त्या मरणावस्थेत त्यांना सोडून दिले जाते. कोणत्याही मनुष्याचा कान त्यांचे कन्हने ऐकण्यास तयार नसतो; कोणताही मानवी हस्त त्यांना मदत करण्यास तयार नसतो.

ह्या परीक्षेच्या काळात प्रभू आपल्या लोकांना विसरेल का? ह्या भयंकर विश्वावर जेव्हा न्याय ओढवला तेव्हा त्याला विश्वासू नोहाचा विसर पडला का? त्या सखल भागातील शहरात जेव्हा स्वर्गातून अग्नी उतरला त्या शहरांचा नाश करण्यासाठी तेव्हा त्याला लोटाचा विसर पडला का? योसेफ जेव्हा मूर्तिपूजक लोकांच्या भोवती मिसर देशात होता तेव्हा देवाला त्याचा विसर पडला का? एलीयाला देव विसरला का जेव्हा इज्बेल राणीच्या शपथेने त्याला धाकात टाकले आणि बाल संदेष्ट्यांचे जे झाले तसे तुझे देखील होईल असा धाक दिला? तुरुंगाच्या अंधार्या कोठडीत त्याला यीर्मयाचा विसर पडला का? अग्नीच्या भट्टीत त्या तिघांना देव विसरला का? किंवा सिंहाच्या गुहेत दानियेलाला विसरला का?

जरी शत्रू त्यांना तुरुंगात टाकतील, तरीही त्याच्या भिंती ख्रिस्त आणि त्यांच्या जीवात्म्यांचे संभाषण हे थांबवू शकत नाहीत. जो त्यांची प्रत्येक दुर्बलता बघतो, जो प्रत्येक परीक्षेशी परिचित आहे, तो सर्व पृथ्वीवरील शक्तीच्या वर आहे; देवदूत त्यांना एकाकी कक्षेत येऊन भेट देतील, स्वर्गातून ते प्रकाश आणि शांती घेऊन येतील. तुरुंग एक महालासारखा होईल; कारण श्रीमंत लोक विश्वासाने तिकडे राहतात, आणि अंधार्या भिंती स्वर्गीय प्रकाशाने प्रकाशित होतील ज्याप्रमाणे पौल आणि सिलाने प्रार्थना केली आणि त्या फिलिपि कारकोठडीत मध्यरात्री स्तुती आणि आराधना केली.

## (२९) देव दुष्टांवर न्याय ओढवतो ह्या कृतीचे वर्णन ह्या वचनातून कसे होते?

***परमेश्वर आपले कार्य, आपले अपूर्व कार्य करण्यास, आपली कृती, आपली विलक्षण कृती सिद्धीस नेण्यास परासीम डोंगरावर उठल्याप्रमाणे उठेल, गिबोन खोऱ्यातल्याप्रमाणे क्षुब्ध होईल. (यशया २८:२१)***

जे लोक देवाच्या लोकांचा छळ करून त्यांचा नाश करू इच्छितात त्यांच्यावर देवाचा न्याय ओढवेल. दुष्टांना खूप काळ सहन करण्याचा त्याचा स्वभाव त्यामुळे लोक अधर्मात पडतात, पण तरीही त्यांची शिक्षा ही निश्चित आणि भयंकर आहे कारण त्याला खूप विलंब लागला आहे. . . . आपल्या दयाळू प्रभूसाठी शिक्षेची कृती एक विचित्र भावना आहे. “प्रभू परमेश्वर म्हणतो, माझ्या जीविताची शपथ, कोणी दुर्जन मरावा ह्यात मला काही संतोष नाही.” यहज्केल ३३:११.

“परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर.... अन्याय , अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा,तरी तो पाप्यांना शासन केल्यावाचून राहणार नाही;निर्गम ३४:६,७ ; नहूम १:३.

नितीमत्वात भयंकर गोष्टींनी त्याच्या उल्लंघन झालेल्या नियमशास्त्राच्या अधिकाराचे समर्थन करतो. ज्या अधर्माने पाप केले त्याच्या शिक्षेची तीव्रता ही प्रभूच्या न्याय करण्याच्या नकारात दिसून येते. ज्या राष्ट्राचे त्याने खूप काळ सहन केले, आणि देवाच्या हिशोबात जोपर्यंत त्याचे अधर्म बसत नाही आणि पूर्ण होत नाही तोपर्यंत तो त्यांचे शासन करणार नाही, शेवटी तो ह्या प्याल्याचे सेवन करेल जो क्रोधाने ज्यात दया अजिबात मिसळलेली नाही असा भरलेला आहे.

(३०) ज्या लोकांवर अवज्ञा केल्याचे चिन्ह आहे ते कोणत्या सात भयंकर पिडांचा न्याय अनुभवतील?

*तेव्हा पहिल्याने जाऊन आपली वाटी पृथ्वीवर ओतली तेव्हा त्या श्वापदाची खूण धारण केलेल्या आणि त्याच्या मूर्तीला नमन करणाऱ्या 'लोकांना' वाईट व 'घाणेरडे फोड आले.' (प्रगटीकरण १६:२)*

*दुसऱ्याने आपली वाटी समुद्रात ओतली, तेव्हा 'समुद्र' मृत माणसाच्या रक्तासारखा 'रक्तमय झाला' आणि 'त्यातील' सर्व प्राणी 'मरून गेले.' (प्रगटीकरण १६:३)*

*तिसऱ्याने आपली वाटी 'नद्या' व पाण्याचे झरे ह्यांत ओतली, 'आणि त्यांचे रक्त झाले.' (प्रगटीकरण १६:४)*

*चौथ्याने आपली वाटी सूर्यावर ओतली; आणि सूर्याला अग्नीच्या योगे माणसांना करपवून टाकण्याची मुभा देण्यात आली. (प्रगटीकरण १६:८)*

*पाचव्याने आपली वाटी श्वापदाच्या आसनावर ओतली, तेव्हा त्याचे राज्य 'अंधकारमय झाले,' आणि लोकांनी वेदनांमुळे आपल्या जिभा चावल्या. (प्रगटीकरण १६:१०)*

*सहाव्याने आपली वाटी 'फरात महानदावर' ओतली तेव्हा 'सूर्याच्या उगवतीपासून' येणाऱ्या राजांची वाट सिद्ध व्हावी म्हणून त्याचे 'पाणी आटून गेले.' (प्रगटीकरण १६:१२) तेव्हा 'विजा चमकल्या, गर्जना व मेघांचे गडगडाट' झाले. शिवाय इतका मोठा भूमिकंप झाला की 'पृथ्वीवर' मानव 'झाल्यापासून'*

*इतका मोठा भूमिकंप ‘कधी झाला नव्हता.’(प्रगटीकरण १६:१८)*

जेव्हा ख्रिस्त त्याची मध्यस्थी सभास्थानात थांबवतो, जे लोक श्वापद आणि त्याच्या प्रतिमेची आराधना करतात त्यांच्यावर हा अमिश्रीत क्रोध उतरतो आणि त्याला ते चिन्ह मिळते (**प्रगटीकरण** १४:९,१०), आणि तो ओतला जातो. मिसर देशावरील पिडा जेव्हा देव इस्राएलाची सुटका करणार होता ते ह्या जगावर जे न्याय येणार आहे देवाच्या लोकांची अंतिम सुटका होण्यापूर्वी त्याच्याशी खूप साम्य दाखवतात.

...ह्या यातना जशा भयंकर आहेत, देवाच्या न्यायचे पूर्ण समर्थन होते. देवाचा दूत घोषणा करतो: ““हे प्रभू, ‘जो तू पवित्र आहेस, होतास व असणार’, त्या तू असा न्यायनिवाडा केलास म्हणून तू ‘न्यायी’ आहेस; कारण त्यांनी पवित्र जनांचे व संदेष्ट्यांचे ‘रक्त पाडले’ आणि तू ‘त्यांना रक्त पिण्यास’ लावले आहे; ह्यास ते पात्र आहेत.” **प्रगटीकरण** १६:२-६. देवाच्या लोकांना मृत्युप्रत दोषी ठरवून, त्यांनी रक्ताचा दोष स्वतःवर ओढवून घेतला आहे जणूकाही त्यांच्या हातून तो रक्तपात झाला होता. त्याच पद्धतीने ख्रिस्ताने त्या काळातील यहुदी लोकांना देखील सर्व पवित्र लोकांच्या रक्ताबद्द्ल दोषी ठरवले जे हाबेलाच्या काळापासून सांडण्यात आले होते; कारण त्यांच्या ठायी तोच आत्मा होता आणि ह्या संदेष्ट्यांच्या खूनी लोकांसोबत त्यांना तेच काम करायचे होते.

ह्या पिडा जागतिक नाहीत, नाहीतर पृथ्वीवरील रहिवासी उखडले गेले असते. तरीही मर्त्य मनुष्याने आतापर्यंत सहन केले नसतील इतके भयंकर त्या पिडा आहेत.

मनुष्यांवरील सर्व न्याय, त्या समाप्तीच्या काळाच्या समीप, दयेने मिश्रित आहेत. ख्रिस्ताचे विनवणी करणारे रक्त पापी व्यक्तीला त्याच्या दोषाचे पूर्ण प्रमाण मिळवण्यापासून बचाव करते; पण अंतिम न्यायात, क्रोध ज्यात दया मिश्रित नाही हा ओतला जातो.

**(३१) जेव्हा दुष्ट लोकांची उपासमार होईल तेव्हा विश्वासू लोकांना काय बचावून ठेवेल?**

***जो धर्माने चालतो, सरळ भाषण करतो, जुलूम करून होणारा लाभ अव्हेरतो, लाच घेण्यापासून आपला हात आवरतो, घातपाताच्या मनसुब्याला आपले कान बंद करतो, दुष्कर्माला आपले डोळे मिटतो, तो उच्च स्थानी वास करील, दुर्गम पहाड त्याचा दुर्ग होईल, त्याला अन्नाचा मुबलक पुरवठा होईल, त्याचे जल आटणार नाही; (यशया ३३:१५-१६)***

देवाचे लोक दुखसहन करण्यापासून तसे सुटणार नाहीत; तरी त्यांचा छळ होऊन ते त्रस्त होतील, ते तर खासगीकरण सहन करतील आणि अन्नाच्या कमतरतेमुळे ते त्रास सहन करतील आणि तसाच त्यांचा नाश होणार नाही. ज्या देवाने एलीयाची काळजी घेतली तो त्याच्या कोणत्याही स्वयं-त्याग करणाऱ्या लेक्रांवरून असाच नजर न टाकता पुढे जाणार नाही. जो देव त्यांच्या डोक्याचे केस मोजतो तो त्यांची काळजी घेईल, आणि दुष्काळाच्या समयी ते तृप्त होतील. दुष्ट लोक तर भुकेने आणि नाशाने मृत पावतात, देवदूत धर्मिकांचे सौरक्षण करतात आणि त्यांच्या सर्व गरजा भागवतात. जोकोणी “नितीमत्वात चालतो” त्याच्यासाठी ते अभिवचन आहे: “त्याला भाकर देण्यात येईल; त्याचे जल हे निश्चित त्याच्याकडे येईल.”

**(३२) जेव्हा संपूर्ण आशा विरून जाते, जसे याकोबाचे त्याच्या त्रासाच्या समयी झाले, नितीमानांची विनवणी काय असेल?**

*मग तो म्हणाला, “पहाट होत आहे, मला जाऊ दे.” तो म्हणाला, “तू मला आशीर्वाद दिल्यावाचून मी तुला जाऊ द्यायचा नाही.” (उत्पत्ती ३२:२६)*

तरीही मानवी दृष्टीला असे दिसेल कि देवाच्या लोकांनी लवकरच त्यांची साक्ष त्यांच्या रक्ताने शिक्कामोर्तब करावी ज्या रीतीने त्यांच्या आधी त्या रक्तसाक्षी लोकांनी केले. ते स्वतः घाबरू लागतात की प्रभुने त्यांना शत्रुपक्षाच्या हाती पडून देण्यास सोडून दिले. हा समय भयंकर त्रासाचा असा आहे. दिवस रात्र त्यापासून सुटका होण्यासाठी प्रभुकडे ते आरोळी मारतात.

दुष्ट उन्मत होतात, आणि उपहासात्मक ओरड ऐकू येते: “तुझा विश्वास आता कोठे आहे? आता देव तुमची सुटका आमच्या हातून का करत नाही जर खरेच तुम्ही त्याची प्रजा आहात?’’ पण वाट पाहणारे लक्षात ठेवतात की येशू हा काल्वरीच्या वधस्तंभावर मरण पावला आणि मुख्य याजक व अधिकारी थट्टेने त्याचा उपहास करत होते : “त्याने दुसऱ्यांना वाचवले; त्याला स्वतःला वाचवता येत नाही; तो इस्राएलाचा राजा आहे; त्याने आता वधस्तंभावरून खाली उतरावे, म्हणजे आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू.” मत्तय २७:४२.

याकोबाप्रमाणे, सर्वजण देवाबरोबर झोंबी करत आहेत. त्यांचे चेहरे त्यांचा आंतरिक संघर्ष व्यक्त करतात. प्रत्येक चेहऱ्यावर तो फिकेपणा आहे. तरीही ते त्यांची कळकळीची मध्यस्थी करण्याचे थांबवत नाहीत.

**(३३) देवाने त्याच्या विश्वासू लोकांच्या सौरक्षणासाठी कोणावर ती कामगिरी सोपवली आहे?**

***कारण तुझ्या सर्व मार्गांत तुझे रक्षण करण्याची तुझ्याविषयी तो आपल्या दिव्यदूतांना आज्ञा देईल. (स्तोत्रसहिता ९१:११)***

लोक स्वर्गीय दृष्टीने बघू शकले, त्यांना दुतांचे संघ दिसतील जे शक्तीने युक्त होऊन ख्रिस्ताच्या संयमाचा शब्द ते राखून ठेवत आहेत. अत्यंत सहानुभूतीने व कोमल वृत्तीने, देवदूतांनी तो त्रास बघितला आणि त्यांच्या प्रार्थना ऐकल्या. ते नाशापासून त्या सेनापतीने त्यांना खेचून घ्यावे म्हणून त्या शब्दासाठी थांबले आहेत. पण त्यांनी थोडे अधिक थांबले पाहिजे. देवाच्या लोकांनी त्या प्याल्यातून प्यावे आणि त्या बाप्तीस्म्यातून त्यांनी बाप्तिस्मा घ्यावा. त्यांच्यासाठी तो विलंब, इतका वेदनामय आहे, आणि तेच त्यांच्या याचनेसाठी उत्तम उत्तर आहे. विश्वास ठेऊन प्रभुने कार्य करण्याची ते वाट पाहत असताना ते त्यांचा विश्वास, आशा आणि संयम आचरणात आणतात, ज्याचा खूप कमी सराव त्यांच्या धार्मिक अनुभवाच्या दरम्यान आला होता. तरीही काही निवडक लोकांसाठी तो त्रासाचा समय कमी करण्यात येईल. "ह्यामुळे तिच्या पीडा म्हणजे मरण, दुःख
व दुष्काळ 'एका दिवशीच येतील,'
आणि ती अग्नीत जाळून टाकली जाईल;
कारण तिचा 'न्यायनिवाडा करणारा प्रभू' देव 'सामर्थ्यवान' आहे." लुक १८:७,८. लोकांना अपेक्षा आहे त्यापेक्षा अंत लवकर येईल. गहू एकत्र जमवला जाईल आणि देवाच्या गोदामात तिकडे पेंढ्या बांधून ठेवल्या जातील; आणि

वाळलेले गवत हे नाशाच्या अग्नीत जाळून टाकण्यासाठी तयार केले जाईल.

## (३४) पित्याची आज्ञा होताच, अभिवचनाची कोणती अद्भुत भविष्यवाणी परिपूर्ण होईल?

*तुझ्या बाजूस सहस्त्रावधी पडले, तुझ्या उजव्या हातास लक्षावधी पडले, तरी ती तुला भिडणार नाही. (स्तोत्रसहिता ९१:७)*

स्वर्गीय पहारेकरी, त्यांच्यात विश्वासात पक्के, पहारा देत राहतात. जरी एका सामान्य आज्ञेने ती वेळ निश्चित केली जेव्हा आज्ञा पाळणारे ठार केले जातील, त्यांचे शत्रू काही बाबतीत ह्या आज्ञेची अपेक्षा करतील, आणि वेळ दिली आहे त्यापूर्वी, त्यांचे आयुष्य घेण्याचा धाडसी प्रयत्न ते करतील. प्रत्येक विश्वासू जीवात्म्याच्या भोवती जे महान रक्षण करणारे दूत आहेत त्यांना कोणीही डावलू शकत नाही. काहींना शहरे आणि गावे ह्यातून बोलावण्यात येते; पण त्यांच्या विरुद्ध ज्या तलवारी उठवल्या जातात मोडून वाळलेल्या गवताप्रमाणे खाली पडतात. इतरांचे रक्षण देवदूत म्हणून युद्धाचे दूत म्हणून केले जाते.

देवाचे डोळे, जे युगांपासून लोकांवर स्थित आहेत, त्या संकटाच्या भोवती केंद्रित होते ज्याची भेट त्याचे लोक घेणार आहेत, जेव्हा पृथ्वीवरील सर्व सत्ता त्यांच्या विरोधात एकवटून जाईल. जसे बंदिवासात असलेले लोक पळ काढतात, उपासमारी किंवा हिंसाचार ह्याने त्यांचा मृत्यू होण्याची भीती त्यांना असते. पण ज्या पवित्र देवाने तांबडा समुद्र इस्त्राएलाच्या समोर दुभागला, तो आपले महान सामर्थ्य प्रगट करेल आणि त्यांचा बंदिवास उलटवून टाकेल. “सेनाधीश परमेश्वर म्हणतो, “मी नेमीन त्या दिवशी ते माझा खास निधी होतील; जसा कोणी आपली सेवाचाकरी करणाऱ्या पुत्रावर दया करतो तसा मी त्यांच्यावर दया करीन.” मलाखी ३:१७.

ख्रिस्ताच्या विश्वासू साक्षीदारांचे रक्त जर ह्या वेळी सांडण्यात आले असते, ते रक्तसाक्षी लोकांच्या रक्ताप्रमाणे नव्हे, बीज जसे पेरले जाते त्याप्रमाणे देवासाठी त्यातून हंगाम उत्पन्न झाला असता. त्यांचा इमानीपणा इतरांना सत्याची साक्ष देताना खात्री देऊ शकणार नाही; पण कठोर हृदयाने दयेच्या सर्व लाटा परतवल्या जोपर्यंत ते पुन्हा परतणार नाही. धार्मिक लोक जर आता त्यांच्या शत्रूपुढे भक्ष्य झाले तर, अंधकाराच्या राजकुमारासाठी तो एक विजयाचा जयघोष झाला असता. स्तोत्रकर्ता म्हणतो: “कारण विपत्काली मला तो आपल्या मंडपात लपवून ठेवील; मला तो आपल्या डेऱ्याच्या गुप्त स्थळी ठेवील; तो मला खडकावर उचलून ठेवील.” स्तोत्रसहिता २७:५.

ख्रिस्ताने म्हंटले आहे: “चला, माझ्या लोकांनो, आपापल्या खोल्यांत जा, दारे लावून घ्या; क्रोधाचा झपाटा निघून जाईपर्यंत थोडा वेळ लपून राहा. कारण पाहा, परमेश्वर पृथ्वीवरील रहिवाशांना त्यांच्या पापास्तव शासन करण्यास आपल्या स्थानाहून निघाला आहे. शोषलेले रक्त पृथ्वी प्रकट करील, वधलेल्यांना ती ह्यापुढे झाकून ठेवणार नाही.” यशया २६:२०,२१. ज्या लोकांनी संयमाने त्याच्या पुनरागमनाची वाट पाहिली त्यांची सुटका गौरवी रीतीने होईल आणि ज्यांची नावे जीवनी पुस्तकात लिहण्यात आली आहेत.

*मी प्रभूवर संपूर्ण हृदयाने प्रेम करतो. माझी प्रार्थना आहे कि मला त्याच्या बाजूचा असे लेखण्यात येईल जेव्हा तो घोषणा करेल, “जो नीतिमान आहे त्याने अजूनही नीतिमान म्हणून राहावे.”*

*गोल करा :     होय      अनिश्चित*

*आता मला जाणीव होते की, सैतान एका गरजणाऱ्या सिंहासारखा आहे, कोणास भक्ष्य*

करावे ह्याची वाट पाहतो. मी प्रार्थना करतो त्या सुज्ञानासाठी की सातत्याने मी देवाच्या वचनाचा अभ्यास करून त्याचा स्वीकार करावा जेणेकरून ह्या जगाच्या इतिहासातील शेवटल्या घटकात ज्या फसवणुकी सैतान दाखवेल ते टाळता येतील.

गोल करा : होय अनिश्चित

मी देवाचे आभारी आहे कारण त्याने त्या महान "त्रासाच्या समयाचा" मला इशारा दिला जो त्याच्या दैवी आज्ञांचा सन्मान करणाऱ्यांवर येईल.

गोल करा : होय अनिश्चित

मी प्रार्थना करतो की देवाने माझे चारित्र्य शुद्ध करावे आणि माझा विश्वास बळकट करावा जेणेकरून, त्याच्या कृपेने, मी त्याच्या गौरवासाठी विजय संपादन करू शकेल.

गोल करा : होय अनिश्चित

प्रेम आणि विश्वासाने, मी सर्वकाही देवाच्या हातात सोपवतो. मी प्रार्थना करतो की चमत्कारिक रीतीने जीवनाचे जतन करून किंवा एका रक्तसाक्षीचा जसा मृत्यू होतो, त्याच्या नावाचे गौरव करण्यासाठी तो माझा उपयोग करून घेईल.

गोल करा : होय अनिश्चित

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________

___________________________________



# धडा ११
# देवाच्या लोकांची सुटका

जे लोक देवाच्या नियमांचा सन्मान करतात त्यांच्यापासून जेव्हा ह्या मानवी नियमांना काढून टाकण्यात येते, दुसर्या हातांमध्ये त्यांचा नाश होण्यासाठी एक चळवळ चालू असते. आज्ञांमधील नियोजित समय जसा समीप येतो; लोक त्या द्वेष करण्यात येणाऱ्या लोकांना मुळासकट उपटून काढण्यास कट रचतील. एका रात्रीत निर्णयात्मक रीतीने सर्व उध्वस्त करण्यासाठी ते निश्चित केले जाईल, आणि त्यामुळे मतभेद आणि खरडपट्टी ह्यांची वाणी एकदम शांत करण्यात येईल.

**(१) जे लोक विश्वासू राहतात ते कोणते अभिवचन हस्तगत करू शकतात?**

*धीराविषयीचे माझे वचन तू राखले आहेस म्हणून पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांची परीक्षा होण्याचा जो परीक्षाप्रसंग सर्व जगावर येणार*

*आहे, त्यापासूनही मी तुला राखीन.*
*(प्रगटीकरण ३:१०)*

देवाचे लोक – काही तुरुंगाच्या कैदेत असलेले, काही जंगल किंवा पर्वतामध्ये एकटे समाधी घेऊन बसलेले- अजूनही दैवी सुरक्षेसाठी प्रार्थना करतात, प्रत्येक चौकात सशस्त्र लोकांच्या ताफ्यात, मृत्युच्या कार्यासाठी तयारी करत आहेत. आता ह्या टोकाच्या क्षणाला , इस्त्रायेलाचा देव त्याच्या लोकांची सुटका करण्यासाठी मध्यस्थी
करेल. प्रभू म्हणतो; “सण पाळताना जसा रात्री गायनाचा नाद उठतो तसा तुमच्या गायनाचा नाद उठेल; परमेश्वराच्या पर्वताकडे, इस्त्राएलाच्या दुर्गाकडे बासरी वाजवत समारंभाने जाणाऱ्याप्रमाणे तुमच्या मनास उल्लास प्राप्त होईल. तेव्हा परमेश्वर आपला प्रतापी शब्द कानी पाडील, आणि आपल्या क्रोधाचे फुरफुरणे, भस्म करणाऱ्या अग्नीची ज्वाला, मेघांचा गडगडाट आणि पर्जन्य व गारा ह्यांची वृष्टी ह्यांनी आपले भुजबल दाखवील.” यशया ३०:२९,३०.

जयघोष, उपहास आणि शापवचन देण्याच्या आवाजाने, दुष्ट लोकांचा गट त्यांच्या भक्ष्यावर झडप घालण्यास तयार आहे, आणि पाहा तेव्हाच एक गडद काळोख, रात्रीच्या अंधारापेक्षा काळा, पृथ्वीवर पडतो. मग एक इंद्रधनुष्य, देवाच्या सिंहासनावरून त्या गौरवाने प्रकाशित होऊन, स्वर्गाला व्यापून टाकतो आणि प्रत्येक प्रार्थना करणाऱ्या जमावाभोवती जणूकाही वेढा घालतो. क्रोधीत लोकसमुदाय अचानक तुरुंगात टाकण्यात येतात. त्यांची थट्टा करणारी ओरड देखील सरून जाते. त्यांच्या घातकी क्रोधाचे साधन देखील विसरले जाते. भयभीत अशा लक्षणाने देवाच्या कराराच्या चिन्हाकडे ते पाहतात

आणि त्याच्या सर्व तेजस्वी प्रकाशापासून सुरक्षा मिळण्याची याचना करतात.

**(२) विश्वासू लोकांच्या ओठातून कोणते आनंदाचे शब्द बाहेर पडतील?**

***त्या दिवशी ते म्हणतील, “पाहा, हा आमचा देव! ह्याची आम्ही आशा धरून राहिलो; तो आमचे तारण करील. हाच परमेश्वर आहे. ह्याची आम्ही आशा धरून राहिलो. त्याने केलेल्या तारणाने आपण उल्हास व हर्ष पावू.” (यशया २५:९)***

देवाच्या लोकांनी एक वाणी, स्पष्ट आणि सुमधुर, म्हणत , ‘‘वर पहा’’ आणि स्वर्गाकडे त्यांचे नेत्र उंच करत, ते तर अभिवचनाचे धनुष्य पाहतील. काळे, क्रोधीत ढग ज्यांनी त्या पडद्याला झाकून टाकले ते तर दुभागन्यात आले, आणि स्तेफनाच्या प्रमाणे ते अगदी अढळ वृत्तीने स्वर्गाकडे पाहतात आणि देवाचे गौरव पाहतात आणि मनुष्याच्या पुत्राला सिंहासनारूढ झालेले पाहतात. त्याच्या दैवी स्वरुपात त्याच्या अपमान झालेल्या खुणा ते ओळखतात; आणि त्याच्या ओठातून पिता आणि पवित्र देवदूत ह्यांच्यापुढे जी विनंती प्रस्तुत झाली ती ऐकतात: “हे माझ्या पित्या, माझी अशी इच्छा आहे की, तू जे मला दिले आहेत त्यांनीही जेथे मी आहे तेथे माझ्याजवळ असावे; ह्यासाठी की, जो माझा गौरव तू मला दिला आहेस तो त्यांनी पाहावा; कारण जगाच्या स्थापनेपूर्वी तू माझ्यावर प्रीती केलीस.” योहान १७:२४.

पुन्हा एक वाणी, संगीतमय आणि जयघोषाने परिपूर्ण, ऐकू येते, म्हणत : “ते येतात! ते येतात! पवित्र, कोणत्याही रीतीने इजा न पोहचवणारे, आणि शुद्ध. त्यांनी माझ्या संयमाचा शब्द राखला आहे; ते देवदूतांच्या मध्ये चालतील;” आणि शांत, बोबडे ओठ ज्यांनी

आपला विश्वास दृढ राखला ते विजयाचा जयघोष करतात.

**(३) देवाच्या मुखातून कोणते शब्द बाहेर पडतात?**

***सातव्याने आपली वाटी अंतराळात ओतली; तेव्हा मोठी 'वाणी [स्वर्गाच्या] मंदिरातून,' राजासनापासून निघाली; ती म्हणाली, "झाले!" (प्रगटीकरण १६:१७)***

मध्यरात्री देव त्याचे सामर्थ्य लोकांच्या सुटकेसाठी प्रदर्शित करतो. सूर्य चमकतो, आणि आपल्या बलाने चमकत राहतो. चिन्हे आणि चमत्कार देखील ओळीने घडताना दिसतात. दुष्ट लोक भय आणि आश्चर्याने तो देखावा पाहतात, नीतिमान सार्वभौम आनंदाने त्यांच्या सुटकेचे चिन्ह बघून उत्साहाने आरोळी मारतात. निसर्गातील प्रत्येक वस्तू त्याच्या कार्याच्या बाहेर येऊन कार्यरत असताना दिसते. पाण्याचे ओहोळ देखील वाहण्याचे थांबलेले दिसते. काळे, जड मोठे ढग येतात आणि एकमेकांवर आदळतात. ह्या क्रोधीत स्वर्गाच्या मध्ये एक अवर्णनीय गौरवाचे स्थान आहे, जिकडून देवाची वाणी अनेक जलानप्रमाणे ऐकू येते , म्हणत: "पूर्ण झाले आहे."

**(४) देवाच्या वाणीमुळे कोणती महान घटना घडेल?**

***तेव्हा 'विजा चमकल्या, गर्जना व मेघांचे गडगडाट' झाले. शिवाय इतका मोठा भूमिकंप झाला की 'पृथ्वीवर' मानव 'झाल्यापासून' इतका मोठा भूमिकंप 'कधी झाला नव्हता.' (प्रगटीकरण १६:१८)***

त्या वाणीने पृथ्वी आणि स्वर्ग कंपायमान होतात....... अंतरीक्ष खुले होऊन पुन्हा बंद होताना दिसते. देवाच्या सिंहासनावरील गौरव चमकत असताना दिसते. पर्वते वाहणाऱ्या वाऱ्यातील एका वनस्पतीसारखे हलतात, आणि क्षय झालेली पर्वते तर प्रत्येक बाजूला विखुरलेले दिसतात. येणाऱ्या मोठ्या वादळाची गर्जना जणू ऐकण्यात येते. समुद्र देखील खवळलेला दिसतो. वावटळाचा जसा निश्वास ऐकून येतो तसा जणूकाही भुते त्यांच्या नाशाच्या कामगिरीवर निघालेली आहेत असे भासते. संपूर्ण पृथ्वी तांडव करून समुद्राच्या लाटांप्रमाणे मोठी होते. त्याचा वरील स्तर तर तुटत असताना दिसतो. त्याचे आधारस्तंभ एक मार्ग तिकडे तयार करताना दिसतात पर्वतांच्या शृंखला बुडताना दिसतात. वस्ती केलेली द्वीपे नाहीशी होताना दिसतात. समुद्राची बंदरे जी सोदोमासारखी दुष्ट बनली ती हे क्रोधीत जल गिळून टाकतात.

महान असे बाबेलोन देवासमोर स्मरणात आलेले आहे, "त्याच्या क्रोधाच्या तीव्रतेतून तिला तो द्राक्षारसाचा प्याला देण्यासाठी." मोठया गारा, प्रत्येक "एका नाण्याच्या वजनाचे," त्यांच्या नाशाचे कार्य करत आहे. वचने १९,२१. पृथ्वीवरील सर्वात गर्विष्ठ शहरे खाली खेचण्यात येतात. राजांची महाले, ज्याच्यावर जगातील मोठ्या लोकांनी त्यांचे धन एकवटले आणि स्वतःला गौरवण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या डोळयापुढे ते तर तुकडे होताना दिसतात. तुरुंगाच्या भिंती कोलमडतात, आणि देवाचे लोक, ज्यांना त्यांच्या विश्वासासाठी बंदिवान करून ठेवण्यात आलेले आहे, त्यांना सोडवण्यात येते.

**(५) ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्याचे साक्षीदार कोण बनतील?**

***‘पाहा, तो मेघांसहित येतो;’ प्रत्येक डोळा त्याला ‘पाहील’, ज्यांनी त्याला ‘भोसकले तेही पाहतील; आणि पृथ्वीवरील सर्व वंश त्याच्यामुळे ऊर बडवून घेतील.’ असेच होणार. आमेन. (प्रगटीकरण १:७)***

कबरा उघडण्यात येतात, आणि “अनेकजण जे पृथ्वीच्या धुळीत विश्रांती घेतात . . . जागे होतात, काही सनातन जीवनासाठी, काही लज्जा आणि सनातन दोशासाठी .” ज्या सर्व लोकांचा तिसऱ्या देवदूताच्या संदेशाच्या दरम्यान विश्वासात मृत्यू झाला ते त्या कबरेतून गौरवाने मंडित होऊन बाहेर पडतात, देवाच्या शांतीचा करार ऐकण्यासाठी ज्या सर्वांनी त्याचे नियमशास्त्राचे पालन केले. “ज्यांनी त्याला भोसकले” (**प्रगटीकरण** १:७), ज्या लोकांनी ख्रिस्ताच्या मृत्युच्या यातनेची थट्टा केली लक्ष दिले नाही, आणि त्याचे सत्य व त्याचे लोक ह्यांचे सर्वात हिंसक विरोधक, त्यांना त्याच्या गौरवात पाहण्यास उठवले जाते आणि तोच सन्मान प्रामाणिक आणि आज्ञाधारक लोकांवर स्थित असलेला दिसतो.

**(६) दुष्ट लोकांचा प्रतिसाद काय असेल जेव्हा त्यांना जाणीव होईल की ते ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्याचे साक्षीदार बनणार आहेत?**

***आणि ते डोंगरांना व खडकांना म्हणाले, “आमच्यावर पडून राजासनावर जो बसलेला आहे, त्याच्या दृष्टीपुढून व कोकऱ्याच्या क्रोधापासून आम्हांला ‘लपवा ! (प्रगटीकरण ६:१६)***

अजूनही आकाशात जड ढगांचे आच्छादन आहे; तरीही त्यातून सूर्य डोके वर काढताना दिसतो, जणूकाही तो यहोवाच्या सूड घेणाऱ्या डोळ्यासारखा दिसतो. स्वर्गातून कडक अशा विजा चमकताना दिसतात, आणि संपूर्ण पृथ्वीला एका ज्योतीप्रमाणे वेष्टून टाकतात. गडगडाट ह्यांचा भयंकर आक्रोश, वाणी, रहस्यमय आणि भयंकर, दुष्टांचा नाश होईल हे घोषित करतात. जे शब्द बोलण्यात येतात ते काही सर्वांना समजत नाही; पण खोटे शिक्षक त्यांना अत्यंत ठळकपणे समजून घेतात.

जे लोक काही काळापूर्वी थोडे अस्वस्थ होते, इतकी फुशारकी मारत दिखावा करत होते, देवाच्या आज्ञांचे पालन करणाऱ्या लोकांच्या प्रती इतकी क्रूरता दर्शवत होते, आता त्यांची त्रेधा उडाली आणि भीती ते कापत आहेत. त्या घटकांच्या आवाजाच्या वर त्यांचा रडण्याचा आक्रोश ऐकण्यात येत आहे. भुते देखील ख्रिस्ताचे दैवत्व कबूल करतात आणि त्याच्या शक्तीसमोर थरथर कापतात, आणि लोक तर दयेची याचना करत भयंकर अशा धास्तीने भरून गेलेली आहेत.

## (७) नीतिमान लोकांकडून कोणता विजयाचा प्रतिसाद हा गीताच्या स्वरूपाने ऐकण्यात येईल?

*देव आमचा आश्रय व आमचे सामर्थ्य आहे; तो संकटसमयी साहाय्य करण्यास सदा सिद्ध असतो. म्हणून पृथ्वी उलथीपालथी झाली, पर्वत कोसळून सागरतळी बुडाले, सागराच्या लाटा गर्जून उसळल्या, त्यांच्या उचंबळण्याने पर्वत हालले तरी आम्ही भिणार नाही. (सेला) (स्तोत्रसहिता ४६:१-३)*

ढगांमधील पडलेल्या भेगामध्ये एक तारा चमकतो ज्याचा प्रकाश अंधकाराच्या तुलनेत चारपट अधिक तेज्वंत असतो. विश्वासू लोकांसाठी आशा आणि आनंद व्यक्त होतात, पण देवाच्या नियमशास्त्राचे उल्लंघन करणार्यांसाठी कठोरता आणि क्रोध हे दाखवतात. ज्या लोकांनी ख्रिस्तासाठी सर्वकाही अर्पण केले ते आता सुरक्षित आहेत, जणूकाही प्रभूच्या मंडपाच्या रहस्याखाली ते लपून जातात. त्यांची परीक्षा झाली आहे, आणि जगासमोर आणि सत्याचा अवमान करणाऱ्या लोकांसमोर जो त्यांच्यासाठी मरण पावला त्याच्याप्रती त्यांनी निष्ठा दाखवली आहे. मृत्यू पथावर असताना देखील ज्या लोकांनी आपली सचोटी कायम ठेवली त्यांच्या जिवंत एक अलौकिक बदल घडलेला आहे. अचानक त्यांची त्या अंधारातून व जे लोक भूतांमध्ये बदलले त्यांच्या जुलूमशाहीतून सुटका झाली आहे. त्यांचे चेहरे, इतके फिके, चिंताक्रांत, आणि हिरमुसलेले, आता अद्‌भुते, विश्वास आणि प्रेमाने चमकतात. त्यांचा आवाज आता जयघोषाने ऐकू येतो.

## (८) स्वर्गात कशाची घोषणा करण्यात येईल?

***आकाश त्याची न्यायपरायणता प्रकट करते; देव स्वतः न्याय करणारा आहे.***
***(सेला) (स्तोत्रसहिता ५०:६)***

पवित्र भरवस्याचे हे शब्द देवाकडे आरूढ होत असताना, ढग पुन्हा मागे सरतात, आणि चकचकीत स्वर्ग समोर दिसतो, दोन्ही बाजूला जे काळोखाने युक्त अंतरीक्ष आहे त्याच्या तुलनेत त्याचे गौरव हे अबोल असे असते. त्या स्वर्गीय शहराचे गौरव त्या द्वारातून बाहेर पडत राहते. मग त्या आकाशातून एक हस्त दिसतो

ज्याने दोन दगडाच्या पाट्या हातात झेलून धरल्या आहेत. संदेष्टा म्हणतो: “स्वर्ग त्याची धार्मिकता घोषित करेल; कारण देव स्वतः न्यायाधीश आहे.” . . . ते पवित्र नियमशास्त्र, देवाचे नितीमत्व, त्या गडगडाट आणि ज्योतीमधून सिनाय पर्वतावरून जीवनाची मार्गदर्शिका म्हणून जे घोषित झाले, आता लोकांना न्यायाचा नियम म्हणून प्रगट होतात.

तो हस्त आता मेज खुले करतो, आणि त्या ठिकाणी दहा आज्ञांच्या पाट्या दिसतात, जणूकाही अग्नीच्या पेनने त्या लिहून काढलेल्या आहेत. शब्द इतके सोपे आहेत की सार्वजन ते वाचू शकतात. आठवणी उजळून येतात, प्रत्येक मनातून अंधश्रद्धा आणि पाखंड ह्याचा अंधकार निघून जातो, आणि देवाचे दहा शब्द, संक्षिप्त, समजण्यास सोपे, आणि अधिकारयुक्त, हे पृथ्वीच्या सर्व रहिवास्यांसाठी प्रस्तुत करण्यात येतात.

**(९) देवाच्या आज्ञांच्या संबंधी कोणते सत्य दुष्टांच्या मनात भीती उत्पन्न करेल?**

*तुझे वचन संपूर्णपणे सत्य आहे; तुझे सर्व न्याय्य निर्णय सनातन आहेत. (स्तोत्रसहिता ११९:१६०)*

ज्या लोकांनी देवाच्या पवित्र नियमांचे उल्लंघन केले आहे त्यांची भयंकर स्थिती आणि निराशा ह्याचे वर्णन करणे अशक्य आहे. देवाने त्यांना त्याचे नियमशास्त्र दिले; त्यांनी आपली चारीत्र्ये त्याच्याशी तुलना करून बघितली असतील आणि त्यांना पश्चाताप व बदल घडवून अंत येणे शक्य होते तेव्हा त्यांच्यातील कमी समजून घेतल्या असतील; पण जगाची मर्जी संपादन करण्यासाठी, त्यांनी त्या आज्ञा बाजूला ठेवल्या आणि इतरांना त्याचे उल्लंघन करण्यास

शिकवले. देवाच्या लोकांना शब्बाथाचे उल्लंघन करण्यास त्यांनी जबरदस्ती केली. आता ज्या नियमशास्त्राचा त्यांनी द्वेष केला तेच त्यांना दोषी ठरवत आहे. आता त्यांच्याकडे कोणतीही सबब नाही अशी भयावह परिस्थिती त्यांची झाली आहे. कोणाची सेवा करून आराधना करायची ह्याची निवड ते आता करत आहेत. "मग तुम्ही वळाल, आणि नीतिमान व दुष्ट ह्यांच्यातला आणि देवाची सेवा करणारा व सेवा न करणारा ह्यांच्यातला भेद तुम्हांला कळेल." मलाखी ३:१८.

**(१०) सत्य जाणून घेण्याचा परिणाम काय आहे आणि हे ज्ञान पतन पावलेल्या लोकांबरोबर न वाटण्याचा काय परिणाम आहे?**

***तू खातरीने मरशील' असे मी पातक्यास म्हणालो असता तू जर त्याला बजावले नाही व पातक्याने आपला कुमार्ग सोडून जगावे म्हणून तू त्याला बजावून सांगितले नाहीस, तर तो पातकी आपल्या दुष्टाईमुळे मरेल; पण त्याच्या रक्ताचा झाडा मी तुझ्या हातून घेईन. तू त्या पातक्यास बजावले असून त्याने आपली दुष्टाई व कुमार्ग ही सोडली नाहीत, तर तो आपल्या दुष्टाईमुळे मरेल आणि तू आपला जीव वाचवला असे होईल. (यहज्केल ३:१८-१९)***

देवाच्या नियमशास्त्राचे शत्रू , सेवकांपासून लहानांपर्यंत, त्यांना सत्य आणि कर्तव्य ह्याची एक नवीन समजूत आहे.खूप उशिरा त्यांना ह्या गोष्टीची जाणीव होते की चौथ्या आज्ञेचा शब्बाथ हा तर जिवंत देवाचा शिक्का आहे [बी, सी, डी अपेंडिक्स पहा]. खूप उशिरा त्यांना त्या शब्बाथाचा खोटा स्वभाव कळतो आणि त्या वाळूवर स्थित आधारस्तंभ जो त्यांनी रचला होता त्याविषयी जाणीव होते. त्यांना कळते की

देवाच्या विरुद्ध ते लढा देत होते. धार्मिक शिक्षकांनी जीवात्म्यांना त्या चिरकाल यातनेप्रत नेले खरेतर त्यांना स्वर्गाच्या किंवा सुख्लोकाच्या द्वारांकडे नेत आहे असे भासवले. अंतिम हिशोब होईल त्या दिवसापर्यंत नाही तेव्हाच त्यांना समजेल की पवित्र कार्यात जे लोक सहभागी असतात त्यांची जवाबदारी किती मोठी आहे आणि त्यांच्या अविश्वासुपनाचे परिणाम किती भयंकर आहेत. केवळ सनातन काळात आपल्याला एका जीवात्म्याचा जो नाश होतो त्याचा अंदाज घेता येईल. ज्याला देव म्हणेल: निघून जा, हे दुष्ट सेवका, त्याची परीस्थिती खरच खूप भयंकर असेल.

## (११) ख्रिस्ताचे पुनरागमन जेव्हा होईल तेव्हा तो कुठे दिसेल?

***येशू त्याला म्हणाला, "होय, आपण म्हटले तसेच. आणखी मी तुम्हांला सांगतो, ह्यापुढे तुम्ही 'मनुष्याच्या पुत्राला सर्वसमर्थाच्या उजवीकडे बसलेले' व 'आकाशाच्या मेघांवर आरूढ होऊन येताना पाहाल." (मत्तय २६:६४)***

लवकरच पूर्वेकडे एक छोटा काळा ढग सितो, माणसाच्या हाताच्या अर्ध्या आकाराचा. हा ढग तारणार्याच्या भोवती असतो आणि दूरवर त्याच्या भोवती केवळ अंधकार आहे असे दिसते. देवाच्या लोकांना हे मनुष्याच्या पुत्राचे चिन्ह आहे हे समजते. पृथ्वीच्या अधिक जवळ तो येत असताना शांत स्तब्धतेत ते त्याच्याकडे बघत राहतात, जो अधिक तेज्वंत आणि गौरवी दिसतो, जोपर्यंत तो एक महान पंधरा ढग बनत नाही, त्याचा मूळ म्हणजे एक व्यापून टाकणारा अग्नी, आणि त्याची वर कराराचे धनुष्य असते.

येशू एका महान विजेत्यासारखा चालून येतो. आता तो काही "दुखाचा मनुष्य ,"

म्हणवत नाही ज्याने लज्जा आणि धिक्कार ह्यांच्या कटू प्याल्यातून सेवक करावे, तो येतो, स्वर्ग आणि पृथ्वीवर विजेता म्हणून येतो, जिवंत आणि मेलेल्या लोकांचा न्याय करण्यासाठी येतो. “विश्वासू आणि खरा,” “तो नीतीने न्यायनिवाडा करतो’ व लढतो.” आणि“स्वर्गातील सैन्ये” (**प्रगटीकरण** १९:११,१४) त्याचे अनुसरण करतात. स्वर्गीय गीतांच्या सुरांमध्ये पवित्र देवदूत, एक असंख्य मोठा जमाव, त्याची भेट रस्त्यात घेतात. अंतरीक्ष तर अत्यंत तेजस्वी स्वरुपानी भरलेले दिसते-—”दहा हजार वेळा दहा हजार, आणि हजारोंनी हजार.”

**(१२) हब्बकूक संदेष्टा ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्याचे वर्णन कसे करतो?**

***देव तेमानाहून येत आहे, पवित्र प्रभू पारानाच्या पर्वतावरून येत आहे.(सेला) त्याचा प्रकाश आकाश व्यापतो; त्याच्या स्तवनांनी पृथ्वी भरली आहे. त्याचे तेज प्रकाशासारखे आहे; त्याच्या हातांतून किरण निघत आहेत; त्याचा पराक्रम तेथे गुप्त आहे. (ह्बक्कुक ३:३-४)***

कोणताही मानवी पेन त्या देखाव्याचे चित्रीकरण करू शकत नाही; कोणतेही मर्त्य मन त्याचे वैभव समजू शकत नाही.... तो जिवंत ढग अजून जवळ येताना दिसतो तेव्हा, प्रत्येक डोळा त्या जीवनाच्या राज्कुमाराकडे पाहतो. त्या पवित्र मस्तकावर आता कोणताही काट्याच्या मुकुट नाही; पण गौरवी तेजस्वी झलक त्याच्या भुवयांवर दिसते. दिवसा तेवत असणाऱ्या सूर्याच्या प्रकाशाला देखील त्याच्या चेहऱ्यावरील तेज हे मागे टाकते. “त्याच्या वस्त्रावर व त्याच्या मांडीवर राजांचा राजा

आणि प्रभूंचा प्रभू हे नाव लिहिलेले आहे.”
**प्रगटीकरण** १९:१६.

**(१३) ह्या महान घटनेप्रती संपूर्ण मानवजात कशी प्रतिक्रिया देतील ह्याचे वर्णन यिर्मया संदेष्ट्याने केले आहे?**

*कोणा पुरुषास प्रसववेदना होत आहेत की काय, हे विचारा; पाहा, प्रत्येक पुरुष प्रसवणाऱ्या स्त्रीप्रमाणे कंबरेला हात देऊन उभा आहे व प्रत्येकाचे तोंड फिक्के पडले आहे असे माझ्या दृष्टीस का पडत आहे? हायहाय! तो महादिन आहे; त्याच्यासमान दुसरा कोणता नाही; तो याकोबाचा क्लेशसमय आहे तरी त्यातून त्याचा निभाव होईल. (यिर्मया ३०:६-७)*

त्याच्या सान्निध्यासमोर  “सर्व चेहरे फिके पडतात;” देवाची दया नाकारणार्यांवर सनातन निराशेचा थरकाप पसरतो. “तिच्या हृदयाचे पाणीपाणी झाले आहे, तिचे गुडघे लटपटत आहेत,.. सर्वांच्या कंबरेत कळा निघत आहेत.”यिर्मया ३०:६; नहूम २:१०. नीतिमान लोक थरकाप करत रडतात: “कोण उभा राहू शकेल?” देवदूतांचे गीत थांबले आहे, आणि एक भयानक स्तब्धता पसरली आहे. मग येशूची वाणी ऐकू येते, म्हणत: “माझी कृपा तुला पुरेशी आहे.” धार्मिक लोकांचे चेहरे प्रकाशित होतात, आणि प्रत्येक अंतःकरणात आनंद भरून जातो. देवदूत एक पट्टी वर घेऊन पृथ्वीकडे येत असताना पुन्हा गीत गाऊ लागतात.

**(१४) जे लोक ख्रिस्ताच्या वधस्तंभावर जाण्यास कारणीभूत होते त्यांच्यासंबंधी देण्यात येणारी कोणती भविष्यवाणी परिपूर्ण होईल?**

*येशू त्याला म्हणाला, “होय, आपण म्हटले तसेच. आणखी मी तुम्हांला सांगतो, ह्यापुढे तुम्ही ‘मनुष्याच्या पुत्राला सर्वसमर्थाच्या उजवीकडे बसलेले’ व ‘आकाशाच्या मेघांवर आरूढ होऊन येताना पाहाल.” (मत्तय २६:६४)*

तिकडे लोक आहेत ज्यांनी थट्टा करून ख्रिस्ताची मज्जा उडवली. आनंदी शक्तीने त्यांच्या मनात त्रास सहन करणार्याचे शब्द येतात, जेव्हा मुख्य याजक ते ऐकतो , तेव्हा सार्वभौमत्वात त्याची घोषणा करतो: “यानंतर तुम्ही मनुष्याच्या पुत्राला अधिकाराच्या उजव्या हाताला विराजमान झालेले पाहाल, आणि तो स्वर्गातून त्या ढगांमधून येताना दिसेल.” आता ते त्याला त्या गौरवात पाहतात, आणि अजूनही त्यांना त्या सामर्थ्याच्या उजव्या स्थानी बसलेले त्यांना बघायचे आहे.

ज्या लोकांनी तो देवाचा पुत्र आहे हे स्वीकारण्यास नाकारले ते आता निशब्द आहेत. त्या ठिकाणी घमेंडखोर हेरोद आहे ज्याने त्याच्या राजकीय पदाचा उपहास केला आणि थट्टा करणाऱ्या सरदारांना सांगितले की तो तर राजा आहे. हेच ते लोक आहेत ज्यांनी त्यांच्या अनादर करणाऱ्या हातांनी त्याच्या स्वरूपावर तो जांभळा झगा घातला, त्याच्या पवित्र मस्तकावर तो काटेरी मुकुट घातला, आणि त्याच्या प्रतिकार न करणाऱ्या हातात तो नकली राजदंड दिला, आणि त्याची निंदा करत थट्टेने त्याच्यापुढे नमन केले. ज्या लोकांनी ह्या जीवनाच्या राजकुमाराला फटके मारले आणि त्याच्यावर थुंकले आता त्याच्या टोचणार्या आश्चर्याकडून वळतात आणि त्याच्या सान्निध्याच्या तेजस्वी गौरवापासून पळण्याचे पाहतात. ज्या लोकांनी त्याच्या हातापायांमध्ये खिळे ठोकले, ज्या सरदाराने त्याच्या कुशीत

भाला खुपसला, हे त्या खूणा थरकाप आणि पश्चातापाने पाहत राहतात.

ज्या सर्वांच्या आयुष्यात ह्या सत्याला नाकारण्यात येते काही क्षण असतात जेव्हा त्यांचा विवेक जागृत होतो, जेव्हा त्यांच्या आठवणीत छळ होत असलेल्या ढोंगी जीवनाची स्मृती ध्यानात येते आणि जीवात्मा केवळ पश्चातापाच्या आगीत झुंजत असतो. पण हे सर्व त्या दिवसाच्या पश्चातापाच्या पुढे काय आहेत जेव्हा "वादळाप्रमाणे तुमच्यावर संकट येईल," "तुफानाप्रमाणे तुम्हांला विपत्ती प्राप्त होईल"! नितीसुत्रे १:२७. ज्यांनी ख्रिस्त आणि त्याच्या विश्वासू लोकांचा नाश केला आता त्यांच्यावर असलेले गौरव पाहतात. त्यांच्या भयावह स्थितीत त्यांच्या कानी संतांच्या वाणी आनंदाने गीत गात असताना ऐकू येतात: "त्या दिवशी ते म्हणतील, "पाहा, हा आमचा देव! ह्याची आम्ही आशा धरून राहिलो; तो आमचे तारण करील. हाच परमेश्वर आहे. ह्याची आम्ही आशा धरून राहिलो. त्याने केलेल्या तारणाने आपण उल्हास व हर्ष पावू." यशया २५:९.

**(१५) स्वर्गात कोणती ओरड होईल जेव्हा ख्रिस्त धार्मिकांना जीवनासाठी मेलेले असे संबोधतो?**

***"अरे मरणा, तुझा विजय कोठे?
अरे मरणा, तुझी नांगी कोठे?" (१ करिंथकरास पत्र १५:५५)***

पृथ्वीच्या चरख्यात, विजांच्या चमकण्यात, आणि गर्जनांच्या मध्ये, देवाच्या पुत्राची वाणी झोपी गेलेल्या संतांना बोलवत असलेली ऐकू येते. नितीमानांच्या कबरांकडे तो पाहतो, मग स्वर्गाकडे आपले हात उंच करून तो रडतो: "उठा, उठा, उठा, जे तुम्ही या मातीत

विसावले आहात, उठा !” पृथ्वीच्या सर्व खोल भागात मृतांना ही वाणी ऐकू जाईल, आणि जे ही ऐकतील ते जिवंत होतील. संपूर्ण पृथ्वी त्या प्रत्येक राष्ट्र, प्रजा, जिव्हा, आणि लोक ह्यांच्या सैन्याने आगेकूच करेल. मृत्युच्या तुरुंगातून ते येतात, आणि अमर्त्य गौरवाने आभूषित होऊन, रडतातः “अरे मरणा, तुझा विजय कोठे?अरे मरणा, तुझी नांगी कोठे?” आणि जिवंत नीतिमान व पुनरुत्थित संतगन त्यांचे आवाज एकवटून मोठ्या, आनंदी जयघोषात सामील होतात.

**(१६) नितीमानांमध्ये कोणता बदल घडून येईल?**

***क्षणात, निमिषात, शेवटला कर्णा वाजेल तेव्हा. कारण कर्णा वाजेल, मेलेले ते अविनाशी असे उठवले जातील, आणि आपण बदलून जाऊ. कारण हे जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान करावे, आणि हे जे मर्त्य त्याने अमरत्व परिधान करावे हे आवश्यक आहे. (१ करिंथकरास पत्र १५:५२-५३)***

सर्व त्यांच्या कबरेतून त्याचा अनुमानाने परत येतात जसे ते मृत्यू झाल्यावर त्यात गेले होते. आदाम, जो ह्या पुनरुत्थित जमावात उभा दिसतो, तो त्या मोठ्या उंचीचा आणि वैभवाचा आहे, पण देवाच्या पुत्रापेक्षा थोडा खाली आहे. नंतरच्या पिढ्यांसाठी तो एक ठळक असा विरोधाभास दाखवतो; ह्या एका बाबतीत त्या संपूर्ण प्रजातीची अधमता दिसून येते. पण सर्व लोक सनातन तारुण्याचा ताजेपणा आणि जोम ह्यांनी पुन्हा उठतात.

प्रारंभी, मनुष्याची निर्मिती देवाच्या प्रतीरुपात झाली, केवळ त्याच्या चारित्र्यात नव्हे, तर त्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये ह्यात

देखील झाली. पापाने ह्यावर पांघरून घातले आणि त्या दैवी प्रतिमेत शिरकाव केला; पण जे काही हरवलेले होते त्याची पुनर्स्थापना करण्यास ख्रिस्त आला. तो आपली मर्त्य शरीरे बदलून टाकेल आणि त्यांना त्याच्या गौरवी शरीरासारखे बनवेल. मर्त्य, भ्रष्ट स्वरूप, ज्यात सौंदर्याचा अभाव आहे, एकेकाळी पापाने दुषित होऊन, परिपूर्ण, सुंदर आणि अमर्त्य होते. सर्व तृटी आणि डाग हे त्या कबरेत राहतात. दूरवर त्या एदेन बागेत हरवलेल्या स्थितीत असताना आणि त्या झाडास पुनर्स्थापित होऊन, उद्धरले लोक "वाढत जातील" (मलाखी ४:२) त्या प्रजातीच्या संपूर्ण उंचीत आणि तसे गौरव संपादन करतील.

पापाचे शेवटले अवशेष काढून टाकण्यात येतील, आणि ख्रिस्ताचे विश्वासू लोक "आपला देव ह्याच्या सौंदर्यात दिसतील" मन आणि जीव आणि शरीरात त्यांच्या प्रभूची परिपूर्ण प्रतिमा ते व्यक्त करतात. ओह, अद्भुत उद्धार! खूप काल ज्याविषयी बोलले गेले, खूप काल ज्याची आशा होती, त्यात उत्सुकत इच्छा व अपेक्षा होत्या, पण कधीही पूर्णपणे ते समजण्यात आले नाही.

**(१७) हा बदल झाल्यावर ठराविक निवडलेले लोक लगेच कुठे जातील?**

***नंतर जिवंत उरलेले आपण त्यांच्याबरोबर प्रभूला सामोरे होण्यासाठी मेघांरूढ असे अंतराळात घेतले जाऊ, आणि तसेच सदासर्वदा प्रभूजवळ राहू. (१ थेसलोनिकरास पत्र ४:१७)***

जिवंत नीतिमान लोक "क्षणाधार्थ, डोळयांची पापणी लवता लवता बदलले जातात." देवाच्या वाणीने त्यांना गौरवण्यात आले;आता त्यांना अमरत्व प्राप्त झाले आणि पुनरुत्थित संतांच्या सोबत ते वर आकाशात

प्रभूची भेट घेण्यास तयार आहेत. देवदूत "चारही दिशांमधून त्या निवडलेल्या लोकांना एकत्र करतात, स्वर्गाच्या एका बाजूने दुसर्या बाजूपर्यंत ते त्यांना एकत्र करतात." लहान लेकरे देखील स्वर्गीय दूतांच्या द्वारे त्यांच्या आईच्या हातात सोपवले जातात. मृत्यूने विघटीत झालेले मित्र पुन्हा एकत्रित होतात, आता परत कधीही विभक्त न होण्यासाठी, आणि आनंदाच्या गीतांनी देवाच्या शहरात एकत्र ते वर जातात.

**(१८) ख्रिस्त आपला नीतिमान न्यायाधीश त्याच्या प्रत्येक उद्धार पावलेल्या लोकांवर काय प्रदान करेल?**

***मग जेव्हा मुख्य मेंढपाळ प्रकट होईल तेव्हा तुम्हांला गौरवाचा न कोमेजणारा हार प्राप्त होईल. (१ पेत्र ५:४)***

देवाच्या शहरामध्ये प्रवेश करण्यापूर्वी, तारणारा आपल्या अनुयायांवर विजयाचे प्रतिकात्मक चिन्ह प्रदान करतो आणि त्यांच्या राजकीय स्थितीमध्ये त्यांना गुंतवून टाकतो. हे चकाकणारे दर्जे एका पोकळ चौकोनासारखे त्यांच्या राजाच्या भोवती दिसतात, ज्यांचे स्वरूप वैभवाने संत आणि देवदूत ह्यांच्यावर चढते, ज्यांचा चेहरा त्यांच्यावर निष्पाप प्रेम घेऊन चमकत राहतो. उद्धार पावलेल्या असंख्य लोकांच्या जमावात प्रत्येक नजर त्याच्यावर केंद्रित असते, प्रत्येक डोळा त्याचे गौरव पाहतो ज्याचा "चेहरा कोणत्याही मनुष्यापेक्षा खराब असून, त्याचे स्वरूप देखील मनुष्याच्या पुत्रांपेक्षा वेगळे होते."

सर्व विजेत्यांच्या डोक्यावर, येशू स्वतः त्याच्या उजव्या हाताने गौरवी मुकुट ठेवतो. प्रत्येकासाठी एक मुकुट आहे, त्यावर त्याच्या

''स्वतःचे नवीन नाव'' आहे(**प्रगटीकरण** 2:17), आणि ती पाटी, "प्रभूसाठी पावित्र्य." प्रत्येकाच्या हातात विजेत्याचा तळहात आणि चमकणारी वीणा आहे. मग, आज्ञा देणारे देवदूत जशी ती धून वाजवतात, प्रत्येक हात त्या विणेवरील तारांवर जातात आणि अगदी कौशल्याने त्यामधून मधुर संगीत बाहेर पडते. पुन्हा ख्रिस्ताचे आगमन प्रत्येक हृदयाला अत्यानंदित करते, आणि प्रत्येकाच्या आवाजातून स्तुतीपर गीते बाहेर पडतातः "ज्याने आमच्यावर प्रेम केले, आणि त्याच्या स्वतःच्या रक्तात आमची पापे धुतली, देव आणि त्याचा पिता ह्याच्याप्रती आपल्याला त्याने राजे आणि याजक असे बनवले; आणि आपल्याला 'राज्य' आणि आपला देव व पिता ह्याच्यासाठी 'याजक' असे केले, त्याला गौरव व पराक्रम हे युगानुयुग आहेत." **प्रगटीकरण** १:५,६

**(१९) उदधरलेल्या लोकांसाठी ख्रिस्त कोणते आनंदी आमंत्रण देणार आहे?**

***तेव्हा राजा आपल्या उजवीकडच्यांना म्हणेल, 'अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादितहो, या; जे राज्य जगाच्या स्थापनेपासून तुमच्याकरता सिद्ध केले आहे ते वतन घ्याः (मत्तय २५:३४)***

खंडणी भरून पावलेल्यांच्या समोर ते पवित्र शहर आहे. येशू त्या मोत्यांनी मंडित वेशी उघडतो, आणि ज्या राष्ट्रांनी सत्य राखले ते त्यात प्रवेश करतात. तिकडे ते देवाचे सुख्लोक पाहतात, आदामाचे घर जेव्हा तो निष्पाप होता. मग ती वाणी, कोणत्याही इतर संगीतापेक्षा मधुर जी मर्त्य कानांनी ऐकली असेल, ती ऐकली जाते, म्हणतः "तुझा संघर्ष संपला आहे." "या, माझ्या पित्याचे सर्व आशीर्वादित लोक, जगाच्या स्थापनेपासून जे

राज्य तुम्हाला वतन म्हणून देण्यात आले त्यात सहभागी व्हा.”

आता तारणारयाची प्रार्थना त्याच्या शिष्यांसाठी परिपूर्ण होते: “मी करेल जेणेकरून ते देखील करतील, ज्यांना तू मला दिले आहेस, जिकडे मी आहे तिकडे त्यांनी देखील असावे.” “तुम्हांला पतनापासून राखण्यास आणि आपल्या ऐश्वर्ययुक्त सान्निध्यात निर्दोष असे उल्लासाने उभे करण्यास जो समर्थ आहे” (यहूदा २४), ख्रिस्त पित्याला त्याच्या रक्ताने विकत घेतलेले प्रस्तुत करून म्हणतो: “इकडे मी आहे, आणि जी लेकरे तू मला दिली.” “तू ज्यांना मला दिले आहेस मी त्यांना राखले.” ओह, उद्धार पावलेल्यांचे ते प्रेम! त्या क्षणाचे ते दृश्य जेव्हा अमर्यादित पिता, आपली प्रतिमा पाहील, पापाचा मतभेद हद्दपार झालेला, त्याची स्थिती काढून टाकलेली, आणि पुन्हा एकदा मनुष्य दैवी शक्तीशी सुसंगतीत असलेला दृष्टीस पडेल!

अबोल आणि न उच्चारता येणाऱ्या प्रेमाने, येशू त्याच्या विश्वासू लोकांना प्रभूच्या आनंदात येण्याचे आमंत्रण देतो. तारणार्याचा आनंद पाहण्यात आहे, गौरवाच्या राज्यात, जे जीवत्मे त्याची यातना आणि अपमान ह्यांनी बचावले गेले होते. उद्धार पावलेले लोक त्याच्या आनंदात सहभागी होतील, आणि जसे ते पाहतील, आशीर्वादित लोकांमध्ये, त्यांच्या प्रार्थना, कष्ट आणि प्रेमळ त्यागाने जे लोक ख्रिस्तासाठी जिंकण्यात आले होते. त्या महान मोठ्या पांढर्या सिंहासनाकडे एकत्र येताना बघून, न व्यक्त करता येणारा आनंद त्यांच्या हृदयांना भरून टाकतो, जेव्हा ते त्या लोकांना पाहतात ज्यांना त्यांनी ख्रिस्तासाठी जिंकले, आणि पाहतात कि एकाने दुसर्याला मिळवले, आणि त्यांनी अजून काही लोकांना मिळवले, सर्व त्या ठिकाणी विश्रामात एकत्र आणलेले,

त्या ठिकाणी येऊन आपली मुकुटे येशूच्या चरणांपाशी ठेऊन सर्व सनातन काळासाठी त्याची स्तुती करत राहतात.

**(२०) कोणत्या गटाला त्यांच्या उद्धारकासाठी ते स्तुतीचे अलौकिक गीत गाण्याचे सौभाग्य मिळेल?**

***ते राजासनासमोर आणि चार प्राणी व वडील ह्यांच्यासमोर जसे काय 'एक नवे गीत गात होते;' ते गीत पृथ्वीवरून विकत घेतलेले एक लक्ष चव्वेचाळीस हजार लोक ह्यांच्याशिवाय कोणाला शिकता येत नव्हते.. (प्रगटीकरण १४:३)***

सिंहासनाच्या समोर असेलल्या स्फटिकांच्या समुद्रात, काचेचा तो समुद्र जणूकाही अग्नीने मिश्रित, - देवाच्या गौरवाने इतका दैदिप्यमान,- त्या ठिकाणी तो जमाव एकत्र येतो ज्यांना "श्वापदावर विजय मिळवला, आणि त्याच्या चिन्हावर, आणि त्याच्या नावाच्या नंबरवर." सियोन पर्वतावर त्या कोकर्याला पाहून, "देवाच्या वीणा हाती बाळगून," ते उभे राहतात, एकशे चव्वेचाळीस हजार ज्यांना इतर लोकांमधून उद्धरले गेले; आणि तिकडे अनेक जलांचा आवाज कानी पडतो, आणि एका महान गर्जनेप्रमाणे, "वीणेवर गीते वाजवणारे लोक." आणि ते गातात "एक नवीन गीत" सिंहासनाच्या समोर, जे गीत कोणीही पाठ करू शकत नाही शिवाय ते एकशेचव्वेचाळीस हजार. मोशे आणि त्या कोक्र्याचे ते गीत आहे—सुटकेचे ते गीत आहे. फक्त ते एकशे चव्वेचाळीस हजार लोक ते गीत पाठ करू शकतात; कारण ते त्यांच्या अनुभवाचे गीत आहे—असा अनुभव जो दुसऱ्या कोणत्याही जमावाने ऐकलेला नव्हता. "हेच ते

लोक आहेत जे कोक्र्याचे अनुसरण तो जाईल तिकडे करतात." ह्यांना पृथ्वीवरून स्वीकारण्यात आले, जिवंत लोकांमधून, "देवाच्या आणि कोक्र्याच्या प्रती त्यांना प्रथमफळ" असे गणण्यात आले. **प्रगटीकरण** १५:२,३ ; १४:१-५.

**(२१) उद्धार झालेल्या लोकसमुदायातून ह्या गटाला काय वेगळे करते?**

***तेव्हा वडीलमंडळापैकी एकाने मला म्हटले, "शुभ्र झगे परिधान केलेले हे कोण आहेत व कोठून आले?" मी म्हटले, "प्रभो, हे तुला ठाऊक आहे." तो मला म्हणाला, "मोठ्या 'संकटातून' येतात ते हे आहेत; ह्यांनी 'आपले झगे' कोकऱ्याच्या 'रक्तात धुऊन' शुभ्र केले आहेत. (प्रगटीकरण ७:१३-१४)***

***स्त्रीसंगाने मलिन न झालेले ते हेच आहेत, ते शुद्ध आहेत. जेथे कोठे कोकरा जातो तेथे त्याच्यामागे जाणारे ते हे आहेत. ते देवासाठी व कोकऱ्यासाठी प्रथमफळ असे माणसांतून विकत घेतलेले आहेत. (प्रगटीकरण १४:४)***

"हेच ते लोक आहेत जे त्या मोठ्या छळातून बाहेर आले;" त्रासाच्या समयातून ते बाहेर पडले जो इतका भयंकर होता कोणत्याही राष्ट्राने पाहिला नसेल असा; याकोबाच्या त्रासाच्या समयातील याचना त्यांनी सहन केल्या आहेत; देवाच्या न्यायांच्या द्वारे अंतिम जे आशीर्वाद आहेत तिकडे ते कोणत्याही मध्यस्थाच्या शिवाय उभे राहिले आहेत. पण त्यांची सुटका झाली, कारण "त्यांचे झगे धुतले, आणि कोक्र्याच्या रक्तात ते पांढरे शुभ्र बनवले." "त्यांच्या मुखात काहीच दोष नव्हता: कारण देवासमोर त्यांच्यात काहीच दोष किंवा चूक

आढळली नाही”. “म्हणूनच तर ते देवाच्या सिंहासनासमोर आहेत, आणि त्याच्या मंदिरात रात्रंदिवस त्याची सेवा करतात: आणि जो सिंहासनारूढ आहे तो त्यांच्यामध्ये वस्ती करेल.”

पृथ्वी ह्या दुष्काळ आणि मरीने वाया गेलेली ते पाहतात, सूर्य लोकांना त्या तप्त उष्णतेने त्रास देतो, आणि स्वतः त्यांनी यातना, भूक आणि तहान हे सर्व सहन केले आहेत. ते ह्यापुढे ‘भुकेले असे होणार नाहीत, व तान्हेलेही होणार नाहीत; त्यांना सूर्य किंवा कोणतीही उष्णता बाधणार नाही.’कारण राजासनापुढे मध्यभागी असलेला कोकरा त्यांचा ‘मेंढपाळ होईल व तो त्यांना जीवनाच्या पाण्याच्या झर्‍यांजवळ नेईल; आणि देव त्यांच्या डोळयांचे सर्व अश्रू पुसून टाकील.”’
**प्रगटीकरण** ७:१४-१७.

**(२२) ह्या वचनात वर्णन केलेले कोणते तत्व उद्धार झालेल्या लोकांसाठी त्यांची साक्ष संपूर्ण विश्वाला सांगण्यासाठी एक प्रेरणा बनेल?**
***देणे फेडण्यास त्यांच्याजवळ काही नव्हते म्हणून त्याने त्या दोघांना ते सोडले. तर त्यांतून कोणता त्याच्यावर अधिक प्रीती करील?” शिमोनाने उत्तर दिले, “ज्याला अधिक सोडले तो, असे मला वाटते.” मग तो त्याला म्हणाला, “बरोबर ठरवलेस.” (लूक ७:४२-४३)***

सर्व युगांमध्ये तारणार्‍याचे निवडलेले लोक हे त्या संघर्षाच्या शाळेत शिक्षित आणि शिस्तबद्ध झाले आहेत. पृथ्वीवर असताना त्या अरुंद मार्गांवर त्यांनी भ्रमण केले; यातनेच्या आगीच्या भट्टीत ते शुद्ध झाले. येशुसाठी त्यांनी विरोध, द्वेष आणि सर्व त्रास सहन केले. जरी गंभीर असे संघर्ष होते तरीही त्यांनी येशूचे अनुसरण केले; आत्म-त्याग त्यांनी सहन केला

आणि कटू निराशेचा अनुभव घेतला. त्यांच्या स्वतःच्या दुखद अशा अनुभवातून ते पापाची दुष्टता शिकले, त्याचे सामर्थ्य, त्याचा दोष, आणि त्याचा धिक्कार; आणि तिरस्काराने ते त्याकडे पाहतात. त्यावर उपाय म्हणून हा अमर्याद त्याग जो करण्यात आला त्यांना स्वतःच्या नजरेत विनम्र करतो आणि त्यांच्या मनात ती कृतज्ञता आणि स्तुती भरून टाकतो जे पतन न झालेल्या लोकांना कधीच समजणार नाही ते त्याचे कौउक कधीच करू शकणार नाहीत. त्यांची मोठ्या प्रमाणावर क्षमा झाली म्हणून तेवढीच ते प्रिती करतात. ख्रिस्ताच्या दुखाचे वाटेकरी बनून, त्याच्या गौरवाचे देखील त्यांना वाटेकरी बनायचे आहे.

**(२३) नितीमानांवरील कोणता धिक्कार काढून टाकण्यात येईल?**

***तो मृत्यू कायमचा नाहीसा करतो; प्रभू परमेश्वर सर्वांच्या चेहर्‍यावरील अश्रू पुसतो; तो अखिल पृथ्वीवरून आपल्या लोकांची अप्रतिष्ठा दूर करतो, कारण परमेश्वर हे बोलला आहे. (यशया २५:८)***

देवाचे वारसदार हे पोटमाळयातून, झोपड्यातून, अंधारकोठडीतून, फाशीच्या तखत्यातून, पर्वते, अरण्ये, पृथ्वीवरील गुहांमधून, आणि समुद्राच्या आवारातून आलेले आहेत. पृथ्वीवर ते “अनाथ, छळलेले, त्रस्त होते.” लाखो लोक असेच अपकीर्तीचे ओझे घेऊन कबरेत गेले कारण त्यांनी अगदी अढळ रीतीने सैतानाच्या फसवणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष केले. मानवी न्यायाच्या दरबारात त्यांना सर्वात घोर असे गुन्हेगार म्हणून ठरवण्यात आले. पण आता “देव स्वतः तो न्यायाधीश आहे.” स्तोत्रसहिता ५०:६. आता पृथ्वीवरील न्याय

उलट झाले आहेत. “तो अखिल पृथ्वीवरून आपल्या लोकांची अप्रतिष्ठा दूर करतो.” यशया २५:८. “ते त्यांना पवित्र लोक, प्रभूचे उद्धार पावलेले असे म्हणतील.” सीयोनेतील शोकग्रस्तांना राखेच्या ऐवजी शिरोभूषण घालावे, त्यांना शोकाच्या ऐवजी हर्षरूप तेल द्यावे; खिन्न आत्म्याच्या ऐवजी प्रशंसारूप वस्त्र द्यावे.” यशया ६२:१२; ६१:३. आता ते काही दुर्बल, त्रस्त, विखुरलेले आणि छळ झालेले नाहीत. ह्यापुढे ते सदैव प्रभूसोबत असणार आहेत. ते त्या सिंहासनाच्या समोर अधिक धनवान झगे घालून उभे राहतील आणि हे तर पृथ्वीवरील सर्वात सन्माननीय लोकांनी देखील घातलेले नसतील. पृथ्वीवरील राजे महाराजे ह्यांच्यावर जे मुकुट घालण्यात आले त्यापेक्षा अधिक गौरवी अशा मुकुटांनी ते मंडित आहेत. वेदना आणि रडण्याचे दिवस सदासर्वकाळसाठी संपलेले आहेत. गौरवी राजाने त्यांच्या चेहऱ्यावरचे अश्रू पुसून टाकले; दुखाचे प्रत्येक कारण काढून टाकण्यात आले आहे.

झावळयाच्या फांद्या हातामध्ये घेऊन ते स्तुतीचे, स्पष्ट, मधुर आणि सुसंगतीचे असे गीत गातात; प्रत्येक वाणीने ते ऐकू येते, जोपर्यंत त्या गीतांची सुमधुर गर्जना संपूर्ण स्वर्गात ऐकू येते: “ते उच्च स्वराने म्हणत होते : “राजासनावर बसलेल्या आमच्या देवाकडून व कोकऱ्याकडून, तारण आहे!” “आमेन; धन्यवाद, गौरव, ज्ञान, उपकारस्तुती, सन्मान, सामर्थ्य व बळ हे युगानुयुग आमच्या देवाचे आहेत! आमेन.”**प्रगटीकरण** ७:१०,१२.

**(२४) उद्धाराच्या कार्याच्या योजनेचे वर्णन पवित्र शास्त्र कसे करते?**

*सुभक्तीचे रहस्य निर्विवाद मोठे आहे; तो देहाने प्रकट झाला, आत्म्याने नीतिमान ठरला, देवदूतांच्या दृष्टीस पडला, त्याची राष्ट्रांत घोषणा झाली, जगात त्याच्यावर विश्वास ठेवण्यात आला,तो गौरवात वर घेतला गेला. (१ तीमथी ३:१६)*

ह्या जीवनात आपण केवळ उद्धाराच्या कार्याचे गमक समजून घेण्याची सुरुवात करू शकतो. आपल्या मर्यादित समजबुद्धीने आपण ती लज्जा आणि गौरव विचारात घेऊ शकतो, जीवन आणि मृत्यू, न्याय आणि दया, जे वधस्तंभात एकत्र येतात; तरीही आपल्या मानसिक शक्तीच्या व्याप्तीने त्याचे संपूर्ण महत्व ग्रहण करण्यात आपण अपयशी होतो.

त्या उद्धार देणाऱ्या प्रेमाची लांबी आणि रुंदी, खोली आणि उंची, हे कमी प्रमाणात ग्रहण करण्यात येतात. त्या उद्धाराची योजना पूर्णपणे समजली जाणार नाही, अगदी जेव्हा उद्धार पावलेले लोक त्याकडे पाहतात आणि जाणून घेतात; पण त्या सनातन युगांमधून नवीन सत्य सातत्याने विचार करणाऱ्या आनंदी मनाला उलगडत राहील. जरी पृथ्वीवरील वेदना आणि मोह त्रास संपतात आणि त्यामागचे कारण देखील काढण्यात येते, देवाच्या लोकांना एक ठळक, विशिष्ट ज्ञान मिळेल कि त्यांच्या तारणाची किंमत नक्की काय आहे.

## (२५) उद्धार पावलेल्या लोकांचे भूतकाळातील, वर्तमान काळातील आणि भविष्यकाळातील विज्ञान आणि संगीत काय आहे?

*तिची रुंदी, लांबी, उंची व खोली किती, हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घेण्यास व बुद्धीस*

*अगम्य अशी ख्रिस्ताची प्रीती ओळखून घेण्यास शक्तिमान व्हावे; असे की तुम्ही देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे. (इफिसकरास पत्र ३:१८-१९)*

संपूर्ण सनातन काळामध्ये ख्रिस्ताचा वधस्तंभ हा उद्धार पावलेल्या लोकांचे विज्ञान आणि संगीत असेल. ख्रिस्त जो गौरविला जातो त्यातच ते क्रुसावर गेलेल्या ख्रिस्ताला पाहतात. ह्याचे कधीच विस्मरण होणार नाही की ज्याच्या सामर्थ्याने असंख्य विश्व तयार केले व राखले ह्या सर्व सृष्टीच्या कार्यात, देवाचा अतिप्रिय, स्वर्गाचे वैभव, ज्यावर प्रेम करण्याची इच्छा आणि आनंद करूब आणि सेराफाने घेतला,—पतन पावलेल्या मनुष्याला उंचावण्यासाठी त्याने स्वतःला विनम्र केले ; पापाचा दोष आणि लज्जा त्याने स्वीकारल्या, आणि आपल्या पित्याचा चेहरा जो लपवण्यात आला, जोपर्यंत एका हरवलेल्या जगाचे धिक्कार ह्यांनी त्याचे हृद्य भग्न केले आणि कालवरीच्या वधस्तंभावर त्याचे जीवन ठेचून काढले. सर्व जगाचा निर्माणकर्ता, सर्व प्रारब्धाचा धनी, त्याने आपले गौरव बाजूला ठेवले आणि अपमानित होऊ दिले केवळ मनुष्यावरील प्रेमासाठी ह्या कारणाने संपूर्ण विश्वात ते आश्चर्य आणि अद्भुत हे कायम राहणार. तारण झालेली राष्ट्रे जसे त्या उद्धारकाकडे पाहतात आणि पित्याच्या चेहऱ्याकडे पाहून त्यावरील गौरव बघतात; त्याचे सिंहासन जसे न्याहाळतात, जे सर्वकाळसाठी आहे, आणि हे जाणून घेण्यास की त्याच्या राज्यास कोणताही अंत नाही, आनंदाच्या विजयशाली गीताने ती गीते गातात: “जो कोकरा वधला गेला तो सन्मानीय, पात्र आहे, ज्याने स्वतःच्या अनमोल रक्ताने देवाच्या प्रती आपला उद्धार केला आहे!”

कृसाचे रहस्य इतर सर्व रहस्यांचे स्पष्टीकरण करते. कालवरीमधून जो प्रकाश चमकतो देवाचे सर्व गुणविशेष ज्यांनी आपल्यामध्ये भय आणि आश्चर्य निर्माण केले ते सुंदर आणि आकर्षक दिसतात. दया, कोमलता आणि पालकत्व दाखवणारे प्रेम ह्यांची सांगड पावित्र्य, न्याय आणि सामार्थ्याशी झालेली दिसते. आपण त्याच्या सिंहासनाचे वैभव जसे पाहतो, उच्च आणि वर असलेले, आपण त्याचे चारित्र्य त्याच्या कृपाळू गोष्टीत पाहतो, आणि कधीही झाले नाही तसे त्या प्रिय शीर्षकाला "आमच्या पित्या" जाणून घेतो.

हे दिसून येईल की जो सुज्ञानात अमर्याद असा आहे तो त्याच्या पुत्राच्या अर्पणाच्या शिवाय आपल्या तारणासाठी इतर कोणतीच योजना रचू शकला नाही. ह्या त्यागाची किमत किंवा मोबदला म्हणजे पृथ्वीवर त्या लोकांना आनंदाने भरून टाकणे ज्यांचा उद्धार झाला आहे, जे पवित्र, आनंदी आणि अमर असे आहेत. तारणार्याचा जो अंधकाराच्या सत्तांसोबत संघर्ष झाला त्याचा परिणाम उद्धार झालेल्या लोकांसाठी आनंद आहे, सनातन काळासाठी ते देवाचे गौरव न्याहाळणे आहे. आणि असे त्या जीवात्म्याचे मोल आहे की पिता दिलेल्या किमतीने तृप्त झाला; आणि स्वतः ख्रिस्त, ह्या त्याच्या महान अर्पणाचे फळ पाहून तृप्त झाला.

***मी त्या महान दिवसाकडे पाहत आहे जेव्हा ख्रिस्त स्वर्गातून मेघारूढ होऊन येईल आणि ह्या पृथ्वीवरील दुष्तेपासून आणि जो त्रासाचा साम्य आपल्यापुढे आहे त्यापासून लोकांची सुटका करेल.***

***गोल करा:*** ***होय*** ***अनिश्चित***

*ख्रिस्ताचे आनंदी आमंत्रण स्वीकारण्यास मी अपेक्षेने वाट पाहत आहे जेव्हा तो म्हणेल, "या, माझ्या पित्याचे आशीर्वादित लोक, जगाच्या स्थापनेपासून जे राज्य तुमच्यासाठी तयार करण्यात आले होते त्याचे वतनदार व्हा."*

*गोल करा :     होय     अनिश्चित*



# धडा १२
# पृथ्वी ओसाड पडणे

(१) दयेचा कोणता संदेश स्वर्ग घोषित करत आहे अशा लोकांसाठी जे अजाणतेपणे बाबेलोनच्या खोट्या सिद्धांतांचे अनुसरण करत आहेत?

*मग स्वर्गातून निघालेली दुसरी एक वाणी मी ऐकली; ती म्हणाली, "'माझ्या लोकांनो,' तुम्ही तिच्या पापांचे वाटेकरी होऊ नये आणि तुम्हांला तिच्या पीडांतील कोणतीही पीडा होऊ नये म्हणून 'तिच्यामधून निघा.' (प्रगटीकरण १८:४)*

(२) बाबेलोन आणि जे तिच्या शिक्वणींना चिकटून राहतात त्यांच्यावर कोणता न्याय ओढवेल?

*ह्यामुळे तिच्या पीडा म्हणजे मरण, दुःख व दुष्काळ 'एका दिवशीच येतील,'*

*आणि ती अग्नीत जाळून टाकली जाईल; कारण तिचा 'न्यायनिवाडा करणारा प्रभू' देव 'सामर्थ्यवान' आहे." (प्रगटीकरण १८:८)*

असे न्याय बाबेलोन वर ओढवतील जेव्हा देवाचा क्रोध त्यांची भेट घेईल. तिच्या अधर्माचे पात्र भरले आहे; तिचा समय आला आहे; नाशासाठी ती परिपक्व झाली आहे. जेव्हा देवाची वाणी त्याच्या लोकांचा बंदिवास उलटवेल, जीवनाच्या महान संघर्षात ज्यांनी सर्वकाही गमावले ते भयंकर रीतीने जागृत होतील. हा तयारीचा समय चालू असताना सैतानाच्या लबाडीने त्यांच्या डोळयांवर पट्टी बांधली, आणि त्यांच्या पापाचे त्यांनी समर्थन केले. जे कमनशिबी होते किंवा ज्यांच्यावर कमी मर्जी होती त्यांच्यावर श्रीमंतांनी वर्चस्व गाजवले; पण त्यांनी त्यांचे धन तर देवाच्या नियमांचे उल्लंघन करून मिळवले होते

**(३) ज्या लोकांचा नाश होत आहे त्यांनी स्वेच्छेने कोणत्या मुलभूत तत्वाचे उल्लंघन केले आहे?**

*परका होतो तेव्हा मला घरात घेतले नाही; उघडा होतो तेव्हा मला वस्त्र दिले नाही, आजारी व बंदिशाळेत होतो तेव्हा माझ्या भेटीला आला नाहीत.' त्या वेळेस हेही त्याला उत्तर देतील, 'प्रभूजी, आम्ही केव्हा तुम्हांला भुकेले, तान्हेले, परके, उघडे, आजारी किंवा बंदिशाळेत पाहिले आणि तुमची सेवा केली नाही?' तेव्हा तो त्यांना उत्तर देईल, 'मी तुम्हांला खचीत सांगतो की, ज्या अर्थी ह्या कनिष्ठांपैकी एकालाही केले नाही, त्या अर्थी ते मला केले नाही.' (मत्तय २५:४३-४५)*

उपाशी लोकांचे पोट भरण्यास त्यांनी दुर्लक्ष केले, नग्न लोकांना वस्त्र घालण्यास, न्यायीपणे वागून दया दाखवण्यास त्यांचा जोर होता. स्वतःला उंच करण्यास त्यांनी पाहिले आणि त्यांच्या सह निर्मितीने त्यांचा आदर करावा अशी त्यांची इच्छा होती. आता ज्या सर्व गोष्टींनी त्यांना महान बनवले त्या त्यांच्यातून काढून टाकण्यात आल्या आहेत आणि आता ते निराश्रित आणि असहाय्य असे आहेत. भयंकर अशा वृत्तीने आता ते त्या मूर्तींकडे पाहतात ज्यांची त्यांनी आपल्या निर्माणकर्त्याच्या पुढे उपासना केली होती. त्यांचे जीवत्मे त्यांनी पृथ्वीवरील धन आणी लाभासाठी विकले, आणि देवाच्या प्रती धनवान होण्याची त्यांनी इच्छा बाळगली नाही. ह्याचा परिणाम म्हणजे, त्यांची जीवने अपयशी आहेत; त्यांचा आनंद हरवून गेला आहे, त्यांचे धन भ्रष्ट झाले आहे. आयुष्यभराची कमाई क्षणाधार्थात संपली. श्रींमंत लोक त्यांचे बलाढ्य घरे नष्ट झाले म्हणून शोक करतात, आणि त्यांचे सोने आणि रूपे देखील विखुरली गेली. पण त्यांचा शोक त्या भयाने शांत केला जातो की स्वतः त्यांचा त्यांच्या मूर्तीसोबत नाश होणार आहे.

**(४) जेव्हा दुष्ट लोक खऱ्या अर्थाने पश्चाताप करतात तेव्हा त्यांच्या आयुष्यात कोणता बदल घडतो?**

*तर माझे नाम ज्यांना दिले आहे त्या माझ्या लोकांनी दीन होऊन माझी प्रार्थना केली आणि माझ्या दर्शनाविषयी उत्सुक होऊन ते आपल्या दुष्ट मार्गांपासून परावृत्त झाले तर मी स्वर्गातून त्यांची विनंती ऐकून त्यांच्या पापांची त्यांना क्षमा करीन व त्यांच्या देशातून क्लेश नाहीसे करीन. (२ शास्ते ७:१४)*

दुष्टांच्या मनात पश्चाताप आहे, देवाचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा त्यांनी पापमय रीतीने त्याग करून दुर्लक्ष केले म्हणून नाही, पण देव विजयी झाला आहे म्हणून. जो परिणाम आहे त्यासाठी त्यांचा शोक दिसून येतो; पण त्यांच्या दुष्टतेवर ते पश्चाताप करत नाहीत. त्यांना शक्य असते तर विजय मिळवण्यासाठी त्यांनी कोणतेही प्रयत्न सोडले नसते.

**(५) नितीमानांसाठी कोणते अद्भुत अभिवचन परिपूर्ण झालेले दिसते?**

***कारण तो पारध्याच्या पाशापासून घातक मरीपासून तुझा बचाव करील. तो तुझ्यावर पाखर घालील, त्याच्या पंखांखाली तुला आश्रय मिळेल; त्याचे सत्य तुला ढाल व कवच आहे. (स्तोत्रसंहिता ९१:३-४)***

जग आता त्या वर्गाकडे पाहतो ज्यांची त्यांनी थट्टा केली आणि चेष्टा केली, आणि त्यांना उपटून टाकण्याची इच्छा बाळगली, आणि हेच लोक कोणत्याही प्रकारे इजा न होता त्या मरीतून, वादळ आणि भूमिकंप ह्यातून पार जाताना ते पाहतात. जे त्याच्या नियमशास्त्राचे उल्लंघन करतात त्यांच्यासाठी जो भस्म करणारा अग्नी आहे, तोच त्याच्या लोकांसाठी एक सुरक्षित आश्रयदुर्ग आहे.

**(६) अध्यात्मिक पुढार्यांवर कोणता न्याय घोषित केला जाईल ज्यांनी सत्याकडे दुर्लक्ष केले आणि त्यांच्या कळपाला दूर लोटले?**

***"जे मेंढपाळ माझ्या कुरणातल्या मेंढरांचा नाश करतात व त्यांना विखरतात ते हायहाय करतील!" असे परमेश्वर म्हणतो. ह्यामुळे माझ्या लोकांना चारणाऱ्या मेंढपाळांविषयी***

*इस्राएलाचा देव परमेश्वर म्हणतो, "तुम्ही माझा कळप विखुरला आहे, त्यांना हाकून लावले आहे, त्यांचा समाचार घेतला नाही; पाहा, मी तुमच्या कर्मांचा अनिष्ट परिणाम तुमच्यावर आणून तुमचा समाचार घेईन, असे परमेश्वर म्हणतो. (यिर्मया २३:१-२)*

ज्या सेवकाने लोकांची मर्जी संपादन करण्यासाठी सत्याचा त्याग केला तो आता त्याच्या शिकवनींचे चारित्र्य आणि प्रभाव ओळखतो. हे तर सिद्ध आहे कि सर्वज्ञानी डोळा त्याच्या मागे नजर ठेऊन होता जेव्हा तो त्या मेजाकडे उभा होता, रस्त्यावर तो चालत असताना, आयुष्याच्या विभिन्न दृश्यात ते लोकांशी कसे मिसळले ते दिसते. जीवात्म्याची प्रत्येक संवेदना, प्रत्येक लिखित ओळ, प्रत्येक उच्चारण्यात आलेला शब्द, प्रत्येक कृती जिने लोकांना खोट्या गोष्टीत आधार घेण्यास भाग पाडले, आता ती सर्वत्र बीज विखुरताना दिसते; आणि आता त्या दुष्ट, पतन पावलेल्या जीवात्म्यांना जे त्याच्या भोवती आहेत, तो हंगाम आता पाहतो.

**(७) हे अविश्वासू पुढारी काय कबूल करण्यात अपयशी ठरले?**

**(८)**

*तुझे वचन संपूर्णपणे सत्य आहे; तुझे सर्व न्याय्य निर्णय सनातन आहेत. (स्तोत्रसहिता ११९:१६०)*

*तुझे न्याय्यत्व हे सनातन न्याय्यत्व आहे, आणि तुझे नियमशास्त्र सत्य आहे. (स्तोत्रसहिता ११९:१४२)*

सेवक आणि लोक ह्यांना दिसते की देवासोबत त्यांचे नातेसंबंध योग्य नव्हते. ते

पाहतात कि त्यांनी सर्व न्यायी आणि नीतिमान नियमशास्त्राच्या उत्पादकाच्या विरुद्ध बंडाई केलेली आहे. त्या दैवी आज्ञांना बाजूला ठेवण्यामुळे हजारो दुष्टता, वैमनस्य, द्वेष, अधर्म उदयास आले जोपर्यंत पृथ्वी हि एका संघर्षभूमी बनली, आणि भ्रष्टाचाराचे एक ठिकाण बनली. ज्यांनी सत्याचा नकार केला आणि चुकीला कवटाळण्याची निवड केली अशा लोकांचे हे मत आहे. कोणतीही भाषा जे अवज्ञा करणारे आणि अप्रामाणिक लोक आहेत त्यांना जी भावना आहे की त्यांनी सनातन जीवन गमावले ह्याचे वर्णन करू शकत नाही. ज्या लोकांची आराधना जगाने त्यांचे कलागुण आणि वक्तृत्वासाठी केली आता ह्या गोष्टी खऱ्या अर्थाने पाहतात. त्यांना उल्लंघन केल्याने काय गमवावे लागले ह्याची जाणीव होते, आणि ज्या लोकांचा प्रामाणिकपणा पाहून त्यांनी त्यांना तुच्छ लेखले आणि उपहास केला त्यांच्या चरणी पडून, ते कबूल करतात की देवाने त्यांच्यावर प्रेम केले.

**(८) पतन पावलेले लोक ज्यांनी त्यांचा विश्वासघात केला त्यांच्याप्रती कशी प्रतिक्रिया देतील?**

***त्या दिवशी असे होईल की, परमेश्वराकडून त्यांची फार त्रेधा उडेल, ते प्रत्येक आपापल्या शेजाऱ्याचा हात धरतील; आणि त्या प्रत्येकाचा हात आपल्या शेजाऱ्याच्या हाताशी प्रतिकार करील; (जखऱ्या १४:१३ )***

लोकांना दिसते की त्यांना भ्रमात ठेवण्यात आले होते. एकमेकांवर ते दोष लावतात कि त्यांना नाशाकडे नेण्यात आले; पण सर्व सेवकांवर त्यांचे सर्वात कटू दोष ओतण्यासाठी एकत्रित होतात. अविश्वासू पाळकानी सोप्या गोष्टींची भविष्यवाणी केली; त्यांच्या श्रोत्यांनी

देवाचे नियमशास्त्र रिक्त करण्यास त्यांना मार्गदर्शन केले आणि जे त्याला पवित्र लेखतील त्यांचा त्यांनी छळ केला. आता, त्यांच्या निराशेत, हे शिक्षक जगासमोर ह्या फसवणुकीच्या कार्याची कबुली देतात. लोकसमुदाय क्रोधाने भरलेला आहे. "आमचे पतन झाले!" ते रडतात, "आणि आमच्या विनाशाचे कारण तुम्ही आहात;" आणि ते खोट्या मेंढपाळाच्या विरुद्ध बोलतात.

ज्या लोकांनी त्यांना न्याहाळले तेच त्यांच्यावर सर्वात भयंकर असे शाप उद्गृत करतात. ज्या हातांनी त्यांना एकेकाळी मुकुटमंडित केले ते आता त्यांच्या नाशासाठी उठवले जातात. देवाच्या लोकांना ठार करण्यासाठी ज्या तलवारी उठल्या गेल्या त्या आता त्यांच्या शत्रूंचा सर्वनाश करण्यासाठी वापरण्यात येतात. सर्वत्र संघर्ष तंटा आणि रक्तपात आहे.

**(९) ह्या तयारीच्या समयाच्या समाप्तीस देव आणि सैतान ह्यांच्यातील वाद कोणाला समाविष्ट करून घेण्याप्रत ताणला जातो?**

*पृथ्वीच्या दिगंतापर्यंत हा गोंगाट पोहचला आहे; कारण मी परमेश्वर राष्ट्रांशी प्रतिवाद करीत आहे, मी सर्व मानवजातीबरोबर वाद घालीत आहे, व दुष्टांना तलवारीच्या स्वाधीन करीत आहे, असे परमेश्वर म्हणतो." (यिर्मया २५:३१)*

सहा हजार वर्षे हा महान वादविवाद अस्तित्वात आहे; देवाचा पुत्र आणि त्याचे स्वर्गीय दूत सातत्याने त्या दुष्ट शक्तीशी झुंज करतात, लोकांना इशारा देत, त्यांना प्रकाशित करत आणि त्यांचे तारण करण्यासाठी. आता सर्वांनी त्यांचे निर्णय घेतले आहेत; दुष्ट लोक

सैतानाशी ऐक्जुत होऊन देवाच्या विरोधातील युद्धात सहभागी झाले आहेत. देवाचे जे नियमशास्त्र कमी लेखण्यात आले होते आता देवाने त्याचे समर्थन करण्याचा समय आलेला आहे. आता हा वादविवाद केवळ सैतानाच्या सोबत नाही, तर लोकांच्या बरोबर आहे. “प्रभूचा राष्ट्रांशी वादविवाद चालू आहे;” “जे कोणी दुष्ट असतील त्यांना तो त्या तलवारीच्या जाती देईल.”

**(१०) जेव्हा हे दुष्ट लोक ख्रिस्ताला मेघांवर आरूढ होऊन येताना बघतील तेव्हा त्यांचे काय होईल?**

*मग तो अनीतिमान पुरुष प्रकट होईल, त्याला प्रभू येशू ‘आपल्या मुखातील श्वासाने मारून टाकील’, आणि तो येताच आपल्या दर्शनाने त्याला नष्ट करील. (२ थेसलोनिकरास पत्र २:८)*

*आणि ते डोंगरांना व खडकांना म्हणाले, “आमच्यावर पडून राजासनावर जो बसलेला आहे, त्याच्या दृष्टीपुढून व कोकऱ्याच्या क्रोधापासून आम्हांला ‘लपवा.’कारण त्याच्या ‘क्रोधाचा मोठा दिवस’ आला आहे, ‘आणि कोणाच्याने टिकाव धरवेल?” (प्रगटीकरण ६:१६-१७)*

ख्रिस्ताच्या येण्याच्या समयी सर्व दुष्ट ह्या पृथ्वीवरून पुसून टाकण्यात येतील- त्याच्या मुखाच्या आत्म्याने व्याप्त होऊन आणि त्याच्या गौरवाच्या प्रकाशाने त्यांचा नाश होईल. ख्रिस्त त्यःच्या लोकांना देवाच्या शहरात नेईल, आणि पृथ्वीवरून सर्व रहिवासी निघून जातील. “पाहा, परमेश्वर पृथ्वी रिक्त करीत आहे, तिला ओसाड करीत आहे, तिला विरूप करीत आहे व

तिच्या रहिवाशांची दाणादाण करीत आहे. पृथ्वी अगदी रिक्त होईल, तिची लूट होईल; कारण परमेश्वर हे वचन बोलला आहे." यशया २४:१,३.

**(११) दुष्टांचा नाश होण्यासाठी ते मुलभूत कारण काय आहे?**

***पृथ्वी आपल्या रहिवाशांकडून भ्रष्ट झाली आहे, कारण त्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे, विधींचे अतिक्रमण केले आहे आणि सनातन करार मोडला आहे. ह्यास्तव पृथ्वी शापाने ग्रासली आहे, तिचे रहिवासी पापाचे फळ भोगत आहेत; पृथ्वीचे रहिवासी जळून भस्म झाले आहेत, मानव थोडेच उरले आहेत. (यशया २४:५-६)***

"... म्हणूनच त्या शापाने पृथ्वीचा संहार केला, आणि जे त्याच्यात वस्ती करतात ते निराश्रित होतातः म्हणूनच पृथ्वीवरील रहिवासी जळून जातात." [सनातनचा करार पहा निर्गम ३१:१६,१७; २०:८, ११; यहज्केल २०:१२; यशया ६६:२२,२३].

**(१२) प्रभूच्या येण्याच्या प्रत्यक्ष कोणता परिणाम पृथ्वीवर दिसून येईल?**

***तरी रात्री चोर येतो तसा प्रभूचा दिवस येईल; त्या दिवशी आकाश मोठा नाद करत नाहीसे होईल, सृष्टितत्त्वे तप्त होऊन लयास जातील, आणि पृथ्वी व तिच्यावरील गोष्टी उघडकीस येतील. (२ पेत्र ३:१०)***

संपूर्ण पृथ्वी एका ओसाड अरण्याप्रमाणे दिसते. शहरे आणि गावे ह्यांचे अवशेष दिसतात जे भूमिकंपाने नष्ट झाले, जी झाडे मुळासकट

उपटली गेली, समुद्राने जे जीर्ण झालेली खडक तोडून दिले किंवा जे पृथ्वीने टाकले ते सर्वत्र त्या ठिकाणी पसरलेले दिसतात, आणि खुल्या आवारात त्या खुणा दिसतात जिकडून पर्वते त्यांच्या मुळापासून उपटून टाकण्यात आली आहेत.

**(१३) ख्रिस्ताच्या दुसऱ्या पुनरागमनासोबत सैतानाचे काय भवितव्य आहे?**

***त्याने 'दियाबल' व 'सैतान' म्हटलेला जुनाट 'साप' म्हणजे तो अजगर ह्याला धरले, आणि त्याने एक हजार वर्षेपर्यंत बांधलेल्या अवस्थेत पडून राहावे म्हणून त्याला त्या अथांग डोहात टाकून दिले;***
***आणि ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत त्याने राष्ट्रांना आणखी ठकवू नये म्हणून वरून बंद करून त्यावर शिक्का मारला. त्यानंतर त्याला थोडा वेळ सोडले पाहिजे. (प्रगटीकरण*** *२०:२-३)*

आता ती घटना घडते जी शेवटल्या सार्वभौम सेवेत पश्चातापाच्या दिवशी व्यक्त होते. जेव्हा अति पवित्र ठिकाणी सेवा पूर्ण होते, आणि इस्राएलाची पापे त्या सभास्थानातून पापार्पनाच्या रक्ताने काढली जातात, मग त्या बळीच्या बकऱ्याला जिवंत प्रभूसमोर प्रस्तुत केले जाते; आणि मंडळीच्या समक्ष मुख्य याज्काने त्याच्यासमोर कबुली दिली "इस्राएल लोकांची सर्व दुष्कर्मे व अपराध ह्यांचा म्हणजे त्यांच्या सर्व पापांचा अंगीकार करावा; व ती त्या बकऱ्याच्या डोक्यावर ठेवून ." लेवीय १६:२१.

त्याच पद्धतीने, जेव्हा स्वर्गीय सभास्थानात पश्चातापाचे कार्य पूर्ण होते, मग देव आणि पवित्र देवदूत आणि उद्धार पावलेल्या

लोकांच्या समक्ष देवाच्या लोकांची पापे सैतानावर लादण्यात येतील; आणि त्या लोकांनी जी सर्व पापे केली त्याचा दोष सैतानावर लावण्यात येईल. आणि त्या बळीच्या बकऱ्याला एका निर्जन प्रदेशात पाठवले जाते, जेणेकरून सैतान त्या नाशवंत पृथ्वीवर , जी निर्जन आणि भयंकर असे अरण्य आहे त्यात त्याचा नाश होईल.

**(१४) सैतानाच्या १,००० वर्ष बंदिवसाच्या समयी देव त्याच्या कृतींवर कोणत्या मर्यादा लावेल?**

***आणि ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत त्याने राष्ट्रांना आणखी ठकवू नये म्हणून वरून बंद करून त्यावर शिक्का मारला. त्यानंतर त्याला थोडा वेळ सोडले पाहिजे. (प्रगटीकरण २०:३)***

हजारो वर्षांसाठी सैतानाचे घर आहे जिकडे तो त्याच्या दुष्ट दुतांबरोबर राहिला. पृथ्वीसाठी मर्यादित, त्याला दुसऱ्या जगाशी ज्यांचे कधीही पतन झाले नाही त्यांना मोहात टाकण्यासाठी आणि चीडीस आणण्यासाठी संबंध ठेवता येणार नाही. ह्या बाबतीत तो बांधला गेला आहे: कोणीही उरलेले नाही, ज्यांच्यावर तो त्याची शक्ती आजमावून पाहू शकतो. फसवणुकीचे आणि विनाशाचे कार्य ह्यातून तो पूर्णपणे काढून टाकण्यात येतो जे अनेक शतकांसाठी त्याचा एकमेव आनंद आहे.

सहा हजार वर्षांसाठी, सैतानाचे बंडाईचे कार्य ह्याने "पृथ्वीला कंपित केले." त्याने "जगाला एक अरण्यासारखे बनवले, आणि ती सर्व शहरे नष्ट केली." आणि त्याने "त्याच्या बंदिवानांचे घर उघडले नाही." सहा हजार वर्षांसाठी त्याचे तुरुंगाचे घर ह्याने देवाच्या लोकांचा स्वीकार केला, आणि सदैव तो त्यांना

बंदिवान म्हणून ठेवेल; पण ख्रिस्ताने त्यांचे बंध मोडून टाकून त्यांना मुक्त केले आहे.

दुष्टांना देखील सैतानाच्या शक्तीच्या पलीकडे ठेवले आहे, आणि त्याचे दुष्ट दूत घेऊन त्याला त्या शापाचा परिणाम काय आहे ह्याची जाणीव होते. "राष्ट्रांचे राजे सगळे आपापल्या घरी गौरवाने निद्रिस्त आहेत; पण तुला फेकून दिलेल्या फांदीप्रमाणे आपल्या थडग्यापासून दूर झुगारून दिले आहे; ............त्यांच्याबरोबर तुला मूठमाती मिळणार नाही, कारण तू आपल्या देशाची नासधूस केली व आपल्या प्रजेचा वध केला; कुकर्म्यांच्या वंशाचे नाव कधी मागे उरणार नाही." यशया १४:१८-२०.

हजार वर्षांसाठी, सैतान ह्या नाशवंत पृथ्वीवर भ्रमण करेल आणि देवाच्या नियमशास्त्राच्या विरुद्ध जी बंडाई झाली आहे त्याचे परिणाम बघेल. ह्या समयात त्याच्या यातना ह्या तीव्र आहेत. त्याचे पतन झाल्यापासून त्याच्या न थांबणाऱ्या कृतीच्या जीवनातून ते प्रगट झाले आहे; पण आता तो त्याच्या सामार्थ्यापासून परावृत्त झाला आणि आता तो मनन करतो ज्या वेळेपासून पहिल्यांदा त्याने स्वर्गाच्या शासनेच्या विरुद्ध बंडाई केली, आणि थरकापाने आणि भयाने त्या भयंकर भविष्याकडे पाहतो जेव्हा त्याने केलेल्या सर्व दुष्टाईसाठी त्याला मोबदला द्यावा लागेल आणि जी सर्व पापे त्याच्यामुळे घडली त्यासाठी त्याला शिक्षा दिली जाईल.

**(१५) त्या १,००० वर्षांच्या दरम्यान उद्धार पावलेल्या लोकांच्या कृती काय असतील?**

*नंतर 'मी राजासने पाहिली,' त्यांच्यावर 'कोणी बसले होते;' त्यांना 'न्यायनिवाडा करण्याचा अधिकार दिला होता;' आणि येशूविषयीच्या*

*साक्षीमुळे व देवाच्या वचनामुळे ज्यांचा शिरच्छेद झाला होता, आणि ज्यांनी श्वापदाला व त्याच्या मूर्तीला नमन केले नव्हते आणि आपल्या कपाळांवर व आपल्या हातांवर त्याची खूण धारण केलेली नव्हती, त्यांचे आत्मेही पाहिले; ते जिवंत झाले आणि त्यांनी ख्रिस्ताबरोबर एक हजार वर्षे राज्य केले. (प्रगटीकरण २०:४)*

त्या हजार वर्षांच्या दरम्यान पहिले आणि दुसरे पुनरुत्थान होण्याच्या दरम्यान दुष्टांचा न्याय करण्यात येईल. प्रेषित पौल ह्या न्यायाकडे लक्ष वेधून घेतो की हि घटना दुसऱ्या येण्यानंतर घडेल. “म्हणून त्या समयापूर्वी म्हणजे प्रभूच्या येण्यापूर्वी तुम्ही न्यायनिवाडा करूच नका; तो अंधारातील गुप्त गोष्टी प्रकाशात आणील आणि अंतःकरणातील संकल्पही उघड करील; आणि मग प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणे देव त्याची वाहवा करील.” १ करिंथकरास पत्र ४:५. दानियेल घोषित करतो की जेव्हा पुराणपुरुष आला तेव्हा, “ देवाच्या पवित्र जनांना न्याय मिळाला.” दानियेल ७:२२.

ह्या वेळी नीतिमान लोक देवाच्याप्रती राजे आणि याजक म्हणून राज्य करतात. . . ह्या वेळी असे दिसते की, जशी पौलाने भविष्यवाणी केली, “पवित्र जन जगाचा न्यायनिवाडा करतील .” १ करिंथकरास पत्र ६:२. ख्रिस्तासोबत एकत्र येऊन ते दुष्टांचा न्याय करतात, त्यांच्या कृतींची तुलना नियमशास्त्राच्या पुस्तकाशी, पवित्र शास्त्राशी करतात, आणि शरीरात जे कार्य होतात त्यानुसार प्रत्येक बाबीला तपासून घेतात. मग दुष्टांनी सहन करण्याचा भाग मोजला जातो, त्यांच्या कार्यानुसार;आणि मृत्युच्या पुस्तकात

त्यांच्या नावाच्या समोर त्यांची निंद म्हणून करण्यात येते.

**(१६) ह्या न्यायात कोणाचा समावेश होईल?**

*किंवा पवित्र जन जगाचा न्यायनिवाडा करतील हे तुम्हांला ठाऊक नाही काय? तुमच्याकडून जगाचा न्यायनिवाडा व्हायचा आहे, तर तुम्ही अगदी क्षुल्लक बाबींचा न्याय करण्यास अपात्र आहात काय? आपण देवदूतांचा न्यायनिवाडा करणार आहोत हे तुम्हांला ठाऊक आहे ना? तर मग व्यावहारिक गोष्टींविषयी सांगणे नकोच. (१ करिंथकरास पत्र ६:२-३)*

सैतान आणि त्याच्या दुष्ट दुतांचा न्याय ख्रिस्त आणि त्याचे लोक करतील. पौल म्हणतो: “आपण देवदूतांचा न्यायनिवाडा करणार आहोत हे तुम्हांला ठाऊक आहे ना?” वचन ३. आणि यहूदा हे घोषित करतो की “आणि ज्या देवदूतांनी आपले अधिकारपद न राखता आपले वसतिस्थान सोडले, त्यांना त्याने निरंतरच्या बंधनात, निबिड काळोखामध्ये महान दिवसाच्या न्यायाकरता राखून ठेवले.” यहूदा ६.

**(१७) १,००० वर्षाचा काळ समाप्त होताना काय घडेल?**

*मृतांपैकी बाकीचे लोक, ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत जिवंत झाले नाहीत. हेच पहिले पुनरुत्थान. (प्रगटीकरण २०:५)*

हजार वर्षाच्या काळाच्या समाप्तीस दुसरे पुनरुत्थान घडेल. मग दुष्ट मृतांमधून उठवले जातील आणि देवासमोर “लिखित न्याय” पूर्ण होण्यासाठी प्रगट होतील. म्हणूनच प्रगटीकरणात, नितीमानांचे पुनरुत्थान होताना

त्याचे वर्णन करत, म्हणतो: “मृतांपैकी बाकीचे लोक, ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत जिवंत झाले नाहीत. हेच पहिले पुनरुत्थान.” प्रगटीकरण २०:५. आणि दुष्टांच्या संबंधी, यशया घोषणा करतो: “बंदिवानांना जसे अंधारकोठडीत कोंडतात, तसे त्यांना कोंडतील व कारागृहात ठेवतील; आणि बहुत दिवसांनी त्यांची झडती घेतील.” यशया २४:२२.

*शास्त्रवचनात मला प्रगट झाले आहे की ह्या महान वादविवादाची समाप्ती कोणत्या महान घटनांनी होणार आहे. मला समजते कि ह्या संघर्षाच्या शेवटी, प्रत्येक व्यक्तीने एक निर्णय घेतला असेल की ते कोणाच्या प्रती प्रामाणिक राहतील.*

*गोल करा :     होय      अनिश्चित*

*मला जाणीव आहे की माझा नाश होण्याच्या त्याच्या प्रयत्नात सैतान त्याच्या अधिकारात जे सामावते ती प्रत्येक पद्धत अवलंबून माझी फसवणूक करण्याचा प्रयत्न करेल आणि जेव्हा हे अपयशी होतात, त्याच्यामागे छळ हा होतोच.*

*गोल करा :     होय      अनिश्चित*

*मी देवाचे आभारी आहे की तो त्याच्या प्रेमात आणि दयेत त्याच्या लोकांना बाबेलोनच्या खोट्या सिद्धांतामधून बोलवत आहे आणि ते सत्य प्रगट करत आहे ज्यामुळे फसवणूक टाळता येऊ शकेल. पवित्र आत्म्याकडून ते मार्गदर्शन मिळण्याची मी प्रार्थना करतो की चुकीपासून माल सत्य समजावे जेणेकरून फसवलेल्या लोकांमध्ये माझी गणती होणार नाही*

*गोल करा :     होय      अनिश्चित*

मला जाणीव होते की शेवटी मानवाने देवाचे न्याय ह्या पृथ्वीचा जो नाश करणार आहेत त्याच्याशी संगत निवडली आहे. मी त्याच्याशी प्रामाणिक राहण्याची निवड करतो मग कोणतीही किमत मोजावी लागली तरीही आणि माझ्या सुटकेसाठी जी अभिवचने त्याने दिली त्यासाठी आभारी आहे.

गोल करा : होय अनिश्चित



# धडा १३
# वादविवादाची समाप्ती

हजार वर्षांच्या समाप्तीस, ख्रिस्ताचे पुन्हा पृथ्वीवर पुनरागमन होईल. उद्धार पावलेल्या लोकांची त्यांना संगत आहे आणि देवदूतांचा समूह त्यांचे रक्षण करतो. तो भयंकर अशा वैभवाने खाली उतरतो तसे मरण पावलेल्या दुष्ट लोकांना त्यांचा नाश मिळतो. ते पुढे येतात, एक मोठी सेना, जी समुद्राच्या वाळूच्या कणांच्या इतकी असंख्य आहे. जे पहिल्या पुनरुत्थानाच्या दरम्यान उठवले गेले त्यांच्यासाठी हा किती मोठा विरोधाभास आहे! नितीमानांना अमर असे तारुण्य आणि सौंदर्य लाभले आहे. दुष्ट लोक आजार आणि मृत्यूचे अवशेष बाळगतात.

**(१) सत्याच्या सामर्थ्याने प्रेरित होऊन इच्छा नसलेल्या ओठांमधून कोणते शब्द बाहेर पडतील?**

*पाहा, तुमचे घर तुमच्यासाठी ओसाड सोडले आहे. मी तुम्हांला सांगतो, 'परमेश्वराच्या नावाने येणारा तो धन्यवादित,' असे तुम्ही म्हणाल तोपर्यंत मी तुमच्या दृष्टीस पडणार नाही." (लूक १३:३५)*

त्या मोठ्या लोकसमुदायात प्रत्येक नेत्राने देवाच्या पुत्राचे गौरव पहायचे आहे. एकाच आवाजाने दुष्ट सेना आवाज करते: "प्रभूच्या नावाने येणारा धन्यवादीत आहे!" येशूच्या प्रती हे प्रेम नाही ज्यामुळे हे उद्गार बाहेर पडतात. इच्छा नसलेल्या ओठांमधून सत्याची शक्ती हे शब्द बाहेर काढते. दुष्ट लोक त्यांच्या कबरेत पुन्हा जातात तसे, ते ख्रिस्ताच्या प्रती त्याच शत्रुत्वाने बाहेर पडतात आणि तोच बंडखोरीचा आत्मा त्यांच्यात असतो. त्यांच्याकडे नवीन तयारीचा समय नको ज्यामध्ये त्यांच्या भूतकाळातील जीवनाच्या त्रुटींवर उपचार होतो. ह्यामुळे काहीच फायदा होत नाही. आयुष्यभराच्या अधर्माने त्यांचे हृदय मवाळ झाले आहे. दुसरा तयारीचा समय, त्यांना जर तो दिला असता तर,पहिला होता तसा हा दुसरा देखील होईल ज्यामध्ये देवाचे नियम काढून टाकले जातात आणि त्याच्या विरुद्ध बंडाई जी आहे ती प्रवृत्त होते.

**(२) "नवऱ्यासाठी शृंगारलेल्या नवरीप्रमाणे सजलेले" असे स्वर्गातून कोण खाली उतरते?**

*तेव्हा मी 'पवित्र नगरी, नवी यरुशलेम', देवापासून स्वर्गातून उतरताना पाहिली. ती नवऱ्यासाठी 'शृंगारलेल्या नवरीप्रमाणे' सजवलेली होती. (प्रगटीकरण २१:२)*

जैतुनाच्या डोंगरावर ख्रिस्त खाली उतरतो, जिकडे त्याचे पुनरुत्थान झाल्यावर, त्याने

स्वर्गारोहण केले, आणि जिकडे देवदूतांनी त्याच्या येण्याचे अभिवचन दिले. संदेष्टा म्हणतो: “देव माझा प्रभू येईल, आणि त्याच्यासोबत सर्व संत देखील येतील.” “आणि जैतुनाच्या डोंगरावर त्याचे चरण स्थित होतील, जे पूर्वेकडे यरुशलेमेच्या पुढे आहे, आणि त्यामध्ये जैतून डोंगर दुभागून, . . . खूप मोठे खोरे तयार होईल.” “तेव्हा परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्या दिवशी परमेश्वर तेवढा व त्याचे नाम तेवढे राहील.” जखर्या १४:५,४,९. जसे नवीन यरुशलेम, तिच्या पूर्ण वैभवाने चकाकत, स्वर्गातून खाली उतरते, त्या ठिकाणी शुद्ध होऊन स्वीकार करण्यास तयार असते, आणि ख्रिस्त, त्याचे लोक आणि देवदूत ह्यांच्यासह त्या पवित्र शहरात प्रवेश करतात.

**(३) जेव्हा १,००० वर्ष संपतील आणि दुष्टांचे पुनरुत्थान होईल तेव्हा सैतान कोणती कृती पुन्हा करताना दिसेल?**

***ती हजार वर्षे संपल्यावर सैतानाला कैदेतून बंधमुक्त करण्यात येईल;आणि तो ‘पृथ्वीच्या चार कोपऱ्यांतील गोग’ व ‘मागोग’ ह्या राष्ट्रांना ठकवण्यास व त्यांना लढण्यासाठी एकत्र करण्यास बाहेर येईल; त्यांची संख्या समुद्राच्या वाळूइतकी आहे. (प्रगटीकरण २०:७-८)***

आता वर्चस्व गाठण्यासाठी सैतान एका शेवटच्या महान संघर्षाची तयारी करतो. त्याच्या सामर्थ्यापासून परावृत्त होऊन आणि फसवणुकीच्या त्याच्या कार्यापासून दूर होऊन, दुष्टाचा राजकुमार हा भयंकर आणि नाकारलेला होता; पण जसे मृत दुष्ट लोक उठवले जातात आणि तो मोठ्या जमावाला त्याच्या बाजूने पाहतो, त्याच्या आशा पालवीत होतात, आणि तो महान संघर्ष सोडून न

देण्याची प्रेरणा त्याला मिळते. त्याच्या झेंड्याच्या अधीन जे सर्व लोक पतन पावले त्यांना बोलावण्याचे धाडस तो करतो आणि त्यांच्याद्वारे त्याच्या योजना अमलात आणण्याचा प्रयत्न करतो. दुष्ट लोक हे सैतानाचे बंदिवान आहेत. ख्रिस्ताला नाकारण्यामध्ये बंडखोर पुढार्याचे नियम त्यांनी स्वीकारले आहेत. ते त्याच्या सूचना प्राप्त करून त्याची बोली ऐकण्यास तयार आहेत.

तरीही, त्याच्या धूर्त स्वभावाशी खरे वागून, तो स्वतःला सैतान म्हणून कबूल करत नाही. तो जगाचा न्यायी मालक आणि राजकुमार असण्याचे कबूल करतो आणि ज्याचे वतन अरास्तपणे त्याच्यापासून काढून घेतलेले आहे. तो स्वतःला त्याच्या भ्रमित प्रजेसाठी एक उद्धार म्हणून प्रस्तुत करतो, ह्याची खात्री देत की त्याच्या सामर्थ्याने त्यांना कबरेतून बाहेर काढले आणि तो त्यांना सर्वात क्रूर अशा जुलूमशाहीतून सोडवणार आहे. ख्रिस्ताचे सान्निध्य त्यांच्यातून काढून टाकले गेले, सैतान त्याचे बेत सिद्ध करण्यासाठी अद्‌भुते करतो. तो दुर्बलांना बलवान बनवतो आणि त्याच्या आत्म्याने आणि शक्तीने सर्वांना प्रेरीत करतो. संतांच्या सेनेच्या विरुद्ध त्यांना चालवण्याचे तो मार्गदर्शन करतो आणि त्यांना देवाच्या शहराचा ताबा घ्यायचा आहे. अत्यंत अवघड अशा उंचावण्याने तो त्या असंख्य लाखो लोकांकडे लक्ष वेधून घेतो ज्यांना मृतांमधून उठवले जाते आणि घोषणा करतो की त्यांचा पुढारी म्हणून तो ते शहर नष्ट करण्यास कार्यक्षम आहे आणि त्याचे सिंहासन आणि राज्य मिळवण्यास पात्र आहे.

**(४) शास्त्रवचन महान पतन पावलेल्या लोकांच्या जमावाची तुलना कशाशी करते?**

*आणि तो ‘पृथ्वीच्या चार कोपऱ्यांतील गोग’ व ‘मागोग’ ह्या राष्ट्रांना ठकवण्यास व त्यांना लढण्यासाठी एकत्र करण्यास बाहेर येईल; त्यांची संख्या समुद्राच्या वाळूइतकी आहे. (प्रगटीकरण २०:८)*

त्या मोठ्या जमावात दूरवर स्थित जमातीचा लोकसमुदाय आहे जे पुराच्या आधी अस्तित्वात असतात; बलाढ्य उंचीचे आणि राक्षसी बुद्धिमत्तेचे लोक, जे, पतन पावलेल्या दुतांचे नियंत्रण पाहतात, स्वतःला उंच करण्यामध्ये ते आपले कौशल्य आणि सुज्ञान ह्यांचे अवलंबन करतील; ज्या लोकांचे कलेच्या कृतीने जगाला त्यांच्या हुशार व्यक्तीला मूर्तीचे रूप दिले, पण ज्यांची क्रूरता आणि दुष्ट हेतू आणि शोध, पृथ्वीला अशुद्ध करून देवाची प्रतिमा भ्रष्ट करतो, त्याच्या निर्मितीतून त्याने त्यांना पुसून टाकले. राजे आणि सरदार आहेत ज्यांनी राष्ट्रे जिंकली, महान योद्धे ज्यांनी कधीही युद्ध हरले नाही, गर्विष्ठ, ध्येय गाठणारे योद्धे ज्यांच्या दृष्टीकोनाने राज्ये डगमगतात. मृत्यूमध्ये ह्यांनी कोणताही बदल अनुभवला नाही. त्यांच्या कबरेतून ते जसे बाहेर येतात, जिकडे थांबले तिकडे त्यांच्या विचारांना पुन्हा प्रवृत्त करतात. जेव्हा त्यांचे पतन झाले तेव्हा त्यांच्यात जिंकण्याची जी इच्छा होती त्याच इच्छेने ते अजूनही प्रेरित झाले आहेत.

सैतान त्याच्या दुतांशी मसलत करतो, आणि मग हे राजे आणि विजेते आणि महान लोकांसोबत मसलत करतो. त्यांच्या बाजूने किती लोक आहेत आणि त्यांची शक्ती किती आहे ते पाहतात, आणि घोषणा करतात की शहरातील सैन्य हे त्यांच्या तुलनेत छोटे आहे, आणि सहज त्यांच्यावर विजय मिळवला जाऊ शकतो. नवीन यरुशलेमच्या धन आणि

गौरवाचा ताबा घेण्याच्या योजना ते करतात. सार्वजन लगेचच युद्धाची  तयारी करण्यास सुरुवात करतात. कुशल कलाकार युद्धाची अमलबजावणी करण्यासाठी आराखडे तयार करण्यास सुरु करतात. सैन्यातील पुढारी, जे त्यांच्या यशासाठी प्रसिद्ध आहेत, मोठ्या जमावातून योद्धांना विभिन्न गट आणि तुकड्यांमध्ये विभागून टाकतात.

**(५) सैतानाच्या आज्ञेवर हे मोठे सैन्य काय करण्याचा प्रयत्न करते?**

*त्यांनी 'पृथ्वीच्या विस्तारावर' फिरून पवित्र जनांची छावणी व 'प्रिय' नगर वेढले; 'तेव्हा [देवापासून] स्वर्गातून अग्नी उतरला आणि त्याने' त्यांना 'खाऊन टाकले.' (प्रगटीकरण २०:९)*

शेवटी आगेकूच करण्याची आज्ञा दिली जाते, आणि असंख्य लोकांचा समुदाय पुढे जातो- असे सैन्य ज्याला पृथ्वीवरील विजेत्यांनी कधीच पाचारण केले नव्हते, जसे सर्व युगाचे एकत्रित सैन्य जेव्हापासून पृथ्वीवर युद्ध सुरु झाले आणि त्याची समानता कशाशीच होऊ शकली नाही. सर्वात महान योद्धा, सैतान, त्या गाडीचा पुढाकार कार्त्कारतो, आणि ह्या अंतिम संघर्षासाठी त्याचे दूत आपले सैन्य ऐकवटतात. त्याच्या ट्रेनमध्ये राजे आणि योद्धे आहेत, आणि मोठ्या प्रमाणावर लोकसमुदाय त्यांच्या मागे जातो, प्रत्येकाचा एक नियुक्त पुढारी असतो. ह्या सैन्याच्या अचूक्तेसोबत , हे सर्व लोकांचे स्तर पृथ्वीच्या मोडलेल्या आणि समान नसलेल्या भागावरून देवाच्या शहराकडे आगेकूच करतात. येशूच्या आज्ञेने, नवीन यरुशलेमच्या वेशी बंद करण्यात येतात, आणि सैतानाचे सैन्य

त्या शहराला वेढा घालतात आणि त्या लढाईसाठी तयारी करतात.

आता परत ख्रिस्त त्याच्या शत्रूंच्या दृष्टीस पडतो. शहराच्या वर दूरवर, सुंदर सोनेरी अशा पायावर, एक सिंहासन आहे, जे उंच आणि वर घेतलेले आहे. ह्या सिंहासनावर देवाचा पुत्र विराजमान आहे, आणि त्याच्याभोवती त्याच्या राज्यातील प्रजा आहे. ख्रिस्ताचे सामर्थ्य आणि वैभव ह्यांचे वर्णन कोणतीही भाषा करू शकत नाही, कोणत्याही पेन द्वारे ते लिहून काढता येऊ शकत नाही. सनातन पित्याचे गौरव त्याच्या पुत्राच्या भोवती आच्छादलेले आहे. त्याच्या सान्निध्याची चमक संपूर्ण देवाच्या शहराला भरून टाकते, आणि त्या वेशिंच्या पलीकडे जाते, संपूर्ण पृथ्वीला त्याच्या तेजाने भरून व्याप्त करून टाकते.

**(६) देवाच्या सिंहासनासमोर जो मोठा लोकसमुदाय उभा आहे त्यांची गणती कोण करत आहे?**

***मी म्हटले, “प्रभो, हे तुला ठाऊक आहे.” तो मला म्हणाला, “मोठ्या ‘संकटातून’ येतात ते हे आहेत; ह्यांनी ‘आपले झगे’ कोकर्‍याच्या ‘रक्तात धुऊन’ शुभ्र केले आहेत. (प्रगटीकरण ७:१४)***

सिंहासनाच्या जवळ ते लोक आहेत जे एकेकाळी सैतानाच्या सर्व कार्यासाठी खूप आवेशी होते, पण ज्यांनी त्या धगधगत्या अनुभवातून बाहेर येऊन, आपल्या तारणार्याचे अनुसरण खोलवर, तीव्र समर्पक वृत्तीने केले आहे. नंतर असे लोक आहेत ज्यांनी अगदी उत्तम रीतीने ख्रिस्ती चारित्र्याचे दर्शक म्हणून स्वतःला लबाडी आणि बेईमानी ह्यांच्यामध्ये व्यक्त केले, ज्यांनी देवाच्या नियमशास्त्राचा आदर केला जेव्हा ख्रिस्ती जगाने त्याला रिक्त

असे लेखले, आणि सर्व युगातील लाखो लोक ज्यांची त्यांच्या विश्वासासाठी कत्तल करण्यात आली. आणि त्या पलीकडे हा "ह्यानंतर मी पाहिले तो सर्व राष्ट्रे, वंश, लोक व निरनिराळ्या भाषा बोलणारे ह्यांच्यापैकी कोणाला मोजता आला नाही असा, शुभ्र झगे परिधान केलेला व हातांत झावळ्या घेतलेला मोठा लोकसमुदाय राजासनासमोर व कोकऱ्यासमोर उभा राहिलेला माझ्या दृष्टीस पडला.." प्रगटीकरण ७:९. त्यांचे युद्ध समाप्त झाले, आणि विजय संपादन झाला. त्यांनी आपली धाव संपवली आणि ते बक्षीस मिळवले. त्यांच्या हातातील झावळ्या त्यांच्या विजयाचे प्रतिक आहे, पांढरा झगा ख्रिस्ताच्या डागरहित धार्मिकतेचे चिन्ह आहे जे आता त्यांचे आहे.

**(७) उद्धार पावलेल्या लोकांच्या ओठातून कोणता प्रेमपूर्वक वाक्यांश ऐकण्यात येईल?**

***ते उच्च स्वराने म्हणत होते :"राजासनावर बसलेल्या आमच्या देवाकडून व कोकऱ्याकडून, तारण आहे!" (प्रगटीकरण ७:१०)***

उद्धार पावलेले लोक एक स्तुतीगीत गातात जे स्वर्गाच्या परिसरात ऐकू येते त्याचा प्रतिध्वनी धुमसतो . . . आणि देवदूत आणि सराफ आदराने आपले आवाज उंच करतात. उद्धार पावलेल्या लोकांनी सैतानाची शक्ती आणि त्याचा पसार पाहिला त्यामुळे, त्यांनी पाहिले, आधी कधीही पाहिले नाही तसे, की इतर कोणतेही सामर्थ्य नाही, केवळ ख्रिस्ताच्या सामर्थ्याने त्यांना महाविजेते बनवले असते. त्या सर्व चमकत्या जमावात कोणीही स्वतःसाठी तारण सिद्ध करण्यास तयार नाही, जणूकाही त्यांच्या स्वतःच्या शक्तीने आणि चांगुलपणाने ते जिंकले असते. त्यांनी जे काही केले किंवा

सहन केले ह्याविषयी काहीच बोलले जात नाही; पण प्रत्येक गीताचे ओझे , प्रत्येक राष्ट्रगीताचे सूर, हे: आमच्या देवासाठी आणि कोकऱ्यासाठी तारण असेच असते.

**(८) दुष्ट मृत लोकांचे कोणत्या महान घटनेसाठी पुनरुत्थान होते?**

***मग मृत झालेल्या लहानथोरांना मी [देवाच्या] राजासनापुढे उभे राहिलेले पाहिले. त्या वेळी 'पुस्तके उघडली गेली;' तेव्हा दुसरे एक 'पुस्तक' उघडले गेले ते 'जीवनाचे' होते; आणि त्या पुस्तकामध्ये जे लिहिले होते त्यावरून मृतांचा न्याय 'ज्यांच्या-त्यांच्या कृत्यांप्रमाणे' ठरवण्यात आला. तेव्हा समुद्राने आपल्यामधील मृत माणसांना बाहेर सोडले; मृत्यू व अधोलोक ह्यांनी आपल्यातील मृतांना बाहेर सोडले; आणि 'ज्याच्या-त्याच्या कृत्यांप्रमाणे' प्रत्येकाचा न्याय ठरवण्यात आला. (प्रगटीकरण २०:१२-१३)***

जमलेल्या सर्व पृथ्वीच्या आणि स्वर्गाच्या रहिवास्यांमध्ये देवाच्या पुत्राचा अंतिम राज्याभिषेक करण्यात येतो. आणि आता, सर्वोच्च वैभव आणि सामर्थ्य ह्यांनी आभूषित होऊन, राजांचा राजा ज्या लोकांनी त्याच्या शासनाच्या विरुद्ध बंडाई केली त्यांच्याविरुद्ध न्याय सुनावतो आणि ज्या सर्वांनी त्याच्या नियमशास्त्राचे उल्लंघन केले आणि त्याच्या लोकांचा छळ केला त्यांचा देखील न्याय करतो. देवाचा संदेष्ट म्हणतो: "मी एक मोठे पांढरेशुभ्र सिंहासन पाहिले, आणि जो त्याच्यावर विराजमान होता, ज्याच्या मुखासमोरून स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांनी पळ काढला; आणि त्यांच्यासाठी काहीच जागा उपलब्ध झाली नाही. आणि मी सर्व मृत, छोटे आणि मोठे लोक देवासमोर उभे असलेले पाहिले; आणि पुस्तक

उघडण्यात आले: आणि दुसरे पुस्तक देखील उघडण्यात आले, जे जीवनी पुस्तक आहे: आणि त्या पुस्तकात ज्या गोष्टी लिहिल्या होत्या त्यानुसार मृतांचा न्याय झाला, त्यांच्या कर्मानुसार.”

**(९) त्या महान अशा न्यायाच्या समयी काय प्रगट होईल?**

***कारण आपणा सर्वांना ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर खऱ्या स्वरूपाने प्रकट झाले पाहिजे, ह्यासाठी की, प्रत्येकाला, त्याने देहाने केलेल्या गोष्टीचे फळ मिळावे; मग ते बरे असो किंवा वाईट असो. (२ करिंथकरास पत्र ५:१०)***

ज्यावेळी नोंद पुस्तके उघडली जातील, आणि येशूचे नेत्र दुष्टांकडे पाहतात, त्यांना जी सर्व पापे त्यांनी केली ह्याची लगेच जाणीव होते. ते पाहतात की कोठे शुद्धता आणि पावित्र्य ह्यापासून त्यांचे पाय घसरले, आणि गर्व व बंडाई ह्यांनी त्यांना इतके दूर नेले आणि देवाच्या नियमशास्त्राचे उल्लंघन करण्यास भाग पाडले. पापात पडण्यासाठी ज्या मोहांना ते बली पडले, त्यामुळे ज्या आशीर्वादांना त्यांना गमवावे लागले, देवाच्या दुतांचा द्वेष त्यामुळे झाला, आणि सर्व इशारे नाकारण्यात आले, हट्टी लोकांनी सर्व दयामाया सोडून दिली, पश्चाताप न करणारे हृदय—हे सर्व जणूकाही अग्नीच्या पत्रांमध्ये लिहिल्यासारखे दिसते.

**(१०) न्यायाच्या दिवशी पतन पावलेल्या लोकांच्या हृदयात कशामुळे हा थरकाप होईल आणि ह्या वाचनात त्या कोणत्या वास्तविक्तांचे वर्णन करण्यात आले आहे?**

*तच्छ मानलेला, मनुष्यांनी टाकलेला, क्लेशांनी व्यापलेला व व्याधींशी परिचित असलेला असा तो पुरुष पाहून लोक तोंडे फिरवत व त्याला तुच्छ लेखत; आणि त्याला आम्ही मानले नाही. खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले. (यशया ५३:३,५)*

सिंहासनाच्या वर वधस्तंभ प्रगट होतो; आणि एका देखाव्यासारखे आदामाचा मोह आणि पतन, आणि त्या अनुषंगाने मनुष्याचा उद्धार होण्याच्या महान योजना हे सर्व दृश्य दिसतात. तारणार्याचा साधा आणि विनम्र जन्म; त्याचे पृथ्वीवरील साधे आणि आज्ञापालनाचे जीवन; यार्देनेत त्याचा बाप्तिस्मा; अरण्यातील त्याचा उपवास आणि परीक्षा; लोकांसमोर त्याचे जाहीर सेवाकार्य, लोकांना स्वर्गाचे सर्वात अनमोल आशीर्वाद दाखवण्यास;ज्या दिवशी प्रेमपूर्वक आणि दयेची कृत्ये दिसतात, प्रार्थनेच्या रात्री आणि पर्वतांच्या एकांतात लक्ष देणे; द्वेष, मत्सर, हेवा ह्यांचे कट रचणे ज्याचे प्रतिफळ प्राप्त झाले; संपूर्ण जगाच्या पापाचे ओझे घेऊन भयंकर, वेदनामय असा गेथसेमनी बागेतील अनुभव; खूनी जमावाच्या हाती त्याला सोपवून त्याचा विश्वासघात; त्या भयंकर रात्रीच्या सर्व घटना—प्रतिकार न करणारा तुरुंगवासी, त्याच्या सर्वात प्रिय आवडत्या शिष्यांनी एकटा सोडलेला टाकलेला, खूप कडक रीतीने सर्व यरुशलेमाच्या रस्त्यावरून घाईने परत जाताना; देवाचा पुत्र आनंदाने अन्नास समोर व्यक्त झालेला, मुख्य याजकाच्या दरबारात

प्रस्तुत करण्यात आलेला, पिलाताच्या न्यायाच्या दरबारात, भित्र्या आणि क्रूर हेरोदासमोर, अपमानित, छळलेला, चेष्टा करून मृत्यू सहन करण्यासाठी दोषी ठरवलेला—ह्या सर्वांचे स्पष्ट चित्रीकरण झाले आहे.

आणि आता त्या डोलणाऱ्या लोकसमुदायापुढे अंतिम दृश्ये प्रगट होतात—संयमी यातना सहन करणारा जो काल्वरीच्या मार्गावर जाण्यास तयार होता; स्वर्गाचा राजकुमार जो क्रुसावर टांगलेला होता; घमेंडखोर याजक आणि उपहास करणारा घोळका जो त्याच्या क्लेशाला तुच्छ लेखत होता; अलौकिक असा अंधकार; वर उचलली जाणारी पृथ्वी, मोडलेले खडक, उघडे थडगे, ह्या सर्व घटना त्या क्षणाचे दर्शक आहेत जेव्हा जगाच्या उद्धारकाने आपल्या प्राणाचा त्याग केला.

ते भयंकर दृश्य जसे होते तसे दिसले. सैतान, आणि त्याचे दूत, आणि त्याच्या प्रजेला त्यांच्या स्वतःच्या कामाच्या चित्रापासून वळण्याचे काहीच सामर्थ्य नाही. प्रत्येक नायक त्याने जी भूमिका बजावली त्याचे स्मरण करतो.हेरोद, ज्याने बेथलेहेम येथील निष्पाप लेकरांची क्रूर हत्या केली जेणेकरून इस्रायेलाच्या राजाला तो ठार मारू शकेल; हेरोदियास जिच्यावर बाप्स्तिमा करणाऱ्या योहानाच्या रक्ताचा दोष आहे; दुर्बल, वेळेला शरण गेलेला पिलात; थट्टा करणारे सरदार; याजक आणि अधिकारी आणि वेडापिसा झालेला लोकसमुदाय ज्याने ओरड केली, "त्याच्या रक्ताचा दोष आमच्यावर, आणि आमच्या लेकरांवर असो!"—सर्व त्यांच्या दोषाची तीव्रता बघतात. व्यर्थ रीतीने त्यःच्या चेहऱ्याच्या वैभवापासून लपण्याचे ते पाहतात, सूर्याच्या तेजाला मागे टाकून, आणि उद्धार पावलेले लोक तर त्यांची मुकुटे तारणार्याच्या

चरणी अर्पण करून म्हणतात: “तो माझ्यासाठी मरण पावला!”

## (११) दुष्ट लोकांची अंतिम दशा किंवा त्यांचे भवितव्य काय आहे?

*ज्या कोणाचे नाव ‘जीवनाच्या पुस्तकात लिहिलेले सापडले नाही’ तो अग्नीच्या सरोवरात टाकला गेला. (प्रगटीकरण २०:१५)*

*जो आपल्या देहस्वभावासाठी पेरतो त्याला देहस्वभावा-पासून नाशाचे पीक मिळेल; आणि जो आत्म्यासाठी पेरतो त्याला आत्म्यापासून सार्वकालिक जीवन हे पीक मिळेल. (गलतीकरास पत्र ६:८)*

संपूर्ण दुष्ट जग देवाच्या दरबारापुढे चौकशीसाठी उभे आहेत आणि त्यांच्यावर स्वर्गाच्या शासनाच्या विरुद्ध गद्दारी केल्याचा आरोप आहे. कोणीही त्यांची बाजू मांडण्यासाठी तिकडे उपलब्ध नाही; त्यांच्यासमोर काहीच सबब नाही; आणि त्यांच्या विरुद्ध सनातन मृत्यूची शिक्षा सुनावण्यात येते.

आता सर्वांना हे दिसते की पापाचे वेतन म्हणजे उदार असे स्वातंत्र्य आणि सनातन जीवन हे नाही, तर गुलामगिरी, घात आणि मृत्यू हे आहेत. दुष्ट लोकांना त्यांच्या बंडखोरीमुळे त्यांनी काय गमावले हे दिसते. सर्व वैभवाच्या पलीकडे असलेले सनातन गौरव त्यांना जेव्हा देण्यात आले तेव्हा त्याला तुच्छ लेखले; पण आता त्यांना कसे ते हवेहवेसे वाटते. “हे सर्वकाही,” पतन पावलेल्या जीवात्म्याची ओरड असते, “माझे असते; पण ह्या गोष्टींना मी माझ्यापासून दूर लोटले. ओह, विचित्र असे आकर्षण! शांती, आनंद  आणि सन्मान ह्यांना मी

दुष्टता , कुप्रसिधी आणि निराशा ह्यांनी मी बदलले.” सर्वजण पाहतात की स्वर्गातून त्यांना जे काढण्यात आले ते रास्त होते. त्यांच्या जीवनाच्या द्वारे त्यांनी ही घोषणा केली: “आम्ही ह्या मनुष्याला [येशूला] आमच्यावर सत्ता गाजवू देणार नाही.”

**(१२) उद्धार पावलेले लोक कोणते गीत गातील?**

***‘ते देवाचा दास मोशे ह्याचे गीत,’ व ‘कोकऱ्याचे गीत’ गाताना म्हणतात, “हे ‘प्रभू’ देवा, हे सर्वसमर्था, ‘तुझी कृत्ये थोर व आश्चर्यकारक आहेत; ‘हे राष्ट्राधिपते,’ ‘तुझे मार्ग नीतीचे व सत्य आहेत.’! (प्रगटीकरण १५:३)***

जणूकाही प्रवेश करून, दुष्ट लोकांनी देवाच्या पुत्राचा राज्याभिषेक पाहिला. त्याच्या हातात ते दैवी नियमशास्त्राच्या पाट्या बघतात, ज्या नियमांना त्यांनी तुच्छ लेखले आणि उल्लंघन केले. त्यांना अद्भुते, स्वर्गात घेतले जाणे आणि तो जिव्हाळा ह्यांचा तारण झालेल्या लोकांकडून अनुभव आलेला आहे; आणि जशी ती सुमधुर लाट संपूर्ण शहराच्या शिवाय त्या लोकसमुदायावर पसरते, सर्वजण एकाच आवाजाने घोषणा करतात , “हे प्रभू परमेश्वरा, तुझे कार्य महान आणि अद्भुत आहेत; तुझे मार्ग न्यायी आणि खरे आहेत, तू संतांचा राजा आहेस”; आणि, उपडे पडून ते जीवनाच्या राजकुमाराची आराधना करतात.

**(१३) सैतानाच्या चारित्र्याचा कोणता पैलू शेवटी संपूर्ण सृष्टीसमोर प्रगट होईल?**

***तुला निर्माण केले त्या दिवसापासून तुझ्या ठायी अधर्म दिसून येईपर्यंत तुझी चालचलणूक यथायोग्य होती. तुझा व्यापार मोठा***

*असल्यामुळे तुझ्या हृदयात अपकारबुद्धी शिरून तू पातक केलेस; म्हणून मी तुला भ्रष्ट समजून परमेश्वराच्या पर्वतावरून लोटून दिले. हे पाखर घालणाऱ्या करूबा! त्या अग्नीप्रमाणे झगझगणाऱ्या पाषाणांमधून काढून मी तुझा नाश केला आहे. तुझ्या सौंदर्याच्या अभिमानाने तुझे हृदय उन्मत्त झाले, तुझ्या वैभवाने तुझी बुद्धी भ्रष्ट झाली; मी तुला भूमीवर आदळले, राजांनी तुझा तमाशा पाहावा म्हणून त्यांच्यापुढे तुला टाकले. (यहज्केल २८:१५-१७)*

महान बंड करणाऱ्याचा हेतू म्हणजे स्वतःचे समर्थन करणे आणि ह्या बंडखोरीसाठी जी दैवी सत्ता आहे त्याला सिद्ध करणे. ह्यासाठी त्या बलाढ्य बुद्धीची सर्व शक्ती त्याने वाकवली. त्याने जाणूनबुजून पद्धतशीर काम केले आहे, आणि प्रचंड यशाने , त्याने जो हा महान वादविवाद चालू होता त्यावर लोकांनी त्याच्या म्हणण्यावर विश्वास ठेवावा असे केले. हजारो वर्षांसाठी ह्या कटाचा प्रमुख ह्याने सत्यासाठी लबाडीने उत्तर दिले आहे.

पण आता वेळ आली आहे जेव्हा बंडाईला शेवटी पराजित करून सैतानाचा इतिहास आणि चारित्र्य हे उघड होणे गरजेचे आहे. ख्रिस्ताला त्या सिंहासनावरून खाली खेचण्याच्या शेवटल्या मोठ्या प्रयत्नात, आणि देवाच्या शहरावर ताबा मिळवण्यास, मुख्य फसवणाऱ्याचा चेहरा उघडा पडला. जे त्याच्याबरोबर एकत्र झाले त्यांनी देखील ह्या कारणाचे पूर्ण अपयश पाहिले. ख्रिस्ताचे अनुयायी आणि प्रामाणिक देवदूत देवाच्या सत्तेच्या विरुद्ध त्याचे हे पूर्ण रचलेले कट पाहतात. तो जागतिक धिक्काराचा विषय बनला आहे.

**(१४) प्रत्येक निर्मित सृष्टीचा प्रतिसाद काय असेल?**

*ह्यात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा, आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे. (फिलीप्पेकरास पत्र २:१०-११)*

सैतान हे पाहतो की त्याने स्वेच्छेने केलेल्या बंडाईचा परिणाम म्हणजे त्याला स्वर्गात स्थान नाही. त्याने त्याच्या शक्तींना देवाच्या विरुद्ध युद्धासाठी प्रशिक्षण दिले; स्वर्गाची शांती, शुद्धता आणि एकोपा हे त्याला प्रचंड त्रास देतात. देवाची दया आणि त्याचा न्याय ह्याच्याविरुद्ध त्याचे आरोप आता शांत करण्यात येतात. जो धिक्कार त्याने यहोवाचा करण्याचे ठरवले होते आता तो पूर्णपणे त्याच्यावर स्थित आहे. आणि आता सैतान खाली वाकून त्याच्यावर जो न्याय ठोठावण्यात येतो तो कबूल करतो.

**(१५) देवाच्या सत्तेचे आणि चारित्र्याचे कोणते सत्य शेवटी संपूर्ण विश्वाला प्रगट होणार?**

*ढग व अंधार त्याच्याभोवती आहेत; नीती व न्याय त्याच्या राजासनाचा आधार आहेत. (स्तोत्रसंहिता ९७:२)*

ह्या खूप काळापासून चालत आलेल्या वादविवादात सत्य आणि चूक ह्याविषयीचा प्रत्येक प्रश्न सोपा केला जातो. बंडाईचे परिणाम, दैवी नियमशास्त्र बाजूला ठेवण्याचे फळ, ह्या सर्वांचे परिणाम प्रत्येक निर्मित बुद्धीपुढे उघड आहेत. देवाच्या सत्तेच्या विरुद्ध सैतानाचा नियम कार्यरत न होणे हे संपूर्ण विश्वाला आता

समजले आहे. सैतानाच्या स्वतःच्या कार्यांनी त्याच्यावर दोष लावला आहे. देवाचे सुज्ञान, त्याचा न्याय आणि त्याचे चांगुलपण पूर्णपणे निर्दोष म्हणून उभे राहतात. असे दिसते कि ह्या महान वादविवादात त्याचे सर्व वागणे हे त्याच्या लोकांच्या सनातन हितासाठी आणि त्याने निर्माण केलेल्या प्रत्येक निर्मितीच्या हिताप्रत होते. “हे परमेश्वरा, तुझी सर्व कृत्ये तुझी स्तुती गातात; आणि तुझे भक्त तुझा धन्यवाद करतात.” स्तोत्रसहिता १४५:१०.

पापाचा इतिहास सर्व सनातन काळासाठी एक साक्षीदार म्हणून उभा राहील ज्याच्याशी देवाच्या नियमशास्त्राचे अस्तित्व सर्व त्याच्या निर्मितीच्या आनंदाशी बांधले गेले. त्या महान वादविवादाच्या सर्व वास्तविकता लक्षात घेता, संपूर्ण विश्व, प्रामाणिक आणि बंडखोर लोक दोघेही, एका सुराने घोषणा देतातः “संतांचा राजा, तुझे मार्ग हे सत्य आणि न्यायी आहेत.”

**(१६) ज्या लोकांना सैतानाने फसवले जेव्हा त्याचे चारित्र्य आणि खरे हेतू उघडकीस येतात तेव्हा त्यांची काय प्रतिक्रिया असते?**

***राष्ट्रांमध्ये तुझ्या ओळखीचे सर्व तुला पाहून विस्मय पावले आहेत, तुझी दशा पाहून लोकांना दहशत पडली आहे, तू कायमचा नष्ट झाला आहेस.” (यहज्केल २८:१९)***

ह्याकडे दुर्लक्ष न करता कि सैतानाने देवाचा न्याय कबूल करण्यात आणि ख्रिस्ताचे वर्चस्व आणि प्रभुत्व ह्याप्रती नमन करण्यास तो झुकला नाही त्यावर मर्यादा घातली, त्याचे चारित्र्य बदलले नाही. बंडाईचा आत्मा, मोठ्या वावटळीसारखा, पुन्हा वाहू लागतो. तो बेभानपणा त्याच्या डोक्यात जाऊन, तो त्या

महान वादविवादात शरण न जाण्याचे निश्चित करतो.

स्वर्गाच्या राजाच्या विरुद्ध एक शेवटला संघर्ष करण्याचा समय आला आहे. तो त्याच्या प्रजेमध्ये घुसतो आणि स्वतःच्या क्रोधाने त्यांना प्रेरित करण्याचा प्रयत्न करून त्यांना लगेच युद्धासाठी प्रवृत्त करतो. पण ज्या सर्व असंख्य लोकांना त्याने ह्या बंडाईसाठी भुरळ घातली, आता त्याचे प्रभुत्व स्वीकारण्यासाठी कोणीही तयार नाही. त्याचे सामर्थ्य आता संपुष्टात आले आहे. सैतानाला ज्या द्वेषाने प्रेरित केले तोच द्वेष ह्या दुष्ट लोकांमध्ये भरलेला आहे; पण त्यांची बाब कशी निराशेची आहे हे त्यांना मात्र दिसते, त्यांना समजते की यहोवाच्या विरुद्ध त्यांचा टिकाव होऊ शकत नाही. सैतानाच्या विरुद्ध तो क्रोध उन्मत होतो आणि जे त्याचे ह्या फसवनूकीमध्ये दूत होते, आणि भूतांचा क्रोध घेऊन ते त्यांच्यावर उलटवतात.

**(१७) सैतानाचे अंतिम भवितव्य प्रगट करण्यासाठी देव कोणते न्यायी विधान प्रस्तुत करतो?**

*“खोटा व्यापार चालवून तू बहुत पातके केलीस, त्यांनी तू आपली पवित्रस्थाने विटाळलीस म्हणून तुझ्यातून अग्नी निघून तुला खाऊन टाकील, असे मी केले आहे आणि तुला पाहणाऱ्यांच्या डोळयांदेखत मी पृथ्वीवर तुझी राखरांगोळी केली आहे. राष्ट्रांमध्ये तुझ्या ओळखीचे सर्व तुला पाहून विस्मय पावले आहेत, तुझी दशा पाहून लोकांना दहशत पडली आहे, तू कायमचा नष्ट झाला आहेस.” (यहज्केल २८:१८,१९)*

**(१८) ज्या लोकांची नावे जीवनी पुस्तकात लिहिलेली नाही त्यांच्यावर कोणत्या न्यायाची सुनावणी होते?**

***ज्या कोणाचे नाव 'जीवनाच्या पुस्तकात लिहिलेले सापडले नाही' तो अग्नीच्या सरोवरात टाकला गेला. (प्रगटीकरण २०:१५)***

"योद्ध्याची प्रत्येक लढाई ही गोंधळलेल्या आवाजाने आहे, आणि त्याचे कपडे रक्तात मिसळलेले आहेत; पण हे तर अग्नीच्या जलनाने आणि इंधनाने होईल." "कारण परमेश्वराचा कोप सर्व राष्ट्रांवर होत आहे, त्याचा संताप त्यांच्या सर्व सैन्यांवर होत आहे; त्याने त्यांचा सर्वस्वी नाश केला आहे; त्याने त्यांचा वध करण्यास लावले आहे." "दुर्जनांवर तो पाशावर पाश टाकील, अग्नी, गंधक व दाहक वारा ह्यांचा प्याला त्यांच्या वाट्यास येईल." यशया ९:५; ३४:२; स्तोत्रसहिता ११:६, स्वर्गाच्या देवापासून अग्नी खाली उतरतो. पृथ्वी भग्न होते. तिच्या पोटात दडलेले शस्त्र बाहेर पडतात. प्रत्येक बाजूने नाशवंत ज्वाला ह्या उसळतात. पर्वते देखील पेटली आहेत. तो दिवस आला आहे की सर्वकाही त्या भट्टीत ओवन मध्ये जळून भस्म होईल. त्यातील घटक देखील तप्त उष्णतेने जळतात, आणि त्यात जी काही कार्ये आहेत ती देखील भस्म होतात. मलाखी ४:१; २ पेत्र ३:१०. पृथ्वीचा अहोभाग हा एका वितळलेल्या भागासारखा दिसतो- एक मोठा, अग्नीचा ज्वलंत सरोवर. दुष्ट लोकांच्या न्यायाचा आणि चिरकाल यातनेचा हा समय आहे. — "सीयोनेला न्याय मिळावा म्हणून सूड घेण्याचा हा परमेश्वराचा दिवस, प्रतिफळ देण्याचे हे वर्ष होय." यशया ३४:८.

**(१९) देवाच्या न्यायाचा आधार काय असेल आणि लगेच न्याय कसा दिला जाईल?**

*"तो प्रत्येकाला ज्याच्या-त्याच्या कृत्यांप्रमाणे फळ देईल": (रोमकरास पत्र २:६)*

पाहा, नीतिमानाला पृथ्वीवर त्याच्या कर्माचे फळ मिळते. नितीसुत्रे ११:३१. "पाहा, भट्टीसारखा तप्त दिवस येत आहे; सर्व गर्विष्ठ व सर्व दुराचारी धसकट बनतील; तो येणारा दिवस त्यांना जाळून टाकील, त्यांचे मूळ, फांदी वगैरे काहीच राहू देणार नाही, असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो." मलाखी ४:१. काहींचा नाश क्षणातच होईल, पण इतर काही दिवस अजून त्रास सहन करतील. सर्वांना "त्यांच्या कृत्यांप्रमाणे "शिक्षा देण्यात येईल. नितीमानांचे पाप हे सैतानावर लादले गेले आहे, तो स्वतःच्या बंडाईसाठी त्रास सहन करतो इतकेच नाही, पण त्या सर्व पापांसाठी जे त्याने देवाच्या लोकांना करण्यास भाग पाडले आहे. ज्या सर्व लोकांना त्याने फसवले त्यांच्यापेक्षा अधिक कडक ही त्याची शिक्षा असली पाहिजे. जे त्याच्या लबाडीला बळी पडले त्या सर्वांचा नाश झाल्यावर, त्याने अजूनही जिवंत राहून त्रास सहन करायचा आहे.

**(२०) शुद्ध करणाऱ्या ज्वाला थांबल्यानंतर सैतान आणि त्याच्या सर्व दुष्टाईचे काय शिल्लक राहील?**

***"खोटा व्यापार चालवून तू बहुत पातके केलीस, त्यांनी तू आपली पवित्रस्थाने विटाळलीस म्हणून तुझ्यातून अग्नी निघून तुला खाऊन टाकील, असे मी केले आहे आणि तुला पाहणाऱ्यांच्या डोळयांदेखत मी पृथ्वीवर तुझी राखरांगोळी केली आहे. (यहज्केल २८:१८)***

त्या शुद्ध करणाऱ्या ज्वालांमध्ये शेवटी दुष्ट लोकांचा नाश होणार, मूळ आणि फांदी— सैतान, ते मूळ आहे, त्याचे अनुयायी त्या फांद्या आहेत. नियमशास्त्राची पूर्ण शिक्षा पार पडली; न्यायाच्या सर्व अटी पूर्ण झाल्या; आणि स्वर्ग व पृथ्वी, पाहतात आणि यहोवाचा धार्मिकतेची घोषणा करतात.

**(२१) दुष्ट लोकांचे अंतिम भवितव्य कसे असेल ह्याचे वर्णन शास्त्रवचन करते?**

***पृथ्वीवरून पातकी नष्ट होवोत; ह्यापुढे दुर्जन न उरोत. हे माझ्या जिवा, परमेश्वराचा धन्यवाद कर. परमेशाचे स्तवन करा! (स्तोत्रसहिता १०४:३५)***

**(२२) पापाच्या नाशाचा हाहाकार ज्या सर्वांनी अनुभवला ते शेवटी आनंदाने कोणते अभिवचन हस्तगत करतील?**

***परमेश्वराविषयी तुम्हांला काय वाटते? तो पुरापुरा अंत करील; विपत्ती दुसऱ्यांदा येणे नकोच. (नहूम १:९)***

सैतानाचे नाशाचे कार्य सदैव थांबले. सहा हजार वर्षांसाठी त्याने त्याची इच्छा पूर्ण केली, पृथ्वीला धिक्काराने भरले आणि संपूर्ण विश्वात त्याने ते दुख आणि यातना पसरवल्या. संपूर्ण निर्मितीने उसासे टाकले आणि यातना सहन केल्या. आता देवाची निर्मिती सर्वकाळसाठी त्याचे सान्निध्य आणि मोह ह्यापासून मुक्त झाली आहे. “सर्व पृथ्वी विश्राम पावली आहे, शांत झाली आहे; लोक गाण्याचा गजर करीत आहेत.” यशया १४:७. “तेव्हा ‘जणू काय’ मोठ्या ‘समुदायाची

वाणी, अनेक जलप्रवाहांचा ध्वनी’ व प्रचंड मेघगर्जनांचा ध्वनी मी ऐकला; तो म्हणाला, “‘हालेलूया; कारण’ सर्वसमर्थ आमचा ‘प्रभू’ देव ह्याने ‘राज्य हाती घेतले आहे.” प्रगटीकरण १९:६.

**(२३) काय सरून जाते आणि नवीन गोष्टी त्याची जागा घेतात?**

***नंतर मी ‘नवे आकाश व नवी पृथ्वी’ ही पाहिली; पहिले आकाश व पहिली पृथ्वी ही निघून गेली होती आणि समुद्रही राहिला नाही. (प्रगटीकरण २१:१)***

जो अग्नी दुष्टांना भस्म करतो पृथ्वीला तो शुद्ध करतो. शापाचा प्रत्येक लवलेश देखील पुसून टाकण्यात आला आहे. सनातन जळणारे नरक देखील उद्धार आणि क्षमा पावलेल्या लोकांपुढे पापाचे भयंकर परिणाम ठेऊ शकणार नाहीत.

**(२४) ख्रिस्त सदैव कोणत्या पापाची एकमेव आठवण ठेवेल?**

***म्हणून दुसऱ्या शिष्यांनी त्याला सांगितले, “आम्ही प्रभूला पाहिले.” पण त्याने त्यांना म्हटले, “त्याच्या हातांत खिळयांचे वण पाहिल्यावाचून, खिळे होते त्या जागी आपले बोट घातल्यावाचून व त्याच्या कुशीत आपला हात घातल्यावाचून मी विश्वास धरणारच नाही.” (योहान २०:२५)***

एक आठवण केवळ उरते: आपला उद्धार कायम त्याच्या वधस्तंभावरील खूणा बाळगेल. त्याच्या जखमी डोक्यावर, त्याच्या बाजूला,

त्याच्या हातापायांवर, पापाने जे क्रूर कार्य केले त्याचे निशाण आहेत. संदेष्टा, त्याचे गौरव पाहत म्हणतो: “त्याचे तेज प्रकाशासारखे आहे; त्याच्या हातांतून किरण निघत आहेत; त्याचा पराक्रम तेथे गुप्त आहे.” हबक्कुक ३:४. ती भोसकलेली बाजू ज्याच्यातून लाल भडक रक्ताचा प्रवाह वाहत होता ज्याने मनुष्याला देवाशी समेट घडून जोडले—त्या ठिकाणी तारणार्याचे गौरव आहे, आणि “त्याच्या सामर्थ्याचे निवासस्थान आहे.” “तारण करण्यास महान,” उद्धाराच्या अर्पणाने, ज्या लोकांनी देवाच्या दयेला तुच्छ लेखले त्यांचा न्याय करण्यात तो बलवान होता. त्याच्या अपमानाचे परिमाण हे त्याच्या सर्वोच्च सन्मानाचे कारण आहेत; सनातन युगांमध्ये काल्वरीच्या जखमा त्याची स्तुती दर्शवतात आणि त्याच्या सामर्थ्याची घोषणा करतात.

## (२५) विश्वासू लोकांसाठी ख्रिस्त काय तयार करत आहे?

***माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत; नसत्या तर मी तुम्हांला तसे सांगितले असते; मी तुमच्यासाठी जागा तयार करायला जातो. (योहान १४:२)***

भविष्यातील वतन खूप साहित्यिक असे दाखवण्याने अनेकांना त्या सत्यांना अध्यात्मिक स्वरूप देण्यास भाग पाडले ज्याकडे खरेतर ते आपले घर आहे असे बघणे अपेक्षित होते. ख्रिस्ताने त्याच्या शिष्यांना आश्वासन दिले की पित्याच्या घरी तो त्यांच्यासाठी महाले तयार करण्यासाठी जात आहे. जे लोक देवाच्या वचनाच्या शिकवणी स्वीकारतात ते स्वर्गीय वस्तीच्या बद्दल पूर्णपणे अज्ञानी नसतील. हे तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणे आहे, “डोळयानी जे

पाहिले नाही, कानाने जे ऐकले नाही व माणसाच्या ‘मनात जे अले नाही, ते आपणावर प्रिती करणाऱ्यांसाठी देवाने सिद्ध केले आहे;”१ करिंथकरास पत्र २:९. मानवी भाषा ही नितीमानांना मिळणाऱ्या प्रतिफळाचे वर्णन करण्यात अपुरी आहे. जे लोक त्याकडे पाहतात केवळ त्यांना ती समजते. कोणत्याही मर्यादित मनाला देवाच्या सुखलोकाचे गौरव समजत नाही, ते ग्रहण करता येत नाही.

**(२६) वतनाच्या भूमीची तुलना कशाशी करण्यात आली आहे?**

*असे म्हणणारे आपण स्वतःच्या देशाचा शोध करत असल्याचे दाखवतात. (इब्री ११:१४)*

*जो विजय मिळवतो त्याला मी माझ्या देवाच्या मंदिरातील स्तंभ करीन; तो तेथून कधीही बाहेर जाणार नाही; त्याच्यावर माझ्या देवाचे नाव, स्वर्गातून माझ्या देवापासून उतरणारे नवे यरुशलेम, म्हणजे माझ्या देवाची ‘नगरी, हिचे नाव,’ आणि माझे ‘नवे नाव’ लिहीन. (प्रगटीकरण ३:१२)*

पवित्र शास्त्रामध्ये तारण झालेल्या लोकांच्या वतनाला “एक देश”म्हंटलेले आहे . . . तिकडे स्वर्गीय मेंढपाळ त्याच्या कळपाला जिवंत पाण्याच्या झर्यांकडे घेऊन जातो. जीवनाचे झाड प्रत्येक महिन्याला त्याचे फळ देते, आणि झाडाची पाने ही राष्ट्रांची सेवा करण्यासाठी आहेत. त्या ठिकाणी सदैव वाहणारे झरे आहेत, स्फटिकासारखे स्पष्ट, आणि त्यांच्या बाजूला हलणारी झाडे आपली सावली प्रभूच्या उद्धार पावलेल्या लोकांसाठी प्रदान करतात. तिकडे अखंड पसरलेली ही सपाट भूमी सौंदर्याच्या टेकड्यांमध्ये बदलते,

आणि देवाचे पर्वत उंचपुरे असे दिसतात. ह्या शांतीदायक भूमीत, जी त्या जिवंत झर्यांच्या शेजारी आहे, देवाचे लोक, जे इतक्या काळापासून यात्रेकरी आणि भ्रमण करणारे आहेत, त्यांना त्यांचे घर सापडेल.

**(२७) नवीन यरुशलेम कशासारखी दिसेल?**

*तिच्या ठायी 'देवाचे तेज' होते; तिची कांती अति मोलवान रत्नासारखी होती; ती स्फटिकाप्रमाणे लखलखणाऱ्या यास्फे खड्यासारखी होती. (प्रगटीकरण २१:११)*

**(२८) आपण वस्ती करणार त्या भूमीमध्ये वातावरण कसे असेल?**

*आणि माझे लोक शांत स्थळी, निर्भय वसतिस्थानात व सुखाश्रमात राहतील, (यशया ३२:१८)*

तिकडे, "अरण्य व रुक्ष भूमी ही हर्षतील; वाळवंट उल्लासेल व कमलाप्रमाणे फुलेल." "काटेऱ्याच्या जागी सरू उगवेल, रिंगणीच्या जागी मेंदी उगवेल; ह्यावरून परमेश्वराचे नाव होईल; ते सर्वकाळचे चिन्ह होईल, ते कधी नष्ट होणार नाही." "लांडगा कोकराजवळ राहील, चित्ता करडाजवळ बसेल, वासरू, तरुण सिंह व पुष्ट बैल एकत्र राहतील; त्यांना लहान मूल वळील." "माझ्या सगळया पवित्र डोंगरावर ती उपद्रव देणार नाहीत व नासधूस करणार नाहीत. यशया ३५:१; ५५:१३; ११:६,९.

**(२९) नवीन पृथ्वीवर कोणत्या अद्भुत कृती किंवा कार्य करण्याचा आनंद उद्धार पावलेल्या लोकांना मिळेल?**

*ते घरे बांधून त्यांत राहतील. द्राक्षांचे मळे लावून त्यांचे फळ खातील. (यशया ६५:२१)*

**(३०) पापाचे कोणते ४ पुरावे अस्तित्वात राहणार नाहीत?**

*तो' त्यांच्या डोळयांचे 'सर्व अश्रू पुसून टाकील;' ह्यापुढे मरण नाही; 'शोक, रडणे' व कष्ट हे नाहीत; कारण 'पहिल्या गोष्टी' होऊन गेल्या." (प्रगटीकरण २१:४)*

स्वर्गाच्या वातावरणात वेदना टिकू शकत नाही. तिकडे अश्रू नसतील, अंत्यविधीचे कार्य नाही, शोक करण्याचे दिवस नाहीत. ... कारण पूर्वीच्या गोष्टी ह्या निघून गेल्या." "रहिवासी म्हणणार नाही, मी आजारी आहे: जे लोक त्या ठिकाणी राहतात त्यांच्या सर्व अधर्माची क्षमा होईल."

**(३१) देवाच्या शहरामध्ये प्रकाशाचा कोणता स्रोत असेल?**

*पुढे रात्र असणार नाही आणि त्यांना दिव्याच्या अथवा 'सूर्याच्या प्रकाशाची' गरज नाही; कारण प्रभू देव त्यांच्यावर 'प्रकाश पाडील; आणि ते युगानुयुग राज्य करतील.' (प्रगटीकरण २२:५)*

देवाच्या शहरात "रात्र असणार नाही." कोणालाही विश्राम घेण्याची गरज वाटणार नाही तशी इच्छा नसेल. देवाची इच्छा पूर्ण करण्यात आणि त्याच्या नावाचे स्तवन करण्यात कोणीही थकून जाणार नाही. आपल्याला कायम सकाळचे ते ताजेपण जाणवेल आणि ते संपण्यापासून आपण खूप दूर असू. ...सूर्याचा प्रकाश अशा चकाकीने वरचढ होईल जो सतत तेवत असेल, तरीही दुपारच्या

प्रकाशाला देखील तो तसाच चमकत राहील. देवाचे आणि कोक्र्याचे गौरव त्या पवित्र शहरात क्षय न पावणाऱ्या प्रकाशाने भरून जाईल. उद्धार पावलेले हे लोक दिवसाच्या सूर्यारहित असलेल्या गौरवात चालतात.

**(३२) कोणाच्या दैवी सान्निध्यात पृथ्वीच्या मंदिराचा पडदा असणार नाही?**

***त्यात मंदिर माझ्या पाहण्यात आले नाही; कारण सर्वसमर्थ प्रभू देव व कोकरा हेच तिचे मंदिर होते. (प्रगटीकरण २१:२२)***

देवाच्या लोकांना पिता आणि पुत्र ह्यांच्याशी खुली सहभागीता घेण्याचे सौभाग्य मिळाले आहे. “कारण हल्ली आपल्याला आरशात अस्पष्ट असे दिसते.” १ करिंथकरास पत्र १३:१२. आरशात जसे दिसते, तसे देवाची प्रतिमा आपल्याला दिसते, निसर्गाच्या कार्यात आणि लोकांशी त्याच्या वर्तणुकीत; पण मग आपण त्याला साक्षात प्रत्यक्ष पाहू, तेव्हा मध्ये एक पडदा देखील नसेल. आपण त्याच्या सान्निध्यात उभे राहू आणि त्याच्या चेहऱ्याचे गौरव पाहू.

तिकडे उद्धार पावलेल्या लोकांना समजेल, जसे ते देखील जाणले जातात. जीवात्म्यामध्ये जे देवाने प्रेम आणि सहानुभूती टाकली आहे तिकडे त्यांना खरा आणि मधुर अनुभव मिळेल. पवित्र लोकांबरोबर असलेली शुद्ध सहभागीता, आशीर्वादित देवदूतांच्या बरोबर आणि सर्व युगात जे विश्वासू राहिले ज्यांनी आपले झगे धुवून कोक्र्याच्या रक्तात पांढरेशुभ्र केले त्यांच्यासोबत असलेले सुसंगत सामाजिक आयुष्य , ते पवित्र बंध जे “स्वर्गातील व पृथ्वीवरील प्रत्येक वंशास ज्या पित्यावरून नाव देण्यात येते”ह्यांच्यामध्ये दिसतात (इफिस.

३:१५)—हे सर्व मिळून उद्धार पावलेल्या लोकांचा आनंद बनतात.

तिकडे, अमर्त्य मनाला कधीही न सरणार्या आनंदाने ह्या निर्मितीच्या शक्तीचे अद्‌भुत समजेल, उद्धार देणाऱ्या प्रीतीचे रहस्य समजेल. देवाच्या प्रती विसर पडेल असा कोणताही क्रूर, फसवणारा शत्रू तिकडे नसेल. प्रत्येक शाखा हि विकसित होईल, प्रत्येकाची क्षमता वाढेल. ज्ञान संपादन करण्याची प्रक्रिया मनाला चिंतेत टाकणार नाही आणि त्यांची उर्जा देखील व्यापून टाकणार नाही. तिकडे सर्वात मोठे कार्य तसेच पुढे नेण्यात येईल, बलाढ्य अशा आशा साकारण्यात येतील, सर्वात उच्च हेतू सिद्ध होतील; आणि अजूनही नवीन उंची पार जाण्यास असतील, नवीन अद्‌भुते ज्यांच्याकडे न्याहाळून पाहता येते, नवीन समजून घेण्यासाठीचे सत्य, ताजे आणि नवीन साधने जे मन जीवात्मा आणि शरीर ह्यांच्या शक्तीला पाचारण करतील.

**(३३) संपूर्ण सार्वकालिकतेत कोणती साक्ष उद्धार पावलेल्या लोकांच्या कडून ऐकू येईल?**

***ते मोठ्याने म्हणत होते : "वधलेला कोकरा सामर्थ्य, धन, ज्ञान, बल, सन्मान गौरव व धन्यवाद हे घेण्यास योग्य आहे!" (प्रगटीकरण ५:१२)***

विश्वाचे सर्व धन हे देवाच्या उद्धार पावलेल्या लोकांचा अभ्यास करण्यासाठी खुले असेल. ह्या मर्त्य तीव्रतेने काहीच फरक न पडता, ते दूरवर जगात त्यांची अथक झेप घेतात—ज्या जगामध्ये मानवी धिक्कारासाठी दुख झालेले पाहून आनंद केला जातो आणि उद्धार पावलेल्या जीवात्म्याच्या गोष्टी ऐकून हर्ष पसरतो. व्यक्त न करता येणाऱ्या आनंदाने

पृथ्वीचे संतान ह्या पतन न पावलेल्या लोकांच्या आनंदात आणि सुज्ञानात प्रवेश करतात. ते ज्ञानाचे आणि समजबुद्धीचे खजिने वाटून घेतात जे युगानुयुग त्यांनी देवाच्या हस्तकृतीवर मिळवले. कमी किंवा मंद न झालेल्या दृष्टीने निर्मितीच्या गौरवाकडे ते पाहतात—सूर्य आणि तारे आणि मंडल, सर्व त्यांच्या नियुक्त अशा क्रमानुसार त्या देवाच्या सिंहासनाभोवती भ्रमण करतात. सर्व गोष्टीत, लहान ते थोर, निर्मात्याचे नाव लिहिलेले असते, आणि सर्वांमध्ये त्याच्या सामर्थ्याचे वैभव दिसून येते.

**(३४) सर्व देवाच्या उद्धार पावलेल्या लोकांच्या ओठातून कोण गीत बाहेर पडेल जसे ते ह्या महान वादविवादाच्या परिणामावर चिंतन करतील?**

*आणि स्वर्गात, पृथ्वीवर, पृथ्वीच्या खाली व समुद्रावर जो प्रत्येक सृष्ट प्राणी आहे तो, आणि त्यांतील सर्व वस्तुजात ह्यांना मी असे म्हणताना ऐकले : "राजासनावर बसलेला ह्याला व कोकऱ्याला धन्यवाद, सन्मान, गौरव व पराक्रम हे युगानुयुग आहेत!" (प्रगटीकरण ५:१३)*

आणि सर्व सनातन काळचे वर्ष, जसे सरतात, अजून अधिक श्रीमंत आणि गौरवी देवाचे आणि ख्रिस्ताचे प्रगटीकरण पुढे व्यक्त करतील. जसे ज्ञान हे प्रगतीशील असते, तसेच प्रेम, आदरयुक्त भावना, आणि आनंद ह्यांची देखील वाढ त्यात होते. जितके अधिक लोक देवाबद्दल शिकतात, तितके अधिक ते त्याच्या चारित्र्याला न्याहाळतात. जसे येशू त्यांच्यासमोर उद्धाराच्या वैभवाला खुले करतो आणि सैतानाच्या बरोबर असलेल्या महान वादविवादात कसे अद्भुत यश मिळाले हे

सांगतो, उद्धार पावलेल्या लोकांची हृदये अधिक तत्पर आदर आणि समर्पणाने भारतात, आणि अधिक व्यापून टाकणाऱ्या आनंदाने ते तर सोन्याच्या वीणा वाजवतात; दहा हजार वेळा दहा हजार आणि असंख्य हजारो वाण्या एकत्रित येऊन स्तुतीगीते अर्पितात.

महान वादविवादाची समाप्ती झाली आहे. पाप आणि पापी लोक आता ह्यापुढे अस्तित्वात नाहीत. संपूर्ण विश्व हे शुद्ध आणि पवित्र आहे. अखंड निर्मितीतून सुसंगती आणि आनंद सर्वत्र धुमसतात. ज्याने सर्वकाही निर्माण केले, त्यातून जीवन आणि प्रकाश आणि आनंद अमर्यादित जागेच्या क्षेत्रातून वाहतात. सर्वात सूक्ष्म अणू पासून सर्वात थोर विश्वापर्यंत, सर्व गोष्टी, सृष्ट आणि निर्जीव, त्यांच्या सौंदर्यात आणि परिपूर्ण आनंदात, घोषित करतात कि देव प्रिती आहे.

*मी आभारी आहे, की प्रेमामध्ये, देवाने शास्त्रवचनातून महान वादविवादाचे जीवनदायी ज्ञान प्रगट केले.मला जाणीव होते कि अंतिम युद्धभूमी म्हणजे माझे हृदय आहे आणि ह्या वादाचा अंतिम मुद्दा म्हणजे माझी निष्ठा आहे.*

*गोल करा :     होय     अनिश्चित*

*मला आता समजते की, ह्या वादविवादाची सुरुवात कशी झाली, त्यात कोणते तत्व समाविष्ट होते,तो किती काळ चालेल, आणि त्याची समाप्ती कशी होईल. मी आभारी आहे की मला आता सैतानाच्या फसवणुकीची जाणीव झाली आहे  आणि आता ते कठोर निर्णय घेण्यास माझी तयारी आहे जे माझे सनातन भवितव्य निर्देशित करतील.*

*गोल करा :     होय     अनिश्चित*

*मी त्या सनातन काळातील वर्षांकडे पाहतो जे देव आणि ख्रिस्ताच्या ज्ञानाचे अधिक वैभवी आणि गौरवी प्रगटीकरण प्रस्तुत करतील.*

*गोल करा :     होय       अनिश्चित*

*माझी प्रामाणिक प्रार्थना आहे, "प्रिय प्रभू, मी माझे जीवन एक विनम्र अर्पण म्हणून देतो. तुझ्या कृपेने मला तुझ्या प्रतिरुपात बदलून टाक. हे जीवनदायी संदेश इतरांना सांगण्याचा आत्मविश्वास मला तू दे. तुझ्या पवित्र नियमशास्त्राच्या आज्ञेत राहण्यासाठी मला आवश्यक ते सुज्ञान आणि कृपा तू पूरव. कोणत्याही परिस्थितीत ह्या महत्वाच्या जाणिवेप्रत विश्वासू म्हणून टिकून राहण्याची शक्ती मला तू दे. प्रभू येशू कृपया लवकर ये!*

*गोल करा :     होय       अनिश्चित*